मधुराद्वैताचार्य

श्रीगुलाबरावमहाराजविरचित

सूक्तिरत्नावली यष्टी १८ वी

समयोपदेश

अष्टादश यष्टी : ग्रंथानुक्रम

१. बोधवाक्ये
२. सुवर्ण कण
३. ब्रह्मसूत्रांवरील निरूपणे
४. वेदान्त निरूपण
५. स्फुट निरूपण
६. सांख्यकारिका निरूपण
७. निरूपण
८. गुरुचरणकौमुदी
९. युक्त्या
१०. बालबुद्धिविवर्धिनी
११. मायर्स / समीक्षा
मायर्स / ग्रंथावरील टिपणे
१२. नागपुरातील चर्चा
१३. शिक्षणरत्नाकर
१४. हरिपाठाचा अर्थक्रम
१५. हरिपाठाच्या प्रतिज्ञा
१६. स्वसमाज सामान्य नियम
१७. वैद्यनंदिनी (आयुर्वेद)
१८. वैद्य वृंदावन (आयुर्वेद)
१९. भिषक्पाटवोपपत्ति (आयुर्वेद)
२०. अभंग (११)
२१. श्रौतक्रीडापट (कैवल्यपट / मोक्षपट : खेळण्याचे नियम)
* परिशिष्ट (मननार्थ उत्थाप्य शंका)

सूक्तिरत्नावली यष्टी १८ वी : समयोपदेश

१. बोधवाक्ये

॥ श्रीज्ञानेश्वर आई समर्थ ॥

भगवान म्हणाले, अर्जूना ! काम व क्रोध जिंकून टाकण्याकरिता मी तुला त्याचे स्वरूप काय आहे हे सांगतो. हे दोनच नाशाचे मूळ आहेत, हे काम क्रोध जिंकल्यामुळे मुक्तीकरता प्रयत्न करणे सुलभ जाईल. काम म्हणजे इच्छा होणे व क्रोध म्हणजे द्वेष.

सर्व पदार्थ परमेश्वराचेच आहेत. आपले म्हणून काही नाही. परमेश्वरालाच आपण आपले म्हणावे. आपण स्वतः परमेश्वराचेच अंश आहोत.

१. अग्नीची लहानशी ठिणगी वाळल्या गवताच्या गंजीवर टाकली असतां सगळ्या गंजीभर पसरते, परंतु ओल्या गवतावर तिची शक्ति चालत नाही;

त्याप्रमाणे जीव परमेश्वरापासूनच उत्पन्न झाले आहेत.ते जेव्हा या संसाररूपी गवताला वैराग्यानें शुष्क करून ज्ञानाने जाळून टाकतात तेव्हा परमात्माच उरतो.

२. मेघापासून पाण्याच्या धारा पडतात परंतु त्या तळ्यांतच साठवतात.

तद्वत् परमेश्वरापासून नाना धर्म व नाना शास्त्रे निघतात परंतु सत्पुरुषांचे हृदय तळ्याप्रमाणे खोल असल्यामुळे त्यांत ते एकत्र होऊन तेथेच धर्माचे रहस्य सांपडते.

३. मधमाशा पुष्कळ फुलांतला रस आणून मध तयार करून तो एका पोळींत सांठवतात व त्यावर बसतात. कोणाला तो रस घेऊ देत नाहीत. परंतु गाई आपल्या वासरांना पाजून दुसऱ्यांनाही दुध देतात म्हणून लोक मधमाशांना जाळून मध हिसकून घेतात व गाईचे पालन करितात.

त्याप्रमाणे जो श्रीमान् असून गरीबांना कांही देत नाही, त्याच्यावर लोक धाड घालून सर्वस्व हिरावून घेतात.पण जे स्वतः उपभोग घेऊन गरीबांना मदत करितात, त्यांना सर्वजण मदत करतात.

४. मनुष्ये सगळीच कामे शिकतात, तरी त्यापैकी एकएकाला एकएकच चांगलें करता येते, आणि ज्याला जे काम चांगले करता येते, तेच करावयास लाविले तर बरे.

त्याप्रमाणे जगात अनेक प्रकारचे धर्म आहेत. त्यापैकी आपल्या मनाला ज्याच्या योगाने चांगले वळण लागेल, असा धर्म सत्पुरुषाच्या मुखातून श्रवण करून त्याप्रमाणे आचरण करणे बरे.

५. अग्नि व पाण्याचा संबंध प्रत्यक्ष झाला तर अग्नि पाण्यानें विझतो, हे खरे, पण अग्नि व पाणी यांचे मध्ये पात्र असले तर अग्नि न विझता उलटे पाणी तापते.

तद्वत् आपल्याशी संसाराचा प्रत्यक्ष संबंध झाला तर आत्मा झाकून संसारच दिसतो, पण वैराग्याचा पडदा मध्यें असला तर विषयांतही आत्मानंदच दिसावयाला लागतो.

६ सूर्याचे प्रतिबिंब चिखलांत व पाण्यांत सारखेच पडते पण पाण्यात ते स्पष्ट दिसतें व चिखलात अस्पष्ट दिसते.

त्याप्रमाणें सर्व सृष्टीत आत्मा भरला आहे; पण वृक्षादि योनींत बुद्धि तमाने युक्त असल्यामुळे आत्म्याची स्पष्ट प्रतीति येत नाही.आणि मनुष्यशरीरात बुद्धि सत्त्वगुणाने जास्त युक्त असल्यामुळे 'मी आहे' अशा प्रतीतीने आत्म्याचे स्पष्ट ज्ञान होते.

७. आपण डोळ्याने पाहातो, कानाने ऐकतो.आपल्यास कानाने पाहतां येत नाही व डोळ्यानें ऐकतां येत नाही.एका इंद्रियाचे काम दुसऱ्यास करता येत नाही, यावरून अमुक इंद्रिय लहान व अमकें मोठे असें कांही एक नसून त्या त्या कामात ते मुख्य आहे.

तद्वत् कोणी परमेश्वराला कर्माने जाणतो कोणी योगाने, कोणी ज्ञानाने व कोणी भक्तीने जाणतो; म्हणून त्यात अमका गौण आहे व अमुक मुख्य आहे, असे मुळींच नसून त्या त्या योगांत ते ते श्रेष्ठच आहेत. कारण ते सर्व एकाच परमात्म्याला जाणतात.

८. आई आपल्या मुलाचें प्रेमाने स्तनपान देऊन नेहमी पालन करिते; परंतु मुलाने खोड्या केल्या असतां ती त्याला शिक्षा देते.

त्याप्रमाणे परमेश्वर आपल्याला सुख व बुद्धि वगैरे आपल्या कृपेनेच देत असतो. परंतु शिक्षा देतो, ती मात्र आपल्या पापाचे फळ म्हणूनच देतो.

आईची शिक्षा मुलाच्या खोड्या बंद करण्या-साठीच असतें. तसें आपले पातक दूर व्हावे व आपला रजस्तम स्वभाव निघून जावा, एवढ्याकरितांच परमेश्वराची शिक्षा असते. आपलें पुण्यकर्महि ईश्वराला अर्पण केल्यानेच पूर्ण होते. परमेश्वरावर निर्दयपणाचा दोष येऊं नये म्हणून पुण्य निमित्ताला आहे. वास्तविक परमेश्वर आपल्या कृपेनेच सुख व बुद्धि वगैरे देत असतो.

आपल्या आईची ममता आहे, म्हणून मुलानें जशा खोड्या करूं नये. त्याप्रमाणे परमेश्वराची आपल्यावर दया आहे असे समजून आपण पापाचरण करू नयें. कारण मुलाने खोड्या केल्या असता जशी आई शिक्षा देते, तद्वत् परमात्मा पाप करणाऱ्याला शिक्षा देतो.

९. फुलांचा सुवास नाकाला येतो व त्यामुळे आपणास आनंदहि होतो. परंतु तो सुवास कोठे नेता येत नाही. फुले जवळ ठेविली तर पाहिजे तेव्हा वासहि मिळतो व फुलेहि असतात.

तद्वत् जे लोक केवळ निर्गुण परमेश्वरालाच भजतात, त्यांना आनंद तर मिळतो, पण समाधीत गेल्याशिवाय वाटेल तेव्हा आनंद घेतां येत नाही. पण आपल्या भावनेंत सगुण परमेश्वर स्थापन केला म्हणजे पाहिजे तेव्हा सगुणाचाहि आनंद मिळतो व निराकार परमेश्वराचाहि आनंद मिळतो.

१०. वारा कोणाच्या ताब्यांतला नसल्यामुळे तो आभाळाला वाटेल तेथे नेतो व आणतो. तद्वत् माया जिंकली नाही तर वाटेल तेव्हा ती सत्त्वगुण उत्पन्न करितें व वाटेल तेव्हा रजस्तमोगुण उत्पन्न करिते.

११ वाऱ्याच्या सहाय्याने अग्नी भडकतो व आभाळ इकडे तिकडे नेऊन पाऊस पडण्यालाहि वाऱ्याची मदत लागते.

त्याप्रमाणे परमात्म्यांचे ज्ञान होण्याला सत्वगुणाची मदत लागते व संसारांतहि एखाद्यावेळी सत्वगुण साह्य देतो.

१२ आपले तोंड निर्मळ आहे की नाही, हे आपल्याला स्वतः पाहता येत नाही, तर आरशांत आपल्या मुखाचे प्रतिबिंब पाडून निश्चय करावा लागतो.

त्याप्रमाणे आपल्या अहंकाराचे दोष स्वतः आपल्याला दिसत नाहीत तर

आरशात तोंड पाहूनच जसें त्याचें दोष काढून टाकावे लागतात; तद्वत अहंकाराला मनापुढे कल्पून त्यांतले दोष काढून टाकावे लागतात.

१३. कोणत्याहि रंगाचा पदार्थ जाळला तर त्याची राख जशी पांढरी होते,

त्याप्रमाणें कोणत्याहि प्रकारचा मनुष्य असो, तो जर सत्संगात राहिला तर त्याचा सत्वगुणच वाढतो.

१४. पशूंच्या जाती पुष्कळ आहेत; तरी चार पाय असणे वगैरे काही काही लक्षणे जशी त्यांच्यांत समान असतात,

त्याप्रमाणे साधूंचे जरी पुष्कळ प्रकार असले तरी भूतांवर दया करणे, रागद्वेष नसणे इत्यादि लक्षणे त्यांच्यात समान असतात, व ते सर्व साधूंत समान सापडतात.

१५. उथळ पाणी असले तर आवाज जास्त होतो, किंवा जोराने वरून खाली पाणी पडत असलें तर आवाज जास्त होतो,

त्याप्रमाणे ज्यांच्याजवळ ज्ञान काहीच नसते, ते जास्त बोलतात किंवा जगाला ज्ञान देण्याकरिता जे परमेश्वराकडून अवतार घेऊन येतात ते सयुक्तिक पुष्कळ बोलून जगाला ज्ञान शिकवितात. मधल्या स्थितीतील लोक मात्र जास्त बोलत नाहीत.

१६. लांकडाने अग्नि पेटविला तर धूर असतो. लोखंड तापविले तर धूर मुळीच नसतो.

त्याप्रमाणे नुसते आत्मज्ञान झाले तरी वासनेचा थोडासा धूर मनाला दिसतो परंतु योगानें व वैराग्यानें ज्याचें ज्ञान दृढ होते तेथे वासनेचा किंवा कर्माचा धूर मुळींच नसतो.

१७. मातीच्या भांड्यात पाणी झांकून ठेविले तर ते निर्मळ आहे किंवा गढूळ आहे हे दिसत नाही. तेच काचेच्या भांड्यातील पाणी झाकून ठेविले तरी ते स्वच्छ आहे किंवा नाही हे आपणांस स्पष्ट दिसते,

त्याप्रमाणे मलीन अंतःकरणांत जे ज्ञान होते त्यांत काय चुका आहेंत हें दिसत नाही पण शुद्ध अंतःकरणातील चुका स्पष्ट समजतात व निर्मळ ज्ञानहि होते.

१८. आपल्याला जर वात-रक्ताचा रोग असला तर आपण आजचें मरण उद्यावर टाकीत असतो.आजच विष खाऊन मरण्याची इच्छा करीत नाही.

त्याप्रमाणे मोक्ष न मिळाला तरी न मिळो, पण संसार दुःखमय आहे.हे जाणून महात्मे तो टाकून देण्याचा प्रयत्न करीत असतात, मग त्यांना ब्रह्मज्ञान समजो किंवा न समजो.

२. सुवर्णकण

(अष्टादश यष्ट्यन्तर्गत पान – २९ – ३४ (समयोपदेश))

१९. पीक दोन प्रकाराने तयार होते.एक पावसाच्या पाण्याने व दुसरे कालव्याचे अगर पाटाने पाणी देऊन, पाऊस न आला तर दुष्काळ पडतो, व पावसावर अवलंबून राहणाऱ्यांना त्याचा परिणाम सोसावा लागतो.परंतु कालव्याने किंवा पाटानें पाणी देऊन जे लोक बागाईत पीक उत्पन्न करीतात, त्यांना कधीच दुष्काळाचा परिणाम भोगावा लागत नाही,

त्याप्रमाणे देव भेटेल तेव्हा भेटेल, एखादा ईश्वरी अवतार झाला असतां तो किंवा एखादा सत्पुरुष भेटून तो सर्वांना उद्धरून नेईल, या आशेवर जे विषयसुखांत काळ घालवितात, पण स्वतः प्रयत्न करीत नाहीत, त्यांना जन्मचे जन्म दुःखातच काढावे लागतात.परंतु जे स्वतः प्रयत्न करून परमेश्वर प्राप्ति करून घेतात, त्यांना परमात्मा याच जन्मांत मिळतो.

२०. नदी एकटीच वाहून समुद्राला मिळण्यापूर्वी मोठी होत नाही, तर लहानसहान नद्या बरोबर घेऊन मोठी होत होत ती समुद्राला मिळते.

त्याप्रमाणे आपल्याला महात्मा व्हावयाचे असलें तर आपण ब्रह्मनिष्ठ होऊन उपदेशानें जगाला ब्रह्मज्ञानी करीत करीत सर्वावर प्रेम करीत जावा म्हणजे आपल्याला महात्म्य स्वरूप मिळत जाते व प्रेमही वाढते.

२१. पतंगाला वारंवार हांकून दिले तरी तो दिव्यावर झडप घालतो. त्यात कधी कधी त्याच्या झडपीनें दिवा विझतो.कधी कधी दिव्याची आंच लागून तो स्वतः मरतो व कधी कधी दिवा विझतो व तोही मरतो.

त्याप्रमाणे महात्मे सांगत असूनहि जे लोक पुनः पुनः संसारात आसक्त होतात, *त्यांना त्यांच्या कर्मानें कधी कधी विषय सोडून जातात व ते राहतात.

*कधी कधी स्वतः मरून जातात व विषय राहतात व *कधी कधी ते व संसार अशा दोहोंचाहि नाश होतो.

२२. कासव व मासे हे जसें जलचर आहेत, तसे किडेहि पाण्यांतच उत्पन्न होतात. परंतु कासव व मासे किड्यांना खाऊन टाकून पाणी स्वच्छ ठेवितात, पण किड्यांच्या योगानें पाणी बिघडते.- त्याप्रमाणे चांगलेपणा व वाईटपणा हे दोन्हीहि मायेचेच धर्म आहेत तरी वाईटपणाच्या योगाने दुःख होते व चांगलेपणा ठेविला तर तो वाईटपणाला घालवून परब्रह्माचे ज्ञान करून देतो.

२३. जोराचा वारा असला तर एका ठिकाणचे आभाळ दुसरीकडे जाऊन दुसऱ्याच ठिकाणी पाऊस पडतो व तोहि चांगला पडत नाही, परंतु वारा नसला तर आभाळ स्थिर राहून एका ठिकाणीच चांगला पाऊस पडतो.

त्याप्रमाणे महात्मे पुरुष जे असतात त्यांनी आपली वृत्ति वेड्यासारखी चंचल ठेविली तर लोकांना त्यांच्यापासून आनंदामृताचा फायदा होत नाही; परंतु त्यांनी आपली वृत्ती स्थिर ठेवून जगाला उपदेश केला तर त्याला त्यांच्या सुखामृताचा फायदा होतो.

२४. समुद्रातील मासे नदीतील माशापेक्षा मोठे असतात; तरी त्यांना गोड पाणी प्यावयास मिळत नाही. खारे पाणीच प्यावें लागते.

त्याप्रमाणे लोकांना चमत्कार करून दाखविणारे साधू भगवद्भक्तांपेक्षा नांवालौकिकास जास्त चढतात. परंतु त्यांना परमात्मभक्तीचें खरे प्रेमामृत चाखावयास मिळत नाही. विषयरूपी दुःखच खावे लागते.

२५. ज्यांना पांघरूणाच्या योगानें थंडीचा बचाव करावा लागतो, त्यांना पांघरूण मिळविण्याची व ते बरोबर नेण्याआणण्याची खटपट पडते. परंतु ज्यांच्या अंगावर केस असतात, त्यांचा थंडीपासून बचाव होतो व पांघरूण मिळवून ते जवळ बाळगण्याच्या खटपटीतही पडत नाही.-

त्याप्रमाणे विषय भोगल्याशिवाय ज्यांना समाधान वाटत नाही, त्यांना विषय कसें प्राप्त होतील ही काळजी राहते.

परंतु जे आत्मस्वरूपाचे ज्ञान करून घेऊन समाधान मिळवितात, ते कितीहि दुःख आलें तरी त्याला जुमानीत नाहींत.

२६. मोठा एकच शत्रु असला तर त्याला कापून टाकतां येते. परंतु

चिलटे, माशा वगैरे लहान लहान पुष्कळ त्रास देणारे असले तर त्यांचा नाश करता येत नाही, व ते त्रास देतात त्यामुळे घर सोडून अंगणांत निजावें लागते.

त्याप्रमाणे आपल्या अंगात एखादाच मोठा दुर्गुण असला तर तो आपल्याला काढून टाकता येतो व प्रायश्चित्तहि घेता येते. परंतु लहान पुष्कळ दुर्गुण आपल्या आंगांत असलें तर तें आपल्याला समजत नाहींत व काढून टाकता येत नाहींत व ते फार त्रास देतात. ज्ञान होऊं देत नाहीत. कारण लहान लहान पुष्कळ असले तर एकट्या मोठ्याचे त्यांच्या पुढे कांही चालत नाही.

२७. थांबलेल्या पाण्यांत किडे होतात व त्यास दुर्गंधी सुटते. वाहत्या पाण्यांत किडे होत नाहीत व ते स्वच्छ असते.-

त्याप्रमाणे जो पुरुष परमार्थाचा एखादा मार्ग स्वीकारून त्यांत संतुष्ट राहतो, त्याला तो मार्ग शेवटी दुःखमय होतो व त्याच्यात पुष्कळ दोष राहतात. परंतु जो पुरुष दररोज आपल्यांत सद्‌गुणांची भर घालतो, त्याच्या आंगांत दोष राहात नाहीत व त्याला दुःखहि होत नाही.

२८. लहान मुलाने अपराध केला तर आई, चित् सहन करते; परंतु मोठ्या मुलाने अपराध केला तर ती त्याला ठोकून काढते. कारण त्याशिवाय त्याला आठवण राहात नाही.

त्याप्रमाणें अज्ञानी लोकांकडून अपराध घडला तर परमेश्वर,, चित् सहन करितो. पण ज्यांना शास्त्र वगैरेचे चांगले ज्ञान आहे त्यांचे हातून अपराध घडला, तर परमेश्वर त्यांना कधीहि क्षमा करीत नाही, तर प्रत्येक वेळी कडक शिक्षा देतो.

२९. जगामध्ये चार तऱ्हेचे लोक दिसतात -

(१) ज्यांना शास्त्र वगैरे कांहीच माहीत नाही. संसाराशिवाय कांहीच आवडत नाही. ज्यांना वाटते की एकदा प्राणी मेला की झाले, आत्मा वगैरे पुनर्जन्म कांहीच नाही.

(२) दुसरे विषयी. ज्यांना चांगले विषय मिळावे म्हणून स्वर्गाप्रीत्यर्थ यज्ञादि कर्मे करावीशी वाटतात.

(३) तिसरे जिज्ञासु. ज्यांना संसार मुळीच आवडत नाही, खरे काय आहे हे कळण्याची अति इच्छा असते.

(४) चवथे मुक्त. ज्यांना कशाचीच इच्छा नाही. जे ईश्वरांत मिळून गेले आहेत.

जिज्ञासूंचीच शास्त्र वगैरेकडे प्रवृत्ती असते. बाकी कोणालाच आवडत नाही. आता आपण निजून उठल्याबरोबर पहिले शौचेला जातो व नंतर तोंड वगैरे धुवून स्नान करतो, त्याप्रमाणे संसारातून सुटावयाचे असल्यास व आपण जिज्ञासू झालो तर पहिलें वाईट गुण टाकून दिले पाहिजेत व नंतर काय करावयाचे ते करावे.

३०. समज आपले घर झाडावयाचे आहे ते केरसुणीनेहि झाडतां येते व वाऱ्यानेहि झाडलें जाऊ शकते. पण केरसुणीने झाडल्यास व्यवस्थेशीर, कोठे मध्येच केर जमा न होतां, झाडलें जाते व वाऱ्याने एका बाजूचा केर दुसऱ्या बाजूला जमा हातो;

त्याप्रमाणे आपण आपले हाताने दुर्गुण काढले नाहीत व परमेश्वर काढील, म्हणून स्वस्थ बसलो तर दुर्गुण काही निघत नाहीत. ते तसेच राहतात. इकडचे तिकडे जमा होतात.

३१. मीठात किंवा गोमूत्रांत दोरी भिजविली व त्याला पदार्थ टांगून ती दोरी जाळली तरी पदार्थ तसाच राहतो;

त्याप्रमाणे ज्यांना वैराग्य झाले आहे व ज्यांना ज्ञान झाले आहे, ते जर परमेश्वरप्रेमाने भिजले नसले तर ज्ञानभिमानानें दुःख भोगीत राहतात.

३२. पाण्यावर तरंग उत्पन्न करता येतात व वाऱ्यानेहि उत्पन्न होतात

त्याप्रमाणे आपल्या मनात आपण स्वतः कल्पना उत्पन्न करतो व मायेच्या योगानेहि त्या उत्पन्न होतात.

३३. विहिरीचे पाणी कोठे खारे असते व कोठे गोडे असते व समुद्राचे पाणी बहुधा खारेच असते. पावसाचे पाणी सर्वात गोडे असते, त्याप्रमाणे

* साधारण मनुष्य कांही चांगले व कांही वाईट असतात.

* साधक म्हणजे जे परमेश्वराविषयी खटपट करतात ते बहुधा चांगलेच असतात.

* अभिमानी नेहमीच वाईट असतात व

* अवतारी सत्पुरुष जे असतात, ते कधीच वाईट नसतात. दुष्टांचा संहार करतात तरी त्यांच्या कल्याणाकरितांच करितात.

३४. खडकावर कितीहि बीज पेरले तरी व्यर्थ जाते, उगवत नाही त्याप्रमाणे मूर्खाला कितीहि सांगितले तरी व्यर्थ जाते.

३५. लहान मुलाचे पोषण आईच्या दुधाप्रमाणे गाईच्या दुधावरहि होऊ शकते, पण प्रेम मात्र आईसारखा कोणी करीत नाही.

त्याप्रमाणे संसार-प्रेम कोणतीहि देवता कोण्याहि योनींत देऊ शकते; पण परमेश्वर-प्रेम मात्र मनुष्य योनींतच मिळते.

३६. जितक्यांना जेवता येते तितक्यांना स्वयंपाक करता येतो, असा नियम नाही; पण जितक्यांना स्वयंपाक करता येतो तेवढ्यांना जेवता मात्र येते;

त्याप्रमाणे जितक्यांना समाधान पाहिजे असे वाटते तेवढ्यांनाहि मन जिंकता येते असे नाही पण जितक्यांना मन जिंकता येते तितक्यांना समाधान असतेच.

३७. आपले डोळे सर्व अवयवांमध्ये सर्वांच्या वर आहेत, त्यांच्यावर थोडेदेखील जाऊं शकत नाही; पण हात खाली असून डोक्यावर जाऊं शकतात. - त्याप्रमाणे देव जरी सर्वांच्यावर आहेत, तरी ते आपल्या वर जाऊं शकत नाहीत; पण मनुष्य जरी देवतांच्या खाली आहे तरी साधनांच्या योगाने स्वर्गाच्याहि वर जाऊन मुक्ति मिळवितात.

४०. लहानपणी मुलाचे काम आई करते. त्यांना स्नान घालते, जेऊ घालते, पण मोठेपणी मुलें वाईट निघाली तर ती आईबापाला सोडून देतात.

त्याप्रमाणे चित्ताला कितीही लाड करून विषय दिलेत तरी ते पुढे सोडून चाललें जाते.

४१. आई गोडाची लालूच दाखवून कडू औषध देते, पण गोड कांही

खाऊं देत नाही,

त्याप्रमाणे **सत्पुरुष चमत्कार दाखवून परमार्थाकडे ओढण्याचा प्रयत्न करतात पण संसारसुख कांही देत नाहींत; कारण त्याच्या योगाने मनुष्य संसारांत फसून नरकांत जातील.**

४२. म्हशीला मोठें शिंगं असतात पण लढाईत त्यांचा कांही उपयोग होत नाही. पण घोड्याला शिंग नसतात, पण लढाईत त्यांचा बराचसा उपयोग होतो.- त्याप्रमाणे पैशाच्या मदानें जे फुगले असतात, त्यांच्या सत्पुरुषांना कांहीच उपयोग नसतो पण जे बुद्धिमान असतात त्यांचा बराच उपयोग होतो.

०००

रुक्मिणी आईना सांगितलेली

३. ब्रह्मसूत्रावरील निरूपणे

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

युष्मदस्मत् . . . . भवितुं युक्तं

कोणताहि प्राणी जो म्हणून या जगात जन्म घेतो, तो कांही ना कांही तरी काम करीत असतोच. झाड, दगड इत्यादि जड पदार्थापासून तो तहत मनुष्यापर्यंत काही तरी काम करीत असतातच. झाड, दगड वगैरे जड पदार्थ काही काम करीत नसून रिकामे (स्तब्ध) बसतात, असे जरी आपल्याला दिसते, तरी वास्तविक तसे नाही. जसे भिंतीला लावलेले दगड, माती, चुना हेहि भिंत धरून ठेवण्याचे काम करितात. तात्पर्य, जगांतील कोणताहि पदार्थ रिकामा नसतो. तो काहींना काहीतरी काम करीत असतोच. कोणताहि पदार्थ कोणत्यातरी मार्गाने काम करीत असतो, ही गोष्ट मनुष्यांतच विशेषे करून समजून येण्यासारखी आहे. कारण आपल्याला मनुष्यपणाचा सर्वात जास्त अनुभव आहे. आता एक दृष्टांत सांगतो.

आपण जेव्हा पहिले घर झाडतो, तेव्हा फाटे दगड वगैरे जाड कचरा असतो, तो हाताने फेकून देतो. केरसुणीने काढीत नाही व साधारण बारीक

केर असतो तो केरसुणीने झाडून फेकून देतो व केरसुणीने न जाणारी अगदी बारीक रज्जी असली तर ती आपण पांघरुणाचे फटके मारून काढून टाकतो. याप्रमाणे घर झाडून अगदी साफ करण्याला तीन साधने लागतात. १ हात, २ केरसुणी व ३. फडके. लांकडे, फाटे, दगड वगैरे फडक्याने काढता येत नाहीत तर ते हातानेच काढून टाकावे लागतात. व बारीक रज्जी काढून टाकण्याचे काम हाताने होत नाही तर ती फडक्याचे फटके मारूनच काढावी लागते. यावरून असे दिसते की, जसे काम असेल तशी सामुग्री असली तरच ते काम होते, नाही तर होत नाही. अशीच आपले चित्त शुद्ध करण्याची पद्धति आहे. आता दुसरा दृष्टांत सांगतो,

लहान लेकरू खोड्या करितांना दिसले, तर त्याला मारून आपण त्याच्या खोड्या दूर करतो. व त्याच्यापेक्षा थोडा माझा मुलगा असला तर त्याला दटावून व रागे भरून व शिव्या देऊन त्याच्या खोड्या बंद करितो. व मुलगा फारच मोठा व समजूतदार असला तर त्याला दोन विचाराच्या गोष्टी सांगून किंवा डोळ्याने दाबून त्याला उपदेश करून त्याच्या खोड्या थांबवितो. असा साधाराण नियम आहे. लहान लेकराचे मन जास्त खोडकर असते, म्हणून ते मारल्याशिवाय ऐकत नाही आणि त्याने आपले ऐकावे म्हणून आपण त्याला ठोकतो, म्हणजे आपण त्याच्या मनालाच शिक्षा देतो. कारण झोपेत त्याला आपण ठोकत नाही. बरे त्याला मारल्याने त्याच्या मनाला शिक्षा होते कशी ? व त्यामुळे त्याचे मन वठणीस कसे येते ? याचे उत्तर हे आहे की, लहानपणी मन शरीरावरच अवलंबून असते म्हणून त्याला शारीरिक शिक्षा करावी लागते व मोठेपणी मन शरीरावर अवलंबून रहात नाही, म्हणून मनाला लाजविले म्हणजे काम होते. हा दृष्टांत सांगितला. दृष्टांताहून आपल्याला सिद्ध करावयाचा सिद्धांत निराळा असतो. जसे सोने तोलावयाचे असल्यास आपण दगडाचे वजन करतो. पण बाजारांत सोनेच विकतो. त्याप्रमाणे दृष्टांतावरून निराळा सिद्धांत समजून घ्यावयाचा असतो.

अज्ञानदशेत आपले चित्त जड संस्कारालाच फार चिकटून असते. त्याला जड वस्तूच खऱ्या वाटतात. जसे :- माझे एखादे पुस्तक फाटले किंवा हरवले तर मला फार वाईट वाटेल. कारण माझी पुस्तकावर अत्यंत प्रीति

आहे. परंतु माझ्या हातांतील सोन्याच्या पाटल्या कोणी नेल्या तर मला काही वाईट वाटणार नाही. कारण त्यावर माझी प्रीती नाही.

दुसरे उदाहरण :- महजत फोडली तर मुसलमानांला फार वाईट वाटते, तसे हिंदूला वाटत नाही, कारण मुसलमानाची महजतीवर फार प्रीति असते, व ते महजत अत्यंत पवित्र मानतात. तशी प्रीति हिंदूची नसते. परंतु हिंदूचे एखादे देऊळ फोडले तर हिंदूला फार वाईट वाटते, कारण त्यावर त्याची अत्यंत प्रीति असते; आणि हिंदूच्या देवळाबद्दल मुसलमानाला कांहीच वाटत नाही, कारण त्यावर त्याची मुळीच प्रीति नसते.

याप्रमाणेंच भांडी, कुंडी, घरदार, वस्त्रे, शरीर याला जेव्हा आपले चित्त फार चिकटून असते, तेव्हा मनाला बोध केल्याने ते शुद्ध होत नाही. ह्याकरिता शरीरानेच आपण आपले कर्तव्य कर्म योग्य रीतीने केले पाहिजे. उदाहरणार्थः-

स्त्रियांना पतिसेवा शरीरानेच केली पाहिजे; मनाने करता येत नाही. आता जसे जसे चित्त शुद्ध होत जाते, तसे तसे मनाने सांगितलेला बोध उपयोगी पडतो तरीपण शरीराने कर्म करणे सोडू नये. जसे फडक्याने घर झाडून साफ केल्यावरहि धूळ आत न येऊ देण्याविषयी सावध रहावे लागते; त्याप्रमाणे चित्त शुद्ध झाले तरी मरेपर्यत कर्म करीतच असावे, म्हणजे चित्त शुद्ध होते; आणि चित्त शुद्ध झाले म्हणजे मग दगडांत, झाडांत काय चालले आहे हे सर्व आपल्याला समजते. परंतु चित्त शुद्ध नसले तर अडथळे येतात. जेव्हा आपले मनच जर आपल्याला नीट समजत नाही, तर मग दुसऱ्याचे कसे समजेल ? वर सांगितलेच आहे, की ह्या जगांतील कोणताहि पदार्थ कोणत्यातरी मार्गाने काही काम करीत असतो. जसे :- गोट्याचे काम गोटाच करितो, म्हैस करीत नाही व म्हशीचे काम गोटा करीत नाही, तर म्हैसच करिते. तसेच झाडांचे कामहि म्हैस किंवा गोटा करीत नाही, तर झाडच करते आतो, आपण मनुष्यजन्म घेऊ, म्हणजे आपल्याला लौकर समजेल; कारण मनुष्यजन्माचा आपल्यास अनुभव आहे.

कोणतेहि काम करण्याचे दोन प्रकार आहेत. एक **औपपत्तिक** आणि दुसरा **अभ्यासिक.**(थियरॉटिकल व प्रॅक्टिकल). पहिले कोणतेही काम आपल्या मनांत येते व नंतर ते आपण बाहेर आणतो. जसे :- मुलाला टोपी शिवावयाची

असली तर प्रथम टोपी आपल्या मनांत येते व नंतर ती आपण शिवतो. कारण आपले मन ज्वरांत असले तर टोपी कशी शिवावी हे समजणार नाही. कारण पहिले टोपीचा आकार आपल्या मनांत तयार करितो व नंतर आपण टोपी शिवतो. मातीचा बैल तयार करावयाचा असल्यास, आपण प्रथम त्याचा आकार आपल्या मनांत तयार करितो. तेव्हा त्या बैलाच्या पायाला कांही शिंग लावीत नाही. तर जसा बैल पाहिलेला असतो, तसाच त्याचा आकार आपल्या मनांत तयार करितो. कुंभार सुरई करितो तेव्हा त्याच्या बुडाला छिद्र करीत नाही तर तो प्रथम सुरईचा आकार आपल्या मनांत तयार करून नंतर ती तयार करितो. आता आपण सुरई तयार करू म्हटले, तर ती आपणाला करिता यावयाची नाही; कारण आपण ती कधीच केली नाही. सुरईचा आकार आपणास मनांत तयार करिता येतो. परंतु हाताने आपण कधीहि सुरई तयार केली नाही म्हणून ती तयार करिता येत नाही.

याप्रमाणे कोणतेहि काम करावयाचे असल्यास, पहिले ते काम आपल्या मनांत येते व नंतर ते आपण हाताने तयार करितो. तसे परमेश्वराने जे हे जगत् केले आहे. ते असेच केले आहे. पहिले जगातले सर्व पदार्थ त्याच्या संकल्पात आले व नंतर त्याने ते बाहेर काढले. आपल्याला जगत् मनांत आणता येते पण बाहेर काढता येत नाही. कारण कुंभाराला सुरई करिता येते, तशी आपल्याला करिता येत नाही. कारण ती तयार करावयास आपण शिकलो नाही. पण सुरई आपल्याला मनांत आणता येते. बाहेर मात्र काढता येत नाही. कुत्र्याला घट करिता येत नाही. तसेच लहान लेंकरासहि करिता येत नाही. कारण त्यांच्या मनांत घट येतच नाही. यावरून असे ठरले की ज्याच्या मनांत पदार्थ येत नाही, त्याला तो करावयास शिकविता येत नाही. आता जगत् तर आपल्या मनांत येते. म्हणून ते तयार करावयास आपण शिकलो तर आपणास ते तयार करिता येईल. घटाचा आकर मनांत आणण्यास कुंभार व आपण सारखेच आहोत पण कुंभाराला घट तयार करिता येतो व आपणला करिता येत नाही. इतकाच भेद आहे.

त्याप्रमाणे मनाच्या दृष्टीने ईश्वर व आपण सारखेच आहोत. कारण ईश्वराच्या संकल्पांत जगत् आले व आपल्यालाहि जगत् मनांत आणता येते.

आता भेद काय तो करण्यातच राहिला व तो भेद काढून टाकावयाचा असल्यास आपण ते शिकलो म्हणजे काम झाले. ते शिकण्याकरिता आपण ईश्वर झालो पाहिजे तेव्हाच शिकता येईल. मनाच्या दृष्टीने पाहिले तर आपण ईश्वर आहोत. परंतु शरीराच्या दृष्टीने आपण ईश्वर नाही. कारण ईश्वराप्रमाणे आपल्याला जगत् करिता येत नाही. दुसरे, आपण ईश्वराशी मिळून गेलो नाही, म्हणून आपल्याला दुःख भोगावे लागते. कसे म्हणशील तर सांगतो.

मातीची भांडी तूं पाहिली आहेस. उन्हाळ्यांत ती तुला मनांत आणता येतात. पण तेवढ्यानं पाणी पिण्याचे काम होत नाही. म्हणून ती आपण कुंभाराकडून विकत आणतो. आता विकत आणलेल्या झारीचा तुकडा पडला, (ती झारी फुटली) तर ती आपण फेकून देतो व आपल्यास पाणी पिण्याची पंचाईत पडते. कारण झारी काही आपल्याला तयार करिता येत नाही. म्हणून पाणी पिण्याची अडचण सोसावी लागते. बरे कुंभाराकडे ती झारी नेली तर जुळत नाही. याप्रमाणे झारी तयार करता येत नसल्यामुळे आपल्याला दुसऱ्यावर अवलंबून रहावे लागते. तसेच आपण संसारांत असून आपली ज्याच्यावर प्रीति आहे, त्या सर्व वस्तू आपणास निर्माण करिता येत नाहीत. याप्रमाणे आपण परमेश्वराच्या स्वाधीन झालो आहो. कारण जगातील सर्व पदार्थ आपल्या मनांत येत असूनही आपण शरीरालाच चिकटून असल्यामुळे आपल्याला सुखदुःख, जन्ममरण येतात. पाणी पिण्याची अडचण पडू नये म्हणून जसे आपण झारी तयार करावयास शिकले पाहिजे, त्याप्रमाणे हे जगतही आपल्यास तयार करिता आले पाहिजे, व तेवढ्याकरिता आपण ईश्वर झालो पाहिजे. आणि ईश्वर होण्याकरिता देहावरून आपले मन काढून ते स्थिर करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.

२ मनाची व्यापकता

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

आता प्रथम थोडक्यात कालच्या प्रतिज्ञा सांगतो. या जगातील कोणताहि प्राणी निर्जीव असो किंवा सजीव असो, कोणते तरी काम केल्यावांचून रहात नाही. अमुक पदार्थ अमके काम करितो हे आपणाला इतर पदार्थापेक्षा मनुष्यातच जास्त समजण्याचा संभव आहे. कारण **आपण देहास जास्त चिटकून असल्यामुळे**

इतर पदार्थात काय चालले आहे, हे समजण्याची आपल्यात शक्ति नाही. घरातील जाड बारीक केर आपल्याला तीन प्रकारांनी काढून टाकता येतो. लाकडे, फाटे, दगड हातांनी फेकून द्यावे लागतात. त्यापेक्षा बारीक केर केरसुणीने झाडून टाकावा लागतो. व बारीक रज्जी फडक्याने फटके मारून काढावी लागते; म्हणजे घर अगदी स्वच्छ होते. लेकराला लहानपणी शारीरिक शिक्षा करावी लागते. मुलगा थोडा मोठा असल्यास त्याला रागे भरून, शिव्या देऊन त्याच्या खोड्या बंद कराव्या लागतात. व मुलगा मोठा समजदार असल्यास त्याला दोन शब्द सांगून किंवा डोळ्याने दाबून शिक्षण द्यावे लागते. कारण **जसे जसे मन शरीराला कमीजास्त प्रमाणाने चिकटून असते तशी तशी शिक्षा करावी लागते** कोणत्याही पदार्थाचा आकार मनांत आणता येतो पण तो पदार्थ तयार करिता येत नाही. त्याप्रमाणे हे जगत् मनात आणता येते, पण तयार करिता येत नाही. कारण ते तयार करण्याची आपणास शक्ति नाही. हे सिंहावलोकन झाले.

(युष्मदस्मत् . . .भवितुं युक्तम्) शरीराच्या दृष्टीने सर्वच आपण आहो; पण आपण ईश्वर मात्र नाही. आपले मन देहाहून वेगळे केल्याशिवाय आपण ईश्वरांत मिळत नाही. **जो मोठा असतो त्याचे मन शरीराहून दूर दूर होते व जो लहान असतो त्याचे मन शरीराला जास्त चिकटून असते.ज्याचे मन शरीरापासून जितके सुटले असेल, तितका तो मोठा आहे. असे समजावे.** आता सर्वापेक्षा मोठा ईश्वर आहे, म्हणून त्याचे मन शरीराला अगदीच चिकटून नसले पाहिजे.

दुसरा दृष्टांत सांगतो :- एका तांब्यात पाणी आहे, ते पाणी ताटात किंवा जमीनीवर टाकू म्हणजे पसरेल. कारण तांब्यात जागेचा विस्तार नाही. परंतु ताटात तांब्यापेक्षा जास्त विस्तार आहे; व ताटापेक्षाहि जमिनीवर जागेचा फार विस्तार आहे म्हणून पाणी जमिनीवर टाकले म्हणजे पसरून जाईल. त्याप्रमाणे आपण आपले मन देहात चोहोकडून दाबून टाकले आहे.

पुन्हा दृष्टांत सांगतो :- तिळाचे लाडू आपण तीळ कुटून दाबून करितो, ते तीळ पहिले पसरलेले असतात, तेव्हा त्यांना जास्त जागा लागते; पण त्याचा लाडू केला म्हणजे ते थोड्या जागेत राहू शकतात.

तसे आपल्या मनाचे अंश चोहोकडे जाणारे आहेत. त्याला आपण देहांत

दाबून टाकले आहे. म्हणून **आपण देहाच्या बाहेर मन काढले पाहिजे; म्हणजे ईश्वरांत मिळून जाऊ.**

(शंका) देहाच्या बाहेर मन काढले तर मनुष्य मरतो, अशी शंका करशील तर ती बरोबर नाही. कल्पना कर की, आपण तांब्यात पाणी आणले व ते एका जागेवर टाकले तर ते पाणी जमिनीवर पसरून जाईल. म्हणजे काय झाले? तर ते पाणी ज्या जागेवर टाकले होते तेथेही राहील व इतर जागेवरही पसरेल. परंतु तेच पाणी जर आपण उतारावर टाकले तर पाणी टाकलेल्या उताराच्या जागेवर ते राहणार नाही. तसे आपले मन मरणांत दुसऱ्या देहात जाते; पण मन देहाच्या बाहेर काढणे असे असते की, ते ज्या देहात असते तेथेही राहते व देहाच्या बाहेरहि जाते म्हणजे अर्थातच मन देहाच्या बाहेर काढले, म्हणजे मनुष्य मरत नाही. मरण हे एखाद्या मोरीसारखे आहे. मोरीत पाणी राहू शकत नाही. तेथे उतार असल्यामुळे पाणी दुसरीकडे जाते. त्याप्रमाणे मरणांत मन देहाला सोडून दुसऱ्या देहात जाते. देहातून मन बाहेर काढणे म्हणजे घरात पाणी टाकण्यासारखे आहे. घरात ज्या जागेवर आपण पाणी टाकतो, तेथेहि ते राहते व दुसऱ्या ठिकाणीहि पसरते. त्याप्रमाणे शरीरातून मन बाहेर काढले म्हणजे शरीरातहि मन राहते व इतर ठिकाणीहि राहते. नळातले पाणी आपण घेतले तरी ते तेथे असतेच. मोरीतले पाणी तेथे नसते. नदी समुद्राला जाऊन मिळाली तरी नदीत सर्वत्र पाणी असतेच. त्याप्रमाणे मरणांत दबलेले मनच दुसऱ्या देहात जाते.

आता वेदान्ताच्या रीतीने जे मन शरीरांतून बाहेर निघते, ते शरीरांतही राहते व सृष्टीतही व्यापून जाते म्हणून मनुष्य मरत नाही. दृष्टांतावर शंका संभवत नाही. पुन्हा दृष्टांत सांगतो. थिजलेले तूप ताटात ठेवले तर ते थोड्या जागेत राहते. तेच तूप पातळ केले तर सर्व ताटभर पसरून जाते, म्हणजे ज्या ठिकाणी तूपाचा गोळा ठेवला होता तेथेही तूप असते व सर्व ताटभरहि पसरते. त्याप्रमाणे देहात मन दबले असते. ते थिजलेले असते म्हणजे देहापुरतेच असते व वेदांतअभ्यासाने जेव्हा आपण मन पातळ करितो तेव्हा ते आपल्या देहात असतेच व सर्व सृष्टीतहि व्यापून जाते. थिजलेला तूपाचा गोळा आपल्यास हाताने नेता येतो. तूप तापलेले असले म्हणजे हाताने नेता येत नाही. ज्याप्रमाणे

देहातच मन असले म्हणजे काळ घेऊन जातो व मन पातळ केले म्हणजे सर्व सृष्टीत व्यापून गेल्यामुळे ते काळाला नेता येत नाही. म्हणूनच तत्त्ववेत्ते जे असतात, त्यांचे मन सृष्टीत व्यापल्यामुळे त्यांना जन्ममरण नसते. आपण म्हणतो की तुकाराम, रामदास वगैरे साधू होऊन गेले, ते आता नाहीत. परंतु असे समजणे बरोबर नाही.

तापलेल्या तूपाचे भांडे लाल झाले म्हणजे त्याला आपण हात लावीत नाही व तेव्हा आपल्याला बाहेर जावयाचे असल्यास कुत्र्याने तूप खाऊ नये म्हणून आपण दार लावतो. तेव्हा ते तूप आपल्यास दिसत नाही. त्याप्रमाणे सत्पुरुषाचे देह अदृश्य होतात. पापी लोकांना ते मेले असे वाटते व दार लाविले म्हणजे जसे तूप दिसत नाही; त्याप्रमाणे पापी लोकांना पापाचा पडदा असतो म्हणून सत्पुरुषांचे देह दिसत नाही. कवाड उघडले म्हणजे ज्याप्रमाणे तूप आहेच; त्याप्रमाणे पापी लोकांच्या हातून पुण्यकर्म होऊ लागले म्हणजे तेच सत्पुरुष पुनः दिसतात. याप्रमाणे **देहापासून मन निराळे केले असता मनुष्य मरत नाही.**

आता देहापासून ज्याचे मन निराळे होत नाही, तो मोठा होत नाही. व ज्याचे देहालाच फार चिकटून असते तो लहान हे सिद्ध झाले. जसे एक श्रीमान् गृहस्थ आहे, त्याने एखाद्या गरीबाला एक रुपया दिला व पुनः परतून घेतला, तर तो लहान मनाचा आहे, असे आपण म्हणतो. कारण त्याचे मन पैशाला चिकटून असते, म्हणून तो मोठा नाही. जसे जसे शरीराला मन जास्त चिकटून असते तशी तशी कडक शिक्षा द्यावी लागते. जसे लहान लेकराचे मन शरीराला जास्त चिकटून असते म्हणून त्याला आपण झोडतो. **लोकांचे नुकसान करणारे जे दुष्ट लोक असतात त्यांचा नाशच केला पाहिजे, कारण त्याला ठोकून काहीच उपयोग होत नाही.**

उदाहरणार्थ एखादा मुसलमान राजा दुष्ट असून गाईला मारणारा व लोकांना त्रास देणारा असला तर त्याचा नाशच केला पाहिजे. म्हणजेच शरीराला चिकटून असलेले त्याचे मन दूर होते, नाहीतर होत नाही. सत्पुरुषाचे मन शरीराला कमी चिकटून असते. आपणाला देहातून मन निराळे करावे लागते म्हणजे आपण ईश्वर होतो. व तेवढ्या करिता आपल्या मनाला जी जी

बंधने असतील ती आपण सोडली पाहिजेत.

मनाची दोन बंधने

ज्याच्या योगाने आपले मन शरीराला चिकटून राहते ते बंधन दोन प्रकारचे आहे. एक **फाजील बंधन व** दुसरे **जरूरीचे बंधन** या दोन बंधनामुळे शरीरांत आपले मन बंधन पावले आहे. १. फाजील बंधन म्हणजे ज्याची आपणाला जरूरी नसून आपण उगीच लावून घेतले ते. व २. ज्याची आपल्याला जरूरी पडते ते जरूरीचे बंधन.

आपण जेवलो नाही व पाणी प्यालो नाही तर आपली शक्ति क्षीण होते. म्हणून अन्न व पाणी हे जरूरीचे बंधन होय. चिलीम ओढणे, पान खाणे हे फाजील बंधन आहे. कारण चिलीम, पान यावाचून आपले काही अडण्यासारखे नाही. या दोन बंधनाने आपले मन शरीराला जखडून गेले आहे. या करिता आपण ही दोन्ही बंधने सोडली पाहिजेत, म्हणजे शरीराहून मन निराळे करिता येईल. पैकी, फाजील बंधन आपण पहिले सोडले पाहिजे व जरूरीचे बंधन नंतर सुटते. परंतु फाजील बंधनच ज्याच्याने सुटत नाही त्याच्याने जरूरीचे बंधन सुटणार कसे ! अर्थातच सुटणार नाही.

मी देह आहे रुक्मिणी हे नांव देहाला आहे. रुक्मिणी म्हणून कोणी हाक मारली तर तू ओ देतेस. कारण तुझे मन शरीराला बांधले आहे; म्हणजे **मी म्हणणे हे जरूरीचे बंधन आहे व माझे माझे म्हणणे हे फाजील बंधन आहे.** जसे माझे घर, आपल्या मुलाची टोपी तूं माझी म्हणतेस. वास्तविक ती टोपी तुझ्या जरूरीची नाही. अंगणांत पडलेले शेणहि जरूरीचे नाही. पण त्यालाहि तूं माझे म्हणून म्हणतेस. **यावरून ममत्व-माझेपणा ज्याच्यावर असतो ते फाजील बंधन होय. व मीपणा ज्यावर असतो, ते जरूरीचे बधंन होय.**

फाजील बधंन सुटण्याला **वैराग्य** म्हणतात. व

जरूरीचे बंधन सुटण्याला **अभ्यास योग** किंवा भक्ति म्हणतात.

आता अभ्यास आणि वैराग्य यांच्या योगाने ज्ञान कसे होते, ते उद्या सांगेन.

३. धर्म आणि अधर्म

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

ममत्व, हे फाजील बंधन असून ते सुटण्यास वैराग्य असले पाहिजे; व मीपण हे जरूरीचे बंधन असून ते सुटण्यास योग, वेदांत व भक्ति पाहिजे हे काल सिद्ध झाले. देहहि फाजील बंधनच आहे, कारण आपण काही देह नसून त्याला मी म्हणून मानीत आहोत. वास्तविक आपण ईश्वरच आहो. पण फाजील आणि जरूरीचे ही दोन्ही बंधने तोडल्याशिवाय आपल्याला काही ईश्वर होता येत नाही. म्हणून आपण ही दोन्ही बंधने तोडली पाहिजेत. पण **एखादा दुष्ट मनुष्य जर ठोकूनही ऐकत नसला तर त्याचा नाशच केला पाहिजे**. जर परमेश्वर सर्वांचा राजा आहे. व आपल्याला असलेली बंधने तोडून टाकली म्हणजे आपण ईश्वरांत मिळू व **आपली बंधने निःशेष नाहीशी करण्याकरीता आपण आपला विहितधर्म शरीराने आचरण केला पाहिजे.**

ज्याच्या योगाने पुण्य होते आणि मोक्ष मिळतो त्याला **धर्म** म्हणतात. व ज्याच्या योगाने पाप होऊन मोक्ष मिळण्यास अडथळा होतो त्याला **अधर्म** म्हणतात.

दृष्टांत सांगतो. ज्याने आपले पोट भरते, पोषण होते ते अन्न होय. गोड लागते, ते अन्न नाही. कारण बचनागहि चिक्कन सुपारीच्या खांडासारखा गोड लागतो. तो खाऊं नये; कारण ते विष आहे, म्हणून ते पोषक अन्न नाही.

आपले कल्याण करावयाची जो इच्छा करितो त्याला मित्र म्हणावे. जो गोड बोलतो तो मित्र नाही. कारण चोरहि गोड बोलतो; पण तो मित्र नाही. गरळ पडलेले अन्न मनुष्याने खाऊ नये. खाल्ले तर तो मरतो. त्याप्रमाणे **शुद्धधर्म असला तरच तो करावा व त्यात पापमिश्रित असले तर तो करू नये.**

धर्म स्वतःच्या बुद्धीने ठरत नाही. अन्नातले विष वैद्याला शोधून काढता येते, त्याप्रमाणे **धर्मात असलेले पाप सत्पुरुषांना समजते, म्हणून त्यांना विचारून ते सांगतील तोच धर्म आचरावा.**

शुद्ध धर्म आचरण केल्याने फाजील बंधन तुटते व जरूरीचे ज्ञानाने तुटते; म्हणून सत्पुरुषाच्या मुखांतून शुद्धधर्म समजून घेऊन त्याप्रमाणे आचरण करावे. लहान मुलाच्या हाती लाडू दिला तर तो विषाचा आहे की साखरेचा आहे हे त्याला ओळखता येत नाही. त्या प्रमाणे धर्म म्हणजे काय? व अधर्म म्हणजे

काय? हे अज्ञानी मनुष्य समजत नाही; म्हणून सत्पुरुषाच्या मुखांतून धर्माधर्म जाणून घेतले पाहिजेत. धर्माची गोष्ट अशी आहे की केव्हा केव्हा धर्मच अधर्म होतो व अधर्म धर्म होतो. जसे जेवण चांगले खरे; पण भूक लागली तरच. अजीर्ण असता जेवण चांगले नाही त्याप्रमाणे कोणत्या ठिकाणी धर्म अधर्म होतो व कोणत्या ठिकाणी अधर्म धर्म होतो, हे सत्पुरुषाकडून जाणून घ्यावे. जसे खरे बोलणे चांगले आहे; पण त्याने प्राणघात होत असल्यास ते चांगले नाही. एवढ्याकरिता आपला योग्य धर्म कोणता, हे सत्पुरुषाकडून जाणून घेऊन त्याप्रमाणे आचरण करावे.

४. अधिकारानुसार धर्म

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

धर्म सत्पुरुषाकडून समजून घ्यावा असे काल सांगितले; कारण, पुष्कळ वेळा असे होते की, धर्म अधर्मासारिखा भासतो व अधर्म धर्मासारिखा भासतो. गहू व त्याची कणिक ही एकाच प्रकारची असतात; पण आपण आपल्या आवडी प्रमाणे त्यापासून अनेक प्रकारचे पक्वान्न तयार करितो. त्याप्रमाणे धर्म हा स्वभावतः एकच आहे. पण अधिकारानुसार त्याचे अनेक प्रकार होतात. लहान लेकराला दूध पाहिजे. मुलगा थोडा मोठा झाल्यावर त्याला किंचित् अन्नही चालते व मोठा झाल्यावर त्याच पोट अन्नावांचून भरत नाही, असे आईला किंवा मोठ्या पुरुषाला जसे चांगले समजते, त्याप्रमाणे **सत्पुरुष ज्यांच्या त्यांच्या अधिकारानुसार धर्म ठरवून देतात.** ही अधिकारी पुरुषाची गोष्ट झाली; पण ज्यांना देहासक्ती फार असून संसारातच आनंद वाटतो, असा पुरुष आपल्या मतलबापुरताच धर्म घेतो व मतलबाचा नसतो तो सोडून देतो.

उदा. - कल्पना कर की, एका घरांत दोन मनुष्ये असून त्या दोघांच्या दोन बायका आहेत. घरचा सर्व कारभार बायकांच्या हाती आहे व घरात काम करण्याकरिता एक नोकर आहे, तर काय होते पहा – प्रत्येक स्त्री त्या नोकराकडून आपल्या मतलबाचे काम करून घेते, व ज्या स्त्रीचे काम तो नोकर चांगले करितो तीच त्याला नोकर चांगला आहे असे म्हणते. ज्या स्त्रीचे काम तो नोकर ऐकत नाही, ती काही त्याला चांगला आहे, असे म्हणत नाही.

–त्याप्रमाणे ज्यांना संसारासक्ती फार असते ते धर्मातून आपल्या मतलबापुरत्याच गोष्टी घेत असतात व मतलबाच्या नसतात, त्या सोडून देतात

आणि असा मतलबापुरता धर्म घेतल्यामुळेच एका धर्माचे नानाप्रकारचे पंथ झाले आहेत. उदाहरणार्थ :- **''सौत्र्यामण्यां सुरां पिबेत्''** ही श्रुती शाक्तांनी मतलबापुरतीच घेऊन शाक्त धर्मपंथ काढला.

तात्पर्य, शरीरासक्ति ज्यांना असते ते आपल्या पुरताच धर्म ठरवितात, व त्यामुळेच नाना प्रकारचे वाद होऊन अनेक पंथ निघतात, म्हणून ज्याला धर्म करावयाचा असेल त्याने आपली शरीरासक्ति सोडली पाहिजे.

शरीरासक्तीमुळे संसारातही बिघाड होतो. भाऊ असले तरी ते वेगळे होतात. मग परमार्थ कसा साधणार? त्याकरिता मतलबापुरताच धर्म काढून घेण्याचा जर प्रयत्न करणार नाही तर आपसांत फूट पडणार नाही. कारण **वास्तविक धर्म तर एकच आहे. धर्म म्हणजे ज्याच्या योगाने परमेश्वर प्राप्ति होईल तो !** आता परमेश्वरप्राप्ति आपल्याला कशी होईल हे पाहिले पाहिजे. आपण परमेश्वर झालो नसल्यामुळे आपल्या मनात जो साकार येतो, तो आपल्याला प्रत्यक्ष करता येत नाही. म्हणून आपण परमेश्वर प्राप्तीचा (म्हणजे परमेश्वर होण्याचा) प्रयत्न केला पाहिजे.

तूं जेव्हा लहानपणी आईबापाच्या येथे होतीस, तेव्हा तुला तेथले आडनाव होते व पुढे लग्न झाल्यावर सासऱ्याच्या घरच्या रीतिभाती तूं करू लागलीस. सासऱ्याच्या घरच्या रीतिभाती शिकूनच तूं त्या कुलात येण्यास योग्य होते व तुझे चित्तही दुसरीकडे न गेले पाहिजे, हेही तुला शिकवावे लागते. तेव्हाच तूं आपल्या कुलात येण्यास पात्र होतेस.

दुसरे - एक मनुष्य आहे त्याला जर कुत्री बायको करून दिली तर शोभत नाही. मनुष्य जातीचीच बायको पाहिजे व आपल्या घरांवाचून दुसरे घर न आवडले पाहिजे व घरच्या रीतिभातीही आल्या पाहिजेत. अशा तीन गोष्टी स्त्रीस आल्या म्हणजे ती गृहिणी होण्यास पात्र होते. त्याप्रमाणेच परमेश्वराकडे जाण्यालाहि तीन गोष्टी आवश्यक आहेत. **पहिले**, आपण परमेश्वराच्या जातीचे आहो की नाही हे समजले पाहिजे. **दुसरे,** परमेश्वराच्या ज्या रीतिभाति आहेत त्या आपण आपल्या आंगात आणल्या पाहिजेत. **तिसरे.** परमेश्वरावाचून इतर गोष्टी आपल्याला न आवडल्या पाहिजेत.

मन्याभाऊला मनुष्य जातीचीच पोरगी बायको करशील. कुत्रे किंवा

मांजराच्या जातीची करणार नाहीस. तसे जर आपण परमेश्वराच्या जातीचेच नसलो तर आपणास परमेश्वर प्राप्ति होणार नाही, बरे, आपण परमेश्वराच्या जातीचे आहो असे घेऊन चाललो, तर आपणास काही तसे दिसत नाही. कारण परमेश्वर सर्व जाणतो, व आपण तर मूर्ख आहो, अशी शंका येते. परंतु अशी शंका घेण्याचे कारण नाही, कारण आपण वास्तविक परमेश्वराच्या जातीचेच असून दुसऱ्या एका जातीशी संगत केल्यामुळे आपण मूर्ख झालो आहो. या जगात **जड व चैतन्य ह्या दोनच जाती आहेत.** जड म्हणजे ज्याला काही करता येत नाही ते, व चैतन्य म्हणजे ज्याला सर्व करता येते असे. या जडचैतन्याचे खरे लक्षण पुढे तुला समजेल - सध्या स्थूलारुंधती न्यायाने वर सांगितलेले लक्षणच लक्षात ठेव.

प्रेतकाली देहाला काही करता येत नाही. आपण असलो तरच देहाला कामे करता येतात. म्हणून आपली जडावर सत्ता आहे, असे ठरते. कारण आपण असलो म्हणजेच देह हालचाल करतो. प्रेतात आपण नसतो म्हणून प्रेत काही हालचाल करीत नाही; यावरून असे ठरते की, आपली सत्ता जडावर आहे. जडाची काही आपल्यावर सत्ता नाही, म्हणून जड हे काही परमेश्वराच्या जातीचे नाही, हे सिद्ध झाले आपल्याला स्वतः थोडे करिता येते म्हणून आपण थोडे तरी परमेश्वराच्या जातीचे आहोत असे ठरते. म्हणून आपण देहासक्ती सोडली पाहिजे व परमेश्वराची संगत केली पाहिजे. यालाच **ज्ञान** म्हणतात.

परमेश्वर दुष्टाला दंड देतो, सत्पुरुषावर दया करितो, न्याय करितो, खरे बोलतो ही परमेश्वराच्या घरची रीति आपण पाळली पाहिजे. खरे बोलणे, असत्याचा त्याग करणे, दया करणे, वगैरे परमेश्वराच्या आंगचे गुण आपल्या आंगात आणिले पाहिजेत सासऱ्याच्या घरच्या रीतिभातीप्रमाणे परमेश्वराच्या घरची रीत आपण आपल्या आंगात आणिली पाहिजे. व **परमेश्वरावांचून आपल्याला दुसरे काहीही न आवडले पाहिजे यालाच अनन्यभक्ति म्हणतात.**

या प्रमाणे **कर्म** म्हणजे रीति जाणणे.

उपासना म्हणजे परमेश्वरावाचून इतर वस्तु न आवडणे व

ज्ञान म्हणजे परमेश्वर आपणच आहो असे वाटणे.

ह्या तीन गोष्टी प्राप्त झाल्या म्हणजे आपल्याला परमेश्वरप्राप्ति होते. ती

कशी होते, हे उद्या सांगेन.

५

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

मागे तुला सांगितले होते की, आपल्याला परमेश्वरात मिळावयाचे आहे. आता आपल्यात व ईश्वरात काही तरी सारखेपणा पाहिजे तरच आपण त्यात मिळू शकू नाहीतर तसे करता येणार नाही. आपण जर ईश्वराच्या जातीचे नसलोच तर आपल्याला ईश्वरात कसे मिळता येईल? यासाठी पहिले आपल्याला पाहिले पाहिजे की आपण ईश्वराच्या जातीचे आहो किंवा नाही. आपण जर ईश्वराच्या जातीचे आहो तर मग आपल्याला ईश्वराप्रमाणे कां करिता येत नाही? आपल्यात काय उणेपणा आहे? इत्यादि गोष्टीचा विचार करून आपण कशाने ईश्वरात मिळून जाऊ हे समजले पाहिजे. हेहि मागे सांगितलेच आहे की, देह सोडून आपण ईश्वराच्या जातीचे आहो म्हणजे **जर आपल्याला देहाहून निराळे होता आले, तर आपण ईश्वरच आहोत.**

आता देहाहून निराळे होण्याकरिता आपल्याला धर्म केला पाहिजे. हे धर्माधर्म आपल्या बुद्ध्यनुसार ठरत नसतात. कल्पना कर निळकंठराव व विठ्ठलराव आहेत. यांच्यात भांडण आहे. आता एक तिसरा मनुष्य आहे. त्याला जर विठ्ठलरावने निरोप सांगितला तर तो जर निळकंठरावाच्या पक्षाचा असला तर निळकंठरावच्या फायद्याचा निरोप सांगेल. पण एखादा मनुष्य असा आहे की तो उदास आहे. त्याला दोघांशीही काहीच करायचे नाही, तर तो कशाला हातच्या गप्पा झोडील? जसा निरोप असला तसा तो त्याला सांगून देईल. त्याप्रमाणे आपल्याला विषयासक्ती फार आहे म्हणून आपण आपल्या मतलबापुरता धर्म काढून घेतो. कल्पना कर माझ्या एवढा एक मुलगा आहे. त्याला चोरी करू नये हे समजते, पण घरातल्या घरात चोरी करतो. तर तो काय वाटून चोरी करतो? विषयसक्तीमुळे घरी पैसे मिळत नाही, एखादी संवय प्रबल आहे व ती सोडवत नाही, म्हणून तो चोरी करतो. **आपण संसाराला जुळेल असा धर्म काढून घेतो.**

बापाने जर मुलाकरिता धन ठेविले तरच मुलाला वाटते की, बापाची सेवा करावी.– बापाला वाटते की, मुलाला काढून टाकले तरी कबूल; पण

मुलाचा धर्म आहे की, बापाच्या आज्ञेने मुलाने वागावे. - पतीला वाटते की, वाटेल तसे स्त्रीला वागविले तरी तिने पतीसेवाच करावी. मनुष्य आपल्या मतलबाप्रमाणे धर्माची चढाओढ करीतो. आपल्याला धर्म पाहिजे असतो, पण मतलबाप्रमाणे पाहिजे असतो.

कित्येक म्हणतात की, पुष्कळाच्या उपयोगाची जी गोष्ट आहे ती करावी. यात देखील सर्वाच्याच उपयोगी एकच गोष्ट पडत नसते. कोणाच्या तरी ती उपयोगी पडणार नाहीच व याच वर्गामध्ये आपण आलो तर ती करावीशी वाटणार नाही. म्हणून संसारी पुरुषाकडून धर्म समजावून घेण्यात अर्थ नाही.

जो निस्पृह आहे त्याच्याच पासून धर्म शिकावा. आप्तापासून धर्म शिकावा **आप्त म्हणजे जो निस्पृह व ज्याला दुसऱ्याच्या कर्तव्यावाचून कर्तव्य उरले नाही. ज्याला वैरी म्हणून मुळीच नाही, लोकांचे कल्याणच करावे,** असे ज्याला वाटते. चोर तर्काने राजाला अडवू शकतो की, 'तूं जसा गांवचे गांव बलात्काराने जिंकून राजा झाला, तसा मीहि एखाद्या घरी चोरी करून धन मिळविले आहे. पण फरक एवढाच की, तूं मोठा चोर व मी लहान चोर.'

पण हा लुोपणा आहे. – त्याप्रमाणे संसारी लोक लुोगिरीचा तर्क लढवून मतलबापुरता धर्म काढून घेतात. म्हणूनच वेदांमध्ये आप्तावर विश्वास ठेवण्याला सांगितले आहे.

कोण खोटे बोलतो? कल्पना कर एखाद्या घरची सर्व माणसे मेली; व एकटा मनुष्य जिवंत आहे त्याला जर खोटे बोलण्याला सांगितले तर तो म्हणतो ''आता मी कोणाकरीता खोटे बोलू?'' संकटामुळे ज्याचा संसार सुटला आहे असे लोकच जर खोटे बोलत नाहीत तर ज्यांनी आनंदाने संसार सोडला आहे ते लोक कशाला खोटे बोलतील? **ज्यांना संसारांत गोडी वाटते तेच लोक खोटे बोलतात.** म्हणून जोपर्यंत आपली बुद्धि निर्मल नाही व आपल्याला धर्माधर्म समजत नाहीत, तोपर्यंत सत्पुरुषाकडूनच ते समजून घ्यावे.

तो धर्म दोन प्रकारचा :- जी गोष्ट आपल्याला माहित आहे ती सांगितली तर काही सांगितली म्हणण्यात अर्थ नाही. पण जी गोष्ट माहीत नाही तीच सांगितली असता सांगितली म्हणावी. मुलाला खेळवणे शिकवावे लागत नाही. ते आपोआपच खेळू लागते. एखाद्या वेळेला मुलाला बाहेर खेळावयाला जाण्याला

सांगितले तर तो काही विधि किंवा शिकवण झाली नाही. ज्या गोष्टी माहित नसून शिकवितात त्याच गोष्टी शिक्षणांत गणल्या जातात.माहित असलेल्या गोष्टी शिकविणे किंवा करण्याला सांगणे म्हणजे नसुता अनुवाद करणे होय. **''अग्निर्हिमस्य भेषजम्''** हे सर्वांना माहित आहे पण शास्त्रांत सांगितले आहे, म्हणजे शास्त्रांत नुसता अनुवाद केला आहे. असे असण्यात शास्त्रांचा काहीतरी उद्देश असतोच. मुलाचा त्रास होत असला तरच आई मुलाला बाहेर खेळावयास जाण्यास सांगते त्याप्रमाणे विषयासक्त जे असतात त्यांनी विषयाच्या गुंगीत काही भलतेच करू नये -निषिद्ध आचरण करू नये - म्हणून संसार करावा असे सांगितले आहे. वेदात ही एकच त्या आप्ताची शिकवण आहे.

याप्रमाणे **अनुवादरूप व विधिरूप** असा दोन प्रकारचा धर्म आहे. त्यात विधिरूपधर्म नुसता वेदान्तच आहे. कारण वेदान्त म्हणजे देवाकडे जाण्याचा मार्ग. तो आपल्याला माहित नाही. व तो त्यात सांगितला आहे, म्हणून वेदान्तच विधिरूप धर्म आहे. वेदामध्ये कोठे ''सौत्रामण्यें सुरां पिबेत्'' इत्यादि प्रकारच्या श्रुति आहेत. त्या अनुवादपूर्वक असून विषयाला आळा घालण्याकरिता आहे. या विषयी भागवतात प्रमाण आहे.

लोके व्यवायामिषमद्यसेवा नित्यास्तु जंतोर्नहि तत्र चोदना ॥
व्यवस्थितिस्तेषु विवाहयज्ञसुराग्रहैरासु निवृत्तिरिष्टा ॥

एखाद्या वैद्याने मीठ भाजून खाण्याची व जुन्या मिरच्याचे तिखट खाण्याचे सांगितले तर ते काय समजावे ? वास्तविक खाऊच नये; पण नच राहवले तर अशा रीतीने खावे. लग्न करणे शास्त्राला सांगायला नको, पण सांगितले नसते तर कोणीहि स्त्री केली नसती, पण तसे न होऊ देण्याकरिता शास्त्राने लग्न करण्याला सांगितले. अति विषयी पुरुषाला बंधन पडावे म्हणून शास्त्राने लग्नादि विधि अनुवाद करून सांगितला आहे. **हा अनुवाद नसून विधि आहे असे म्हणणे विषयासक्त व आपमतलबी लोकांचे आहे.** याप्रमाणे धर्माधर्म आपल्या बुद्ध्यनुरूप ठरत नसून ते सत्पुरुषाकडूनच समजून घ्यावे. आता या धर्माचे दोन भाग आहेत. ते **ज्ञान** व **क्रिया** हे आहेत. ते पुढे सांगेन.

६.

॥ श्री ज्ञानेश्वर आई समर्थ ।

मागे सांगितलेच आहे की, ज्या गोष्टी आपल्याला माहित आहेत त्याच जर शास्त्रांनी सांगितल्या असल्या तर विधि होत नाही व मानू नये. आता काही गोष्टी अशा आहेत की, धर्माप्रमाणे दिसतात पण धर्मात मोडत नाही. उदा. दूध व दही दोन्ही पांढरेच दिसतात; पण दूध समजून दही खाल्याने चालणार नाही. त्याप्रमाणे पतिआज्ञा पाळणे हा धर्म आहे, पण कोणतीही आज्ञा पाळणे धर्म होणार नाही; तर चांगल्याच कामात पतीची आज्ञा पाळावी. ज्याच्या योगाने आपले सत्त्व वाढेल असे करावे. या विषयी एक गोष्ट सांगतो, पण हा परिप्लवार्थ आहे.

कथा

एक गुरु होता त्याला सरासरी ५० शिष्य होते. त्या गुरूला माणसे मारण्याची विद्या येत होती. ही विद्या शिकविण्याविषयी सर्वांनी गुरूला विनंती केली.एके दिवशी सर्वांना कोठून तरी गाईकरिता गहू वगैरे काही कापून आणण्याला गुरुजीने आज्ञा केली.

त्यापैकी २५ शिष्य जे गेले तर एका शेतात चांगला गहू होता तेथे आले व आपण हा गहू कापून नेला तर गुरु फारच खुष होतील असे जाणून त्या २५ जणांनी तो गहू कापला व बाकीच्या २५ जणांनी एका ठिकाणी जाऊन चांगलेसे गवत घेऊन आलेत. सर्वजण घरी येऊन पोहोचल्यावर, ज्यांनी गहू कापून आणिला होता त्यांनी गुरुपुढे हात जोडून,'' आम्ही उत्तम कोंवळा गहू कापून आणला'' म्हणून सांगितले.

तेव्हा गुरु कांही न बोलता, 'आणखी बाकीचे शिष्य कोठे आहेत'' म्हणून विचारले,

तेव्हा ते म्हणालेत ''गुरुजी ! त्यांनी नुसते गवतच आणिले म्हणून पुढे येण्याची त्यांना लाज वाटते.''

तेव्हा गुरूने सांगितले की, ''त्यांना बोलावून आणा'' व यांना सांगितले की, ''तुम्ही आपल्या घरी जावे. मजपासून तुम्हाला काही प्राप्त होणार नाही. तुम्हाला ही विद्या सांगितल्यास मनुष्य संहाराशिवाय दुसरा उद्योगच तुम्ही

करणार नाही.''

नंतर ज्यांनी गवत आणले होते त्यांना विद्या शिकविली व सांगितले की. ''तुमच्या अंतःकरणांत दया आहे म्हणून मी ही विद्या सांगतो.''

म्हणून ज्याच्या योगाने आपली सत्त्ववृद्धी होऊन वरवर चढत जाऊ, त्याला धर्म म्हणावे.

''धर्मो जगत्कल्याणधारकः''

वरच्या पायरीवर चढणे हेच धर्माचे लक्षण आहे. कोणताहि एकच आग्रहाने धर्म धरून ठेवू नये. ज्या रीतीने सत्त्ववृद्धी होईल तोच धर्म होय. भागवतात म्हटले आहे :-

''स वै पुंसां परो धर्मो, यतो भक्तिरधोक्षजे''

एका औषधीच्या योगाने गुण न आला तर ज्याच्या योगाने गुण येईल तेच औषध घ्यावे; **त्याप्रमाणे ज्याच्या योगाने उन्नति होईल तोच धर्म समजावा.** ज्याच्या योगाने परमेश्वरप्राप्ती होईल तोच धर्म होय. श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

गुरुसंप्रदाय धर्म । तेचि जयाचे वर्णाश्रम ॥ ज्ञाने.अ.१३

वर्णाश्रम धर्म आहेत तरी ज्याचा जो सांप्रदायिक धर्म असेल तोच खरा धर्म आहे. भागवतांतहि असे सांगितले आहे,

''धर्मः स्वनुष्ठितः पुसां विश्वक्सेनकथासु यः ।
नोत्पादयेद्यति रतिं श्रम एवहि केवलम्''॥ (भाग.स्कं.२)

मोठा धर्म करीत राहिलो व ईश्वर प्राप्ती झाली नाही तर काय उपयोग? गद्धचाप्रमाणे भारवाहक झालो म्हणावयाचे ? फुकट श्रम आहेत, फळ मुळीच नाही. कितीहि वाळु दळली तरी त्यापासून तेल निघावयाचे नाही. त्याप्रमाणे ज्याच्या योगाने ईश्वर मिळत नाही तो धर्मच नव्हे.

श्री एकनाथ म्हणतात :-

हरिप्राप्तीविण तप । शरीरशोषण अमुप ॥
तो पूर्वादृष्टे भोगी पाप । हरिप्राप्ती वांचून ॥

तप केले व ईश्वरप्राप्ती झाली नाही तर ते तपच नव्हे, व्यर्थ आहे.

श्रीधर म्हणतात :-

कृष्णप्राप्तिविण धर्म । तोचि तया पडला भ्रम ॥

श्रीतुकाराम म्हणतात :-

भगवंती घडे जेणे अंतराय । हो का बाप माय त्यजावे ते ॥१॥
येरा प्रिया पुत्र धना कोण लेखा । करीताती देखा हितशत्रू ॥२॥
प्रल्हादे जनक बिभिषण बंधु । तैसी माता निंदू भरते केली ॥३॥
तुका म्हणे सर्व धर्म हरीचे पाय । आणिक उपाय दुःख मूळ ॥४॥

गोपी व यज्ञपत्न्या यांनी पति सोडला, बळीनी शुक्र आज्ञा मोडीली व वामनांनी मागितल्याप्रमाणे त्रिपादपृथ्वी दान दिली. परमेश्वराचे ठिकाणी एवढी प्रीति उत्पन्न झाली पाहिजे की, पाण्याशिवाय मासोळी तळमळते त्याप्रमाणे ईश्वर प्राप्तिविषयी रात्रंदिवस तळमळ पाहिजे. हे उपलक्षणाने सांगतो. उपलक्षण म्हणजे दूध मांजरीला खाऊ देऊ नको म्हणजे दही खाऊ दे असा अर्थ नाही किंवा कुत्र्याला खाऊ दे असा अर्थ नाही.

प्रेमाशिवाय कोणत्याच रितीने ईश्वर मिळणे शक्य नाही. प्रेम उत्पन्न होण्याकरिता धर्म करावा व प्रेम उत्पन्न झाला म्हणजे धर्माचा आग्रह सोडावा. पण लोकांकरिता तरी धर्म केलाच पाहिजे व भक्तीत अडथळा येत असल्यास मात्र तो सोडून द्यावा.

तो धर्म दोन प्रकारचाः- वेदान्त व कर्म. हे आतां पुढे सांगीन.

७

॥ श्री ज्ञानेश्वर आई समर्थ ।

काल धर्म दोन प्रकारचा आहे असे सांगितले, ते हे. **१. कर्म** आणि २. **वेदांत.** पैकी पहिला धर्म कर्म आहे. रोगावर दोन प्रकारचा उपाय करावा लागतो. एक औषध घेणे व दुसरे पथ्य करणे. औषध घेतले पण पथ्य केली नाही तर काही उपयोग होत नाही व नुसती पथ्यच केली, औषध घेतले नाही, तरीहि काही उपयोग होत नाही. पथ्य करणे म्हणजे आपल्या जीभेला जी तेलकट, आंबट, तिखट वगैरे खाण्याची संवय लागली असते ती रोखणे. ही गोष्ट आपल्या स्वाधीन आहे. वैद्याच्या स्वाधीन नाही. वैद्याने पथ्य कर असे सांगितले, व ती आपण केली नाही, तर काही उपयोग होत नाही. कारण, जिभेच्या आवडीप्रमाणे तेलकट आंबट खाऊ लागलो, व पथ्य न केली तर औषध घेऊनहि

रोग जाणार नाही.

त्याप्रमाणे दोन प्रकारचा धर्म आहे. आपण सर्व जगतापेक्षा लहान झालो असल्यामुळे आपल्याला वारंवार अडचणी येतात व अडचणी आल्यामुळेच आपण परतंत्र झालो आहो व ईश्वर तर स्वतंत्र आहे, परतंत्र नाही, व आपल्याला परमेश्वरांत मिळून जावयाचे आहे म्हणजे आपण स्वतंत्र होऊ. हा एक धर्म. यालाच वेदान्त म्हणतात.

दुसरा धर्म म्हणजे **कर्म.** ईश्वरात मिळून जाण्याकरिता, विषयवासनेच्या योगाने आपल्या इंद्रियांना विषय सेवन करण्याची जी संवय लागली आहे, ती ज्याच्या योगाने तोडून टाकता येते, त्याला कर्म म्हणतात. चांगले कर्म केले म्हणजे वासना निवृत्त होतात. ज्याला जे विहित कर्म आहे ते आचरण केले म्हणजे वैराग्य होते. कर्मापासून तामस वैराग्य होते. धर्माने रजतम नाहीसे होऊन उत्तम वैराग्य होते, याकरिता विषयापासून आपल्या इंद्रियांची प्रवृत्ती रोखणे हेच आपले कर्तव्य कर्म आहे. अर्जुनाला भगवंताने गीतेत असेच सांगितले आहे की, 'अर्जुना ! तूं कर्म कर.' **भगवद्गीतेसारखे शास्त्र त्रिभुवनात नाही.** हा धर्म व वैराग्य आपणच संपादन केले पाहिजे. जसे, वैद्य आपणाला औषधी देतो, पण पथ्य आपल्यालाच केली पाहिजे. त्याप्रमाणे गुरु आपणास ईश्वरांत मिळून जाण्याचे ज्ञान देतात, परंतु योग्य धर्माप्रमाणे आचरण करून व वैराग्य संपादन करून आपणच आपली सुधारणा केली पाहिजे.

कल्पना कर की वैद्याने चांगली औषधी दिली पण रोग्याने कुपथ्य केली, तर दोष कोणावर? रोग्यावर. वैद्यावर दोष नाही. त्याप्रमाणे स्वतः जर आपले मन आपल्याल वळविता येत नसले तर ईश्वरावर बदनामी नाही. आपण जर कर्म चांगले केले नाही, व पुष्कळ वेदान्त ऐकला तर आपल्याला ज्ञान होत नाही. क्षयरोगावर पथ्य करावयास सांगितले नाही. कारण क्षयरोगी आधीच रोड झाला असतो आणि त्यावर पुन्हा कर्षण चिकित्सा (पथ्य) सांगितली, तर रोगी जास्तच रोड होईल. त्याप्रमाणे जो चांगला अधिकारी आहे, त्याला ब्रह्मज्ञानावांचून दुसरे ज्ञातर स्फुरतच नाही म्हणून सहज होण्यासारखे जे कर्म आहेत तेच त्याला सांगत असतात. त्याच्याकरिता निराळा धर्म सांगितला नसतो.

गीतेत भगवान् म्हणतात - अर्जुना ! आपला स्वतःचा जो धर्म आहे तो

दुसऱ्याच्या धर्मापेक्षा कितीहि दोषयुक्त वाटत असला तरी तोच करावा. तोच करणे उत्तम आहे. कल्पना कर की, अमुक एका रोगावर एक औषधि घेतली व ती कडू आहे, तरी पण तीच चांगली असते. कारण त्या रोगावर तीच औषधि चालते, दुसरी चालत नाही. – त्याप्रमाणे स्वतःचा धर्म कितीहि कठिण असला तरी तोच आचरण करावा. दुसऱ्याचा धर्म आचरण करू नये. नंतर सर्व धर्माचे फळ देवाने सागिंतले. त्यानंतर अर्जुनाने देवाला विचारले, देवा ! आपण सांगता तरी लोक भलत्याच मार्गाने का जातात ?

अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पुरुषः ॥
अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः ॥ गीता अ.३.श्लोक.३६

अर्थ :- स्वतःची इच्छा नसतांही मनुष्याला अधर्म करावयास कोण शिकवितो? या प्रश्नावर भगवान् सांगतात :-

काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः ।
महाशशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ॥ अ.३.श्लो.३७

आपल्याला स्वतःला कोणीच पापात टाकीत नाही. ईश्वरहि काही आपल्याला पाप करावयास लावीत नाही.

कल्पना कर की, पुरुषोत्तम वरून खाली उडी टाकू लागला. तर तू काय करशील ? त्याला धरून ठेवशील व जर जबरदसतीनेच उडी टाकू लागला, तर त्याला तूं रागे भरशील व ठोकशीलहि; कारण तुला माहित आहे की, त्याने उडी टाकल्यामुळे होणाऱ्या दुःखापेक्षा तूं मारल्याने होणारे दुःख कमी आहे. बरे, इतकेही करून, तुझी नजर चुकवून त्याने उडी टाकलीच, तर तुझा इलाज नाही. कारण तू काही त्याला उडी टाकावयास लाविले नाही. तर ती त्याने आपल्या मनानेच टाकली. तुझ्या मनांत पुरुषोत्तमचे बरे व्हावे ही इच्छा असल्यामुळे त्याचे जेणे करून वाईट होईल असे तूं त्याला शिकवीत नाहीस.

त्याप्रमाणे परमात्मा दयाळू आहे. तो जगाला वाईट करण्याला कधीहि शिकवीत नाही व परमात्मा जर पापी लोकांना जी शिक्षा देतो, तीही त्यांचा परमात्म्याकडील मार्ग बंद पडून त्यांनी जास्त अज्ञानांत पडू नये म्हणून देतो. परंतु परमात्मा कोणाला कधीहि वाईट करावयास शिकवीत नाही. तथापि मनुष्य जे स्वतः आपले वाईट करून घेतो, ते आपल्या हातानेच. वाईट काम

करण्याला त्याला दुसरा कोणीहि प्रवृत्त करीत नाही. तूं व पुरुषोत्तम निराळे आहेत. म्हणून तो उडी टाकू लागला. तर त्याला तूं धरू शकतेस. परमेश्वर व आपण (तू) निराळे नाही. तर स्वतः आपणच परमेश्वर आहो. पण आपण आपल्या स्वरूपाला विसरलो आहो व मी देह आहे असे मानीत आहो; म्हणूनच आपण कामक्रोधादि विकारांच्या स्वाधीन होतो व बंधन पावतो. वाईट कर्माचे फल देणारा दुसरा कोणीच नाही. स्वतः आपणच आहोत. म्हणूनच भगवान् अर्जुनाला म्हणाले, अर्जुना ! तूं स्वतःच आपले कामक्रोधादि विचार नाहीसे करून टाक.

ooo

४. वेदान्त निरूपण

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

वेदान्त हा केव्हाहि शिकविण्यावरच अवलंबून आहे व योग हा क्रियेवर अवलंबून आहे. कित्येक योगाने ब्रह्मज्ञान होते, असे म्हणतात. आता यांत कोणाचे म्हणणे खरे आहे, हे निवडून घ्यायला काय आहे? योगाने ज्ञान होते म्हणणारेहि महात्मेच आहेत. यांत मग खरे कोण? दोघेहि खरे बोलतात, असे घेतले तरी हे सिद्ध करणे अत्यंत कठिण आहे. कारण – कल्पना कर, एक मनुष्य म्हणतो की, परुळकराचे घर हर्द्याला आहे व दुसरा म्हणतो की, नाही, त्याचे घर भोपाळला आहे. यांत हे दोघेहि तुजपेक्षा वडील आहेत. मग यांत कोणाचे म्हणणे खरे मानता येईल? दोघांचेहि तर मानताच येणार नाही. हर्द्याला आहे म्हणणाऱ्याचेच म्हणणे खरे मानावे लागेल, कारण आपल्याला वस्तुज्ञान आहे. - एखाद्या बाईने म्हटले की मी कणकीत पाणी टाकून पोळ्या केल्या व दुसरीने म्हटले की, मी दूध टाकून पोळ्या केल्या, तर यांत खरे कोणाचे मानता येईल? दोघाचेही खरे मानता येईल. कारण पाण्यानेहि पोळ्या होऊ शकतात. पण घराची गोष्ट तशी नाही. म्हणून दोन महात्मे जेथे विरुद्ध बोलतात, तेथे त्यांचे बोलणे वस्तुविषयक असले तर समन्वय होऊ शकत नाही; पण क्रियाविषयक असल्यास त्या विरुद्धवाक्यांचा समन्वय होऊ शकतो. पण त्यातहि क्रियाविषयक वाक्यात योग्यता पाहिजे. – उदा. एकाने म्हटले की,

पाण्याने अग्नि पेटला व दुसरा म्हणतो की इंधनाने अग्नि पेटला, तर यांत पहिल्याचे म्हणणे चूक समजले जाईल. कारण पाण्याचे अंगी अग्नि पेटविण्याची योग्यता नाही. म्हणून जेथे क्रियाविषयक दोन विरुद्ध वाक्ये आहेत व त्यांच्यात योग्यता आहे, तेथे त्या वाक्याचा समन्वय होऊ शकतो.

पुनः आपण पाहतो की, क्रियेने जे जे होते ते ते आरब्धमाण असते. उदा. पोळी ती क्रियेने करतो. पहिले कणीक घ्यावयाची, नंतर भिजवावयाची, नंतर पोळपाटावर लाटण्याने लाटायची व नंतर तव्यावर घालायची, तेव्हा पोळी तयार हाते. जेव्हा कणीक घेतो तेव्हा पोळी नसते. मग त्यात पाणी वगैरे घालून पोळी करण्याला आरंभ करतो व नंतर तयार झाल्यावर खातो म्हणजे नाहीशी होते. याप्रमाणे ती आधी नसते व शेवटी नसते. मध्येच भासते म्हणून ती अनित्य आहे. याप्रमाणे प्रत्येक वस्तु क्रियेने आरभ्यमाण होते व ती आरंभ होण्याचे पूर्वीहि नसते व नंतरहि नसते, म्हणून अनित्य आहे.

''यद्यदारभ्यमाणं तत्तत् अनित्यं क्रियावत्वात् पोलिकादिवत्''

क्रियेने जी जी वस्तू होते तिचा तिचा आरंभ होतो व ती ती अनित्य आहे,

''यद्यदारभ्यमाणं वस्तु तत्तत् प्रागप्रतीतं प्रागभावत्वात् ॥''

आता योग काय आहे? योग म्हणजे चित्तनिरोध करणे. इकडचे चित्त काढून तिकडे लावणे. लावणे हे सर्व क्रियेने होते. म्हणून योगक्रियेने आरंभ होतो. आता योगाने आत्मा मिळतो म्हणावे तर त्याचा आरंभ पाहिजे. मग तो पूर्वी नसला पाहिजे.

यद्यदारभ्यमाणं तत्तत् प्रागप्रतीतं प्रागभावत्वात् पोलिकादिवत् ॥

आत्मा योगाने मिळतो तर तो आरभ्यमाण झाला व तो पूर्वी नसला पाहिजे. पण हे चूक आहे. आत्मा तिन्ही काली नाश पावत नाही. येथे योग चुकला आहे. जरी योगाविषयीचे म्हणणे महात्म्याचेच आहे. तथापि मोठेपणावर किंवा लहानपणांवर वस्तुविषयक ज्ञान अवलंबून नसते. वस्तुज्ञान सर्वांना सारखेच होते. क्रियाफल आरभ्यमाण असल्यामुळे ते अनित्य असते. परंतु आत्मा हा तिन्ही काळी असल्यामुळे तो नित्य आहे व म्हणूनच तो कर्माचे फल होऊ शकत नाही.

अर्थात् **आत्म्याला जाणावयाचे असल्यास ज्ञानानेच जाणले पाहिजे. योगाने**

आत्मा कळणे शक्य नाही. ज्ञान हे नेहमी वस्तुतंत्र असते, म्हणजे वस्तू जशी असेल तशीच ती ज्ञानाने कळते; परंतु कर्माची गोष्ट तशी नाही. ते वस्तुतंत्र नसून कर्तृतंत्र आहे, म्हणजे कर्म हे नेहमी कर्त्याचे इच्छेप्रमाणे होत असते. आपणाला मातीची वाटेल तशी बाहुली तयार करता येते. परंतु मातीपासून वडाचे झाड तयार करता येत नाही. कारण ते कर्मफल (यद्यपि ब्रह्मदृष्टीने जरी नाही, तथापि व्यावहारिक दृष्टीने) सिद्ध वस्तु आहे. त्याचप्रमाणे आत्मा हे कर्मफल नसून सिद्ध वस्तु आहे. त्यामुळे त्याला बदलविता येत नाही.

जीव हे भोवऱ्यातील किड्याप्रमाणे फिरून फिरून खाली येत असतात. जर एखाद्याने त्या किड्यांना छायेत आणून टाकिले, तर ज्याप्रमाणे त्यांना विश्रांती मिळते, त्याप्रमाणे तत्त्वज्ञानी पुरुषापासून जर जीवाला आत्मज्ञान झाले तर त्याला विश्रांति मिळते. ज्याप्रमाणे कोसला आपले भोवती कोष तयार करितो व स्वतःच आपणाला बांधून घेतो व शेवटी त्यातच मरतो, त्याप्रमाणे अज्ञानाने आपण स्वतःच पांच कोशात बद्ध झालो आहो. ते कोश कोणते आहेत, हे **ज्ञानाने** समजून घेऊन **योगाने** त्यांना काढून टाकावे.

''आधी आत्मयाते जाणावे । मग तयाते साधावे ।

येरवी नुसते अनुभवावे । काय धरूनी ॥८॥''(परमामृत अ.४ ओ.८)

ज्याप्रमाणे आपण नारळांत डोल आहे, हे समजले म्हणजे त्याला काढून घेतो, त्याप्रमाणे प्रथम वेदान्ताने पंचकोशा पलीकडे आत्मा आहे, हे समजून घ्यावे व नंरत क्रियेने त्या कोशांना दूर करावे. सारांश योगाने वरील पडदे दूर करावे व ज्ञानाने आत्मा मिळवून घ्यावा. डोल जर वाळला तर तो नारळाहून आलग निघून येतो, ओला असला तर तो निघून न येता नारळास चिकटून राहतो. तसेच वैराग्यादिकांनी ज्याचा शरीरावरील अभिमान सुटला आहे, तो जीवंतपणी देहाहून अलग राहतो. त्यामुळे त्याला जिवंतपणीच किंवा मेल्यावर केव्हाच भय नसते; परंतु जो देहरहित न होता मी धन्य झालो असा अभिमान धरतो, तो शरीर सोडल्यावर फार दुःख भोगतो.

कोश पांच आहेत. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय. पंचीकृत पंचमहाभूतांपासून उत्पन्न झालेल्या स्थूल देहास **अन्नमय कोश** म्हणतात. कर्मेंद्रिये व वायु (प्राण) मिळून **प्राणमय कोश** होतो. ज्ञानेंद्रिय व मन मिळून

मनोमय कोश होतो. ज्ञानेंद्रिये व बुद्धि मिळून **विज्ञानमय कोश** होतो, व केवळ सुख-समाधानाला **आनंदमय कोश** म्हणतात. आत्मा हा वरील पांचहि कोशाहून निराळा आहे, असा वेदान्ताचा सिद्धांत आहे.

१. चार्वाक अन्नमय कोशालाच आत्मा म्हणतात. तांबूलापासून जसा लाल रंग उत्पन्न होतो तसा पंचमहाभूतापासून आत्मा उत्पन्न होतो, असे त्यांचे मत आहे. परंतु त्यांचे हे मत बरोबर नाही. कारण समुदाय किंवा संघात नेहमी दुसऱ्या करिता असतो. विड्यातील रंग हा समुदायाने झालेला आहे. त्या समुदायाचा म्हणजे विड्याचा उपयोग विड्यांतील रंगाला करता येत नाही. विड्यातील रंग विड्यालाच खात नाही. जर आपण संघातापासून उत्पन्न झालो असतो, तर आपणाला त्या संघाताचा म्हणजे देहाचा उपयोग करता आला नसता; परंतु ज्याअर्थी आपणास देहाचा उपयोग करिता येतो, त्याअर्थी देहच आपण नसून त्याहून निराळे आहो.

२. चार्वाक मताचे खंडण दुसऱ्याहि रीतीने करिता येईल. जन्मापूर्वी व मरणानंतर देह नसतो. ज्याअर्थी देहच आत्मा आहे त्याअर्थी जन्मापूर्वी व मरणानंतर आत्मा राहात नाही, हे उघड आहे. आता जन्मल्यावर एकाला सुख, तर दुसऱ्याला दुःख कां होते? कर्माचे फळ म्हणावे, तर जन्मापूर्वी आत्मा नसतो, म्हणून सुख-दुःख विनाकारण मिळतात, असे म्हणावे लागते. लहान मुलाची आई मरून त्याला जे दुःख होते ते उगीच होते, असे म्हणणे भाग आहे. त्याचप्रमाणे आता काही करूनहि फायदा नाही, कारण ते भोगण्यास आपण मरणानंतर राहत नाही. म्हणून न करून फळ मिळणे व करून कांही एक न होणे असे मानावे लागते. परंतु सृष्टीत नियम दिसून येतो. माणसाला कधीच झाड फुटत नाहीत. तेव्हा वरील म्हणणे योग्य नाही. अशा रीतीने चार्वाकांच्या मताचे खंडन झाले.

३. काही चार्वाक इंद्रियात्मवादी आहेत. इंद्रिये हेच आत्मा असे त्याचे मत आहे. ते आपल्या मताच्या सिद्ध्यर्थ श्रुति व युक्ति यांचे एकदेशीय सहाय घेतात. ते म्हणतात, उपनिषदांत ज्याअर्थी इंद्रियांचा संवाद दिला आहे व त्याचे भांडण झाले, असे म्हटले आहे, त्याअर्थी इंद्रियांत चैतन्य असले पाहिजे व म्हणून इंद्रिये हेच आत्मा आहे असे सिद्ध होते. तसेच युक्तिपक्षांत त्यांचे असे म्हणणे आहे की,

जो पर्यंत इंद्रिये आहेत तोपर्यंतच जाणण्याची शक्ति आहे. इंद्रिये नसली म्हणजे जाणण्याची शक्ति नाहीशी होते. म्हणून इंद्रिये हाच आत्मा हे, युक्तीने सिद्ध होते. परंतु हे त्यांचे मत बरोबर नाही; कारण इंद्रिये पांच आहेत. ते जर आत्मा आहेत, तर एकाच शरीरात पाच आत्मे होतील व एकार्थग्रहण होणार नाही. डोळ्यांनी अग्नि पाहणे व त्वचेला चटका लागणे ह्या दोन्ही गोष्टी एकासच समजणार नाहीत. कारण त्वचा व डोळे हे दोन्ही निरनिराळे इंद्रिये आहे; परंतु असे होत नाही. ह्या दोहोंचेहि ज्ञान एकासच होते. म्हणून इंद्रिये आत्मा नसून तो त्याहून भिन्न आहे, हे सिद्ध झाले.

४. अर्वाचीन चार्वाक मेंदू एक इंद्रिय आहे, असे म्हणतात. मेंदू हा एक अक्रोडासारखा पदार्थ आहे. पण हे त्यांचे म्हणणे ठीक नाही; कारण असा प्रश्न उपस्थित होतो की, तो सर्वांगइंद्रियरूप आहे, अथवा एकांग-इंद्रियरूप आहे ? जर तो एकांग-इंद्रियरूप असेल, तर कानानेही जेवता यावो; पण तसे होत नाही बरे जर तो सर्वांग-इंद्रियरूप म्हणावा, म्हणजे त्यात निरनिराळ्या शक्ति आहेत असे म्हणावे तर ह्या सर्व शक्तींना जाणणारा कोणीतरी निराळा असला पाहिजे. तो मेंदूच आहे, असे म्हणता येत नाही.

५. हे म्हणतात सर्व ज्ञान बाहेरूप येत असते. आंत आत्मा म्हणून कोणी एक नाही, परंतु निरनिराळे ज्ञान जोडणारा जो ''मी'' तो कोठून येतो ? तो तर बाहेरून येत नाही, म्हणून हाहि वाद ठीक नाही.

६. अलीकडे एक बाई नाकाने व पाठीने पाहात असते. न्यायकर्ते अक्षपाद (गौतम) मुनीहि पायाने पाहात होते. ह्यावरून कोणी असे म्हणेल की, कोणतेहि काम कोणत्याहि इंद्रियाने होते. पण असे म्हणता येत नाही. एकाच ठिकाणी दोन शक्ति राहतील, पण त्या दोन्ही शक्ति एक होणार नाहीत. वास घेण्याची शक्ति व पाहाण्याची शक्ति कधीच एक होणार नाही.एका गोलकात दोन इंद्रिये राहू शकतील, पण ते दोन्ही एक होणार नाहीत. भाजीत तिखट व मीठ दोन्ही पदार्थ राहतात परंतु तिखट काही मीठ होत नाही. जरी ते एकाच ठिकाणी राहतात तरी ते दोनपणानेच राहतात. जरी ते दिसत नाहीत इतके एकरूप होतात तथापि ते आपसात भिन्नच असतात. पाण्यात उज्जन व प्राणवायु असे दोन वायु असतात. पण ते दोन्ही एक होत नाहीत. जर एक झाले असते तर दोन

नांवाची गरजच नसती. त्याप्रमाणे इंद्रियोत दोन शक्ति असल्या, तर त्या दोन्ही एके ठिकाणी राहतील पण एक होणार नाहीत. जिभेत चव घेणे व बोलणे ह्या दोन शक्ति आहेत; पण त्यादोन्ही एक नाहीत. जोपर्यंत मनुष्य बोलत असतो तोपर्यंत त्याला रूचि घेता येत नाही. दोन्ही शक्ति एकच होत्या तर तिखटाची चव घेतांना मनुष्य बोलत आहे असे म्हटले असते, पण तसे होत नाही; म्हणून शक्ति भिन्न भिन्न राहतात हेंच खरे असून, इंद्रिये एक आहेत हे म्हणणे बरोबर नाही.

७. सांख्यवादी मन एक इंद्रिय आहे असे मानतात. कांही चार्वाक हाच पक्ष घेऊन तोच आत्मा आहे असे प्रतिपादन करतात, पण ह्याहि मतांत काही अर्थ नाही. आपल्या नाहीपणाचे ज्ञान कोणालाच नसते. जर कांणी मेला तर तो स्वतः मी मेलो असे म्हणणार नाही. आंधळा मला दिसत नाही असे म्हणतो, म्हणजे इंद्रियाच्या नाहीपणाचे ज्ञान त्याला असते. जर मन हेच एक इंद्रिय नसून तेच आत्मा असते, तर इंद्रियाच्या नाहीपणाचे ज्ञान त्याला समजले नसते. ह्यावरून मन हे आत्मा नसून, तो त्याहून निराळा आहे, हे सिद्ध होते.

८. जर कोणी असे म्हणेल की, आपल्या नाहीपणाचे ज्ञान आपणाला होते, तरीहि आमचाच पक्ष सिद्ध होतो; कारण ह्या म्हणण्याने मेल्यावर आपणाला ज्ञान असते म्हणजे मेल्यावर आत्मा असतो हे सिद्ध होईल. वास्तविक पाहता स्वतःच्या नाहीपणाचे ज्ञान कोणालाच होत नाही. इंद्रियांच्या नाहीपणाचे जे ज्ञान होते ते त्याहून निराळ्यासच होत असते. त्याप्रमाणे इंद्रियआत्मवादीयांचे खंडण झाले. आता प्राणात्मवादी चार्वाकाचे मत खंडण करतो. त्यांचेच प्रमाणे वीजेला आत्मा मानणारे आहेत, ते पुढे सांगेन.

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

(भगवान म्हणतात, सर्व भूतांचे ठिकाणी जो मी एक आहे त्या माझे रूप जर व्हावयाचे असेल तर सर्व भूतांवर प्रेम करणे हे शिकले पाहिजे. माझे तीन प्रकारचे भक्त आहेत :- त्यात

''सर्वभूतेषु यः पश्येद् भगवद्भावमात्मनः॥
भूतानि भगवत्यात्मन् एष भागवतोत्तमः॥

सर्व भूतांचे ठिकाणी जो मला पाहतो तोच श्रेष्ठ आहे. आता तुला एक दृष्टांत सांगतो. जर पाणी प्यावयाचे असेल तर ते तसेच पातळ ठेवतो व पितो, पण हातात धरावयाचे असल्यास त्याचा बर्फ करावा लागतो, त्या प्रमाणे बाहेर परमेश्वराशी खेळण्याची इच्छा असल्यास, परमेश्वराच्या प्रेमाची इच्छा असल्यास, सगुण भक्ती करावी व हृदयात सगुण पहावे.

''गुरुमुखे जाणावे निर्गुण । आवडी करुनि भजावे सगुण ॥

आपल्या शरीरात एक वायु आहे. हे शरीर अन्नापासून उत्पन्न होते व त्यानेच वाढते व पुढे त्यातच लय पावते. अन्न म्हणजे पृथ्वी. आईबापाने अन्न खाल्ले नाही तर शरीर उत्पन्न होणार नाही.)

(पितृभुक्तान्न ...) आईबाप जे अन्न खातात त्याचे वीर्य व शोणित होऊन त्या वीर्य व शोणितापासून आपले शरीर बनते. हे अन्नमय शरीर आत्मा नव्हे. याहून तो निराळा आहे; कारण हे शरीर जर आत्मा म्हणावे तर ते पूर्वी नव्हते व पुढे नाहीसे होते व आत्मा तर नित्य आहे.

आता कित्येक असे म्हणतात की, सर्वच वस्तु अनित्य आहे मग आत्मा कोठला राहिला? अनित्य म्हणजे नाश पावणारे. यांना असा प्रश्न करावा की, आपण म्हणता की, सर्वच वस्तुचा नाश होतो, तर नाश होणे तरी नित्य आहे किंवा नाही ? सर्वच वस्तुचा नाश होतो हे कोणाला समजते ? सर्व वस्तुचा नाश झाल्यावर तो नाश पाहणारा कोणी तरी असलाच पाहिजे, तेव्हाच सर्व वस्तूचा नाश होतो, असे म्हणता येईल. ज्याचा त्यालाच नाश दिसणे शक्य नाही. जी गोष्ट नाश पावते तीला काही तरी आधार पाहिजे. आधारासहित सर्वच जर नाश पावते तर हे समजते तरी कोणाला? यावरून काही तरी नित्य मानल्याशिवाय होऊच शकत नाही व त्यालाच आपण आत्मा म्हणतो.

आता कोणी असे म्हणेल काहो ! पहाडांत एखादी वस्तु आहे, तुम्हाला माहित नाही, मग ती तरी तुम्हाला कोठे दिसते ? ती नाश पावली व कोणाला समजली नाही तर नाश पावली म्हणता येईल किंवा नाही ? आपल्याला माहित नसूनही वस्तू नाश पावते. एखाद्या पदार्थाचा नाश झाला असे आपण कशावरून म्हणाते की, सर्व जगत दिसते व ती वस्तू दिसत नाही, व पुन्हा त्या वस्तुचा नाश झाला तरी अधिकरण नाश पावत नाही. पृथ्वी वगैरे तशीच राहते. पण सर्वच

वस्तु नाश पावल्या व काहीच राहिले नाही तर सर्व वस्तूचा नाश झाला असे कसे ठरविता येईल? सर्वच वस्तु अनित्य आहे. हे जो जाणतो तोच आत्मा आहे. तो काही देह होऊ शकत नाही कारण देह नाशवंत आहे.

आता प्राणमय कोश आत्मा नव्हे,

वासना द्विविधा प्रोक्ता शुद्धाऽशुद्धेति भेदतः ॥
अशुद्धा महतां कोपात् शुद्धा महदनुग्रहात् ॥

तुला एक कथा सांगतो - कोणी जय विजय नावांचे दोघे भाऊ होते. ते ब्राह्मण होते. जोपर्यंत मायबाप जिवंत होते तोपर्यन्त एक जुटीने वागत होते. जय हा मोठा व विजय हा लहान होता. पुढे आईबाप मरण पावलेत. एके दिवशी ते दक्षिणेला गेलेत. तेथे त्यांना पुष्कळ धन मिळाले. पुढे रस्त्याने चालतांना जयाने विजयाला म्हटले की ''मी तुझा वडील भाऊ आहे. मला तू आपले द्रव्य दे.''

विजय परत जयाला म्हणाला ''मी तुझा लहान भाऊ आहे. लहानावर प्रेम करावे. आपल्या वाट्यांपैकी अर्धे धन दे.''

असे करता करता ते निकरावर आले व त्यांनी एकमेकाला शापिले. जयाने शाप दिला की, तू मगर होशील. विजयाने शाप दिला की, तू हत्ती होशील. पुढे परस्पर आपण आपल्याला शापून घेतले, असे पाहून वाईट वाटले व ईश्वराचा धावा केला. तेव्हा देत आलेत व त्यांनी सांगितले की, ''तुम्ही माझे भक्त आहात त्याअर्थी तुमचे वचन मी मोडू शकत नाही. आपापसांत दिलेला शाप तुम्ही भोगलाच पाहिजे.''

त्या शापामुळे पुढे एक मगर व एक हत्ती झाला. एकदा हत्ती एका सरोवरावर पाणी पिण्याकरीता गेला. त्याच तळ्यात तो मग होतो. पाण्यात हत्ती गेल्याबरोबर त्या मगराने त्याचा पाय धरला व काही वेळपर्यंत दोघांचा बराच झगडा झाला. पाण्यात मगराला विशेष जोर असल्यामुळे हत्ती अगदी त्रस्त झाला. त्या हत्त्याचे मूल वगैरे बाहेरच राहिले. कोणीच त्यापैकी त्याला साह्य करीना. शेवटी निराश होऊन त्यांनी ईश्वराचा धावा मांडला.

नसे ठावा ब्रह्मा न शिव अथवा श्रीपति हरी ।
हरी जो तापाते उचलुनि कृपासिंधुलहरी ॥
हरी वाटे काळा करिस विपती मृत्युभुजगा ।

जगाचा जो आहे धनि कवण तो पाव मजगा ॥ (वामन पंडित)

धांवा ऐकून लगेच देव तेथे आले व सुदर्शन घालून सोडविले.

नक्र बोले ऐके हृषिकेशी । नाम मात्रे तारिले गजेंद्रासी ।
काय कृपण झाले मजविशी । आता कैसा बा मोकलूनि जासी ॥१॥
कळले कळले गा देवपण आता । सोडी ब्रीद आपुले दीनानाथा ॥धृ॥
दीनानाथ म्हणविसी कशासाठी। द्वैतभाव का धरियेला पोटी ।
कैसे पाप लाविले माझे पाठी । तुझे रूप देखिले आजि दृष्टी ॥२॥
दीनानाथ बोलती वेदचारी । साधुसंत गाताती नानापरी ॥
सत्य ब्रीद मिरवत चराचरी । सोडी ब्रीद आपुले झडकरी ॥३॥
रजमात्रे तारिली अहिल्या शिळा । नामेकरूनि उद्धरिले अजामेळा ।
पापी कैसा मी सांग घननीळा । तुझे रूप देखिले म्या आजि डोळा॥४॥
न्याये ब्रीद घेईल तुझे आता । पापी कैसा मी सांग दीनानाथा ।
कैसे पाप मारिले माझे माथा । अझुनि लाज का नये तुझ्या चित्ता ॥५॥
नक्र बोले देवासी हासु आले । निंदा नव्हे स्तवन माझे केले ।
दीनानाथें तात्काळ उद्धरिले । विष्णुदास नामा कौतुक बोले ॥६॥

(नामदेव गाथा)

हा नक्राचा धावा ऐकून देवाने त्याचाहि उद्धार केला व दोघांनाही आपले द्वारपाळ केले. पुढे भगवान् सनत्कुमार एकदा श्रीविष्णूच्या दर्शनाकरिता वैकुंठास गेले, पण त्यावेळेला लक्ष्मी व विष्णु एकांतात असल्यामुळे भगवान् सनत्कुमाराला त्या जय विजयाने प्रतिबंध केला. भगवन् सनत्कुमार हे नेहमीच पांच वर्षाचे बाळ राहात असत व त्यामुळे यांना कोठेहि जाण्याचा प्रतिबंध नव्हता. तेव्हा भगवान् सनत्कुमार यांनी शाप दिला की ''तुम्ही राक्षस योनीत जन्म घ्याल.''

तेव्हा त्यांनी देवाचा धावा केला. देवानी सांगितले की, ''मी यांत काही करू शकत नाही. विनाकारणच त्यांना प्रतिबंध केला तुम्हाला शाप भोगलेच पाहिजेत.''

तेव्हा त्यांनी विचारले की, ''देवा आम्ही तुझी भक्ति कशी करावी.''

देव म्हणाले ''तुम्ही विरोधभक्ति कराल तर तीन जन्माने मला पावाल व प्रेमभक्ति कराल तर सात जन्माने मला पावाल.''

शेवटी त्यांनी विरोध भक्ति मागितली. ते पहिल्या जन्मी हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपु झालेत. दुसऱ्या जन्मांत रावण कुंभकर्ण झालेत व तिसऱ्या जन्मांत ते शिशुपाल व वक्रदंत झालेत.

आचार्य म्हणतात वासना दोन प्रकारची आहे :- शुद्ध व अशुद्ध. **अशुद्ध वासना महात्म्यांच्या कोपामुळे उत्पन्न होते.** उदा. जय विजय यांनी प्रेमभक्ति कबूल केली असती तर काय झाडले असते, पण महात्म्यांचा कोप होता म्हणून त्यांना विराधेभक्ति करून वैकुंठात जाण्याची इच्छा उत्पन्न झाली. प्रेमाची आवडी नव्हती. त्याचप्रमाणे शुद्ध वासना सत्पुरुषाच्या कृपेनेच उत्पन्न होते. प्रल्हाद दैत्यकुळात उत्पन्न झाला असूनहि श्री नारदांच्या कृपेमुळे त्याला ईश्वराच्या प्रेमाची आवडी होती. परमेश्वर जवळ असून प्रेम उत्पन्न होते असे नाही. जय विजय नेहमीच जवळ राहात होते. व तसेच दुर्योधनाच्या जवळी देव पुष्कळ राहात होते. ईश्वराचे ठिकाणी प्रेम महात्म्याच्या कृपेनेच उत्पन्न होतो. या जयविजयांना तिसऱ्या जन्मांत मुक्ति झाली पण रावण कुंभकर्ण हे मेले तेव्हा त्यांच्या तोंडातून ज्योति निघून रामाच्या तोंडात गेली, तशीच शिशुपाल वक्रदंत यांच्या तोंडातून ज्योति निघून श्रीकृष्णाच्या तोंडात गेली असे आहे.

पहिले तर रामअवतारात मिळालीच होती, मग जन्मास कसे आहे ? रामांत ज्योति मिळाल्यावर पुन्हा जर जन्म झाला तर श्रीकृष्णात ज्योति मिळाल्यावर पुन्हा जन्म होणार नाही कशावरून ? पुन्हा रामअवतारातले त्याचे कर्म कृष्णअवतारात संपले असे म्हणात येत नाही.

याचा अर्थ असा :- त्यांच्या तोंडातून ज्योति निघून रामात मिळाली ती त्यांना सायुज्य मुक्ति मिळाली पण वासनावशाने पुन्हा श्रीकृष्ण अवतारांत जन्म घ्यावा लागला. ही ज्योति आत्मा नव्हे, कारण आत्मा व्यापक असल्यामुळे याच्या तोंडातून निघून त्याच्या तोंडात जाऊ शकत नाही. ही ज्योति हिरण्य गर्भाचा प्राणमय भाग आहे. हिरण्यगर्भातील राजसभाग प्राण आहे. सात्विक भागाला जीव म्हणतात. तो कंठदेशी असतो. तो सात्विक असल्यामुळे त्याच्यामध्ये आत्म्याचे प्रतिबिंब पडते. त्याला प्राणधारकजीव म्हणतात. तो मृत्युच्या वेळेला तेजात लय पावतो व वाक् मनात लय पावते व तेव्हा जीव दुसऱ्या ठिकाणी निघून जातो. ही ज्योति आत्मा नव्हे. हा प्राणधारक जीव होय. काल अन्नमय देह आत्मा

नव्हे असे सागिंतले. तसाच हा प्राणमय कोशही आत्मा नव्हे. आता हा प्राणधारक जीव आत्म्यांत कसा मिळवावा हे उद्यां सांगीन.

०००

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

निळकंठरावांना सांगितलेले

५. स्फुट निरूपण

विषयापासून सुख नाही. विषयावर मन एकाग्र झाले म्हणजे आपला आनंद प्रतिबिंबित होतो व तो आनंद आपण विषयाचे ठिकाणी आरोपित करतो. जशी एकादी स्त्री गळ्यांत नथ अटकवून ती विसरल्यामुळे इकडे तिकडे तिच्या शोधार्थ फिरते; त्याप्रमाणे आपण आपल्या आत्मविस्मृतिमुळे सुखासाठी भटकत फिरतो. व विषय सुख देणारे आहे असे समजून ते प्राप्त करून घेण्याची खटपट करितो. पूर्ण सुख या जगांत कोठेच नाही. ते एका मोक्षाचे ठिकाणी मात्र आहे. हा मोक्षाचा मार्ग गुरु साधनचतुष्टयसंपन्न शिष्यासच सांगतात. शिष्याने साधनचतुष्टयसंपन्न गुरुवांचूनच झाले पाहिजे. १. विवेक, २. वैराग्य, ३. शमादि षट्क व ४. मुमुक्षा. हे साधनचतुष्टय शिष्याने आपल्या सामर्थ्यानेच गुरुच्या बळाशिवाय प्राप्त करून घेतले पाहिजेत.

विवेक = (सांख्य शास्त्र नव्हे) नाशवंत काय आहे व अविनाशी काय आहे, हे समजणे.

वैराग्य म्हणजे या लोकचे व परलोकाचे भोगाचे ठिकाणी आवडी नसणे. या लोकांच्या भोगाविषयी इच्छा ठेवल्यास दुःख तसेच राहते व तसेच परलोकाच्या भोगाविषयीहि इच्छा ठेवल्यास होते.

शम = मनोनिग्रह.

दम म्हणजे बाह्येंद्रिय निग्रह,

तितिक्षा = शीतोष्ण सुखदुःख इत्यादि द्वंद्वे सहन करणे,

उपरम = एकवेळ विषयावरून काढलेली वृत्ति पुन्हा विषयावर न जाऊ देणे.

श्रद्धा = शास्त्र व गुरुवाक्य यांचे ठिकाणी विश्वास.

समाधान = फल होवो किंवा न होवो, कर्तव्य पराङ्‌मुख न होणे.

मुमुक्षा = जन्ममृत्युपासून सुटण्याची तीव्र इच्छा.

जर शिष्य चांगला नसला तर त्याला सद्गुरुपासूनहि कांही फायदा होत नाही. शिष्याला या साधनचतुष्टयापैकी वैराग्य व विवेकमात्र दृढ असला पाहिजे.

सांख्याने विवेक करता येतो, **योगाने ध्यान** करिता येते, व **वेदांताने ज्ञान** होते.

आत्मा काय आहे व अनात्मा काय आहे हे समजण्याला **विवेक** उपयोगी पडतो.

विजातीय वृत्तीचा तिरस्कार करून सजातीय वृत्तीच येऊ देणे याला **ध्यान** म्हणतात.

माझ्यासुद्धा जग वगैरे काही एक नसून केवळ ज्ञानमय आत्माच चोहोकडे भरला आहे असे समजणे, याला **ज्ञान** म्हणतात.

जोपर्यंत आपण भावना करितो तोपर्यंत ध्यान असते; म्हणून ध्यान हे भावनातंत्र आहे व ज्ञान हे वस्तुतंत्र आहे. हेच पुढे विस्ताराने सांगेन.

काल ज्ञान हे वस्तुतंत्र असून, ध्यान हे कर्तृतंत्र आहे, असे सांगितले होते. म्हणजे ध्यान, करणाऱ्याच्या इच्छेवर अवलंबून असून ज्ञानामध्ये वस्तु जशीच्या तशीच येते. ध्यानांत आपण कुत्र्याला शिंगेहि लावून देऊ शकतो. पदार्थाचे ज्ञान होण्याविषयी दोन मते आहेत.

१. इंद्रियाच्या द्वारे वृत्ति बाहेर निघून पदार्थाचे अज्ञान नाहीसे करते व नंतर कूटस्थ ज्ञान करून घेते.

२. दुसरे मत पारकीय लोकांचे आहे. ते म्हणतात पदार्थाचे कल्लोळ (व्हायब्रेशन्स) डोळ्याच्या द्वाराने मेंदूत जाऊन पुनः तेथेच परतून येतात व मग पदार्थाचे ज्ञान होते.

पण येथे एक मोठी शंका आहे. एकदा त्या वस्तुकडे लक्ष नसले तर त्यापासून कल्लोळ उत्पन्न होऊन आपल्या इंद्रियावर पडले, तरी ज्ञान होत नाही व आपण म्हणतो की माझे तिकडे लक्ष नव्हते.

दुसरे पदार्थाचे कल्लोळ मेंदूत जातात म्हणजे काय? त्या पदार्थाचे परमाणु जातात किंवा आपल्या मेंदूवर त्याचे ठसे उमटतात? परमाणु जातात

असे म्हटले तर ते एकत्र जमून मेंदू फुटला पाहिजे व ठसे जातात म्हटले तर मेल्यावर मेंदू पाहिल्यास दिसत नाहीत; म्हणून आपल्याकडील मतच पसंत आहे. आता वृत्ति बाहेर कशी निघते, हा दोघांनाहि प्रश्न आहे. ज्ञान म्हणजे जसा पदार्थ आहे तशी वृत्ति होणे.

उदाहरणार्थ :- खांब मनांत आणतांना भिंत मनात येत नाही. ते ज्ञान मिळविण्याकरिता साधन पाहिजेत.

उत्क्रांतिवादाचे खंडण

जंतूनां नरजन्म दुर्लभतमम् । अर्थ :- जगतातील सर्व प्राण्यांमध्ये मनुष्यजन्म दुर्लभ आहे, कारण पापपुण्य समान असल्यास हा जन्म मिळत असतो.

येथे एक दुसरे मत आहे. ते उत्क्रांतिवादियांचे आहे. ते म्हणतात - नेहमी जगाची वाढ होत असते. म्हणजे पहिले पृथ्वीपासून झाडे उत्पन्न होतात. पुढे त्यापासून कीटकादि प्राणी उत्पन्न होतात. पुढे त्यापासून अमिबा, वानर वगैरे होतात. व अशा प्रकारे वाढता वाढता त्यांची वाढ मनुष्य देहात पूर्ण होते.

हे मत अगदी गचाळ व चुकीचे आहे. कारण यांना आपण प्रश्न करू की

१. ही वाढ नेचरनेंच होते किंवा या जगावर कोणाचा ताबा आहे म्हणून होते?

२. नेचरनेंच म्हणजे स्वाभानेच होते म्हटल्यास तो स्वभाव स्वतंत्र आहे किंवा परतंत्र आहे ?

३. स्वतंत्र म्हणावा तर मग उत्क्रांति होते म्हणणे शोभत नाही. कारण स्वतंत्र मनुष्य वाटेल तसे करू शकतो, म्हणून नेचर वाटेत तेव्हा वाटेल ते रूप धरू शकेल.

४. अशा प्रकारेच उत्क्रांति होते, हा नेचरच आहे, असे म्हणणे म्हणजे आम्ही विचारतो तेच उत्तर देणे झाले. जसे गम् धातूचे गच्छ हे रूप कसे झाले, असे विचारले असता, म्हणावयाचे की व्याकरणांत काही नियम आहेत, त्यामुळे गम् च्या ठिकाणी गच्छ हे रूप होते. पुनः असेच झाले पाहिजे, असा नियम आहे, असे म्हटल्यस नियम म्हणजे काय? व्यवस्था ना? असेच झाले पाहिजे हा नियम चेतना शिवाय जडात राहू शकत नाही; कारण बुद्धीशिवाय व्यवस्था ठेवणे शक्य नाही. पाणी उत्पन्न करावयचे असल्यास दोन माप हैड्रोजन व एक माप

ऑक्सिजन घ्यावा, हे काही पाणी किंवा त्यातील हैड्रोजन व ऑक्सिजन सांगत नाहीत, तर ते आपल्या बुद्धीच्या योगाने समजते.

आता हा स्वभाव परतंत्र आहे, म्हटल्यास नियामक जड होवू शकत नाही. तो चेतन असला पाहिजे.

हे सर्व प्रत्यक्षवादी म्हणवितात; पण त्यांचे येथे चुकते की, बुद्धीशिवाय गणित राहू शकत नाही, व या जगात तर गणित व व्यवस्था दिसते, तर मग येवढ्या जगाची व्यवस्था ठेवणारी- बुद्धिमान शक्ति घेतल्यावाचून कसे निभेल? नियम जर परतंत्र मानावेत तर मग नियामक मानलाच पाहिजे. मग तो नियामक दिसत का नाही? व दिसत नाही तर त्याच्याविषयी उहापोह तरी कसा करावयचा? पण आपल्यांत काही कारणे आहेत, त्यमुळे त्याचा उहापोह करिता येतो. पुन्हाः या उत्क्रांतिवादात एक मोठा दोष आहे, तो असा -

उत्क्रांति म्हणजे काय? जसजशी वाढ होत जाईल तसा तसा संपूर्ण शक्तीचा विकास होत गेला पाहिजे.

आता वानरामध्ये विष समजण्याची शक्ति आहे.

मोरालाही विषाचे ज्ञान असते. सर्पाला त्रिकाल ज्ञान असते.

सर्प ज्याच्या अंगात येतो त्याला कोठेहि काही ठेवले तरी समजते.

गिलेडा वानरला दहा कोसावरून फळ दिसते व त्या सिद्धी, या प्राण्यांमध्ये सहाजिकच असतात.

आता मनुष्य जर या वाढीची पूर्णावस्था आहे, तर मग त्या सर्व शक्तीचा त्याचे ठिकाणी पूर्ण विकास असला पाहिजे. कारण त्या शक्ति फार श्रेष्ठ आहेत; पण मनुष्यामधे त्या दिसत नाही व मोठ्या प्रयासानेही प्राप्त होणे कठीण असते. अशाप्रकारे शक्तीचा ऱ्हास होणे म्हणजे उत्क्रांति मानावयाची किंवा काय?

उत्क्रांतिवादाच्या मताने, जर आपण पूर्ण आहोत, तर मग खालच्या कोटीच्या प्राण्यापेक्षा आपल्यात पूर्णता जास्त पाहिजे. परंतु औषध अन्न वगैरेमध्ये आपल्याला खालच्या कोटीचे साह्य घ्यावे लागते. कित्येक वनस्पति खाऊन वगैरे आपण आपली बुद्धि वाढवून घेऊ शकतो; मग उत्क्रांति झाली म्हणण्यात काय अर्थ आहे. आपण पूर्ण आहोत, तर खालच्या कोटीतल्या प्राण्यांना सहाय्य केले पाहिजे; पण उलटे आपणच त्यांचे सहाय्य घेतो. एका एका योनीत एक एक

विशिष्ट शक्ति आहे. व त्या कर्मामुळेच प्राप्त होतात, असे घेतल्यावाचून उपाय नाही.

सर्व प्राण्यामध्ये देवशरीरे जास्त पुण्यवान असतात व ते पुण्यपाप मिश्रित असते. पुराणात अशा कथा आहेत की महादेवाचे लिंग गळून पडले, विष्णू दगड झाला, इंद्र भगेंद्र झाला, चंद्राला कलंक लागला, ब्रह्मदेवाचे शीर तुटले वगैरे; त्या उपासना करून झालेला शिव, विष्णू, इंद्र, चंद्र, ब्रह्मदेव यांना लागू आहेत. म्हणजे जीव उपासना करून त्या त्या देवतेत मिळून जातो व हा जीवच असतो. व त्या देवतेच्या शरीरात राहून पुण्य-पापाचे फळ भोगतो. याला फळिया म्हणतात. उपासनेने प्रसन्न होतो तो ईश्वर शंकर व त्यात उपासनेने मिळून जातो तो जीव शंकर. याप्रमाणे देवतांमध्ये पुण्य जास्त असते व पाप कमी असते.

तिर्यगादि योनीत पाप अधिक असते व पुण्य कमी असते. त्या योनीतील सिद्धि पुण्याचे फळ असून, देहाला चिकटून राहणे, बोलता न येणे वगैरे पापाचे फळ आहे.

स्त्रीजन्म

एकंदर या सर्व प्राण्यामध्ये मनुष्यजन्म फारच कठिण आहे. त्यातहि पुरुषजन्म फार कठिण आहे कारण स्त्रियांचे ठिकाणी प्रेम व श्रद्धा वगैरे चांगले गुण असतात; पण मोह हा गुण फार वाईट असतो. याचे कारण असे– संग जितका जास्त तितका मोह जास्त. वीर्य पडल्याबरोबर मनुष्याला काही नाही, पण स्त्रियांना तो गर्भ नऊ महिने वागवावा लागतो व त्यामुळे स्त्रियांना पुरुषापेक्षा संग जास्त घडतो. त्यांना वाटते की मोह केला नाही तर मुलाचे कसे होणार? त्यांना ईश्वराविषयी कितीहि सांगितले, तरी पटत नाही. तथापि ब्रह्मचारिणी स्त्री असली किंवा प्रयत्नाने मोह जिंकला तर स्त्रियांना ज्ञान होऊ शकते. आपल्या इकडे स्त्रियांना मूर्ख समजतात. मोह नाहिसा करून पुष्कळ स्त्रियांनी ज्ञान करून घेतले, याविषयी उत्तम कथा सांगतो.

मदालसेची कथा

एका राजाला मदालसा नांवाची मुलगी होती. ती थोडी मोठी झाल्यावर तिला एका महापुरुषाची संगति घडून ज्ञान झाले. पुढे तिचे एका राजाशी लग्न

करून दिले. भगवती मदालसा ऋतुस्नान झाली. तथापि पतीला संग करून देत नसे. मला पुत्र होईल तर तुम्ही त्याचे तोंड पाहू नये व मी वागवीन तसे वागू दिले पाहिजे, असे कबूल असल्यास मी संग करू देईल, असे तिने पतीला सांगितले. राजा या म्हणण्याला कबूल झाला. पुढे तिला मुलगा झाला. त्याला तिने बाळपणापासूनच वैराग्याच्या गोष्टी व ज्ञान सांगून, श्रवण-मनन-निदिध्यासन करवून संन्यास घ्यावयाला सांगून घरांतून पाठवून द्यावे. अशा प्रकारे आपल्या सात मुलांना तिने ज्ञान सांगून संन्यास दिला. हे समजताच राजाला फार संताप आला.

पुढे राजाला आठवा मुलगा झाला. तो राजाने आपल्या ताब्यांत घेतला. मुलगा नेहमी ऐश्वर्यात असल्यामुळे भोगातच त्याचे चित्त लागले, म्हणून त्याचे नांव अलर्क ठेवण्यात आले. अलर्क म्हणजे 'कावरला कुत्रा'; कारण संसारांत पडलेला, विषयासक्त विष्णूहि एखाद्या कुत्र्याप्रमाणेच आहे. पुढे राज्यकारभार अलर्काकडे सोपवून राजा वनांत गेला. इकडे भगवति मदालसा राजाबरोबर न जाता मुलांचा शोध करू लागली. त्यांची भेट घेऊन त्यांना सांगितले की, ''मी तुम्हाला ज्ञान वगैरे दिले पण तुम्ही गुरुदक्षिणा काहीच दिली नाही''

तेव्हा त्यांनी सांगितले, की ''भगवती, तुझी आज्ञा आम्हाला प्रमाण आहे.''

तेव्हा - ''अलर्क तुमचा भाऊ हा संसारांत फारचच आसक्त आहे, तर त्याला त्यांतून काढा, म्हणजे गुरुदक्षणा पावली,'' असे तिने सांगितले.

तेव्हा ते सर्वजण काशीराजाकडे जाऊन म्हणाले,''राजा ! आम्ही वडील असून आमच्या बापाने आम्हाला राज्य न देता धाकट्या भावाला दिले आहे, तर तेवढे आमचे आम्हाला मिळवून दे. आम्ही मात्र त्याला शरण जाऊन मागणार नाही''.

त्या भावांनी लगेच संन्याशी वेष काढून टाकून क्षत्रियासारखा पोशाख केला होता. यांत अधर्म नाही. **कोणतीहि गोष्ट इंद्रियांच्या वश होऊन करू नये. लोककल्याणाकरिता करण्यास हरकत नाही.**

श्री समर्थ म्हणतात ,

'उपाधिसि कंटाळू नये । उपाधीत सांपडू नये ॥

त्याचप्रमाणे ज्ञानेश्वर महाराजहि म्हणतात,

'म्हणोनि इंद्रिये देखे । लाळाविना कौतुकें ॥

इंद्रियासाठी इंद्रियाचे लाड पुरवू नये. काशीराजाने युद्धाची तयारी केली. अधर्माने राज्य बळकाऊं देत नसत. भगवती मदालसेने राज्य सोडून बाहेर निघतांना एक कागद लिहून ठेवला होतो. त्यात ''राज्य वाईट आहे. ते नेहमी लोकांच्याच फायद्याचे असले पाहिजे. आपण अरेरावी करू नये. लोकांच्या सुखाकरिता झटावे व राज्य सोडून देऊन ज्ञान प्राप्त करून घेऊन आपण या संसारांतून मुक्त व्हावे.'' असे लिहिले होते. जातेवेळी तो कागद अलर्काला देऊन सांगितले की - ''तुजवर बिकट प्रसंग आला म्हणजे हा कागद वाचून पहा?''

काशीराजाचे सैन्य नगरावर येऊन ठेपताच आपल्या आईच्या सांगण्याची अलर्काला आठवण होऊन कागद उघडून पाहिला व काशीराजाच्या पक्षाला जाऊन मिळालेल्या आपल्या भावांची भेट घेऊन सांगितले की ''मी युद्ध न करता राज्य देण्याला तयार आहे, ते आपण घ्यावे.''

हे ऐकताच वडील भाऊ फार आनंदित झाला व त्याची आईशी भेट करविली. पुढे आईने सांगितले की, ''राज्य काशीराजाला देऊन टाक व तूं ज्ञान शिकून योगाभ्यास करून मुक्त हो.'' पुढे तो योगाभ्यास करून मुक्त झाला.

अशा स्त्रिया विरला, पण पुरुषांना विचार जास्त असतो. तथापि जे कामासाठी स्त्रियांचे विकले असतात, ते त्या स्त्रियापेक्षांहि वाईट.

भगवान् नाथ म्हणतात,

''स्त्रियाचे संगती । कदाचित् होय मुक्ती ॥''

''महत्सेवा द्वारमाहुर्विमुक्तेस्तमोद्वारं योषितां संगिसंगम् ॥''

भागवत स्कं.५.अ.५।२

भगवान् श्रीरामांनी स्त्रीकरता शोक केला, तो काही कामाकरता केला

नाही. म्हणून अतिव्याप्ती होत नाही स्त्रियेचा संगच करू नये असे (''योषिता संगिसंगम्'') . . . नव्हे, नाहीतर स्वस्त्रीवर अतिव्याप्ति होईल म्हूणन श्लोकांत ''योषितां'' पद घातले. योषितांचा संग वाईट. या स्त्रियांपेक्षा पुरुष श्रेष्ठ. त्यांत ब्राह्मण श्रेष्ठ. मग ब्राह्मण्य जातीपक्षाने घ्या किंवा गुणकर्माने घ्या. कोणाला बायबल आवडते तर कोणाला वेस्टर्न फिलॉसफी आवडते; म्हणून त्या ब्राह्मणांतहि वेदान्त आवडणारा दुर्लभ. त्यातहि वेदान्ताचा खरा अर्थ समजून घेणारा दुर्लभ; नाहीतर वेदान्त शिकून मातृगमनापर्यंत पाळी येते, म्हणून वैराग्य आंगी असून वेदान्तचर्चा करणारा दुर्लभ.

त्यांतहि कोणीकडे वृत्ति जाऊ न देता आत्म्याकडेच लावणे दुर्लभ.

त्यातहि सर्व आत्मा व ब्रह्म एकच आहे. असे समजून आनंदात राहणारा दुर्मिळ आहे.

असे ज्ञान करून देणारा सद्गुरु मिळणे सर्वांत कठिण आहे. अनंत जन्माचे पुण्य असल्याशिवाय सद्गुरु मिळत नाहीत, म्हणून असा सद्गुरु मिळून जो आपले कल्याण करून घेणार नाही तो आत्मघातकी म्हणावा. लहानपणी मला माझी आजी एक गोष्ट सांगत असे. ती अशी.

खेकडी पक्षाची गोष्ट

खेकडी नांवाचा एकपक्षी आहे तो ओरडला म्हणजे म्यां आजीला विचारावे की, ''आई हा काय म्हणतो ?''

आईने सांगावे की, तो म्हणतो, 'खेंक खेंक खेकडी । सकाळ बांधू झोपडी ॥'' पहाट झाली आणि सूर्योदय झाला की, म्हणतो ''आतां कोण बांधतो झोपडी''

याप्रमाणे हा नियम जगाला लागू केला असता असे दिसते की, दुःखाचे वेळी मनुष्य म्हणतो की, मी असे पुन्हा करणार नाही पण सुखाची वेळ आली की **'भोगून घ्यावे, पुढे पाहतां येईल'** असे त्याला वाटते. जन्माच्या पूर्वी म्हणतो 'देवा काढ येथून, पुढे असे करणार नाही.' पण जन्म झाल्याबरोबर सर्व विसरतो.

स्त्री प्रसूतीच्या वेळी म्हणते की, मी पुनः पतिसंयोग करणार नाही, पण तेवढी वेळ गेली की, पुन्हा काही नाही. याप्रमाणे मनुष्याला प्रसूतिवैराग्य होत असते. नाथ म्हणतात,

'मनुष्य देही ब्रह्मज्ञान । पुढील जन्मी मी करीन ।
म्हणे तो नागवला जाण । सोलीव अज्ञान त्यापाशी ॥

म्हणून **प्रयत्न करून मनाची प्रवृत्ति संसारातून काढून ब्रह्मज्ञानाकडे न लावली तर काहीच फायदा होणार नाही, म्हणून बळेच मन तिकडे लावून, ब्रह्मज्ञान करून घेऊन, या संसारातून सुटण्याचा प्रयत्न करावा.**

श्री भगवान म्हणतात -

नृदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभं प्लवं सुकल्पं गुरुकर्णधारम् ।
मयानुकूलेन नभस्वतेरितं पुमान् भवाब्धिं न तरेत् स आत्महा ॥

(भाग.स्कंध११.अ.२०श्लो.१७)

ब्रह्मज्ञानाच्या दृष्टीने पाहिले तर हा नरदेह सुलभ आहे, कारण मनुष्य देहात ब्रह्मज्ञान करून देणे शक्य आहे म्हणून सुलभ आहे, परंतु हा नरदेह दुर्लभही आहे. कारण अनेक जन्मांचे सुकृत जेव्हा संचित होते, तेव्हांच नरदेह मिळतो; म्हणून हा नरदेह दुर्लभ आहे अअसे म्हटले आहे. आतां नरदेह मिळून, त्यातून ब्राह्मण देह मिळाला तर फारच उत्तम. कारण **इतर वर्णांमध्ये ज्यांचे पिढीजात संस्कार क्रौर्य, हिंसा वगैरे चालत आले आहेत त्यात रज तम जास्त असतो. पण ज्यांच्या कुळांत वेदान्तचर्चा, परमेश्वराचे आराधन वगैरे सात्त्विक आचरण चालत असते, त्या कुळात जन्म मिळणे परम भाग्यच आहे.**

पुनः हे नर शरीर उत्तम प्रकारच्या नौकेप्रमाणे आहे. इतर नौका वाऱ्याच्या स्वाधीन असतात. वारा त्यांना जिकडे नेईल तिकडे त्यांना जावे लागते. भगवान् म्हणतात, या नरदेहरूपी नौकेला माझी अनुकूला हाच कोणी एक वारा त्याचे पूर्ण साह्य असूनही जो मनुष्य हा संसारसमुद्र तरून जात नाही, तो आपल्या हाताने आपलाच नाश करून घेतो. राजा अपराध्याला एक वेळ क्षमा करतो, परंतु पुनः त्याने अपराध केला तर त्याला तिप्पट शिक्षा मिळते.

त्याप्रमाणे **नरदेह प्राप्त होऊन जर आपण परमेश्वराची प्राप्ति करून घेतली नाही तर पूर्वीच्या पापापेक्षा लाखपट आपली शिक्षा जास्त वाढते;** कारण आपण संसारासाठी आपला देह साहेबास विकून टाकतो, त्याप्रमाणे परमार्थाकरिता आपला देह झिजविला पाहिजे. **आपल्यास परमार्थ असावा ही इच्छा तर फार असते, परंतु संसाराकरितांच आपण मरेपर्यत यत्न करतो आणि परमार्थ बंद पाडतो पण परमार्थाकरिता संसार बंद पाडीत नाही.** रसनालोलुप रोगी मरण येईल तेव्हा येईल, अशा अविचाराने, पाहिजे ते खातो. पथ्य करीत नाही. त्यामुळे त्याचा रोग जोरावतो व शेवटी तो मरतो. शहाणा मनुष्य पथ्य कायम ठेवून व औषध घेऊन रोगमुक्त होतो. त्याप्रमाणे **खरा मुमुक्षु जो असतो तो म्हणतो की, संसार चालेल तसा चालेल, पण परमार्थाकरिता प्रयत्न केलाच पाहिजे** व तो त्याप्रमाणे प्रयत्न करतोहि. या गोष्टीवरूनच मुमुक्षु व विषयी यांची परीक्षा होते. भगवान् सुरेश्वराचार्य म्हणतात की, वेदान्त शिकल्याने ज्ञानी कोण व अज्ञानी कोण हे चांगले समजते. विषयावर आवडी असणे व जिकडे चित्त जाईल तिकडे प्रीति असणे हे अज्ञानियांचे लक्षण आहे. याकरिता आपण नेहमी मन रोकले पाहिजे. नाथ म्हणतात -

''मन जेथ विकल्पु धावे । तेथ महामारी विवेक फावे ॥
मन जेथ अधर्मी संभवे । तेथ विवेक धांवे हा की तू ॥१॥
मन जाय काम क्रोधापाशी । विवेक धरूनी ओढी केशी ।
मन रिघता निंदेपाशी । विवेक त्यासी बुकाली ॥२॥
मन म्हणे विषय सुटी । विवेक हाणी वैराग्य काठी ।
मन धावता कल्पने पाठी । विवेक उठाउठी झोटी धरी ॥३॥
परदारा परधन । अभिलाषूं धांवे मन ।
तेथहि विवेक धावून । रणकंदन आरंभी ॥४॥
ऐसा मन विवेकाचा झगडा । ते गाऱ्हाणे आले सद्गुरु पुढा ।
तेणे करावया निज निवाडा । अद्वैत वाडा कोंडले ॥५॥

तुकाराम महाराज म्हणतात -

''रात्रं दिवस आम्हा युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ॥

ही स्थिति सद्‌गुरुजवळ जाण्यापूर्वी झाली पाहिजे. गुरु करून मंत्र घेऊन जर अशी शिष्याची स्थिति झाली नाही, तर काहीहि उपयोग नाही. जोपर्यंत आपल्याला मन रोधता येत नाही, तोपर्यंत गुरु करून मंत्र घेऊनहि काही फायदा होत नाही.

तुकाराम महाराज म्हणतात -

'न मिळो खावया न वाढो संतान । परी हा नारायण कृपा करो ॥
ऐसी माझी वाचा मज उपदेशी । आणिक लोकांसी हेचि सांगे ॥

अशा प्रकारची जेव्हा स्थिति होते, तेव्हाच सद्‌गुरुजवळ जाण्याचा अधिकार होतो. तात्पर्य चित्त फारच शुद्ध झाले पाहिजे, म्हणजे सद्‌गुरूंच्या उपदेशाचे सार्थक होते.

पुढे नाथ म्हणतात -

तो दृष्टी पाहताची ठावो । मनाचा मोडलाचि स्वभावो ।
देहीचा झाडोनी अहंभावो । विवेकेशी पाहावो ऐक्य केले ॥

असे झाले म्हणजे सहजच युद्ध मिटते. पण याच्यापूर्वी आपण आपली तयारी केली पाहिजे.

कित्येक मनुष्य दुःखी आहेत. कित्येक सुखी आहेत. आपली इच्छा नसताहि पुष्कळ गोष्टी घडून येतात. इत्यादि गोष्टीवरून पाहिले असता, कर्म आहे असे म्हणावे लागते व त्या कर्माच्याच योगाने या संसारसागरात आपण फिरत आहोत. याकरिता संसारात अडचणी आल्या तरी त्या विवेकाने सहन करून परमार्थाच्या मार्गाने लागले पाहिजे. आपण हळू हळू पूर्ण होऊ. इतकी घाई करून तरी काय करायचे आहे, अशी आपली इच्छा असते. परंतु आपण हे पक्के लक्षात ठेविले पाहिजे, की **काळ काही आपली वाट पाहात नाही. तो झरझर चालला आहे. म्हणून त्याच्या हजार पटीने जास्त जेव्हा आपण यत्न करू, तेव्हाच काळाला जिंकू.** याकरिता वैराग्ययुक्त होत्साता, चित्त शुद्ध करून, ब्रह्मज्ञान मिळविण्याकरिता यत्न केला पाहिजे. कारण मनुष्ययोनीमध्ये व पश्वादि

योनीमध्ये विषय सुलभ आहेत, जसे :- नोकरी करूनहि दुसऱ्याचे बोलणे सहन करावे लागते, व चिंता ही नेहमी असतेच. कुत्र्यालाहि लोक मारतात. तात्पर्य- कुत्र्याला आपणाला श्रम सारखेच पण कुत्र्याला चिंता तरी नसते. म्हणून आपल्यापेक्षा कुत्रे बरे. कारण ते या लोकीचे सुख तर भोगतात. आपल्याला या लोकीहि सुख मिळत नाही. भगवान् म्हणतात -

'अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम् । गीता अ.९ श्लो.३३

उत्तरार्ध **''अगा मर हा बोल न साहती । आणि मेलीया तरी रडती ।**
परी असते जात न गणिती । गहिंसपणे ॥५१३॥
जंव जंव बाळ बळिया वाढे । तंव तंव भोजे नाचती कोडे ।
आयुष्य निमाले आतुलिये कडे । ते ग्लानिची नाही ॥५११॥

मुलगा पांच वर्षाचा झाला म्हणजे तो पांच वर्षाचा मेला असेच म्हणावे लागते. कारण तितके त्याचे आयुष्य कमी झाले. याप्रमाणे मनुष्य हा दररोज मरत असतो. प्रत्येक घटकेला आयुष्य जातच आहे.

'जिये लोकीचा चंद्र क्षयरोगी । जेथ उदय होय अस्तालागी ।
दुःख लेऊनि सुखाचि आंगी । सळित जगाते ॥५०२॥
अहा कटकटा हे ओखटे । इये मृत्युलोकीचे उफराटे ।
एथ अर्जुना जरी अवचटे । जन्मलासी तूं ॥५१५॥

याप्रमाणे या मृत्युलोकांत सरळ असते ते उलट वाटते, व उलट असते ते सरळ वाटते. या करिता आपली मति जशी शुद्ध होते, तशीच ती कायम राहिल्यास आपण मुक्त होऊ ।

गर्भे व्याधौ स्मशाने च जायते यादृशी मतिः ।
सैव चेत् सर्वदा तिष्ठेत् को न मुच्येत बंधनात् ॥
स्मशानांते भोजनान्ते मैथुनान्ते च या मतिः ॥
यदि स्यात् सर्वदा सा चेत् तद्विष्णोः परमं पदम् ॥
तरी झडझडूनि वहिला निघ । इये भक्तिचिये वाटे लाग ।
जिया पावसी अव्यंग । निजधाम माझे ॥५१६॥

६. सांख्यकारिका निरूपण

॥ श्रीज्ञानेश्वर माउली ॥

गुरुजवळ जाण्यापूर्वीच वैराग्यादिक साधनचतुष्टयसंपन्नशिष्य असावा लागतो, असे काल सांगितले. दुःख ३ प्रकारचे असते - १.आध्यात्मिक २.आधिभौतिक व ३.आधिदैविक. यात्रिविध दुःखांची शांति होण्याकरिता यद्यपि ब्रह्मज्ञानाची प्राप्ति झाली नाही तरी विषयांचे ठिकाणी दुःख आहे याचा आपल्याला प्रत्यक्ष अनुभव असल्यामुळे संसार सोडण्यापासून आपल्यस सुखच होईल, कारण दुःखाचा त्याग करावा अशी सर्वांचीच बुद्धी असते.

कारिका

दुखःत्रयाभिघातात् जिज्ञासा तदभिघातके हेतौ ।
दृष्टे साऽपार्था चेन् नैकान्ताव्यन्ततोऽभावात् ॥
दृष्टवद् अनुश्रविकः सह्यविशुद्धिक्षयातिशयः युक्तः ।
तद्विपरीतः श्रेयान् व्यक्ताव्यक्तज्ञविज्ञानात् ॥

ईश्वरकृष्ण म्हणतात, तीन प्रकारचे दुःख असल्यामुळे त्याचा नाश करण्याविषयी इच्छा उत्पन्न होते. या विषयी निरनिराळे वाद आहेत. कोणी म्हणतात की या लोकातील सुख भोगल्यानेच दुःखाची निवृत्ति होते,

कोणी म्हणतात की परलोकातील सुख भोगल्यानेच या त्रिविध दुःखांची निवृत्ति होते.

विवेकी पुरुष या लोकातील व परलोकातील सुख भोगल्याने दुःखनिवृत्ति होते अससे मानीत नाहीत.

आता या त्रिविध दुःखांची निवृत्ति होण्याकरिता दृष्ट उपाय समर्थ आहेत की नाहीत हे आपण पाहूं. प्रथम तर्क व अनुभवाच्या दृष्टीने आपण विचार करू. आपण जरी औषधी आणतो ती झाडांना दुः देऊनच आणतो. दुःख देऊन ज्या

औषधी रसायने वगैरे तयार करावी लागतात. त्यांच्या अंगी दःख निवारण करण्याचे सामर्थ्य नसते. जसे झाड तोडले म्हणजे त्यापासून त्या झाडाला दुःख होते म्हणून त्यापसून आपले दुःख दूर होत नाही. आता औषधी घेतल्यामुळे दुःख दूर होते, असे जे आपल्याला वाटते ती भ्रांती आहे. कारण औषध घेताना दुःख होते. व अमुक औषध अमुक रोगांवर घेतले असतां तो रोग खात्रीने नाहीसा होईल हाही नियम नाही.

सायंसमध्ये ॲग्रीमेंट, डिफरन्स अँड कमिटंट व्हेरिएशन् अशा तीन (अन्वय-व्यतिरेक पाहण्याच्या) मेथडस् (रीती) आहेत. पैकी डिफरन्स ही रीत उत्तम आहे. औषषधाने नियमे करून दुःखनिवृत्ति होईलच असा नियम नाही.

दुसरे जे औषध एकाला गुण करते तेच औषध दुसऱ्याला लागू पडत नाही व असे झाले म्हणजे मग आपण प्रकृतीवर व रोग्याच्या बलावर दोष देतो. परंतु कोणत्याही रोगावर खात्रीचे औषध आजपर्यंत निघाले नाही व पुढेही निघणार नाही. यावरून या लोकात दःखनिवृत्ति करण्याला उपाय नाहीत. परलोकात स्वर्ग मिळावा, अशी इच्छा असल्यास यज्ञ करावा लागतो. यज्ञात पशूची हिंसा करावी लागते हा एक दोष आहे व पुण्य संपल्यावर परलोकातून खाली यावे लागते, हा दुसरा दोष आहे. पशूची हिंसा पशूला दुःख देऊनच करावी लागते. त्या हिंसेचे फल स्वर्गप्राप्ति होते असे म्हणणे अगदीच विरुद्ध आहे. याकरिता दुःखनिवृत्तिसाठी या दोन उपायाहून निराळा असा ज्ञान हा उपाय मानला पाहिजे. ब्रह्म काय? माया काय? जगत् काय आहे? हे जाणून त्याचा विचार करून ज्ञानाने ब्रह्मस्थिती प्राप्त करून घेतली म्हणजे त्रिविध दुः:खांची निवृत्ति होते.

(हा भाग यष्टी१४ मध्ये सांख्यांत टाकण्याचे चुकीने राहून गेले. पुढी आवृत्तीत चूक सुधारली जावी. - संपादक)

ooo

७. जय-विजय कथा

प्रेमासाठी सगुण भक्ती

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

(भगवान् म्हणतात- सर्व भूतांचे ठिकाणी जो मी एक आहे त्या माझे रूप जर व्हावयाचे असेल तर सर्व भूतांवर प्रेम करणे हे शिकले पाहिजे. माझे तीन प्रकारचे भक्त आहेत. :– त्यात -

सर्वभूतेषु यः पश्येद्भगवद्भावमात्मनः ॥
भूतानि भगवत्यात्मन् एष भागवतोत्तमः ॥

सर्व भूतांचे ठिकाणी जो मला पाहतो तोच श्रेष्ठ आहे. आता तुला एक दृष्टान्त सांगतो - जर पाणी प्यावयाचे असेल तर ते तसेच पातळ ठेवतो व पितो, पण हातात धरावयाचे असल्यास त्याचा बर्फ करावा लागतो. त्याप्रमाणे बाहेर परमेश्वराशी खेळण्याची इच्छा असल्यास, परमेश्वराच्या प्रेमाची इच्छा असल्यास सगुणभक्ती करावी व हृदयात सगुण पहावे.

''गुरुमुखे जाणावे निर्गुण । आवडी करोनी भजावे सगुण ॥''

अन्नमय व प्राणमय कोश

आपल्या शरीरात एक वायू आहे. हे शरीर अन्नापासून उत्पन्न होते व त्यानेच वाढते व पुढे त्यातच लय पावते. अन्न म्हणजे पृथ्वी. आईबापाने अन्न खाल्ले नाही तर शरीर उत्पन्न होणार नाही.)

(पितृभुक्तान्न .....) आईबाप जे अन्न खातात त्याचे वीर्य व शोणित होऊन त्या वीर्य व शोणितापासून आपले शरीर बनते. हे अन्नमय शरीर आत्मा नव्हे. याहून तो निराळा आहे कारण हे शरीर जर आत्मा म्हणावे तर ते पूर्वी नव्हते व पुढे नाहीसे होते व आत्मा तर नित्य आहे.

आता कित्येक असे म्हणतात की सर्वच वस्तू अनित्य आहे मग आत्मा कोठला राहिला? - अनित्य म्हणजे नाश पावणारे. यांना असा प्रश्न करावा की ''आपण म्हणतां की सर्वच वस्तूंचा नाश होतो, तर 'नाश होणे' तरी नित्य आहे

किंवा नाही?'' - सर्व वस्तूंचा नाश होतो हे कोणाला समजते? सर्व वस्तूंचा नाश झाल्यावर तो नाश पाहणारा कोणीतरी असलाच पाहिजे. तेंव्हांच सर्व वस्तूंचा नाश होतो असे म्हणतां येईल. ज्याचा त्यालाच नाश दिसणे शक्य नाही. जी गोष्ट नाश पावते तिला काहीतरी आधार पाहिजे. आधारासहित सर्वच जर नाश पावते तर हे समजते तरी कोणाला? यावरून कांहीतरी नित्य मानल्याशिवाय होऊच शकत नाही. व त्यालाच आपण आत्मा म्हणतो.

आतां कोणी असे म्हणेल 'कांहो, पहाडात एखादी वस्तू आहे, तुम्हाला माहीत नाही मग ती तरी तुम्हाला कोठे दिसते? ती नाश पावली व कोणाला समजली नाही तर नाश पावली, म्हणता येईल की नाही? आपल्याला माहीत नसून ही वस्तू नाश पावते? एखाद्या पदार्थाचा नाश झाला, असे आपण कशावरून म्हणतो की, सर्व जगत् दिसते व ती वस्तू दिसत नाही व पुन्हा त्या वस्तूचा नाश झाला तरी अधिकरण नाश पावत नाही. पृथ्वी वगैरे तशीच राहते. पण सर्वच वस्तू नाश पावल्या व काहीच राहिले नाही तर सर्व वस्तूंचा नाश झाला असे कसे ठरविता येईल? सर्वच वस्तू अनित्य आहेत हे जो जाणतो तोच आत्मा आहे. तो काही देह होऊ शकत नाही कारण देह नाशवंत आहे.

आता प्राणमयकोष आत्मा नव्हे -

वासना द्विविधा प्रोक्ता शुद्धाऽशुद्धेति भेदतः ।
अशुद्धा महतां कोपात् शुद्धा महदनुग्रहात् ॥

कथा : गजेन्द्र मोक्ष

तुला एक कथा सांगतो - कोणी जय-विजय नावाचे दोघे भाऊ होते ते ब्राह्मण होते. जोपर्यंत मायबाप जिवंत होते तोपर्यंत एकजुटीने वागत होते. जय हा मोठा व विजय हा लहान होता. पुढे आईबाप मरण पावलेत. एके दिवशी ते दक्षिणेला गेलेत. तेथे त्यांना पुष्कळ शन मिळाले. पुढे रस्त्याने चालताना जयाने विजयाला म्हटले की ''मी तुझा वडील भाऊ आहे. मला तूं आपले द्रव्य दे.''

विजय परत जयाला म्हणाला ''मी तुझा लहान भाऊ आहे. लहानावर प्रेम करावे. अपल्या वाट्यापैकी अर्धे धन दे.''

असे करता करता ते निकरावर आले व त्यांनी एकमेकांला शापिले. जयाने शाप दिला की, ''तूं मगर होशील.'' विजयने शाप दिला की, ''तूं हत्ती होशील. पुढे परस्पर आपण आपल्याला शापून घेतले असे पाहून वाईट वाटले व ईश्वराचा धावा केला. तेव्हा देव आले व त्यांनी सांगितले की तुम्ही माझे भक्त आहात त्या अर्थी तुमचे वचन मी मोडू शकत नाही. आपापसात दिलेला शाप तुम्ही भोगलाच पाहिजे. त्या शापामुळे पुढे एक मगर व एक हत्ती झला.

एकदां हत्ती एका सरोवरावर पाणी पिण्याकरितां गेला. त्याच तळ्यात तो मगर होता. पाण्यात हत्ती गेल्याबरोबर त्या मगराने त्याचा पाय धरला व कांही वेळपर्यंत दोघांचा बराच झगडा झाला. पाण्यात मगराला विशेष जोर असल्यामुळे हत्ती अगदी त्रस्त झाला. त्या हत्त्याचे मूल वगैरे बाहेरच राहिले. कोणीच त्यापैकी त्याला साह्य करीना. शेवटी निराश होऊन त्यानी ईश्वराचा धांवा मांडला.

नसे ठावा ब्रह्मा न शिव अथवा श्रीपती हरी ।
हरी जो तापाते उचलुनि कृपासिंधुलहरी ॥
हरी वाटे काळा करिस विपती मृत्युभुजगा ।
जगाचा जो आहे धनी कवण तो पाव मज गा ॥(वामन पंडित)

धांवा ऐकून लगेच देव तेथे आले व सुदर्शन घालून सोडविले.

नामदेवांचा अभंग

नक्र बोले ऐके ऋषिकेशी । नाममात्रे तारिले गजेंद्रासी ।
काय कृपण झाले मजविशी । आता कैसा बा मोकलूनि जाशी ॥१॥
कळले कळले गा देवपण आता । सोडी ब्रीद आपुले दीनानाथा ॥धृ॥
दीनानाथ म्हणविसी कशासाठी । द्वैतभाव कां धरियेला पोटी ।
कैसे पाप लाविले माझे पाठी । तुझे रूप देखिले आजि दृष्टी ॥२॥
दीनानाथ बोलती वेद चारी । साधुसंत गाताती नानापरी ।
सत्य ब्रीद मिरवत चराचरी । सोडी ब्रीद आपुले झडकरी ॥३॥
रजमात्रे तारिली अहिल्या शिळा । नामेकरूनी उद्धरिले अजामेळा ।

पापी कैसा मी मांग घननीळा । तुझे रूप देखिल्या म्यां आजि डोळां ॥४॥
न्याये ब्रीद घेईल तुझे आतां । पापी कैसा मी सांग दीनानाथा ।
कैसे पाप मारिले माझे माथा । अझुनि लाज कां नये तुझ्या चित्ता ॥५॥
नक्र बोले देवासी हासूं आले । निंदा नव्हे स्तवन माझे केले ।
दीनानाथे तात्काळ उद्धरिले । विष्णुदास नामा कौतुक बोले ॥६॥

हा नक्राचा धांवा ऐकून देवाने त्याहि उद्धार केला व दोघांनाही आपले द्वारपाळ केले. पुढे भगवान् सनत्कुमार एकदा श्रीविष्णूच्या दर्शनाकरिता वैकुंठास गेले, पण त्या वेळेला लक्ष्मी व विष्णु एकांतात असल्यामुळे भगवान् सनत्कुमाराला त जयविजयांनी प्रतिबंध केला. भगवान् सनत्कुमार नेहमीच पांच वर्षाचे बाळ राहात असत. त्यामुळे त्यांना कोठेही जाण्यास प्रतिबंध नव्हता.

तेव्हा भगवान् सनत्कुमार यांनी शाप दिला की, तुम्ही राक्षस योनीत जन्म घ्याल. तेव्हा त्यांनी देवाचा धांवा केला. देवानी सांगितले की, मी यांत काही करू शकत नाही. विनाकारणच त्यांना प्रतिबंध केला..तुम्हाला शाप भोगलेच पाहिजेत.

तेव्हा त्यांनी विचारले की, आम्ही तुझी भक्ती कशी करावी?

देव म्हणाले की तुम्ही विरोधभक्ती कराल तर तीन जन्माने मला पावाल व प्रेमभक्ती कराल तर सात जन्माने मला पावाल.

शेवटी त्यांनी विरोधभक्ति मागितली. ते पहिल्या जन्मी हिरण्याक्ष व हिरण्यकशिपु झालेत. दुसऱ्या जन्मात रावण कुंभकर्ण झालेत व तिसऱ्या जन्मात ते शिशुपाल व वक्रदंत झालेत.

आचार्य म्हणतात वासना दोन प्रकारची आहे :- शुद्ध व अशुद्ध. अशुद्ध वासना महात्म्यांच्या कोपामुळे उत्पन्न होते. उदा.- जय-विजय यांनी प्रेमभक्ति कबूल केली असती तर काय झाले असते? पण महात्म्यांचा कोप होता म्हणून त्यांना विरोधभक्ति करून वैकुंठात जाण्याची इच्छा उत्पन्न झाली. प्रेमाची आवडी नव्हती. – त्याचप्रमाणे शुद्ध वासना सत्पुरुषांच्या कृपेनेच उत्पन्न होते. प्रऱ्हाद दैत्यकुळात उत्पन्न झाला असूनहि श्रीनारदांच्या कृपेमुळे त्याला ईश्वराच्या प्रेमाची आवडी होती. **परमेश्वर जवळ असून प्रेम उत्पन्न होते असे नाही.** जय-

विजय नेहमीच जवळ राहात होते व तसेच दुर्योधनाचे जवळही देव पुष्कळ राहात होते. **ईश्वराच्या ठिकाणी प्रेम महात्म्यांच्या कृपेनेच उत्पन्न होतो.** या जय -विजयांना तिसऱ्या जन्मात मुक्ति झाली. पण रावण कुंभकर्ण हे मेले तेव्हा त्याच्या तोंडातून ज्योति निघून रामाच्या तोंडात गेली. तशीच शिशुपाल वक्रदंत यांच्या तोंडातून ज्योति निघून श्रीकृष्णाच्या तोंडात गेली, असे आहे.

शंकाः- 'पहिले तर रामावतारात मुक्ति मिळालीच होती. मग पुन्हा जन्मास कसे आले? रामात ज्योति मिळाल्यानंतर पुन्हा जर जन्म झाला तर श्रीकृष्णात ज्योति मिळाल्यानंतर पुन्हा जन्म होणार नाही कशावरून? पुन्हा रामअवतारातले कर्म कृष्णअवतारात संपले, असे म्हणता येत नाही.'

हिरण्यगर्भ व प्राणधारक जीव

याचा अर्थ असा :- त्यांच्या तोंडातून ज्योति निघून रामात मिळाली - ती त्यांना सायुज्यमुक्ति मिळाली. पण वासनावशाने पुन्हा श्रीकृष्णअवतारात जन्म घ्यावा लागला. ही ज्योति आत्मा नव्हे, कारण आत्मा व्यापक असल्यामुळे याच्या तोंडातून निघून त्याच्या तोंडात जाऊ शकत नाही. ही ज्योति हिरण्यगर्भाचा प्राणमय भाग आहे. हिरण्यगर्भातील राजसभाग प्राण आहे. सात्त्विक भागाला जीव म्हणतात. तो कंठदेशी असतो. तो सात्त्विक असल्यामुळे त्याच्यामध्ये आत्म्याचे प्रतिबिंब पडते. त्याला प्राणधारक जीव म्हणतात. तो मृत्यूच्या वेळेला तेजात लय पावतो व वाक् मनात लय पावते व तेव्हा जीव दुसऱ्या ठिकाणी निघून जातो. ही ज्योति आत्मा नव्हे. हा **प्राणधारक जीव** होय.

काल अन्नमय देह आत्मा नव्हे असे सांगितले. तसाच हा प्राणमय कोशही आत्मा नव्हे. आता हा प्राणधारक जीव आत्म्यात कसा मिळवावा, हे उद्या सांगीन.

. .

मंगेशराव केकरे यांना रायपूर श्रावण शु. ५ ता.२१-८-१९०९ रोजी चिंतामणी मंदिरात सांगितलेली

८. गुरुचरणकौमुदी

॥ तत्त्वविवेक ॥

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

आर्या

हृदयांतरीय तिमिरा ज्ञानेश्वर प्रेम कौमुदी न गणी ।
पंचदशी पंचदशी नसतां गुरुचरण कौमुदी गगनी ॥१॥

ओवी

बहुजरी असेल दीपक । तरी न होती सर्व तम नाशक ।
या लागी हे कौतुक । अपेक्षिजे ॥१॥

आर्यार्थ व मंगलाचरण :- पंचदशीवर पुष्कळ टीका आहेत. परंतु जिज्ञासूंना सुलभ अशी एकहि नाही. ती उणीव भरून काढण्याकरिता गुरुचरणकौमुदीचा आरंभ आहे. जिज्ञासूंच्या हृदयाकाशांत जर गुरुचरण कौमुदी नाही, तर पंचदशी ही पंचदशीच म्हणजे अमावास्याच होय. कारण **ज्ञानेश्वरप्रेमकौमुदी** हीच एक हृदयांतरीय तिमिराला म्हणजे जिज्ञासूंच्या हृदयांतील तिमिर - अज्ञान- अहंग्रंथी - न गणण्याला समर्थ आहे. (हा आर्यार्थ झाला).

ओवीचा अर्थ :- रामकृष्णाची दीपिका नांवाची जी पंचदशीवर टीका आहे - त्याला उद्देशून आहे.

प्रस्तावना :- मनुष्याच्या वयाच्या एकंदर चार अवस्था आहेत.

१. त्यांत पहिली जी **अर्भकावस्था,** तीत तो काहीच करीत नसतो. फक्त आईच्या कडेवर बसावे, रडावे, व स्तनपान करावे, एवढेच काय ते, त्याचे व्यापार असतात.

२. **दुसरी किशोरावस्था :-** ह्या किशोर अवस्थेत त्याची खेळाकडे प्रवृत्ति असते.

३. **तिसरी तरुणावस्था :-** ह्या अवस्थेत संसाराकडे प्रवृत्ति असते. व

४. **चौथी वृद्धावस्था :-** म्हणजे म्हातारपण - ह्यांत बसून खाण्याकडे प्रवृत्ति

असते.

पहिल्या वयांत आई किंवा बाप कांहीच शिक्षण देऊ शकत नाहीत. पुढे मुल खेळायला लागते, तेव्हा त्याला खेळ सोडून दे व कांही तरी सोय धर, असे आई शिकविते. खेळ म्हणजे ज्यांत काही अर्थ नाही, ज्याचा काहीच उपयोग नाही, अशा गोष्टी करणे. जसे गंजीफा खेळणे. गंजिफा खेळण्याचा काय उपयोग आहे? त्यापासून काही खायला मिळत नाही. असा फुकट खेळ खेळणे सोडून दे, म्हणून आपण मुलाला म्हणतो. असे निरुपयोगी खेळ खेळता पुढे त्याची चैन वाढत जाते, तेव्हा त्याला पैशाची गोडी लागते. तेव्हा त्या निरुपयोगी खेळावरच पैशाचे डाव मांडू लागतो. मग त्याचा तो व्यर्थ खेळ सार्थ होतो. पण त्या खेळातहि नियम नसतो. कधी हरतो व कधी जिंकतो. पुढे तरुण होतो, तेव्हा ते खेळ सोडून देतो व थोडे तरी पैसे मिळण्याचे काम काढतो व वृद्ध झाला म्हणजे बसून खातो. –

* ह्याप्रमाणे मनुष्य अगदी लहान असतो, तेव्हा कांहीच करीत नाही.
* दुसऱ्या अवस्थेत त्याची व्यर्थ कामाकडे प्रवृत्ति असते.
* तिसऱ्या अवस्थेत थोडेसे फायद्याचे काम करतो.
* चवथ्या अवस्थेत सार्थ कामाकडे लागतो. व
* पाचव्या अवस्थेत - वृद्धपणांत बसून खातो. ह्या जशा शरीराच्या अवस्था सांगितल्या तशा मनाच्याही चार अवस्था आहेत.

१. पहिली बालिश अवस्था - ह्या अवस्थेंत फार अज्ञान असते. स्वतःच्या खाण्यापिण्या-पलीकडे बायकामुलांचीहि त्याला विशेष फिकीर असत नाही. आपल्या देहाला सुख होण्याचीच फिकीर असते. त्याला आपले-परके मुळीच समजत नाही. अशा मनुष्याला काहीच शिकविता येत नाही.

२. मनाची दुसरी अवस्था पामर – खेळते लेकरूं जसे खोट्याच निरूपयोगी गोष्टी करते, तसे बायका लेकरे वगैरे खोटा प्रपंच, त्याचा उपयोग नसता त्यांतच आनंद मानतो. बायको लेकरे वगैरे यांचा खरोखर आपल्यास काहीच उपयोग नसतो. उलट तेच त्यांच्या सुखाकरिता आपली इच्छा करितात. कर्ज करणारा बाप असला किंवा सर्व पैसा उधळून टाकणारा बाप असला तर तो मुलास आवडत नाही. मग नोकरहि तसाच असतो. याला पैशे मिळताहेत,

तोपर्यंत तोहि आपल्याजवळ राहतो. बायका, मुले ह्यांनाहि पैसा, अडका, अन्नवस्त्र, आपण पुरवीत आहोत तो पर्यंतच ते आपल्याजवळ राहतात. नोकरहि तेच करतो. नोकरात व त्यांच्यात भेद काय? दोघेहि सारखेच. तुम्ही म्हणाल मुले आपले पोटांतून जन्मले म्हणून त्यांचा प्रेम अधिक असतो, तर जंत, किडे हेहि पोटांतून उत्पन्न होतात, त्यांचा तुम्ही प्रेम का करीत नाही? याप्रमाणे पामर अवस्थेत मनुष्य निरूपयोगी - खोट्या गोष्टीच्याच नादी लागतो.

तिसरी अवस्था विषयी :- लेकरूं ज्याप्रमाणे खोटा खेळ पण लावून खेळते, त्याप्रमाणे विषयी पुरुष खोटे विषय खरे समजून स्वर्गादिकासाठी यत्न करतो. स्त्री, पुत्र, आप्त, मित्र वगैरे या लोकांत लवकर मरतात, म्हणून स्वर्गाची इच्छा करतात. कर्मठ लोक या विषयांत सार्थकता मिळवितात. मुले ज्याप्रमाणे पणांत हारतात किंवा जिंकतात, त्याप्रमाणे कर्माने स्वर्ग तर मिळतो, पण कर्मांत चूक झाली तर मिळत नाही.

४. लहान लेकरांस जशी आई खेळ सोड व काहीतरी सोय धर असे सांगते. त्याप्रमाणे विषयी पुरुषांस साधुपुरुष ही स्थिति सोडून काहीतरी सोय धरावयास उपदेश करितात. ''या लोकाचे व परलोकाचे विषय मिथ्या खोटे आहेत, म्हणून कांहीतरी परमार्थ साधन कर'' असे सांगतात. तरुण पुरुष जसा काही पोटासाठी मिळवितो व खाण्यासाठी व्यवस्था करतो, त्याप्रमाणे मन पामर व विषयी अवस्थांतून जिज्ञासू दशेत जाते, तेव्हा सगळे विषय सोडून देते. या दशेत मन विचार करते की ब्रह्मसुख न मिळो, पण या लोकाचे व परलोकाचे भोग यांपासून काही वास्तविक सुख नाही. उलट त्याच्यापासून आपले फार नुकसान आहे. म्हणून ते एकदम सोडा.

समज ज्योतिषाने तुला सांगितले की, 'तूं अमक्या दिवशी मारल्या जाशील'' तर तूं आज विष खाशील काय? नाही. पुढे मरण येईल तेव्हा येईल; पण धडधडीत आज मरण कां आणा? म्हणून जिज्ञासू पुरुष विचार करतात की विषयांनीच आज मरण कां आणा? म्हणून जिज्ञासू पुरुष विचार करतात की विषयांनीच कित्येकांचा नाश झालेला, आपण डोळ्यांनी पाहतो ते विषय एकदम सोडा. ब्रह्मसुख न मिळो पण धडधडीत दुःख देणारे विषय काय म्हणून बाळगावे? व्यवहारांत तरी आपण दुःख सहनच करतो की नाही?

आपली बायको, माय, मुलगा हे चांगलेच आहेत, असे आपण घेऊन चालतो. बायको जारिणी नसेल कशावरून? आई अन्नांत विष घालणार नाही कशावरून? मुलगा आपला नाश करणार नाही कशावरून? पण ह्या गोष्टीवर पांघरून घालून लोक व्यवहार करतातच. – त्याप्रमाणेच परमार्थांत अडचणी कां सोसू नयेत?

पुष्कळ लोक असे म्हणतात की, ''जगाचे जसे होईल, तसे आपलेहि होईल. जगाच्याच मार्गाने जाणे बरे. परमार्थात फार अडचणी आहेत. योग चुकला असतां पुष्कळ लोक वेडे झाले आहेत. तो मार्ग फार बिकट आहे.''

याचे उत्तर असे की एक योगी चुकला म्हणून आपण चुकूं कशावरून? व्यवहारात तरी दुसऱ्याच्या पोराने इस्टेट रांडेस दिली म्हणून आपण आपला मुलगा सोडून देतो काय? दुसऱ्याच्या बायकोने नवऱ्याचा जीव घेतला, म्हणून आपण आपली बायको सोडून देतो काय? मग व्यवहारांतील रीति परमार्थात कां लागू करू नये? असा विचार जिज्ञासू करतात व सर्व भोग सोडून देतात, व गुरूने सांगितलेले साधन करतात.

म्हातारपणी जसा मनुष्य बसून खातो त्याप्रमाणे अखंड समाधान भोगणे ती मुक्तदशा होय. याप्रमाणे बालिश, पामर, विषयी, जिज्ञासू व मुक्त अशा मनाच्या पांच अवस्था- पांच प्रकार सांगितले.

लहान लेकरू खेळाचे नादात आईचे ऐकत नाही. सार्थ खेळाचा नाद लागल्यावर किंवा जुव्याचा नाद लागला असता खेळते लेकरूहि आईचे ऐकत नाही. म्हातारा मनुष्य अनुभवीच असतो. तो बसून खात असतो. फक्त तरुण मात्र आईचे ऐकतो व पैसे मिळवून पोटाची व्यवस्था करतो. त्याप्रमाणे * बालिश कोणाचे ऐकत नाहीत. * पामरहि ऐकत नाहीत. व * विषयीहि ऐकत नाहीत. ते फक्त विषयांच्या संबंधाचे ऐकतात. * मुक्तांना ऐकण्याची जरूरच नसते. घेणे देणे त्यांना राहात नाही. * फक्त जिज्ञासू मात्र वेदांतग्रंथाचे अधिकारी आहेत. ते या लोकचे व परलोकचे विषय सोडतात व परमार्थाविषयी तत्पर राहतात. परमार्थदर्शक त्यांना गुरु. असतात. जो खरा परमार्थ सांगेल व जिज्ञासूला मार्ग सांगेल तोच गुरु. कान फुंकून गुरुशिष्य होत नाहीत. या करिता सर्व जिज्ञासूंना बोध होण्याकरिता ग्रंथकार गुरूला नमस्कार करतात.

नमः श्रीशंकरानंदगुरुपादाम्बुजन्मने ।
सविलासमहामोहग्राहग्रासैककर्मणे ॥१॥
तत्पादांबुरुहद्वन्द्वसेवानिर्मलचेतसाम् ।
सुखबोधाय तत्त्वस्य विवेकोऽयं विधीयते ॥२॥

भगवान् विद्यारण्य म्हणतात - मी जो सद्गुरूला नमस्कार केला, तो योग्य आहे. कारण आपल्याला या जगांत उद्धार करण्याला श्रीगुरूवांचून कोणीच समर्थ नाही. सर्वांत आईबाप श्रेष्ठ मानतो व आपल्यात अशी म्हण आहे की, कोण्या मोठ्या बाजारात गेलो किंवा कोण्या मोठ्या ठिकाणी गेलो, तरी तेथे सर्व मिळते; पण आईबाप काही मिळत नाहीत म्हणजे आईबाप दुर्मिळ वाटतात.

स्त्रियांना पतीवांचून श्रेष्ठ दैवत नाही. त्यांना पतीच परमेश्वर आहे; पण ज्यांना ज्ञान करून घ्यावयाचे आहे व वैराग्य झाले आहे, त्यांना मात्र मग पति दैवत नाही. वैराग्य नाही झाले तोपर्यत मात्र पतीच परम दैवत आहे. **विषयाचे ठिकाणी जोपर्यत वैराग्य झाले नाही, तोपर्यंत धर्मच उत्तम आहे.** मुलाचा धर्म मातृपितृसेवा. स्त्रियेचा धर्म पतिसेवा आहे. केव्हा केव्हा आपल्याला विषयांत वैराग्य झालेसे वाटते; पण एकीकडे विषयांत वैराग्य होऊन संसारासक्ती सुटून दुसरीकडे दुसराच संसार जडतो. उदा. मी आहे. मी संसार सोडला, पण हे काकूने दिलेले कडे घालतो; हा एक मी दुसराच संसार लावून घेतला.

कथा

एक अशी कथा आहे. एक विधवाबाई असे. तुझ्या आजीसारखीच ती फार सोवळी असे. रस्त्याने चालतांना एखाद्या पानावर पाय पडला, तर स्नान करीत असे. काम पडल्यास नदी धुवून घेत असे. एकदा तिच्या घरात मांजर मेली. त्यामुळे घर विटाळले व ते घर शुद्ध करण्याकरिता तिने मांजर बाहेर फेंकून दिले व जेथे तिचा एखादा हात लागला, तेथे तिने स्वच्छ धुवून घ्यावे. दार वगैरे सर्व स्वच्छ धुवून घेतले, पण जेव्हा मांजर टाकायला गेली, तेव्हा दार मोकळे राहिले; त्यामुळे आत एक उंट शिरला व त्याचे हातपाय मोडल्यामुळे तोहि आत मरून पडला. तिला वाटले आता कसे करावे. मांजर तर कशी बाहेर काढून फेंकली, पण उंट बाहरे कसा काढू. कोणाला साह्याला बोलवावे,

तर ते सर्व कपडे घालून येतील; पण ती एकदाची कबूल झाली व लोकांना म्हणाली, ''बापा! कसेहि करा, कपडे घालून या की, काही करा, पण या उंटाला बाहेर काढा'' पण कोणीच येईना, म्हणून त्या उंटासहित तिने आपले घर जाळून टाकले. तात्पर्य मांजर जाळण्याकरिता तिने उंटासहित घर जाळले.

कित्येक साधु घर सोडतात, पण पुढे बगीचा लावतात. कोठे राघोच पाळतात व पुढे त्यांच्या बगीच्यातील झाडाचे पान जरी तोडले, तरी एकदम लाल होतात.

एक साधु असे. त्याने आपले बरोबर एक काठी ठेवली होती व तिच्यासहित त्याने पुष्कळ यात्रा केल्या व त्या काठीवर त्याचा इतका प्रेम असे की, ती एकदा हारपली होती, तर ते दिवशी त्याने अन्न सोडून दिले. याचप्रमाणे आम्ही कोणालाही आई म्हणावयाचे व त्यांच्या प्रेमांत फसावयाचे. जेवीत नाही म्हणावयाचे व इकडे रगडून फराळ करावयाचा.

तात्पर्य, एक संसार सोडून दुसरा संसार धरण्याला वैराग्य म्हणत नसतात. एका आत्म्यावांचून किंवा **परमेश्वरावांचून कोठेच प्रेम नसणे व सर्व विषय काकविष्ठेप्रमाणे ओंगळ वाटणे याला वैराग्य म्हणतात.** स्वर्गातले, वैकुंठातले, ब्रह्मलोकांतले, कोठलेहि विषय असोत त्यांच्या विषयी काकविष्ठाबुद्धि असणे यालाच वैराग्य म्हणतात. असे वैराग्य ज्याला होते, त्याला श्रीगुरुवांचून कोणीच श्रेष्ठ नाही. कारण आईबाप वगैरे कोणत्याहि जन्मात मिळतात. स्त्री, पति कोणत्याहि जन्मात मिळतात. पण श्रीगुरु एखाद्यालाच पूर्वपुण्याने मनुष्यजन्मात मिळतो.

तात मिलै पुनि मात मिलै सुत, भ्रात मिलै युवती सुखदायी ।
राज मिलै गजवाजि मिलै सब, साज मिलै मन वांछित पाई ॥
लोक मिलै सुरलोक मिलै, विधिलोक मिलै वैकुण्ठकु जाई ।
सुन्दर और मिलै सबही सुख, सन्तसमागम दुर्लभ भाई ॥१२॥

(सुन्दर विलास)

सद्गुरु लक्षण

सद्गुरु लक्षण सांगतात :- समार्थांनी लक्षण एका ओवीत केले आहे

''सकल रक्षूनि ज्ञान सांगे । जेणे वेदज्ञान न भंगे ''

(उदा. मी तुझा व यमुनाचा संसार सोडविला, म्हणून माझ्यावर विश्वास ठेवणे चांगले नाही). कर्म सांगतांना ज्ञानाचा उच्छेद व ज्ञान सांगतांना कर्माचा उच्छेद असे करणारा गुरु नको. (उदा.) एक वैद्य असे. त्यांनी औषध दिले म्हणजे खाण्याला देऊ नये व खाण्याला देतांना औषध देऊ नये. त्यामुळे औषधीचा काहीच परिणाम होत नसे. अशाला गुरु म्हणू नये. सर्व रक्षण करून ज्ञान सांगणारा गुरु म्हणावा.

श्रीधरस्वामी साधूचे लक्षण करतात :-

''साधवः शास्त्रानुवर्तिनाः''

आणि सुंदरदास असे लक्षण करतात :-

प्रीति प्रचंड लगै परब्रह्महि, और सबै कुछ लागत फिको ।
शुद्ध हृदै मन होई सो निर्मल, द्वैत प्रभाव मिटै सब जीको ।
गोष्टि रू ज्ञान अनंत चलै जँह सुंदरि जैसु प्रवाह नदीका ।
ताहिते जानि करौ निशिवासर साधुको संग सदा अति नीको ॥१॥

- सुंदर विलास

एका परमेश्वराचे ठिकाणी प्रेम असल्यामुळे, बाकी सर्व विषय फिके वाटतात, हे वैराग्य सांगितले. उपाधि नाहिशी होऊन जीवेश्वर ऐक्य होते, हे ज्ञान **'शुद्ध हृदय मन होईसो निर्मल द्वैतप्रवाह मिटे सब जीको'** या पदाने सांगितले व **''गुरुः शास्त्रानुवर्तिनः''** असला पाहिजे हे **'गोष्टिरु ज्ञान'** इत्यादि पदाने सांगितले.

सो गुरुदेव लपै न छिपै कछु सत्व रजो तम ताप निवारी ।
इंद्रिय देह मृषा करी जानत, शीतलता समता उर धारी ॥
व्यापक ब्रह्म विचार अखंडित, द्वैत उपाधि सबै जिन टारी ।
शब्द सुनाय संदेह मिटावत, सुंदर वा गुरुकी बलहारी ॥१॥

तो गुरु झाकला जात नाही. जो सत्त्वरजतमापासून निवारण करतो, तो कसा झांकला जाईल व कशाने झांकला जाईल. ''इंद्रिय देह मृषा करी जानत'' यावरून इंद्रियाने विषय मागितले, तर देत नाही. देहाला जे नांव आहे, ते खोटे आहे, असे तो समजतो. ''शीतलता'' या पदावरून ज्याच्या वचनाने ज्याला संसारताप झाला आहे असा कोणीहि पुरुष, आनंदित होतो, हे दाखविले आहे.

आपला आहे म्हणून जास्त सांगावयाचे व परका आहे म्हणून सांगू नये असा भेद त्यांच्यापाशी नसतो; म्हणून ''समता'' पद घातले आहे. आत्मा सर्वव्यापक आहे, असे ज्यांना ज्ञान झाले असते, हे दाखविण्याकरिता ''व्यापक'' पद घातले आहे. आपल्या वाक्यानी जो दुसऱ्याचे संशय दूर करतो, तोच खरा श्रीगुरु समजावा. तो फारच दुर्मिळ आहे. अशा श्रीगुरूचे ठिकाणी ज्याचे चित्त स्थिर झाले आहे, अशाकरिता मी या **तत्त्वविवेकनामक प्रथम प्रकरणाचा आरंभ** करतो.

शब्दस्पर्शादयो वेद्या वैचित्र्याज्जागरे पृथक् ॥
ततो विभक्ता तत्संविदेकरूपा न भिद्यते ॥३॥

पाच इंद्रिये आहेत. नाक, कान, डोळे, आंगावरचे कातडे, जीभ. ही इंद्रिये जरी निरनिराळी आहेत तथापि यांचा स्वामी एकच आहे. तो मालक तूं आहेस. डोळ्यांनी पुस्तक पाहिले. याचा रंग लाल आहे हे कोणी जाणले? हा लाल रंग कोणी पाहिला? शब्द कोण ऐकतो? जिभेने रुचि कोण घेतो? मीच लाल रंग पाहिला, मीच शब्द ऐकिला, मी रुचि घेतली असे आपण म्हणतो. याप्रमाणे हे विषय जरी निरनिराळे आहेत व यांचे ज्ञान जरी निरनिराळे आहे, तरी या सर्वांना जाणणारे ज्ञान एकच आहे व ते ज्ञान तूंच आहेस. तूंच या सर्वांना जाणतेस. या पांच इंद्रियांनी तुला ज्ञान होते. ती तूं या सर्व इंद्रियांहून निराळी आहेस.

नास्तिक खंडन

देहच आत्मा आहे, असे नास्तिक म्हणतात; पण हे चूक आहे. कारण शब्द कानाने ऐकतो. रूप डोळ्याने पाहतो, तर हे शब्द कानाजवळच राहावे, रूप डोळ्याजवळच राहवे. जे देहच आत्मा आहे म्हणतात त्यांना असे विचारावे की ''काय हो ! गोड खाल्ले हे ज्ञान व शब्द ऐकू आला हे ज्ञान एकच आहेत काय? नाही. या दोन्ही विषयाचे ज्ञान निरनिराळे होते. देहच आत्मा असता, तर हे दोन्ही ज्ञान एकच झाले असते व या दोन्ही ज्ञानाला जाणणारा जर कोणी नाही तर या दोन्ही ज्ञानामध्ये जी एकसांखळी दिसते, ती राहिली नसती. डोळ्यानेंहि मीच पाहतो, कानानेहि मीच ऐकिले, जिभेने मी अन्नाचा रस

घेतो, असे ज्ञान राहिले नसते. या भिन्न ज्ञानामध्ये जी मीपणाची सांखळी आहे, ती या इंद्रियांहून निराळी आहे. निराळी नसती, तर सर्व ज्ञान एकालाच झाले नसते.

तथा स्वप्नेऽत्र वेद्यं तु न स्थिरं जागरे स्थिरम् ॥
तद्भेदोऽतस्तयोः संविदेकरूपा न भिद्यते ॥४॥

पांच प्रकारचे जे विषयज्ञान आहे, त्या सर्वांना जाणणारा एक या देहारहित आहे. कारण तसे नसते, तर मी ऐकले, मी रस चाखला, मला स्पर्श झाला वगैरे असे निरनिराळे ज्ञान एका मीपणाने जुळविता आले नसते. व कानाचे ज्ञान कानालाच, स्पर्शाने ज्ञान त्वचेला, रसाचे ज्ञान जिभेला असे तेथल्या तेथेच असते, पण तसे होत नाही. अनुभव असा आहे की, प्रत्येक मीच केले असे आपण म्हणतो. तात्पर्य आत्मा हा सर्वांमध्ये एकच आहे. जागृतीत जे निरनिराळे ज्ञान होते त्या सर्वांना जाणणारा एकच आहे.

भासताती शब्दादि जागृदवस्थेत भिन्न भिन्न जरी ॥
त्यांचे ज्ञान त्यांतुनि भिन्न नांदते अखंड एक तरी ॥

याप्रमाणेच स्वप्नांतले आहे. जागृतीत पदार्थ फार वेळ राहतात व स्वप्नांत जागृतीतली इंद्रिये मात्र नसतात, ती स्वप्नांत कल्पलेली असतात. पुनः स्वप्नांतून जागृतीत आल्यावर आपण म्हणतो की, मी स्वप्न पाहिले म्हणजे आता मी जो जागृतीत अनुभव घेऊन राहिलो, तोच मी स्वप्नांत होतो व मीच ते स्वप्न पाहिले; म्हणून स्वप्नांतहि आत्मा एकच आहे. निरनिराळे स्वप्न जरी असले, तरी मीच पाहिले असे आपण म्हणतो, म्हणून आपण एकच असतो. जागृतीत व स्वप्नांत आत्मा एकच असतो. त्यातले पदार्थ मात्र बदलतात.

सुप्तोत्थितस्य सौषुप्ततमोबोधो भवेत्स्मृतिः ॥
सा चावबुद्धविषयाऽवबुद्धं तत्तदा तमः ॥५॥
स बोधो विषयाद्भिन्नो न बोधात्स्वप्नबोधवत् ॥
एवं स्थानत्रयेऽप्येका संवित्तद्वद्दिनान्तरे ॥६॥
मासाब्दयुगकल्पेषु गतागामिष्वनेकधा ॥

नोदेति नास्तमेत्येका संविदेषा स्वयंप्रभा ॥७॥

(पाठभेद - गतागम्येष्वनेकधा)

निद्रा

सुषुप्तीत आत्मा राहतो किंवा नाही याविषयी सांगतात :-

सुषुप्ति म्हणजे जागृती नाही व स्वप्नहि नाही अशी गाढ निद्रा. कित्येक म्हणतात सुषुप्तीत आत्मा नसतो. भगवान् विद्यारण्य म्हणतात :- जागृतीत आत्मा राहतो हे तुम्ही कबूल करता व कोणीहि कबूल करीलच. कारण आत्मा नसता तर प्रेतवत् देह पडला असता; म्हणून जागृतीत आत्मा असतोच.

आता तुम्ही सुषुप्तीत आत्मा नाही म्हणता, तर तो काय सुषुप्तीत नाहिसा होऊन, जागृतीत पुनः उत्पन्न होतो? जागृतीत तो आत्मा राहतो व सुषुप्तीत राहात नाही, या तुमच्या म्हणण्याचा अर्थ असाच होतो की, तो जागृतीत उत्पन्न होतो. तुमच्या म्हणण्याप्रमाणे घेतल्यास जागृतीत जो आत्मा उत्पन्न होतो तो सुषुप्तीत नाहीसा झालेला आत्माच असतो किंवा दुसराच आत्मा उत्पन्न होतो?

पहिले पक्षी, तोच जर आत्मा उत्पन्न होतो, असे म्हटले तर त्याचा नाश होतो म्हणणे व्यर्थ आहे.

दुसरे पक्षी त्याला कालची स्मृति राहू नये. मी काल ही कामे केली, काल मला अशी स्वप्ने दिसली, असे ज्ञान राहू नये. पुनः आपण म्हणतो ''मी सुखाने निजलो होतो, मला काही कळत नव्हते'' ही स्मृति होऊ नये. सुषुप्तीत जर आत्मा नव्हता तर मग मी सुखाने निजलो होतो इत्यादि स्मृति का व्हावी? कारण अनुभवाचीच स्मृति होत असते. सुषुप्तीतून जागृतीत आल्यावर आपण म्हणतो की, ''मला काही माहित नव्हते'' यावरून त्या ठिकाणी दुसरे काही नव्हते असे सिद्ध होते, पण मीच नव्हतो असे सिद्ध होत नाही. मला काही समजत नव्हते, हा तरी अनुभव होताच.

कित्येक म्हणतात - मागचा अनुभव पुनः जागा झाल्यावर पदार्थ पाहातो व मग या दोन अनुभवाचीच तुलना करून मधल्या तेवढ्या वेळचे अनुमान करतो; पण असे जर घेतले तर याला कां अनुभव यावा? याच्याने तुलना कशी व्हावी? तो अनुभव तर मागच्या आत्म्याचा झाला. हा तर नूतन आत्मा, याला ते ज्ञान कसे व्हावे? कारण एकाचे काम दुसऱ्याला कसे समजते? काकूचे काम

तुला समजत नाही. तुझे काम काकूला समजत नाही; म्हणून दुसराच आत्मा उत्पन्न होतो, असे मानणे असंगत आहे. म्हणून सुषुप्तीतहि आत्मा असतो हे सिद्ध झाले.

हे जसे अवस्थांतराचे झाले, याचप्रमाणे जन्मान्तराचे आहे. **सुषुप्तीच फार वेळ राहिली म्हणजे मरण होत असते, मरण दुसरे काही नाही.** आतां आपण मेल्यावर नाहीसे होऊ ही कल्पना जीवंतपणीच कशी करता येते?

कोणी म्हणतात, मेल्यावर आपण राहात नाही, म्हणून खावे, प्यावे, चैन करावी. हे त्यांचे अनुमान कोणत्याच रीतीने सिद्ध होऊ शकत नाही; कारण अनुमान जे करावयाचे ते सहचारव्यभिचारपूर्वक पाहिजे. अग्नि व धूमाच्या सहचारव्यभिचारावरून पर्वतावरच्या अग्नीचे अनुमान आपण करीत असतो. तसा आत्मनाशविषयी सहचारव्यभिचार कोठेच दिसत नाही. मेल्यावर आत्मा नाहीसा होतो, म्हणजे त्याचा अभाव होतो असे म्हटल्यास अभाव नेहमी प्रत्यक्ष असला पाहिजे. आपल्या अनुभवावरून आपला नाश कल्पिता येत नाही. मी नाहिसा झालो, असा अनुभव आपला कधीच नसतो. मेल्यावर आत्मा नाहीसा होतो, हे कोण जाणतो?

पुनः जे कोणी मेल्यावर आत्मा राहात नाही असे म्हणतात, त्यांना असा प्रश्न करा की कायहो? मेल्यावर जर आत्मा नाहिसा होतो, तर हा आत्मा कोठून आला? तुमच्या मताप्रमाणे अभावातून हा तुमचा आत्मा उत्पन्न झाला, असे म्हणावे लागते. आता या तुमच्या म्हणण्याप्रमाणे जर अभावातून आत्म्याची उत्पत्ति मानली, तर मग मेल्यावर नाहीसा होऊन, पुनः उत्पन्न होणार नाही कशावरून? जसा आत्मा अभावातून आला तसा पुढेहि येईल व अभावापासून भावोत्पत्ति मानली तर अभाव म्हणण्यात काय अर्थ आहे? आंधाराने दिसू लागल्यास मग आंधारात व प्रकाशात काय फरक राहिला?

आता कोणी असे म्हणतील. की, जरी आत्मा उत्पन्न होत असला तरी, जो आत्मा देह सोडून गेला, तोच पुन्हा येईल कशावरून? यांना मी असे विचारतो की, अभाव जर एकच आहे तर मग दुसरा आत्मा येतो म्हणण्यात काय अर्थ आहे. कारण त्या अभावामध्ये आत्म्याचे व्यक्तित्व तर नसतेच. व्यक्तित्व राहते म्हटल्यास आत्म्याचा नाश होतो म्हणता येत नाही व व्यक्तित्व

जरी न स्वीकारले तरी अभाव एकच असल्यामुळे दुसरा आत्मा उत्पन्न होतो म्हणण्यात काहीच अर्थ नाही. याप्रमाणे मेल्यावर आत्म्याचा नाश कल्पिता येत नाही.

सुषुप्तीत जसे विषय भासत नाहीत त्याप्रमाणे सुषुप्ति जास्त झाली म्हणजे मरण. त्या मरणातहि विषय भासत नाहीत सुषुप्तीतच जर आत्मा नष्ट होत नाही, तर मग जो आत्मा तिन्ही अवस्थेत नष्ट होत नाही व तो जन्मांतरात एकच असतो. व जो अनंत जन्मांत एकच असतो तोच आत्मा अनंत कल्पातहि एक आहे. म्हणून तो अमर आहे. मरण म्हणजे मोठी वाढलेली झोप. एकाच दिवशी तिन्ही अवस्थेत आत्मा राहतो म्हणून तो सुषुप्तीत राहतोच. तीच सुषुप्ति पुष्कळ वाढली म्हणजे मरण. म्हणून मरणांतही आत्मा नष्ट होत नाही, व पुढे अशी अनंत मरणे आली तरी तो नष्ट होत नाही, म्हणून तो कधीच नष्ट होत नाही. भगवान म्हणतात–

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ।

(गी. अ. २ श्लो. २३)

अर्थ- आत्मा नित्य आहे व जी वस्तु नित्य आहे, तीच व्यापक असते. म्हणून एक तो आत्माच सत्य आहे, तसाच तो ज्ञानरूप आहे, कारण तो विषयाला जाणतो व तो विषयाच्या अभावालाहि जाणतो. तो सर्वाला जाणणारा आहे व नित्य आहे. याप्रमाणे आत्मा सृत्रिरूप आहे हे सिद्ध झाले. आता तो आनंदरूप कसा आहे हे उद्या सांगेन.

अयमात्मा परानंदः परप्रेमास्पदं यतः ।
मा न भूवं हि भूयासमिति प्रेमात्मनीक्ष्यते ॥८॥
तत्प्रेमात्मार्थमन्यत्र नैवमन्यार्थमात्मनि ।
अतस्तत्परमं तेन परानंदताऽऽत्मनः ॥९॥

काल आत्मा सत्यज्ञानरूप आहे हे सांगितले. आता तो आनंदरूप आहे असे सांगतात :- ज्या ठिकाणी जेवढे सुख जास्त, तेवढी त्या ठिकाणी प्रीति जास्त असते. या मानाने जेवढे विषय आपण भोगतो, तेवढेहि आपल्याला आवडतात, म्हणूनच आपण भोगतो. ते सर्व आपल्या करिताच पाहिजेत. मुलगा,

पति, भाऊ, आई वगैरे सर्व आपल्याला आपल्या सुखाकरिता आवडतात. मुलगा मुलाकरिता, पति पतीकरिता काही प्रिय नसतो. यावरून आपणच जास्त प्रेमास्पद आहो. आपल्यावर जे प्रेम असते, ते निस्सीम असते. आपल्याला आपला देह मोठा प्रिय वाटतो, पण त्याचाहि एखादे वेळी कंटाळा येतो व तो नाहिसा व्हावा असे वाटते, पण आपण नाहिसे व्हावे असे वाटत नाही. देह जो नाहिसा व्हावा वाटतो, तो तरी आपल्या सुखाकरिताच वाटतो. या दृष्टीने आपण प्रेमास्पद आहो, असे ठरते, व त्या प्रेमाचे आपल्याला भान आहे. असे असून मग दुसऱ्या विषयाची अपेक्षा आपल्याला का असावी? जर आपण परमप्रेमास्पद आहो, तर मग आपल्याला दुसऱ्याची अपेक्षा नसावी? **याप्रमाणे आपल्याच ठिकाणी प्रेमाचे भान व अभान दोन्ही आहेत.** हे दोन विरुद्ध गुण एकाच पदार्थाचे ठिकाणी कसे राहू शकतात? तथापि अनुभव तर असा आहे की, आपल्याच ठिकाणी प्रेमाचे भान व अभान आहे व पुनः विरोधी गुण एकाच पदार्थाचे ठिकाणी नसतात हेहि आपण अनुभवावरूनच ठरवितो. जेव्हा प्रकाश असतो तेव्हा अंधार नसतो. आपले प्रेम आपल्यावर फारच आहे, व प्रेमाशिवाय सुख राहू शकत नाही. एवढे असून पुनः आपल्याला दुसऱ्या पदार्थाची अपेक्षा असते, हे कसें? भान व अभान हे दोन्ही गुण विरोधी आहेत व हे तर एकाच पदार्थाचे ठिकाणी भासतात? याला काही तरी कारण असले पाहिजे. प्रतिबंधाशिवाय एका पदार्थाचे ठिकाणी विरोधी गुण भासावयाचे नाहीत. प्रतिबंध म्हणजे खरी वस्तू न भासून भलतीच भासणे. आपण परमप्रेमास्पद असून विषयाची अपेक्षा लागते, म्हणून येथे काही प्रतिबंध असला पाहिजे. तो प्रतिबंध अविद्या आहे.

इत्थं सृत्रिपरानंद आत्मा युक्त्या तथाविधम् ॥
परं ब्रह्म तयोश्चैक्यं श्रुत्यन्तेषूपदिश्यते ॥१०॥
अभाने न परं प्रेम भाने न विषये स्पृहा ।
अतो भानेऽप्यभाताऽसौ परमानंदतात्मनः ॥११॥
अध्येतृवर्गमध्यस्थपुत्राध्ययनशब्दवत् ।
भानेऽप्यभानं भानस्य प्रतिबंधेन युज्यते ॥१२॥
प्रतिबंधोऽस्ति भातीति व्यवहारार्ह-वस्तुनि ।
तं निरस्य विरुद्धस्य तस्योत्पादनमुच्यते ॥१३॥

तस्य हेतुः समानाभिहारः पुत्रध्वनिश्रुतौ ।
इहानादिरविद्यैव व्यामोहैकनिबंधनम् ॥१४॥

मागे सर्वस्वी प्रेमास्पद आपणच आहो व तसाच आत्मा अमर ज्ञानरूप आहे हे युक्तीने सांगितले; याबद्दल श्रुतिहि आहे.

''सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म''
''आनंदं ब्रह्मेति व्यजानात् ।''

कल्पना कर १०-५ मुली गाणे म्हणत आहेत. त्यात तुझी बहिणहि आहे. त्या जर एकसारखा गळा काढून गाणे म्हणू लागल्या, तर तूं आपल्या बहिणीचा गळा ओळखू शकणार नाहीस. पण तेथे तुझी बहिण नाही म्हणता येणार नाही. मग तिचा गळा स्पष्ट का ऐकू येत नाही. येथे समानाभिहार प्रतिबंध आहे. सारखा गळा स्पष्ट ऐकू येत नाही. याप्रमाणे आपल्या ठिकाणी अविद्या प्रतिबंध आहे. अविद्या काय आहे हे सांगण्याकरिता सर्व जगाचे कारण काय हे सांगतात. या जगाचे कारण प्रकृति आहे. प्रकृति म्हणजे जिच्या मध्ये तिन्ही गुण सारखे असतात. कारणाचे गुण कार्यात असतात, व आणखी इतरहि गुण असतात. काळ्या तंतूपासून पट उत्पन्न होतो. कार्यात काही गुण कारणातले व काही गुण निराळे असतात. जगात कित्येक सुखी, कित्येक दुःखी, कित्येक दोन्ही, कित्येकांना काही समजत नाही. याप्रमाणे जगत् सुख दुःख मोहाने भरलेले दिसते. म्हणून हे गुण कारणात अअसले पाहिजेत. सुख हे सत्त्वगुणापासून आहे. दुःख हे रजोगुणापासून व मोह तमोगुणापासून आहे. याप्रमाणे जगताचे कारण सत्त्व रज तम या गुणांनी त्रिगुणात्मक आहे.

चिदानंदमयं ब्रह्म प्रतिबिम्बसमन्विता ॥
तमो रजःसत्त्वगुणा प्रकृतिर्द्विविधा च सा ॥१५॥
सत्त्वशुद्ध्यविशुद्धिभ्यां मायाऽविद्ये च ते मते ॥
मायाबिम्बो वशीकृत्य तां स्यात्सर्वज्ञ ईश्वरः ॥१६॥
अविद्यावशगस्त्वन्यस्तद्वैचित्र्यादनेकधा ॥

प्रकृति म्हणजे तिन्ही गुण साम्यावस्थेंत राहणे. ती प्रकृति दोन प्रकारची आहे. उदा॰ एकच पाणी शुद्ध व मलीन असते. पाण्यात चिखल असला तर सूर्याचे प्रतिबिंब पडूनहि दिसत नाही. पण तेच थोडे स्वच्छ पाणी असले तर

त्यात पडलेले सूर्यप्रतिबिंब स्पष्ट दिसते. त्याप्रमाणे प्रकृति दोन प्रकारची आहे.

१. सत्त्वगुण जास्त व रजतम फार कमी हिला **माया** म्हणतात.

२. रजतम जास्त व सत्त्व कमी तिला **अविद्या** म्हणतात.

३. मायेंत पडलेले ब्रह्माचे प्रतिबिंब तो **ईश्वर** व अविद्येंत पडलेले ब्रह्माचे प्रतिबिंब तो **जीव.**

शुद्ध सत्त्वगुण मायेत असल्यामुळे ब्रह्माच्या शक्तीला झांकत नाही. रजतम, ज्ञान झांकणारे आहेत. सत्त्व ज्ञानाला साधक आहे. ज्ञानाला झांकणारे नाही. म्हणून ईश्वराचे ज्ञान झांकले जात नाही; व म्हणूनच तो सर्वज्ञ व स्वतंत्र झाला. माया त्याच्या स्वाधीन राहिली. अविद्येमध्ये रजतम जास्त असल्यामुळे व यांच्या योगाने ज्ञान झाकल्यामुळे जीव अल्पज्ञ व परतंत्र झाला व तो अविद्येच्या स्वाधीन आहे. ती अविद्या पुष्कळ प्रकारची आहे व त्यामुळे जीवही पुष्कळ आहेत. ती अविद्या प्रत्येक जीवाचे कारणशरीर आहे. या स्थूल देहाला आपण जसे मी म्हणतो, त्याप्रमाणे या कारणशरीराला मी म्हणतो, तेव्हा जीवाला **'प्राज्ञ'** म्हणतात.

सा कारणशरीरं स्यात्प्राज्ञस्तत्राभिमानवान् ॥१७॥
तमःप्रधानप्रकृतेस्तद्भोगाय ईश्वराज्ञया ॥
वियत्पवनतेजोऽम्बुभुवो भूतानि जज्ञिरे ॥१८॥
सत्त्वांशैःपंचभिस्तेषां क्रमाद्धीन्द्रियपंचकम् ॥
श्रोत्रत्वगक्षिरसनघ्राणाख्यमुपजायते ॥१९॥
तैरन्तःकरणं सर्वेवृत्तिभेदेन तद्द्विधा ॥
मनोविमर्शरूपं स्याद् बुद्धिः स्यान्निश्चयात्मिका ॥२०॥

जीव जेव्हा अहंकार धरून आपल्याला विसरतो व अविद्याच मी आहे म्हणतो, तेव्हा तोच **'प्राज्ञ'** संज्ञा पावतो व हीच अविद्या जीवाचे कारणशरीर आहे. जीव एक एक पडदा घेत जातो. उदा॰ तूं मायाबापाच्या घरी होतीस तेव्हा मी अमुकाची सून असे वाटत नव्हते, पण तेच लग्न झाल्याबरोबर तसे वाटायला लागले. – याप्रमाणे जीवाने आपल्याला विसरून जाऊन, मी अविद्या आहे असे म्हटले, पुढे मनालाच मी आहे असे म्हटले व पुढे या स्थूल देहालाच मी आहे असे म्हटले, 'अविद्या मी आहे म्हणजे मला काही समजत नाही,' असे म्हणूं लागला.

तेच त्याचे **कारणशरीर** या कारणशरीराभिमानी जीवाला त्याच्या कर्माचे फळ देण्याकरिता, ईश्वराने सृष्टी उत्पन्न केली. त्याला जगाचे काही करावयाचे नाही, पण कृपाळुपणे सर्व जीवांना त्यांच्या कर्माचे फळ मिळावे व ज्ञान करून घेऊन, त्यांनी मुक्त व्हावे म्हणून सृष्टी उत्पन्न केली. त्यांत पहिले आकाश, त्यापासून वायु, त्यापासून तेज, त्यापासून आप, व त्यापासून पृथ्वी उत्पन्न केली. शब्द हा आकाशाचा गुण आहे. वायूत शब्द व स्पर्श दोन गुण आहेत. तेजात शब्द, स्पर्श व रूप असे तीन गुण आहेत. शब्द, स्पर्श, रूप, रस असे चार गुण आपात आहेत, व पृथ्वीत, शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध असे पांच गुण आहेत. ही पांच भूते त्रिगुणात्मक आहेत, कारण प्रकृति त्रिगुणात्मक आहे व कारणाचे गुण कार्यात असतात.

सर्व भूतांचा सत्त्वगुण एकट्टा करून त्यापासून अंतःकरण झाले. ते पुनः दोन प्रकारचे आहे. संशयात्मक ते मन व निश्चयात्मक ती बुद्धि. यांच्याच सत्त्वगुणापासून त्वक्, चक्षु, जिव्हा, घ्राण, श्रोत्र ही पांच इंद्रिये उत्पन्न झाली. आकाशाच्या सत्त्वांशापासून **श्रोत्र,** वायूच्या सत्त्वांशापासून **त्वक्**, अग्नीच्या सत्त्वांशापासून **चक्षु,** आपाच्या सत्त्वांशापासून **जिव्हा**. रजोगुणापासून पांच कर्मेंद्रिये झाली. त्यात आकाशाच्या रजोगुणापासून **वाचा,** वायूच्या रजोगुणापासून **हात,** अग्नीच्या रजोगुणापासून **पाय,** आपाच्या रजोगुणापासून **उपस्थ,** पृथ्वीच्या रजोगुणापासून **गुद.**

तसेंच या पंचभूतांच्या रजोगुणापासून **प्राण** उत्पन्न झाला. तोहि पांच प्रकारचा आहे. प्राण, अपान, व्यान, उदान, समान. त्यांत **प्राण** बेंबीपासून कंठापर्यंत असतो. तो आपण श्वासोश्वास करतांना आंत बाहेर घेतो व सोडतो. **अपान** कटिजंघा वगेरेच्या ठिकाणी असतो. याच्या योगाने आपण लघवी करतो. **व्यान** - नाक, कान, डोळे जीभ या ठिकाणी राहतो. जेवल्यानंतर ज्याच्या योगाने सुस्ती येते. **उदान** हातपायादि संधीच्या ठिकाणी असतो. ज्याच्या योगाने आपण बोलतो. **समान** सर्व देह व्यापून आहे. ही पांच ज्ञानेंद्रिये, पांच कर्मेंद्रिये, पांच प्राण, मन व बुद्धि इतकें मिळून **सूक्ष्म शरीर** किंवा **लिंग शरीर** होते. या सूक्ष्म शरीराला जेव्हा जीव मी म्हणतो तेव्हा त्याला **''तैजस''** म्हणतात. हे सूक्ष्मशरीर या देहातून निघून दुसऱ्या देहात जाते. यालाच जन्ममरण आहे.

रजोंऽशैः पंचभिस्तेषां क्रमात्कर्मेन्द्रियाणि तु ॥
वाक्पाणिपादपायूपस्थाभिधानानि जज्ञिरे ॥२१॥
तैः सर्वैः सहितैः प्राणो वृत्तिभेदात्स पंचधा ॥
प्राणोऽपानः समानश्चोदानव्यानौ च ते पुनः ॥२२॥
बुद्धिकर्मेन्द्रियप्राणपंचकैर्मनसा धिया ॥
शरीरं सप्तदशभिः सूक्ष्मं तल्लिंगमुच्यते ॥२३॥
प्राज्ञस्तत्राभिमानेन तेजसत्व प्रपद्यते ॥

काल लोकांतराला जाणारे हेच लिंग शरीर आहे, असे सांगितले. कारण आत्मा सर्वव्यापक असल्यामुळे कोणत्याच लोकाला जाऊ शकत नाही व जी वस्तु अव्यापक आहे, तीच एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जात असते.

उदा.- ताई येथे नव्हती. आजनासला होती, म्हणून ती तेथून येथे आली. पुनः हा स्थूल देहहि जाऊ शकत नाही, कारण तो मेल्यावर येथेच पडला असतो म्हणून. हे मागे सांगितलेले सतरा तत्त्वांचे सूक्ष्म शरीरच लोकांतराला जात असते. या सूक्ष्म शरीरावर आपला अभिमान असल्यामळे, आपल्याला जन्ममरण होतात. अभिमान नसल्यास जन्ममरण होणार नाही. कल्पना कर, एक लोखंडाचा गोळा घेतला व तो चांगला तापविला व ठोकला, तर त्यांतील अग्नीवर घाव बसतात असे आपणास वाटते; पण वास्तविक अग्नीवर एकहि घाव बसत नसून लोखंडावरच सर्व घाव बसतात. – त्याप्रमाणे आत्म्याचा व या सूक्ष्म शरीराचा अध्यास झाला आहे. **अध्यास म्हणजे खोटे व खरे एक समजणे.** उदा॰ नकली मोतीहि केव्हा केव्हा खरेच आहेत, असे वाटते. ज्याला परीक्षा नाही, त्याला खरे कोणते व खोटे कोणते हे समजत नसते. त्याप्रमाणे सूक्ष्म शरीरच मी आहे, असे आपण म्हणतो; म्हणून आपल्याला जन्ममरण आहे॰ हा अध्यासच सर्व दुःखाचे मूळ आहे. या लिंगशरीरात ज्ञानेंद्रिय, कर्मेंद्रिय, प्राण ही असल्यामुळे यांत सत्त्व व रज आहेत, व बाकीचा जो तम राहिला त्याचे पंचीकरण केले.

या पंचीकरणापासून हे आपले स्थूल शरीर झाले. या शरीरांत पाच तत्त्व आहेत. पोकळी म्हणजे आकाश. श्वास वगैरे वायु. अग्नीचा भाग (रक्त स्वेद), आपाचा भाग वीर्य, मूत्र व पृथ्वीचा भाग त्वचा, मांस, शौच वगैरे.

त्यात पुन्हा **आकाशाचे पाच भाग** - काम, क्रोध, शोक, मोह, भय.

वायूचे पांच भाग - चालन, वळण, प्रसरण, संकोचन, निरोधन.

अग्नीचे भाग - क्षुधा, तृषा, झोप, आलस्य, मैथुन.

आपाचे पांच भाग - वीर्य, रक्त, मूत्र, लाळ, घाम.

पृथ्वीचे पाच भाग - हाड, नाडी, त्वचा, मांस, रोम.

हे सर्व मिळून आपले शरीर झाले आहे. यांत लिंग शरीर येऊन राहाते.

लिंगशरीराचा व आत्म्याचा जसा अध्यास झाला आहे, तसाच पुढे हा अध्यास विसरून जाऊन या स्थूल देहाचा अध्यास होतो. उदा. राघो पकडून पिंजऱ्यात ठेवण्याच्यापूर्वी झाडच त्याचे घर असते. पुढे पकडून पिंजऱ्यात ठेवल्यावर पिंजराच घर मानतो व पुढे त्या पिंजऱ्यातील नलिकेवर जाऊन बसतो व मग मी ही नळी सोडली तर पडेन, असे समजून त्या नळीला घट्ट धरून ठेवितो. – त्याप्रमाणे पहिले आपण कारण-शरीराचा अभिमान धरला, पुढे सूक्ष्म शरीराचा अभिमान धरला व त्याचप्रमाणे जेव्हा स्थूलदेहाचा अभिमान धरतो, तेव्हा त्याला **'विश्व'** म्हणतात.

मी अमुका नामरूपाचा । ऐसा हा अभिमान विश्वाचा ।
तूं जाणता या सर्वांचा । विलक्षण ॥ (परमामृत अ. ४ ओ. २९)

जो प्राज्ञ तोच तैजस व तोच विश्व.

याप्रमाणे हा जीव उत्तरोत्तर अध्यास धरून कर्म करतो व पापाने नर्क व पुण्याने स्वर्ग मिळवितो व भोग झाल्यावर पुनः कर्म करण्याकरिता जन्म घेतो. कर्मानंतर भोग, व भोगानंतर पुनः कर्म, याप्रमाणे सुख दुःख परंपरा चालली आहे.

हा **विश्व**, पुण्याच्या योगाने देव, समान पापपुण्य असल्यास मनुष्य व पाप पुष्कळ व पुण्य कमी असल्यास तिर्यग् योनीत जातो. देव योनीत जाणारे जीवहि अज्ञानी आहेत.

कुर्वन्ते कर्म भोगाय कर्मकर्तुं च भुञ्जते ॥
नद्यां कीटा इवावर्तादावर्तान्तरमाशु ते ॥
व्रजन्तो जन्मनो जन्म लभन्ते नैव निर्वृतिम् ॥३॥

या सर्वांना स्थूल शरीराचा अभिमान असल्यामुळे हे सर्व विश्वच आहे.

सत्त्वप्रधानविबुधा, रजसो मनुष्यः, पश्वादयस्तमसउन्नतभावबद्धाः॥

देव सत्त्वप्रधान असतात. मनुष्य रजःप्रधान असतात. तिर्यग् तमप्रधान असतात. सर्वजण अविवेकाने आपल्याला विसरून जाऊन या कर्मफेऱ्यात पडतात. त्यांना सुखाचा आश्रय कधीच नाही. भोवऱ्यांत सांपडलेले जसे फिरत राहतात व कोणी एखादा पूर्व पुण्याने मिळाला, तर त्याच्यातून त्याला काढतात. याप्रमाणे सर्व जीव या चक्रांत फिरत आहेत. एखाद्या जीवाला अनंत जन्मीच्या पुण्याने श्रीगुरु मिळून तो या भवचक्रापासून सुटून अशा सुखाला प्राप्त होतो.

९. युक्त्या

॥ युक्ति १ ली ॥

८-१०-१९०७

सामान्य चैतन्याची सिद्धि
जाति / व्यक्ति

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

जगातला कोणताहि पदार्थ घेतला तरी त्याला व्यक्ति व जाति ही असतातच. परंतु मन व कारण यांना मात्र जाति व व्यक्ति नाही. व्यक्ति म्हणजे आपल्याला प्रत्यक्ष होते ते व जेवढे इंद्रियगोचर ते सर्व प्रत्यक्ष होय. परंतु सुख-दुःख प्रत्यक्ष नाही. उदा.- उन्ह व शिवी यांजपासून होणारे दुःख प्रत्यक्ष नाही. झोपेत मन इंद्रियापासून लक्ष्य काढून घेते, म्हणून इंद्रियांना आपले विषय ग्रहण करता येत नाहीत. सुखदुःखाचे ज्ञान आपल्याला अपरोक्ष होते. प्रत्येक पदार्थाला जाति व व्यक्ति आहेत. व्यक्ति म्हणजे स्तंभ, पुरुष वगैरे.

अनेक व्यक्तींच्या ठिकाणी राहणारा, जो एक सामान्य धर्म, त्याला जाति म्हणतात. व्यक्ति=विशेष व जाति=सामान्य. सामान्य गोष्ट कळल्याशिवाय विशेष कळत नाही व विशेष कळल्याशिवाय सामान्य कळत नाही. व्यक्तिवरून जातीची कल्पना होते व जातीवरून (सामान्यावरून) व्यक्तीची म्हणजे विशेषाची कल्पना होते. ह्यावरून विशेष आणि सामान्य ह्यांचा अन्योन्याश्रय झाला.

शंकराचार्यांशिवाय इतर सर्व द्वैतवादी असल्यामुळे या अन्योन्याश्रयाचा

उलगडा शांकरमताशिवाय कोणासच होत नाही. अद्वैत असे शांकरमतच यातला दोष दाखवू शकते. अन्योन्याश्रयात दोष आहे, कारण दोन वस्तूत जी जास्त टिकावू असेल ती अगोदर असली पाहिजे. आता जाति अगोदर किंवा व्यक्ति अगोदर हे आपण पाहू. जाति एकच आहे व व्यक्ति पुष्कळ आहेत.

जाति निर्गुण व व्यक्ति सगुण असते, किंवा निराकार व साकार असते. जाति मनोगोचर आहे, इंद्रियांने दाखविता येत नाही. व्यक्ति साकार असते व इंद्रियगोचर असते. साकार पदार्थाचा नाश होतो. नाशकत्व व साधकत्व ह्या गोष्टी साकारातच राहतात. पुरुष म्हटले म्हणजे सगळे एक, पण स्त्री म्हटली की भेद आलाच. पण मनुष्य म्हटले की, पुरुष व स्त्री दोन्ही आले; दोन पायाचे म्हटले की भेद आलाच. परंतु प्राणी म्हटले म्हणजे मनुष्य व पशु दोन्ही आले. पुनः स्थावर म्हणजे झाड, पर्वत म्हटले की भेद आलाच, परंतु पांच भूतांचे झालेले पदार्थ म्हटले म्हणजे त्यात दोन्ही आले. तरी पुनः पांच भूतांचे झालेले नाहीत, असे पदार्थ म्हटले म्हणजे भेद येतोच, परंतु मनाचे केलेले पदार्थ म्हटले म्हणजे पांच भूतापासून झालेले व पांच भूतापासून न झालेले दोन्ही त्यांत आले. ह्यावरून मनात सर्वांचा समावेश झाला.

नाश म्हणजे कारणात मिळून जाणे. मनाचा अभिमान हेच सुखदुःखाचे कारण आहे. मुलगा मेला म्हणजे दुःख होते ते कां ? मुलगा दिसत नाही म्हणून दुःख होते म्हणावे तर जन्मापूर्वीहि तो दिसत नाही. तेव्हा दुःख कां होत नव्हते? याचे कारण असे की,– तो मेल्यावर जरी त्याचा देह नाहीसा होतो, तरी मनातून नाहीसा होत नाही, म्हणून दुःख होते, व जन्मापूर्वी मुलगा मनावरच येत नाही, म्हणून दुःख होत नाही.

विरोध हा कार्यात आहे, कारणात नाही. उदा. अग्नि व पाणी. अग्नि लाकडात असतो. तेव्हा पाण्याशी त्याचा विरोध नसतो. विरोध असता तर पाण्याने झाड वाढले नसते, म्हणून विरोध हा मूळ रूपात नाही. बाहेर निघाल्यावर विरोध आहे. मूळ रूपात (कारणात) सर्व वस्तु कारणरूपानेच असतात. सामान्यात (जातीत) नाशकत्व आणि साधकत्व म्हणजे वैर व मित्रता उत्पन्न होत नाही. कारण ती निराकार असते हे वर सांगितलेच आहे व साकारात नाशकत्व- वैर व साधकत्व- मित्रता; ह्या गोष्टी राहतात म्हणून त्याचा नाश होतो; हेहि

सांगितलेच आहे. म्हणून सामान्याचा (जातीचा) नाश होत नाही, म्हणून ती अगोदर असली पाहिजे. जाति पासूनच व्यक्ति उत्पन्न होते.

जाति मनोगोचर आहे, म्हणून जो पदार्थ मनात येतो त्यापासूनच व्यक्ति उत्पन्न होते. म्हणून **निराकारापासून साकार उत्पन्न होते.** जातीच्या म्हणजे सामान्याच्या मानाने मन विस्तृत आहे, पण व्यक्तीच्या मानाने ते देहापुरतेच झाल्यामुळे लहान आहे; म्हणून मनातून व्यक्ति काढून टाकली तर जाति निराकार म्हणजे सामान्य चैतन्य बाकी राहिले.

या युक्तीने शत्रु-मित्र हे भाव मनातून काढून टाकले म्हणजे ते सर्वाभूती समबुद्धि होते.

॥ युक्ति २ री ॥

ता. ११-१०-१९०७

सांख्य व वेदान्त : समन्वय

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

कारणाचे विभाग करून टाका. जगत् जाणण्याचे कामी सांख्याचा उपयोग होतो, व ब्रह्म जाणण्याचे कामी वेदान्ताचा उपयोग आहे. आता कारणातून पहिले सगळे मनावर येते, हे सांगितलेच आहे. कपिल गीतेत म्हटले आहे. की

''आत्मा च पुरुषः प्रोक्तो मानसं प्रकृतीं तथा''॥

आत्मा म्हणजे कारण किंवा सर्वव्यापक असणारा '**अतति इति आत्मा**' तो झाला पुरुष व मन हे प्रकृति होय. कारणातून कोणतीहि गोष्ट मनावर आल्याशिवाय रहात नाही. मनाचे तीन गुण आहेतः सत्त्व, रज व तम. हे तिन्ही द्रव्य आहेत, गुण नाहीत. कारण यांचा संयोग व विभाग होतो. गुणाचा संयोग होऊ शकत नाही. तिखट व साखर या द्रव्यांचा एकत्र संयोग करता येतो. परंतु त्यांचे गुण तिखटपणा व गोडी हे एका ठिकाणी मिळविता येत नाहीत. म्हणून सत्त्व, रज व तम हे गुण नव्हेत, द्रव्य आहेत. द्रव्यावर रहाणारे जे गुण ते धर्म होत. परंतु हे रजादिक मनुष्याला अज्ञानाने बांधतात. म्हणून गुण म्हणजे दोरी या अर्थाने त्यांना गुण म्हटले आहे. कारिकाकारांनी म्हटले आहे :- सत्त्व जे द्रव्य आहे, त्याचे प्रकाश, हलकेपणा व आनंद असे तीन धर्म आहेत. प्रकाश हा ज्ञान देणारा आहे. रजाचे दुःख आणि चंचलता असे धर्म आहेत. तमाचा धर्म जडपणा

आहे. तमोगुणात चित्त असले म्हणजे मन फार संकोचित असते.

उदाहरण:- जसे पाणी बर्फरूपाने डब्यात दाबून ठेवता येते, त्याप्रमाणे रजोगुणात मन मोकळे होते, पण ते मर्यादित असते. सत्त्वगुणात मात्र मन पूर्णपणे मोकळे होते व विस्तृत होवून म्हणजे फैलून सर्व ब्रह्मांडाला हालवून सोडते. सत्त्वगुण पूर्ण आहे व रज व तम हे न्यून आहेत.

उदाहरणार्थ:- समुद्रातले पाणी घड्यांत भरले म्हणजे समुद्राच्या बाहेर काढल्यामुळे घड्यातले पाणी न्यून झाले. तसेच **मन जेव्हा कारणातून बाहेर येवून न्यून होते तेव्हा दुसऱ्या पूर्ण वस्तूची त्याला अपेक्षा असते.** देहाच्या मानाने आपण झाडाएवढे असतो तर घराचीच जरूरी लागली नसती, कारण झाडाला घर नको. पृथ्वीपेक्षा आपण मोठे असतो तर आपणास पृथ्वीची अपेक्षा नसती. **आपण देहापुरतेच आपल्याला मानून घेतल्यामुळे आपणाहून निराळा असा कोणी सर्व शक्तिमान् ईश्वर असला पाहिजे,** असे सहज मनात येते.

शंका :- मन हे एकाच काली आपल्या देहाने न्यून व आपणाहून भिन्न व पूर्ण शक्तिमान् ईश्वर ह्या दोन्ही गोष्टी कशा उत्पन्न करू शकते?

उत्तर :- स्वप्नांत आपल्यास आपली आई दिसते व आपणहि दिसतो. म्हणून ती स्वप्नातली आई आपल्या आधी जन्मली असते काय? नाही. आपण व आपली आई ही दोघेहि मनाने एकाच वेळी उत्पन्न केलेली असतात. त्याचप्रमाणे **मन हे एकाच काली आपण न्यूनदेहाने उत्पन्न होते व आपल्याहून पूर्ण ईश्वरालाही उत्पन्न करते.** सत्त्वगुण ईश्वराकडे नेणारा आहे.

देवतांची उत्पत्ती

आपण जसे जसे न्यून न्यून होत जातो तसे तसे देवता जास्त उत्पन्न होत जातात. 'कारण' हे दूर नसून त्या कारणालाच, सत्त्वगुण देवतारूपाने उत्पन्न करतो.

लहान असते ते अध्यात्म व मोठे ते अधिदैव. आपण अध्यात्म झालो की बाकीचे मन देवतारूपाने परिणाम पावते म्हणजे अधिदैव बनते.

आपले मन इंद्रियांच्या स्वाधीन झाले की बाकीचे मन देवतारूपाने परिणाम पावते. आपण इंद्रियावर येण्याच्या पूर्वीच देवता तयार झाल्या. डोळ्याशिवाय पाहणे होत नाही, कानाशिवाय ऐकता येत नाही व त्वचेशिवाय स्पर्श समजत

नाही; त्याप्रमाणे **मन इंद्रिया एवढे झाले की सूर्य, दिशा, वायू वगैरे निरनिराळ्या देवता उत्पन्न होतात.** प्रीति, वासना व भोग, ह्या मनाच्या तीन वृत्ति आहेत.

मनाने आळसात आनंद मानला की, कारण हे **रुद्र** या रूपाने उत्पन्न होते. मनाला विषयाची वासना झाली की कारण **ब्रह्मदेवाच्या** रूपाने उत्पन्न होते व मनाला प्रीतीची इच्छा झाली म्हणजे **विष्णु** या रूपाने कारण परिणाम पावते.

कारणामध्ये जीवाचे कल्याण करण्याची इच्छा सहज असते. म्हणून मन लहान झाले की, कारण देवतारूप होवून जीवाचे कल्याण करून त्याला परत आपल्याकडे आणण्याची खटपट करते. जसा अज्ञान मुलगा इकडे तिकडे फिरत असला, तर आईची त्याजवर नजर असते, तशीच जीवाच्या एकंदर कर्मावर देवतांची नजर असते.

जिभेशिवाय रुचि समजत नाही, असा मनाने निश्चय केला की ईश्वर **वरुणरूप** झालाच.

डोळ्याशिवाय दिसत नाही, असा निश्चय झाला, ईश्वर **सूर्यरूप** झालाच. **आपण न्यून होत चाललो की परमेश्वर निरनिराळ्या देवतारूपांनी उत्पन्न होतो.**

कानाशिवाय ऐकू येत नाही, असा निश्चय मनाने केला, की ईश्वर **दिशारूप** होतो.

त्वचेशिवाय स्पर्श समजतच नाही, असा निश्चय झाला,की ईश्वर **वायूरूप** होतो.

नाकाशिवाय गंध समजत नाही, असा मनाने निश्चय केला की ईश्वर **अश्विनीकुमाररूप** झालाच. याप्रमाणे पंच तन्मात्रा तयार झाल्या.

हाताशिवाय काम होत नाही, असा आपला निश्चय झाला, की **इंद्रदेवता** उत्पन्न झाली.

डोळ्याशिवाय दिसत नाही असे मनाते घेतले, की **सूर्यदेवता** उत्पन्न झाली.

पायाशिवाय चालणे होत नाही, असा मनाने निश्चय केला, की **जयन्त** ही देवता उत्पन्न झालीच.

स्त्री भोगाची इच्छा उत्पन्न झाली की ईश्वर **प्रजापति** झालाच.

गुदाशिवाय मल विसर्जन होत नाही, असा मनाने निश्चय केला की

निर्ऋतिदेव झालाच.

वाचेशिवाय बोलणे होत नाही असा निश्चय झला की **अग्निदेवता** उत्पन्न होते. याप्रमाणे दश इंन्द्रिये व तीन गुण असे तेरा.

पंच प्राणांच्या पाच पंचभूताच्या पांच.

शुक्राची देवता **आप,**

शोणिताची **सोम** व

ओजाची **ईशान** अशा २६ देवता झाल्या.

अन्नशिवाय क्षुधा जाऊ शकत नाही, असा मनाचा निश्चय झाला, की परमात्मा स्वतः **विराटदेवता** बनणार.

पाण्याशिवाय तहान जावू शकत नाही, असा निश्चय झाला, की ईश्वर **मेघरूप** बनला.

वायू पोटात असल्याशिवाय जीव जगत नाही, असे ठरल्याबरोबर प्राण **हिरण्यगर्भ** बनला.

मनुष्याला मेल्याशिवाय होतच नाही, असे ठरल्याबरोबर ईश्वर **मरणाची देवता** झालाच.

आपणाला जन्म पाहिजे असे वाटू लागेल तेव्हा ईश्वर **मरीची** प्रजापति झालाच.

शरीरावर प्रियता उत्पन्न झाली, तेव्हा ईश्वर **काळरूप** झाला. काळच शरीराचे पोषण करतो.

याप्रमाणे तेहतीस देवता वेदात सांगितल्या आहेत. त्याच देवतांना स्त्रिया झाल्या.

त्याचप्रमाणे मनुष्याच्या जेव्हा नीच वासना झाल्या तेव्हा कनिष्ट देवता झाल्या.

आपण क्रोधावर आलो तेव्हा **यक्ष** उत्पन्न झाले.

कामावर आलो तेव्हा **अप्सरा** उत्पन्न झाल्या.

लोभावर आलो तेव्हा **राक्षस** उत्पन्न झाले.

हा सर्व खेळ निराकार आहे. पण आकाराची कल्पना येते तेव्हा सगुणरूप देवता होतात.

उंच मनुष्याकरिता उंच देवता व नीच वासना ज्यांच्या आहेत, त्यांच्याकरिता नीच देवता उत्पन्न झाल्या. सगळ्या देवतांत ब्रह्मा, विष्णू व शंकर हे श्रेष्ठ आहेत, व ईश्वरानेंच ती ती रूपे धारण केली. त्यांच्या पलीकडे मात्र देवता नाहीत, म्हणजे असणे शक्य नाही.

।। युक्ति ३ री ।।

।। श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ।।

लक्षण व प्रमाण

आजची युक्ति समजल्याने सर्व शास्त्रात प्रवेश होतो.

''लक्षण-प्रमाणाभ्यां वस्तुसिद्धिः''

हे सर्व शास्त्राचे सूत्र होय. चैतन्यवादी, जडवादी, लोकांतील निरनिराळे मतवादी या सर्वाचे हे एक वाक्य होय. याचा अर्थ असा - जगातला उंच, नीच, शास्त्रीय वगैरे कोणताहि पदार्थ असो, त्याचे ज्ञान, लक्षण व प्रमाण यांच्या योगाने होते. हे **लक्षण व प्रमाण जुळले तर ती वस्तु आहे, नाहीतर नाही असे समजावे.**

लक्षण म्हणजे ज्या वस्तूला जाणावयाचे आहे, तिचा मुख्य धर्म सांपडणे व ज्या रीतीने तिला आपण जाणतो, ते **प्रमाण** होय.

पदार्थाचा मुख्य धर्म म्हणजे **लक्षण.**

हे न समजण्याला तीन दोष आहेत. ते असें :- **अतिव्याप्ति, अव्याप्ति व असंभव.** हे तीन दोष दूर करून लक्षण होते व ह्या तीन दोषातून कोणताहि एक जरी असला, तरी लक्षण होत नाही.

उदा. एक गाय आहे व तिचे आपल्यास लक्षण करावयाचे आहे म्हणजे गायीचा मुख्य धर्म आपल्यास पाहावयाचा आहे, तर दोन शिंगे म्हणजे गाय असे जर लक्षण केले तर येथे अतिव्याप्ति दोष येतो, कारण म्हशी, हरणे, शेळ्या यांनाहि गायच म्हणावे लागेल. यावरून वस्तूचा धर्म समजण्याकरिता जो निश्चय केला त्यावरून दुसऱ्याहि पदार्थाचा बोध होत असेल तर तो **अतिव्याप्ति** दोष समजावा.

आता **अव्याप्ति दोष** म्हणजे लक्षण कमी पडणे. जसे 'काळी असते ती गाय' एवढेंच जर लक्षण केले, तर लाल, पांढऱ्या ह्या गायी वगळल्या पाहिजेत,

म्हणून येथे लक्षण कमी पडले. हा अव्याप्ति दोष होय.

तिसरा **असंभव दोष :-** याचे उदा॰ जिचें चौकोनी पाय असतात, ती गाय असे लक्षण केले तर, अशी कोठे गाय असते काय? हा असंभव दोष झाला. तर हे तीन दोष दूर करून लक्षण केले, तर ते बरोबर होईल. ''सास्नादिमत्वं गोर्लक्षणम्'' म्हणजे पोळी व योनी वगैरे असली म्हणजे तिला गाय म्हणावे हा नियम बरोबर झाला. म्हणून ज्या ज्या पदार्थाचा मुख्य धर्म कमी पडत नाही, जास्त होत नाही किंवा दुसऱ्या पदार्थावर जात नाही त्या त्या पदार्थाचे लक्षण बरोबर झाले असे समजावे. याचप्रमाणे सगळ्या पदार्थाचे लक्षण समजावे.

दुसरे पुरणाची पोळी. गूळ भरला ती पुरणाची पोळी, असे लक्षण केले तर गुळाची पापडी ही पुरणाची पोळीच होईल. किंवा तुपाशी जेवतात ती पुरणाची पोळी म्हटले तर भातावर अतिव्याप्ति होईल. चार पाय असतात ती पुरणाची पोळी म्हटले, तर असंभव दोष येईल. म्हणून ज्यामध्ये दाळ व गूळ किंवा साखर भरून करतात, ती पुरणाची पोळी, हेच लक्षण बरोबर होईल. याप्रमाणे प्रत्येक पदार्थाचे लक्षण होते. जो लांब असून विषारी असतो, ज्याला पाय नसतात व ज्याला उलटा दांत असतो तो सर्प. हे सर्पाचे लक्षण बरोबर झाले. ही जगातल्या पदार्थांची गोष्ट झाली.

आता ब्रह्माविषयी विचार करू :-

शालीग्राम खडा म्हणजे विष्णु असे म्हटले तर सामान्य खडाहि विष्णुच होईल, किंवा ज्याला मुकुट आहे तो विष्णु असे म्हटले तर राजाहि विष्णु होईल, म्हणून जो शंख, चक्र, पीतांबरधारी असून ज्याला कौस्तुभ व लक्ष्मी आहे व हृदयावर श्रीवत्सलांछन आहे तो विष्णु हे लक्षण बरोबर झाले. तात्पर्य, **वस्तूचे ज्ञान लक्षणांवाचून होत नाही.**

प्रमाण

ह्याप्रमाणे लक्षणनिष्ठ वस्तू ज्या रीतीने समजते ते प्रमाण होय. प्रमाण सहा प्रकारचे आहे : प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शाब्द, अर्थापत्ति व अनुपलब्धि. कोणी ८ प्रकारचे प्रमाण मानतात पण ते दोन अद्वैत मताचे नाहीत.

१) **इंद्रियाने जे यथार्थ ज्ञान होते ते प्रत्यक्ष प्रमाण होय.** हा खांब आहे हे ज्ञान प्रत्यक्ष प्रमाणानेच झाले. शब्द ऐकू येणे, रस गोड तिखट लागणे, हे सगळे

प्रत्यक्ष प्रमाणानेच होते मात्र यथार्थ समजले पाहिजे. आंधारात दोरीवर सर्प दिसतो. तो डोळ्यानेच दिसतो, पण ते प्रमाण नव्हे, तो भ्रम आहे. कारण ते सर्पाचे खरे ज्ञान नाही.

२) **प्रत्यक्ष प्रमाणाचे साह्य घेऊन दुसऱ्या वस्तूचे ज्ञान होते ते अनुमान प्रमाणाने** होते. पर्वतावर धुपट पाहून वणवा लागला असे आपण म्हणतो, तेव्हा ते अनुमान प्रमाण होय. जेथे धुपट तेथे अग्नि ही व्याप्ति होय. हिला **सहचार व्याप्ति** म्हणतात. पर्वतावर धुपट पाहून तेथे अग्नीचे ज्ञान अनुमान प्रमाणाने झाले. ह्या अनुमान प्रमाणाने दूरच्या पदार्थाचे ज्ञान होते, जवळचे होत नाही, हे वर सांगितलेच आहे.

ह्या अनुमान प्रमाणात कधी कधी उलटी रीति असते, त्याला **हेत्वाभास** म्हणतात व यांत जो घोटाळा आहे, तो हेत्वाभासाचाच आहे. आपण घरात धुपट पाहिले तर अग्नि आहे हे समजते. तसेच पर्वतावरही धुपट पाहून अग्नीचे ज्ञान अनुमान प्रमाणाने झाले. नुसती धुवार दिसली व त्याला आपण धुपट समजलो तर ते संशयाचे प्रमाण होईल. म्हणून त्याला अनुमान म्हणता येणार नाही. आता हेत्वाभास = उलटे प्रमाण. जेथे जेथे धुपट असते तेथे तेथे अग्नि असतो हे उलटे केले म्हणजे जेथे जेथे अग्नि असतो तेथे तेथे धुपट असते हे उलटे प्रमाण झाले. हे अनुमानासारखेच दिसते, पण चुकते. कारण लोखंडाचा गोळा तापविला तर तो अग्निसारखा दिसतो, पण त्याचे ठिकाणी धुपट नसते.

३) आता **उपमान प्रमाण :-** उपमान प्रमाणात व्याप्ति काहीच नसते. पदार्थासारखा दुसरा पदार्थ आहे हे सादृश ज्ञान जेव्हा प्रत्यक्ष होते तेव्हा उपमान प्रमाण म्हणतात. उदा॰ वरून पुस्तक आण असे म्हटले तर पुस्तकाचे सादृश ज्ञान प्रत्यक्ष झाल्यामुळे पुस्तक आणता येईल.

४) चवथे **शाब्द प्रमाण :-** आप्त म्हणजे खरे बोलणारा जे सांगेल ते शाब्द प्रमाण. ज्यांना तर्क नसून श्रद्धा मात्र अतिशय असते, ते भलत्याच शब्दप्रमाणावर विश्वास ठेवतात. व दुसरे अतिशय तर्कटी आहेत, त्यांचा विश्वास शब्द प्रमाणावर बसत नाही. त्यांचेहि चुकते. नुसत्या तर्काने चालत नाही.

जसे बापाचे लक्षण काय? तर चौघे लोक किंवा आई जे सांगेल ते; म्हणजे शब्द प्रमाण मानले पाहिजे. बापाचे ज्ञान प्रत्यक्ष नाही, अनुमानानेही होत नाही कारण अग्निधूमासारखा बापाचा संबंध दुसऱ्या पदार्थाशी नाही. तसेच

उपमान प्रमाणानेहि बापाचे ज्ञान होत नाही; कारण मुलाचा व बापाचा चेहरा सारखा असतो. म्हणून शब्दप्रमाणानेच बापाची सिद्धि होते. यावरून शब्दप्रमाणाची जरूर आहे व त्याकरिता तर्क आणि श्रद्धा ही पाहिजेत. एकादा मनुष्य दूर गेला तर त्याचे सुखदुःख शब्दप्रमाणाने कळते. मात्र खरे बोलणारा जे सांगेल तेच शब्दप्रमाण मानावे, व ज्याला कशाचीही जरूर नाही, जो निस्पृह असून लोकांचे कल्याण करणारा असेल, तोच खरे बोलतो. प्लेगने ज्याच्या घरचे सगळे संपले व पतही उडाली असा मनुष्य म्हणतो की, मी आता खोटे कोणासाठी बोलू? मग जे सुखाने घरदार सोडून गेले ते खरे बोलतीलच हे सिद्ध आहे. यावरून सत्पुरुष हेच आप्त होत व त्यांचेच वचन शब्दप्रमाण मानावे, म्हणून वेद पुराणे ही **शाब्द प्रमाणे** होत.

५) **अर्थापत्ति :-** एकादा मनुष्य लठ्ठ दिसतो व दिवसा तर जेवीत नाही, म्हणून तो रात्री जेवतो हे खरे असलेच पाहिजे. अनुमानात उलट प्रकार नसतो. परंतु अर्थापत्तीत तसे नाही. लठ्ठ असतो तो जेवतो व जेवतो तो लठ्ठ असलाच पाहिजे. अनुमान सादृशतेवरून होते व अर्थापत्ति सादृशतेवरून होत नाही. ''यत्र यत्र धूम्रस्तत्र तत्र वन्हिः'' ही व्याप्ति तुम्ही तयार केली, म्हणून पर्वतावरला तुम्ही अग्नि सिद्ध केला, परंतु जेवत असतो, तो लठ्ठ होतो, हे तुम्हाला अर्थावरून समजले. प्रत्यक्ष पाहिलेले नव्हे, म्हणून हे अर्थापत्ति प्रमाण होय. याप्रमाणे जितक्या पदार्थांना अस्तित्व आहे, त्या सगळ्याचे ज्ञान या पांच प्रमणावरून होते.

६) आता राहिलेले सहावे प्रमाण जे '**अनुपलब्धि**' ते वस्तु नाही असे सांगण्याच्या उपयोगी पडते. जसे ''इथे जैराम नाही'' हे तुम्ही कशावरून सांगितले? प्रत्यक्ष प्रमाणावरून काही सांगितले नाही, किंवा अनुमानानेहि सांगितले नाही. कारण ''इथे नाही'' असे सांगता या शब्दानेहि हे ज्ञान तुम्हास झाले नाही, तसेच उपमानानेहि झाले नाही, कारण मोतीराम नाही म्हणून जैराम नाही असे सादृशज्ञान हे नाही किंवा अर्थापत्ति प्रमाणानेहि हे ज्ञान तुम्हास झाले नाही, कारण रात्री होता, म्हणून आता नाही असे आपण म्हणत नाही तर ''जैराम येथे नाही'' हे ज्ञान '**अनुपलब्धि**' प्रमाणानेच तुम्हास समजले. ह्याप्रमाणे ही लक्षण व प्रमाणांची युक्ति तुला सांगितली ती नीट ध्यानात ठेव.

---

१०. बालबुद्धिविवर्धिनी

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

॥ ऐं विद्यायै नमः ॥

कन्या :- आपण कां शिकले पाहिजे ?

बाप :- शिकणे एक सुखाचे साधन आहे म्हणून.

कन्या :- सुख कशाला म्हणतात व ते किती प्रकारचे आहे ?

बाप :- आपल्याला जे आवडते त्याला सुख म्हणतात व जे आवडत नाही त्याला दुःख म्हणतात; जसे हिवाळ्यात सकाळी उन्हात बसणे आवडते व थंडी आवडत नाही. हे सुख चार प्रकारचे आहे.

१) चांगले वागणे २) पैसा मिळविणे. ३) संसाराचा उपभोग घेणे ४) देवाच्या बरोबरीचे होणे. यालाच शास्त्रात **धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष** म्हणतात.

कन्या :- बाबा हे मिळविण्याचे साधन आपल्यापाशी काय आहे ?

बाप :- विश्वास आणि बुद्धि. आपण व्यवहारात काही कामे विश्वासाने व काही कामे बुद्धीने करतो. केवळ विश्वासाने किंवा बुद्धीने काही कोणाचे चालत नाही. समज आपण जेथे बसलो आहे, तेथे एखादी वीज पडणार नाही कशावरून? धरणीकंप होऊन पृथ्वी लयाला जाणार नाही कशावरून? आपल्या अन्नांत कोणी विष घालणार नाही कशावरून? त्या आक्काबाईच्या पोराप्रमाणे आपल्याला घाटसर्प होणार नाही कशावरून? – याप्रमाणे नेहमी आपण शंकाच घेत राहिलो तर आपल्याकडून जेवणखाण सुद्धा न होता शरीरच चालणार नाही. म्हणून पुष्कळ गोष्टीवर आपल्याला व्यवहारात विश्वास ठेवावा लागतो. आपल्या विश्वासाच्या विरुद्ध जगात काही गोष्टी होत नाहीत असे नाही, काल त्या कमलाच्या मुलाच्या आंगावर अकस्मात वीज पडून मेल्याची वार्ता तूं ऐकलीच आहेस. मागे हैदराबादेस पाणी पडून कित्येक लोकांचा नायनाट झाला अशी एक बातमी वर्तमानपत्रांत आली होती. पण आपल्या घराविषयी तसे होणार नाही कशावरून, असा संशय घेऊन आपण काही आपले निजणे, बसणे सोडीत नाही. तात्पर्य, **जसे आपण व्यवहारात विश्वासाने कामे करतो तसा धर्मावरही विश्वास ठेवून कामे केली पाहिजेत.**

कन्या :- बरे, पण बाबा ! बुद्धीची आवश्यकता कोणती ?

बाप :- समज तुझ्या भावाने तुला ताई ताट वाढ असे म्हटले म्हणजे त्याच्यापुढे काय तूं रिकामे ताट नेऊन ठेवशील होय ?

कन्या :- नाही.

बाप :- कां ? ताट वाढ असे म्हटल्याने ताटात अन्न पाहिजे हे तुला कसे समजले? ताट या शब्दाचा 'अन्न' अर्थ कोठे आहे? पुनः मला भाजी वाढ असे म्हटले असता तूं त्याला क्ष्री भाजी नेऊन वाढशील की नाही? कारण क्ष्या भाजीलाहि भाजी म्हणतात.

कन्या :- ताट किंवा कच्ची भाजी कोणी खात नाही. शिजविलेली भाजी खातात. मग मी नुसते ताट किंवा क्ष्री भाजी कशी वाढीन?

बाप :- अग पण तुझ्या भावाला क्ष्री भाजी पाहिजे असल्यास?

कन्या :- पण त्याने स्पष्ट तोंडाने क्ष्री भाजी मागितली नाही तोपर्यंत इतर लोक जसे खातात तसे मला वाढले पाहिजे.

बाप :- शाबास वत्से ! शाहाणी आहेस तूं. यालाच बुद्धि म्हणतात.

या **बुद्धी**चा उपयोग कोठे करावा व ती कशी वाढवावी? **श्रद्धा** कशी ठेवावी व तिचा उपयोग कोठे करावा हे शिकण्याकरिताच आपल्यास शिक्षण पाहिजे. आपल्या धर्मांतल्या चुका दूर करण्याकरिता आपल्याला बुद्धीची आवश्यकता आहे.

कन्या :- मला बुद्धीची आवश्यकता समजली. त्या जीजीबाईची सून एवढी ढोमी झाली आहे, पण तिच्या सासऱ्यानी सांगितले की यमुना, भाजी गोड कर बरे ! तिने होय म्हणून भाजीत पुष्कळशी साखर कालवून त्यांच्यापुढे नेऊन ठेवली. बुद्धि असती तर असे झाले नसते की नाही ?

बाप :- अर्थातच नाही.

कन्या :- आता हा विश्वास आणि बुद्धि हे दोन्ही बरोबर कसे वाढवावे?

बाप :- मुली, त्याच्या करिताच आपल्याला ६ प्रमाणे कळली पाहिजेत; परंतु तितक्यांची तुमच्या वयांत आवश्यकता जरी नाही तरी त्यापैकी तीन कळलीच पाहिजेत.

कन्या :- प्रमाण म्हणजे काय !

बाप :- आपल्याला कळण्याची साधने. आपल्याला तीन साधनाने बहुतेक गोष्टी कळतात. काही गोष्टी **प्रत्यक्ष** पाहून कळतात. काही अंदाजाने कळतात त्याला **अनुमान** म्हणतात. हा अंदाज करण्याकरिता बुद्धीची आवश्यकता पाहिजे. काही गोष्टी दुसऱ्याने सांगून कळतात. याला **शाब्द** म्हणतात. येथे आपल्याला विश्वासाची आवश्यकता लागते. या तीन गोष्टीवाचून कोणतेहि ज्ञान निश्चयाचे होत नाही.

कन्या :- बाबा ! प्रत्यक्ष प्रमाण किती प्रकारचे आहे ?

बाप :- ५ प्रकारचे आहे. १.ऐकणे, २.पाहणे, ३.वास घेणे, ४.चाखणे आणि ५.आंगाला स्पर्श करणे हे याचे पांच प्रकार आहेत.

नादाचे ज्ञान ऐकल्याने होते व त्याचे स्थान कान आहेत, त्याला श्रोत्र म्हणतात.

उजेडाचे ज्ञान पाहण्याने होते व त्याचे ठिकाण डोळे आहेत, त्याला चक्षु म्हणतात.

वास घेण्याचे स्थान नाक आहे. त्याला घ्राण म्हणतात.

पदार्थाची चवी चाखल्याने समजते. त्याचे स्थान जीभ आहे, त्याला रसना म्हणतात.

आमच्याजवळ एखादी वस्तु आली असता त्याचे ज्ञान स्पर्शाने होते, त्याचे स्थान सर्व आंगावरील कातडी आहे, तिला त्वचा म्हणतात.

याप्रमाणे **प्रत्यक्ष** तुला समजले ना ?

कन्या :- होय बाबा ! पण मला वाटते सर्वच गोष्टी प्रत्यक्षाने कळतात मग अनुमानाचे काय आवश्यकता आहे ?

बाबा :- वीणा, दिवा, फूल, गादी, साखर इत्यादि जवळचे पदार्थ प्रत्यक्षाने कळतात. दूरच्या किंवा सूक्ष्म वस्तू कळण्याकरिता आपल्याला अनुमान करावे लागते. काल तूं म्हणत होतीस ना आपल्या तुळशीजवळ तरलिका आली असेल. पण तू तिला प्रत्यक्ष पाहिले होते काय ?

कन्या :- नाही बाबा, काल आम्ही तुळशीजवळ दोघींनी संध्याकाळी गाणे म्हणण्याचे ठरविले होते म्हणून ती संध्याकाळी आली असेल असे मला वाटले.

बाबा :- तूं जाऊन पाहिले तेव्हा ती तेथे होती किंवा नाही?

कन्या :- होती तर. तिने एक कृष्णाचे गाणे म्हटले आणि मी शंकराची ५ पदे म्हटली.

बाप :- बरे तर असो. तुला जे, ती वेळ झाल्याबरोबर वाटले की तरलिका आली म्हणून. याला तूं प्रत्यक्ष म्हणत असशील तर प्रत्यक्ष त्वां पाहिले नाही. अनुमानानेच वाटले असे म्हणावे लागते. बरे. काल तूं त्या बयाबाईवर कां रागावली होतीस ग ?

कन्या :– काल की नाही, मी बाहेर गेले होते व घरी परत येऊन पाहते तर दादा जेऊन उठला होता व तो मला म्हणाला 'काय कार्टे, सगळा भात जाळून टाकला.' मग मला वाटले की वहिनी चुलीवर भात ठेवून व त्याखाली जाळ लावून, आपला शृंगार करण्याचे कामात गर्क झाल्या असतील.

बाप :- तूं नाहीस, केव्हां केव्हां खेळण्यात गुंतत वाटते ! आतांच पहा, माझ्या बोलण्याकडे तुझे लक्ष नसून उगीच कागदाच्या चिंध्या करीत आहेस की नाही ! बरे, पण तुझ्या वहिनीने भाताखाली जाळ लावून टाकून गेली, हे तूं प्रत्यक्ष पाहिले नव्हतेस ना !

कन्या :- पण बाबा, जाळावांचून भात कां उगीच जळेल !

बाप :- तर मग जेथे जेथे जळेल तेथे तेथे विस्तव पाहिजे, हे तुला ठाऊक आहे म्हणावयाचे?

कन्या :- होय बाबा, ठाऊक आहे.

बाप :- यालाच व्याप्ति म्हणणतात. त्वां भात जाळलेला प्रत्यक्ष पाहून जाळ अधिक झाला असे त्वां आपल्या वहिनीला सांगितले ना? याला काय म्हणतात ग?

कन्या :- हे एक अनुमान झाले बाबा.

बाप :- होय, आपल्या नदीला पूर आला म्हणजे तिकडे फार पाणी पडला असे म्हणतात हे कोणते प्रमाण?

कन्या :- अनुमानच.

बाप :- ठीक तुला चांगले समजले. याप्रमाणे कार्याला कारण पाहिजे हेहि

एक अनुमानच आहे.

कन्या :– बाबा, कार्यकारण कशाला म्हणतात, मला ठाऊक नाही.

बाप :- अग, जे उत्पन्न होते ते कार्य व ज्याचे होते ते कारण. जसे कणीक गव्हापासून होते म्हणून ते कार्य आहे व गहूं कारण आहे.

कन्या :- पण कणीक तर दळणारीने उत्पन्न केली बाबा.

बाप :- होय दळणारी कारणच आहे. तिला कर्ता म्हणतात. बरे मी तुला विचारतो, पोळी कशाची होते? कणकीची, म्हणून कणिक कार्य आहे की नाही?

कन्या :- नाही बाबा. कारण पोळी तर कणकीपासून झाली आहे; म्हणून पोळी कार्य होईल व कणिक कारण होईल.

बाप :- आणि आपल्या घरचा स्वयंपाकी कोण होईल?

कन्या :- ते बाबा तुम्हीच सांगा.

बाप :- अग, त्याला कर्ता म्हणतात म्हणून तुला सांगितले ना?

कन्या :- हो बाबा. पण हे अनुमानप्रमाण धर्माच्या काय उपयोगी पडते?

बाप :- अग तुला ठाउक आहे स्वयंपाकी बोलतो म्हणून सजीव आहे. कणिक ही निर्जीव आहे. सजीव पदार्थांनी बनल्यिावांचून कणकीला आपणहून पोळी होता येत नाही. म्हणून पोळी तुजजवळ आली की तिचा करणारा स्वयंपाकी आहे, असे तुला कळले की नाही? त्याप्रमाणे हे सर्व जगातील पदार्थ जड आहेत. आपण कांही हे जड करण्याला समर्थ नाही. म्हणून एवढ्या मोठ्या सृष्टीला करणारा कोणीतरी पाहिजे की नाही?

कन्या :- हो पाहिजे. पण बाबा त्याचे नांव काय?

बाप :- त्याचे नांव! त्याचे नांव आहे ईश्वर.

कन्या :- बाबा. पण मी काल आईबरोबर पुराणाला गेले होते तर त्यात ब्रह्मदेव जगाला करणारा आहे असे निघाले होते.

बाप :- तुझ्या भावाला कचेरीतले लोक काय म्हणतात ग?

कन्या :- महाराज म्हणतात.

बाप :- तूं काय म्हणतेस?

कन्या :- दादा म्हणते.

बाप :- तुझी आई?

कन्या :- बाबू म्हणते.

बाप :- त्याचप्रमाणे ईश्वरालाही कोणी ब्रह्मदेव म्हणतात, कोणी विष्णू म्हणतात, कोणी शंकर म्हणतात व कोणी देव म्हणतात.

कन्या :- अस्स, देवही त्यालाच म्हणतात. तो तर आत्ता मला समजला.

बाप :- समजला कसा ग, तूं तर त्याला प्रत्यक्ष पाहिले नाहीस?

कन्या :- पण आपणच आत्ता सांगितले ना ! की एवढी मोठी सृष्टि जड आहे व ती उत्पन्न होते म्हणून कोणी तरी तिला कर्ता पाहिजे.

बाप :- हो. पण याला कोणते प्रमाण म्हणतात?

कन्या :- याला म्हणतात अंदाज.

बाप :- कारटे, असे गावंढळ शब्द ज्ञारू नयेत.शास्त्रीय भाषेत याला काय म्हणतात?

कन्या :- आता नाही ज्ञारणार बाबा. आपण सांगाल तसेच शब्द ज्ञारीत जाईन. याला अनुमान म्हणतात. बरे, शाब्द म्हणून जे सांगितले त्याची काय आवश्यकता?

बाप :- तूं मघा म्हणत होतीस, माझा दादा उद्या फिरायला जाणार आहे म्हणून. हे कशावरून म्हटलेस ग?

कन्या :- वहिनीने मला आज सांगितल म्हणून.

बाप :- वहिनी खोटी बोलली नसेल कशावरून?

कन्या :- बाबा, लहान वहिनी की नाही कधी खोटे बोलत नाही. मोठी वहिनी तरी केव्हां केव्हां खोटे बोलत असेल. म्हणून लहान वहिनीवर मी विश्वास ठेवते. आई पुष्कळदां म्हणत असते की माझी लहान सून पूर्वीची तपस्विनी होती की काय कोण जाणे? तिला खोटे बोलणे मुळीच ठाऊक नाही.

बाप :- एकूण ती खरी आहे म्हणून तिच्या बोलण्यावर विश्वास ठेवते तर!

कन्या :- होय.

बाप :- ठीक आहे. यालाच **शाब्द** म्हणतात. जो खरे बोलतो त्या **आप्त** म्हणतात व तो जे सांगतो त्याला **शाब्दप्रमाण** म्हणतात. तुझी वहिनी खरे बोलते म्हणून ती आप्त आहे. उद्या भावाची जाण्याची बातमी सांगितली तो **शब्द** होय. याप्रमाणेच आपले पूर्वीचे ऋषी खरे बोलणारे होते म्हणून त्याना आप्त म्हणतात. त्यांनी ग्रंथांत सांगितलेल्या उपदेशाला शाब्दप्रमाण म्हणतात. समजलेना सर्व तुला?

कन्या :- होय.

बाप :- बरे, तुला आणखी एक विचारतो. त्या दिवशी तूं त्या पेढेवाल्याकडून पेढे विकत घेतले होतेस तेव्हा ती सखू म्हणाली की या पेढ्यांनी जीव जातो. मग तूं कसे खाल्लेस ग?

कन्या :- माझी आई म्हणाली - सखू खोटे बोलते, तूं पेढा खा.

बाप :- पण सखू खोटे बोलत होती हे कशावरून?

कन्या :- पण माझी आई माझ्याशी कशी खोटे बोलेल बाबा?ती तर पुष्कळ वेळा म्हणते की 'माझ्या गोपीचे चांगलेपण मी कधी डोळ्याने पाहीन' अशी ममाझी ती हितचिंतक असतां, ती मला कशी फसवील बरे?

बाप :- मुली, त्याचप्रमाणे आपल्या धर्मातले ऋषी वगैरे तुला आप्त म्णून सांगितले. तेच आपले हितचिंतक होत. त्यांनी सांगितलेलाच उपदेश ऐकावा.प्रत्येकांनी आपलाच धर्म पाळावा. भगवंतांनी गीतेत अर्जुनाला सांगितले की- आपल्या धर्मात मरणे बरे, दुसऱ्याच्या धर्मात मोठे भय आहे.

कन्या :- मी अगदी असेच वागेन, पण पुढे काय बाबा?

बाप :- पुढे मग सांगेन. इतकेच पहिले पाठ करून उद्या मला म्हणून दाखीव पाहूं.

॥ बुद्धिशिक्षा नाम प्रथमोऽध्यायः ॥

(प्रथम धडा समाप्त)

- - -

११. मायर्सची समीक्षा

(जर्मन तत्त्वज्ञ मायर्सच्या 'ह्यूमन परसन्यालिटी' या ग्रंथावरील श्रीगुलाबरावमहाराजांनी केलेली समीक्षा - अपूर्ण)

।।श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ।।

पंचमोध्यायः

हा वेळपर्यंत ४ थ्या अध्यायात अंतःस्वत्वाचे निरनिराळे अंश उठतात असे सांगितले. त्यांचा एकाशी एक संबंध नसतो. परंतु आता अंतस्स्वत्व सर्व एक होऊन कार्य करते हे सांगावयाचे आहे. तरीपण पूर्वीच्या अध्यायांचा योग्य उपसंहार सांगितला पाहिजे.

अन्तःस्वत्व

१ ल्या अध्यायात अंतस्संकार उठून वर्तमान स्वत्वाला दाबून दुसरेच एक स्वत्व बनते. त्या स्वत्वाच्या योगाने होणारे कार्य वर्तमान स्वत्वाला काही कळत नाही. म्हणजे अंतस्संकार हे दुसरे स्वत्व बनवून कार्य करीत असतात - असे अपस्मार, रोगी, वेडे वगैरेमध्ये दृष्टीस पडते. परंतु केव्हा केव्हा त्याच लोकांत असेही दृष्टीस पडते की; त्याला सांगितले एक कार्य, तर तो करतो दुसरेच. आणि वर्तमान स्वत्वालाहि त्याचे थोडेसे ज्ञान असते. म्हणजे याचा अर्थ असा की केव्हा वेड्या लोकांमध्ये देखील अंतस्संस्कार एक स्वत्व होऊनही काम करीत असतात. परंतु पुष्कळसे भिन्न होऊनच काम करीत असल्यामुळे पुष्कळ वेळी विशृंखलता व एखादेवेळी सुशृंखलताही कामात दृष्टीस पडते असे सांगितले.

अन्तर्ज्ञान

२ ऱ्या अध्यायात सांगितले की वर्तमान ज्ञानाच्या आत असणारे अन्तर्ज्ञान वर उठून वर्तमान ज्ञानाला जोर देऊन काम करीत असते आणि पूर्वाध्यायातील लोकांप्रमाणे वर्तमान ज्ञानाला दाबून टाकीत नाही. म्हणून विलक्षण काम करीत असून देखील त्या लोकांना त्या कामाचे ज्ञान असते. म्हणजे त्यांचे स्वत्व एक होऊन कार्य करीत असते. ही गोष्ट बुद्धिमंतामध्ये (जिनीयस्) दृष्टीस पडते. वर्तमान संस्काराच्या तळी असणारे ज्ञान व एकाग्रतेला लागणारी शक्ति उठून

वर्तमान स्वत्वाशी मिळून काम करते म्हणजे स्वत्व निरनिराळे न होता एक होऊन काम करते.

निद्रा - स्वप्न

३ ऱ्या अध्यायात 'स्लीप' (sleep) असे सांगितले कीं **निद्रा ही जागृतीचा अभाव नसून भावरूप आणि प्रकृतावस्था आहे.** त्याचप्रमाणे असेही सांगितले की **स्वप्नामध्ये जागृतीपेक्षाही अधिक ज्ञान आपणाला होते.** परंतु अन्तर्ज्ञान बुद्धिमंतांत एक होऊन काम करतें आणि स्वप्नात भिन्न होऊन काम करते हा एक फरक आहे. तसाच निद्राभ्रमणावस्थेत व बुद्धिमंतात सूचनेचा आणि स्वतः उत्थानाचा फरक आहे. निद्राभ्रमणावस्थेत व स्वप्नात फारसा भेद नाही. इतकेच की स्वप्नावस्थेत चिंतन होते व निद्राभ्रमणावस्थेत चिंतनाप्रमाणे क्रिया घडते परंतु दोन्ही अवस्थेंत आपापल्यापरी विशृंखलता असते.

इंद्रियांच्या द्वारा जागृतीत न होणारे ज्ञान देखील स्वप्नावस्थेंत होतें, केव्हां केव्हा स्वप्नावस्थेंत असे ज्ञान होतें की त्याचा जागृतींत सुगावाहि लागत नाहीं. अन्तर्ज्ञानाचा व इतरांच्या मनाचा संबंध असतो म्हणून परस्परांच्या आकर्षणाने विनिमयहि चालत असतो.

कोणी म्हणतात कीं निद्रा ही कांही न करणारी अशी वृत्ति आहे. परंतु तसें नाहीं, निद्रेत देखील निरनिराळ्या प्रकारचे व्यापार चालत असतात, त्यातहि अलौकिक ज्ञान होत असतें. स्वप्नात ज्ञान होण्याला लागणारी जी ज्ञा शक्ति, तिलाच ''मानस व मनोजगत्तारायंत्र'' म्हणतात.

प्राणविनीमय : मानसतारायंत्र

४ थ्या अध्यायांत प्राणविनिमय सांगितला आहे. यांत एकाग्रता कॉन्सन्ट्रेशन (concentration) लक्षसादरता आणि ह्यूमन फॅकल्टी (human faculty) मानवी मानसिक कर्तृत्वशक्ति यांच्या सूचनेच्या योगाने विकास व विस्तार दाखविला आहे. त्याचप्रमाणे निद्राभ्रमणादि अवस्थेंत मूळ शक्तीचा आभासहि दाखविला आहे. तसाच स्वप्ननिद्राभ्रमणावस्थेतहि दाखविला आहे. एवं चौथ्या अध्यायांत सांगितलेल्या निरनिराळ्या मार्गांतून निरनिराळ्या रीतीने आपण एकाच सिद्धान्तावर येऊन पोचलो आहो. तो सिद्धान्त म्हणजे **मानुषिक स्वत्वात अतींद्रिय अशी काही गूढ शक्ति आहे.** हे जे आतापर्यंत निरनिराळे मार्ग

सांगितले त्या मार्गातील विषयांचा परस्पर काय संबंध आहे, तो दाखवून त्यापासून ज्ञा तऱ्हेचे अनुमान आपणाला कसे काढता येते, तें पाहू. मागे सांगितलेले स्वत्वव्यतिरेक, बुद्धिमत्ता, निद्रा व प्राणविनिमय हे सर्व आम्ही अनिच्छेंद्रियज्ञान 'सेंसरी ऑटोमॅटिझम' (sensory automatism) व अनिच्छेंद्रिय क्रिया 'मोटोरी ऑटोमॅटिझम' (motoryautomatism) या दोहोंमध्यें आणून दाखवितो. परंतु हे ध्यानात ठेवले पाहिजे की ''मानसतारायंत्र आणि मनोजगत् तारायंत्र'' हेच वर्तमानज्ञानापेक्षा अन्तर्ज्ञानांत विशेष आहे. ''इंद्रियज्ञानाची जिथे गति नाही अशा ठिकाणचे ज्ञान होण्यालाच मानसतारायंत्र आणि मनोजगत् तारायंत्र म्हणतात.''

परंतु ब्रह्मज्ञान मात्र कोणी याचा अर्थ समजू नये. कारण ब्रह्मज्ञान व्यापक असल्यामुळे देशावर अवलंबून असणाऱ्या मानस किंवा मनोजगत् तारायंत्राने ते होऊ शकत नाही. दूरदृष्टि, दूरश्रवण ; इत्यादि जगातल्या गोष्टींवरच या दोहो तारायंत्रांची योजना होते. देश असल्यावाचून दूरत्व व समीपत्वच घटत नाही. यावरून हे ब्रह्मज्ञानावाचून अज्ञानातच आहे असे समजावे. याचे क्षुद्रत्व मी प्राणविनिमय अध्यायांत आपले मत देतांना दर्शविले आहे.

जीवन : मृत्यू

तसेच हेहि ध्यानात ठेविले पाहिजे की ''अंतस्स्वत्वाची इच्छैकाग्रता शरीरावर असणे, याचे नाव जीवन'' आणि ''ती एकाग्रता त्याने काढून घेतली म्हणजे मरण'' हे वर सांगितलेच आहे. यावरून अंतःस्वत्व जसे जिवंतपणी राहते तसे ते शरीर सोडल्यावरही राहते.

एवढ्यावरून शरीरानंतर वर्तमानस्वत्व नाश पावते असे मात्र कोणी समजू नये. कारण अंतःस्वत्वच थोडेसे वर भासले म्हणजे वर्तमान स्वत्व होते हे पूर्वी सांगितले आहेच. ''मरणानंतर वर्तमानस्वत्व हें अंतस्स्वत्वाशी एक होऊन जाते. आणि स्वतंत्रहि असते.'' त्याला शरीर सोडण्याचे कारण एवढेच की शरीर हे कार्योपयोगी नसते म्हणून. प्रस्तुत या अध्यायाचा विषय जी अनिच्छेंन्द्रियज्ञानकृति (ऑटोमॅटिझम) (automatism) त्याचे लक्षण सांगतो. परंतु साधारण इतर मानसशास्त्रात मानलेल्या अनिच्छेंद्रियज्ञानकृतींपेक्षा आमच्या

अनिच्छेंद्रिय ज्ञानकृतीचे लक्षण निराळे आहे.

अन्तर्ज्ञानाने जेव्हा प्रत्यक्ष इंद्रियद्वारा बाह्य प्रतीतींसारखी प्रतीती होऊ लागते तेव्हा त्याला आम्ही अनिच्छेंद्रिय ज्ञानकृति म्हणतो.

उदाहरणार्थ - एखादेवेळी एखादा नाद आपोआपच ऐकूं येतो किंवा एखादी गोष्ट आपोआपच डोळ्यासमोर दिसू लागते. एखाद्या पदार्थाचे शब्दाचे (नाद) ऐकू येतात.

शिरसगांवच्या माधवराव खोलकुट्यांची मुलगी मनी हिला आम्ही ताई म्हणत असतो. ही आपला जप करीत असता मला 'वाटेल तसें भलते शब्द' ऐकू येतात, असें अझूनही सांगत असते. आणि अमनस्क खंडातहि एके ठिकाणी असे लिहिले आहे की **''अकस्मादेव पतति शब्दः कर्णे शुभाशुभः''** चरकांच्या इंद्रियस्थानांत इंद्रिय विप्रतिपत्तींत अशा प्रकारचे इच्छा नसून चिन्ह होणे व ते पुष्कळ इंद्रियांना माहीत होणे असे सांगितले आहे. तथापि ही इंद्रियांची विकृत दशा आहे. परंतु इंद्रियांची विकृत दशा ही तरी अशा प्रकारची कशी व्हावी याचे उत्तर रंध्रवाद्यांना देता येत नाही. ते आर्यवैद्यांसारखे पाश्चात्य वैद्यांनी अंतरिन्द्रीय ज्ञान मानले नाही म्हणून. परंतु चरकातील इंद्रियविप्रतिपत्तींत जशी विकृत दशा आहे तसा अमनस्क खंडातील 'अकस्मात् शब्दपात' वगैरे विकृत समजले जात नाही. म्हणून मायर्सचे म्हणणे अमनस्क खंडातीलच शब्दपातासारख्या एखाद्या चिन्हाशी जुळवावे हे मला बरे दिसते.

पण त्यांचे विषय धुंडूं गेले असता आपल्या या दृश्य जगात दिसत नाहीत. अनिच्छेंद्रियज्ञानकृतीची ही सामान्य लक्षणे सांगितली. या स्थितीचे दोन भेद आहेत; **अनिच्छेंद्रियज्ञान व अनिच्छेंद्रियकृति.** अंतरज्ञानाचे योगाने इंद्रियद्वारा बाह्यप्रत्यक्षासारखे आणि खरे, जेव्हा प्रत्यक्ष ज्ञान होते तेव्हा त्याला पहिली संज्ञा आहे. आणि अंतर्ज्ञानाच्याच योगाने जेव्हा शरीरात प्रत्यक्ष क्रिया घडते तेव्हा त्याला दुसरी संज्ञा आहे.

यात प्रत्यक्ष शब्दाचा अर्थ 'स्पष्ट' समजावा.

आन्तर व बाह्य संस्कार

आंतरसंस्कारांकडून उपरिस्थ संस्कारांचे जे ज्ञान तेहि जेव्हा मिळते तेव्हा त्या स्थितीला अनिच्छेंन्द्रिय ज्ञानकृति म्हणतात. जागृतीत जे ज्ञान मिळत

नाही, ते ज्ञान उद्रेक करण्यासाठी अंतस्थ संस्कारांचे जे ज्ञान व क्रिया त्याला अनिच्छेन्द्रिय-ज्ञान आणि अनिच्छेन्द्रिय-कृति म्हणतात. हे उपरिस्थ संस्कारांना मिळूनहि होते व न कळूनहि होते.

साधारण इतर मानसशास्त्रात उपरिस्थ संस्कारच खरे आणि अंतस्संस्कार आभासमात्र आहेत असे मानतात. — परंतु माझे मत तसे नाही. **''अंतःसंस्कारच खरे व उपरिस्थ संस्कार त्यांचे आभासमात्र आहेत''** असे मी म्हणतो. कारण शरीरापुरती उपयोगी लागणारी शक्ति कमी पडली तर अध्यात्म जगातून अंतस्संस्कार उपरिस्थ संस्कारात ती देत असतात हे वर सांगितलेच आहे म्हणून माझेच म्हणणे बरोबर आहे.

साधारण मानसशास्त्रात वर्तमानेच्छारहित इंद्रियकृतीलाच अनिच्छेंद्रिय ज्ञानकृति नाव दिले आहे. परंतु मी याची परिभाषा निराळी करतो. जे कधी पाहिले नाही किंवा (डोळ्यांच्या) ताराग्र-अन्तःपटलावर (रेटिना=Retina) ज्याचे प्रतिबिंब पडले नाही अशा प्रकारचा प्रकाश अथवा काही वरील स्थानी प्रतिबिंब पडत नसताहि दृक्‌गोचर अथवा इंद्रियगोचर होतो तोच माझ्या परिभाषेचा अर्थ होय. अन्यथा प्रदर्शन (इल्यूजन = Illusion) आणि सामायिकासति प्रदर्शन हॅल्यूसिनेशन (Hallucination) हे दोन्ही माझ्या परिभाषेत येतील. परंतु पहिले स्वप्नात आणि दुसरेच विशेष परिभाषावाच्य स्थितीत होऊ शकेल. एखादी वस्तु दुसऱ्या वस्तूच्या ऐवजी दिसणे हे पहिले, व वस्तु त्या स्थळी नसता दिसणे हे दुसरे.

स्वप्नांची सत्यता

आपलेकडे दोन प्रकारची अन्यथाख्याति मानली आहे. अन्य रूपें करून अन्यवस्तूचे भान व अन्यस्थळीं अन्य वस्तूचे भान. परंतु या दोन्हीला भ्रम म्हटले आहे. – आणि मायर्सने या दोनही गोष्टीला सत्य म्हटलेसे दिसते. तथापि सत्ख्यातिवाद्यांच्या मतांत दोन्ही प्रकारचा भ्रम सत्य आहे असे प्रतिपादन केले आहे. ह्या भ्रमसत्यत्वाचे थोडेसे दिग्दर्शन **यतींद्रमतदीपिकाकाराने** प्रथमावतारात केले आहे. हा अवतार प्रत्यक्षप्रमाण स्थापक आहे. त्यात अशा प्रकारच्या भ्रमालाही त्याने प्रत्यक्ष व सत्य म्हटले आहे. – परंतु मायर्सने ज्या सत्य स्वप्नांचा स्वीकार केला आहे. ती सत्यस्वप्ने यतींद्रमतदीपिकाकारांच्या स्वप्नांशी

सामान्यत्वें जुळतात. परंतु कथासरित्सागरातील यथार्थस्वप्नांशी तंतोतंत जुळतात.

मायर्ससारख्या सत्य स्वप्नांचा श्रीमत् शंकराचार्यांनी शतश्लोकीमध्ये फलसत्यत्वेंकरून स्वीकार केला आहे. परंतु तीं स्वप्नें मिथ्या आहेत असे सांगितले आहे.

कदाचित् पहिल्याविषयी पूर्वी सांगितले आहे तरी ते विसरून कोणी स्मृतीने उत्तर देऊ पाहतील.

योगशास्त्रांत स्वप्नाला भावित स्मर्तव्या स्मृति आहे असें म्हटले आहे. परंतु रंध्रवाद्यांच्या स्मृतीचा व तिचा भेद आहे. रंध्रवाद्यांची स्मृती बाह्य संस्कारावर अवलंबून असून आमच्या योगशास्त्रकारांची स्मृति अंतःप्रेरणेवर अथवा संस्कारावर अवलंबून असते असे मला वाटते. परंतु या निर्णयाचे काही वेळ मी ध्यान केले तर विशेष ते कोठे तरी लिहीन. किंवा आताच कदाचित् पूर्ण विचार झाला असे वाटते.

तथापि दुसऱ्याविषयी मुळीच उत्तर देतां यावयाचे नाही. म्हणून त्याचेच उदाहरण घेऊन चालतो. डोळ्यांत काही प्रतिबिंब न पडताहि जें सामायिकासति प्रदर्शन होते ते डोळ्याने होत नाही असें स्पष्ट म्हणावे लागते. हे रंध्रवाद्यांच्या दृष्टीनेही दाखविता येईल.

उदा. सर्वांचे बीज जें त्याने उत्क्रांतीचे मूळतत्त्व मानले आहे. त्यात त्यांना दोन प्रकारच्या उपपत्ति मानाव्या लागतील एकतर (१) पुढे उत्क्रांति ज्या रीतीने व्हावयाची त्या रीतीची नियंतृ शक्ति त्या मूळतत्त्वात आहे ही व (२) दुसरी मूळतत्त्वात शक्ति आहे परंतु तिचे नियमाने उत्क्रमण बाहेरच्या काही तरी परिवर्तनाने होते ही.

पहिल्या उपपत्तीत बुद्धिपूर्वकता असल्यामुळे चैतन्य मानावे लागते आणि दुसरीत जडवाद कबूल करावा लागतो. दुसरी उपपत्ती कबूल केली तर मग सर्व काही बाहेरून उत्तर मिळाले पाहिजे. परंतु सामयिकासति प्रदर्शनादिकांत बाहेरून उत्तर देता येत नाही. म्हणून वर सांगितलेच आहे. तर मग पहिली उपपत्ती मानणे भाग आहे.

सर्व जगत् अणुमय आहे असे मानणाऱ्यांच्या उपपत्तीत चूक दिसून आली आहे. कारण अणुमध्येंहि आणखी हजारो विभाग का म्हणाना, विद्युतकल्लोळ

आहेत आणि ते विद्युतकल्लोळ म्हणजे स्थूलाकाशाचे=इथरचे (ether) कंपन होय असे सिद्ध झाले.

कणादांचा परमाणुवाद

चरकावर जी 'जल्पकल्पतरु' टीका आहे तींत जगदुपपत्ति प्रकरण लिहीत असतांना स्थूलाकाशाचा उल्लेख केला आहे. ते स्थूलाकाशाचे लक्षण व (ether) इथरचे लक्षण एकच आहे.

म्हणून पहिली उपपत्ति मानावयाची असल्यास हें स्थूल आकाशच बुद्धिमत् मानावे लागले.

पूर्वी आपणाकडे जो कणादादिकांचा परमाणुवाद आहे तो हल्लींच्या परमाणुवादापेक्षा भिन्न व ज्ञा प्रतीचा आहे. हल्लीं मानलेलें जें स्थूलाकाशाचें कंपन, त्यात परमाणू मानल्याशिवाय, तें देखील होऊ शकत नाही.

''परंतु हे लक्षात येंऊन देखील हल्लीचे जडशास्त्र या कंपनावरच थांबले आहे. कोण्याही वस्तूचा कार्याकडून किंवा कारणांकडून जो अव्यक्तपणा सापडतो ''तो ज्ञानाच्या पुढे असल्यामुळे त्याला अल्पत्वास्तव परमाणुत्व आले'' हाच आपल्याकडील परमाणुवाद्यांचा अर्थ समजला आहे.

सांख्यांनी याचे केवळ व्यक्तित्वाने ग्रहण न करून **जातित्वाने ग्रहण** केले आहे. आणि व्यक्त्याश्रय काढून टाकून **निरवयव शक्तिरूप प्रधान** असे त्यालाच नाव दिलें आहे. त्याचेच मिथ्यात्व म्हणून वेदान्तियाने **माया** असे नांव दिले आहे.

व्यक्त्याश्रय काढता येत नाही व जाति सोडता येत नाही. तसेच सत्यत्व चैतन्याच्या ठिकाणी राहिल्यामुळे ज्याला असत्यत्व येते, अशा प्रकारची अव्यक्त स्थिती स्वीकारून न्याय-सांख्य-वेदान्ताचें विज्ञानभिक्षूंनी आपल्या सांख्यसाराच्या उत्तरार्धात एका श्लोकाने एकीकरण केले आहे. तो श्लोक येथे देतो :-

नामरूपविनिर्मुक्तं यस्मिन् सन्तिष्ठते जगत् ॥

तमाहुः प्रकृतिं केचिन्मायामेकेऽपरेत्वणून ॥ (सांख्यसारे)

इतक्या दूर हल्लीचा अणुवाद गेला नाही हे वाचकांना सहजच कळून येईल.

सर्व इंद्रियांची सर्व-कार्यक्षमता

आणि तसे मानले म्हणजे त्यात इंद्रियादिकांचा प्रभेद नसल्यामुळे पाहिजे त्या अंगाने पाहिजे त्या इंद्रियाचे काम केले पाहिजे. हे सिद्ध झाल्यावर त्याच्याच

उत्क्रांतीने झालेला ज्ञा मेंदूबिंदू पाहिजे त्या अंगाने पाहिजे त्या इंद्रियाचे काम सुरू करू शकतो.

परंतु नाकातूनहि पाणी पिता येईल तरी तोंडाने पिणे जसे सुलभ पडते तद्वत डोळ्याने पाहणे सुलभ पडते इतकेच. तथापि दिसतें तें डोळ्यांनी दिसत नसून ज्ञा मेंदुबिंदूनेंच दिसते किंबहुना डोळ्याच्या साधनापेक्षांही तो हाइयेस्ट सेंटर इन द ब्रेन (Highest Centre In the brain) अधिक जास्त पाहू शकतो. हे रंध्रवाद्यांच्या दृष्टीने देखील सिद्ध झाले आहे. की अंतर इंद्रियच सर्व काम करून शकते. ही इथरमध्ये शक्ति आली कोठली? तर ती अंतःसंस्कारातूनच आली पाहिजे; कारण इथर बुद्धीरूप आहे असे कोणी मानीत नाही.

बुद्धिरूप मानले तर सर्वच इथरचे म्हणून सर्वच बुद्धिरूप दिसले असते.

आणि जे काही दिसतें ते मिळवून पाहण्याला बुद्धिशिवाय दुसरे साधन नाही. उदाहरण, अमुक एक वस्तु जेव्हा पाहतो तेव्हा निरनिराळ्या इंद्रियाने तिचे वर्ण आकारादि कळतात. परंतु तें जुळवून वस्तुत्व बुद्धिशिवाय देता येत नाही. कोणी म्हणतील की संस्कार संबंधाने (association) असोसिएशनने असे होते. उदाहरण, कुत्र्याचा आवाज ऐकला व कुत्रा दिसला तथापि यांत दोन इंद्रियांनी दोन कल्लोल (Sensations) (सेंसेशन) झाल्यामुळे दोन्ही जुळवून पाहणे बुद्धिशिवाय होत नाही ; म्हणून जेव्हा शरीरी काम करतों तेव्हा मेंदूबिंदूचा आश्रय करीत असला तरी मेंदूबिंदूच्या पाहण्यामध्ये कांही इंद्रियशक्ति व काही अंतरबुद्धिशक्तीचा स्वीकार करावा लागतो.

सारांश उत्क्रांतिमत मानले तरी पदार्थाची जशी उत्क्रांति होते तसा मनाचा अधिकाधिक विकास होत जातो. पदार्थापासून शरीर झाले असून आत्मा ईश्वरापासूनच आला आहे. म्हणून **उत्क्रांत्युपपत्ति** आणि **ईश्वरउपपत्ति** ह्या दोन्ही खऱ्या आहेत. हे मी वर सांगितले. पण सांगावयाचे इतकेच की मनुष्यप्राणी उत्क्रांतिवादी जसा सर्वांच्या वरचा मानतात तसे मनुष्यावरही आणखी पुष्कळ अध्यात्मिक ज्ञाप्रतीची देवतास्वरूपे आहेत हे त्यांना मानले पाहिजे.

तात्पर्य, शारीरिक रीतीनें जें दिसते तें अंतस्संस्कारातील अगदी थोडेसे ज्ञान असल्यामुळें पुष्कळ इंद्रियांवाचूनहि अंतस्संस्कार स्वयं पाहू शकतात हे सिद्ध झाले.

चित्तोत्क्रमण वाद

तसे आपलेकडे सांख्य शास्त्रात गुणामुळें उत्क्रांतिवाद मानला आहे. व योगशास्त्रांत चित्ताच्या क्षिप्तादि भूमिकेमुळे हाच वाद मानला आहे. योगवासिष्ठातील निर्वाण प्रकरणात सुषुप्तीमध्यें पाषाणादि व स्वप्नामध्ये पशुपक्षादि, जागृतिमध्यें मनुष्य देवादि व आणखी एक अवस्था सांगितली आहे. तिचे मला स्मरण नाही. परंतु अशा अवस्थाभेदाने उत्क्रमण मानले आहे. तथापि भेद इतकाच की हे उत्क्रमण चित्ताचे होत असून पाहिजे त्या वेळीही प्रयत्नाने उडीं घातल्यासारखे वर जाता येते.

परंतु शरीराला मात्र हा उत्क्रमणवाद आपणाकडे लावीत नाहीत. ह्याचे कारण, योग्याला पाहिजे ते शरीर घेतां येतें, हा ज्ञा शोध लागला आहे, हेंच आहे. शापानें केव्हा केव्हा खालचे शरीर येऊन ज्ञानही नष्ट होते असे पुराणांत सांगितले आहे. ॲनी बेझंट हें कबूल करीत नाही. तसेच थिऑसफीच्या ग्रंथातही लिहिले नाही.म्हणून थिऑसफीच्या उत्क्रांतिवादाशीही भारतीयोत्क्रमणवाद जुळत नाही. प्रयत्न न करितां क्रम व प्रयत्नाने यौगपद्य हा आमचेकडील चित्तोत्क्रमणवादाचा मथितार्थ आहे.

विद्युत्-वादाचे खंडन

मानसतारायंत्राविषयी वगैरे अलेक्झांडर जेम्स आपल्या ''डायनॉमिक थिअरी ऑफ लाइफ ॲन्ड माइंड'' नांवाच्या पुस्तकात म्हणतो की ही कार्ये विद्युतनें होतात. मेसार हा चुंबकोपपत्ति मानणारा होता. त्यापेक्षां विद्युत् ही थोडीशी दुरून कार्य करूं शकते. तथापि सर्व समाधान तिच्या योगाने होऊ शकत नाही. कारण विद्युतचे काम फक्त चालन करणेच आहे. त्याच्या योगाने मनात जी भावना आली ती कदाचित् दुसऱ्याला कळू शकेल. परंतु भावना करणाऱ्याच्या घरी ज्या दुसऱ्या काही वस्तु आहेत त्याही दिसून पडतात. त्यांचीही भावना मनामध्यें आनुषंगिक रीतीने आली असेल असें म्हटलें तरीही भावना करणाऱ्याला त्याचे ज्ञान असले पाहिजे.

ज्ञान नसलें तर तीव्र भावनेशिवाय मानस तारायंत्र होऊ शकत नाही. म्हणून मृदुभावनेचा परिणाम तीव्रभावनेपुढे काही होणार नाही, आणि ज्ञान न झालेली अशी भावना येते ही गोष्ट प्रमाणही करता येणार नाही. शिवाय अज्ञेय

मानले तर स्पेन्सर प्रमाणेंच झाले. परंतु स्पेन्सर जे अज्ञेय मानतो तें बोलण्याला सोपे आहे. अज्ञेय म्हटल्याने मनाची प्रवृत्ती शांत होत नाही. तिला जाणण्याची अधिक इच्छा राहते. तोंड दाबून बुक्यांचा मारासारखी मात्र तिची स्थिति होते.

एखादा मनुष्य भावना करणाऱ्याच्या घरी असला व भाव्य पुरुषांनी तो पाहिला नसला तर भाव्य पुरुषाला तो दिसतो. यावरून येथे विद्युतचे काही काम नसून भाव्य पुरुषाचे मन येथे येऊन पाहते असेच म्हटले पाहिजे. शिवाय इथर, विद्युत वगैरे सूक्ष्म गोष्टी काय आहेत हे कोणताच जडशास्त्रवेत्ता अजून सांगू शकत नाही व त्या जड आहेत की चेतन आहेत या विषयीही कोणी काही बोलू शकत नाहीत. तथापि विद्युतादि शक्तींच्या योगाने मानसतारायंत्रे वगैरेंची उत्तरें दिली तरी ती सूक्ष्म शक्तींच्या रूपाने द्यावी लागतील व तें सूक्ष्मत्व जगातील सूक्ष्मत्वापेक्षां अधिक असले पाहिजे हे उघड आहे.' असे प्रोफेसर साहेब म्हणाले.

सूक्ष्म शक्ति चेतन झाली पाहिजे असा त्यांच्या मताचा भाव होता. फार सूक्ष्म सूक्ष्म होत गेली म्हणजे चेतना येते असें विद्युन्मानसशास्त्रात डॉ. डॉंडस्ने कबूल केलें आहे. आणि अतिसूक्ष्मता ज्ञानमात्रच राहिली पाहिजे. कोणी म्हणेल नुसती सत्ता मात्र राहूं शकेल तरी सत्ता ज्ञानाशिवाय कळूं शकणार नाही. म्हणून ज्ञानमात्र मानून पुनः चेतन मानले पाहिजे. शिवाय मानसतारायंत्रादिकांच्या वेळीं मेंदूचे परिवर्तन काय होतें हे प्रयोगिक रीतीने कोणास सांगता येत नाही असे मला वाटते.

म्हणून अन्यथा प्रदर्शन स्थितीत अथवा स्पष्ट सामयिकासति प्रदर्शन स्थितीत अंतःसंस्कारच वर्तमान इच्छेवाचून इंद्रियज्ञानविना दूरचे किंवा जवळचे इंद्रियांनी कधी पाहिले नाही असेच प्रत्यक्ष ज्ञान करून देतात. हे म्हणणें भाग आहे. यालाच मी अनिच्छेंद्रिय ज्ञानकृती नांव देतो. त्यातील ''अनिच्छेंद्रिय ज्ञान = कधीं न पाहिलेले अंतस्संकारानें इंद्रियावाचून बाह्य स्थितीसारखें प्रत्यक्ष ज्ञान'' होणें होय. आणि अनिच्छेंद्रिय कृती म्हणजे न कळून बोलतो किंवा लिहितो परंतु ते बुद्धिपूर्वक बरोबर असते.

आमचेकडे प्राचीन मुनी व सत्पुरुष आणि अर्वाचीन **स्वामी विवेकानंद** हे अनिच्छ कांही मानीत नाहींत. मायर्स ज्याला अनिच्छ म्हणतो तेथे देखिल सामान्य इच्छा आहे. परंतु ती संवयरूप झाली असल्यामुळे पृथक् झाल्यासारखी

आहे इतकेंच. सर्व जग वासनेनेच झाले आहे. म्हणून अनिच्छ कांहीच संभवत नाही. अतिशय एकाग्रतेने दुसरीकडे चित्त लावलें असतां प्रत्यक्ष ज्ञान देखील बंद पडते. हे अभ्याससाध्य आहे असे पतंजली आचार्य समाधिपादांत म्हणतात.

स्वामी विवेकानंदाने आपल्या राजयोगात व जठारांनी आपल्या 'स्वानंद साम्राज्यात' देखिल असेंच प्रतिपादिलें आहे, या अध्यायांत अनिच्छेंद्रिय ज्ञान मात्र सांगतो. अनिच्छेंद्रियकृती पुढें सांगेन.

अनिच्छेन्द्रियज्ञान कृती

पूवी सांगितल्याप्रमाणे स्वत्वव्यतिरेक, असाधारण बुद्धिमता, स्वप्न व प्राणविनिमय हे सर्व अनिच्छेंन्द्रिय ज्ञानकृतींत येतात. ते असे की वरील स्वत्वव्यतिरेकादि घटनांत जेवढे ज्ञान होते तेवढे अनिच्छेंद्रियज्ञान समजावें. आणि क्रिया अनिच्छेंद्रियकृती समजाव्यात. स्वप्नादिक अन्यथा प्रदर्शनाने होतात. आणि अनिच्छेंद्रियज्ञानकृती सामयिकासति प्रदर्शनस्थित असतात.

तथापि **''शास्त्रीय रीती अशी आहे कीं एका गोष्टीनेच पुष्कळशा प्रश्नांची उत्तरें मिळाली पाहिजेत.''**

ती या अनिच्छेंद्रिय ज्ञानकृतीने मिळतात. म्हणून स्वत्वव्यतिरेकादि अनिच्छेंद्रियज्ञानकृतीच आहे असें म्हणण्यास हरकत नाही. परंतु अनिच्छेंद्रियज्ञान या अध्यायांत सांगावयाचे आहे हे वर सांगितले. पूर्वील प्राणविनिमय अध्यायांत परकीय सूचनेनें स्वकीयान्तःसंस्कार उद्रेक होऊन सामयिकासति प्रदर्शन होते, असे दाखविले आहे. अर्थात सामयिकासति प्रदर्शनच अनिच्छेन्द्रिय ज्ञानकृतींना विशेष व्यक्त करतें हे सांगावयास नको. परंतु ही प्राणविनिमय स्थिति सोडून दिली तरी जाग्रदवस्थेंत सामयिकासति प्रदर्शन होतें हे सिद्ध आहे.

आता कोणी असे म्हणेल की प्राणविनिमयात जसे परकीय सूचनेने पाहू शकतो त्याप्रमाणेंच स्वकीय सूचनेने पाहूं शकतो किंवा पूर्वीच असलेल्या स्मृतीचे अंश एकत्र करून एखाद्या नव्या रीतीने जागृतींत सामयिकासति प्रदर्शन करतो. अथवा अंतस्संकाराच्या पडद्यामध्ये कोठेंतरी घटना बनत असते. तीच घटना कोणत्या एका रीतीनें पाहूं शकतो. हें शेवटचेंच उत्तर मला मान्य आहे.

ही चित्रें अंतःसंस्कार अस्पष्ट असतां स्वप्नात पाहूं शकतो आणि असाधारण

बुद्धिपुरुष एकाग्रतेने ती चित्रें पाहूं शकतात. हाहि एक भेद ध्यानांत ठेविला पाहिजे.

आत्मख्यातिवाद व मायर्स

सर्व कांही बुद्धींतच असून तेच आपण बाहेर पाहतो असा आत्मख्यातिवादियांचा सिद्धान्त आहे. या सिद्धान्ताचा व मायर्सचा मेळ आहे. परंतु बौद्ध जसे विज्ञान क्षणिक मानतात तसे मायर्स मानीत नाही.

तथापि 'मायर्स' ही ह्या एका ठिकाणीं साशंक आहे. ते ठिकाण म्हणजे सामयिकासति प्रदर्शनांत कोण्याकोण्या ठिकाणीं आत्मख्यातीनें उत्तर देतो व कोण्याकोण्या ठिकाणीं मानसतारायंत्र घेऊन अन्यथाख्यातीने उत्तर देतो हें होय.

स्फटिकचित्र योग

परंतु यावांचूनहि आणखी कांही घटना सापडतात कीं नाही हे पाहूं. स्फटिक चित्रे क्रिस्टायव्हिजन (Crystaivisions) ह्याचे चांगले उदाहरण आहे. एक कांचाचा गोळा घेऊन तो एका काळ्या बनातीच्या फडक्यात गुंडाळून त्याला टेबलामध्यें सगळ्याच्या मागें ठेवून तो टेबल थोडासा उघडा ठेवला असता काही वेळ तिकडे एकटकीने पाहणाऱ्या मनुष्याला तो कांच दिसतो. परंतु एक एक वेळा दहा दहा मिनिटें टक लावावी लागते. असे चारवेळ टक लावल्यानें अवश्य दिसते. पण वीस मनुष्यांच्यामध्ये एखादाच मनुष्य हे पाहूं शकतो. तो तो काचांचा गोळाच पाहतों असें नाहीं, तर त्यामध्ये एखादी मूर्तीहि पाहतो. पाहाणारा पुरुष जर असाच अभ्यास करील तर त्याला दिव्य दृष्टीने पुष्कळ गोष्टी कळतील.

आपलेकडे आरशाचा अशाच प्रकारचा योग आहे. दोन आरसे घेऊन हा योग करावा लागतो. **स्वामी नृसिंहसरस्वती** पुष्कळ वेळ आपल्या शिष्यांना हा योग सांगत असत. त्यांचे शिष्य अझून हयात आहेत. दुसरें चंद्राकडे टक लावून किंवा सूर्याकडे टक लावून पाहण्यामध्यें ही अशी दिव्य दृष्टि सिद्ध होते असें कांही लोक सांगतात.

(मायर्सला जर ब्रह्मज्ञान असते तर ह्याचा ग्रंथ योगवसिष्ठाच्या तोडीचा झाला असता असे कै. विष्णुपंत धामापुरकरांजवळ श्री. महाराज बोलले होते असे ती स्व. धामापुरकरांनी एकदा मला सांगितल्याचे आठवते.- पु. ब. मोहोड)

|| श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ||

मायर्सच्या ग्रंथावरील टिपणे

(प्रयोगशास्त्रीय रीतीने (सायंटिफिक मेथडने) आत्मोपपत्ति पटवून देणारा प्रसिद्ध इंग्लिश मानसशास्त्री एफ.डब्ल्यू.मायर्स यांच्या मानुष स्वत्व (ह्यूमन परसनॅलिटी) नामक ग्रंथावर श्रीगुलाबरावमहाराजांनी समीक्षण पूर्वक नोट्स लिहिल्या आहेत. त्याची विषयानुक्रमणिका - मिलिंद : त्रिपुरवार, श्रीमहाराजांच्या चरित्राचे लेखक)

अध्याय पहिला

स्वत्वैकत्व व्यतिरेक पृ. २ स्वत्व - मीपणा २. एका स्वत्वातूनच अनेक स्वत्वांचा - अहंत्वाचा - उदय २.सुपर व सब कॉंशसनेस=संस्कार २. स्वत्वाचे लक्षण ३. एक स्वत्व उदय पावले म्हणजे दुसरे दबून जाते. ३. साधारण व असाधारण बुद्धीची माणसे. ३. ऐतिहासिक गोष्टी किंवा धार्मिक गोष्टी घेऊन मी कोणास विश्वास ठेवण्यास सांगत नाही तर शास्त्रीय सायंटिफिक रीतीनेच मी आपला सिद्धांत पटविणार आहे. पृ. ४. वर्तमान ज्ञान हे लीन दशेतल्या ज्ञानाचा बिलकूल थोडा अंश आहे. हे आता शास्त्रीय रीतीने सिद्ध होऊ पाहात आहे. ४. शास्त्रीय रीतीचे ३ प्रकार.मेथड ऑफ ॲग्रीमेंट वगैरे ५. रंध्रोपपत्ति व आत्मोपपत्ति यापैकी आत्मोपपत्तीचे प्रामाण्य बलवत्तर ६. रंध्रवादी निरुत्तर होतात अशा गोष्टी पृ. ६,७,८,९,१०,२२ बालपणी जो मी होतो तोच मी आताही आहे इ. अहंचे एकदंर ज्ञान - पृ.६ते८. आदि अंतर्रूप चैतन्याचे ज्ञान करून घेण्याकरिता एखादा आर्य पवित्र महात्मा पाहून त्या जवळ गेले पाहिजे असे हक्सले साहेबांचे म्हणणे ८. रंध्रोपपत्तीचे खंडण ८ ते१०.आपणास शरीराहून निराळे होता येते म्हणूनच आपले (मृत) शरीर आपणास स्वप्नात पाहता येते. १०. संस्कार जसेचे तसेच उदय पावतात. ११. आपण सर्वाहून निराळे आहो हे कोणालाच नाही म्हणता येत नाही. १२. आपण कोण किंवा काय व निराळा राहून शरीराचे कार्य कसे करतो याचे समाधानकारक उत्तर आत्मोपपत्तीने मिळते.१२-१३. वर्तमान संस्कारच्या तळी दुसरे अनंत संस्कार आहेत व तेच मुख्य आहेत.१५-१६. असाधारण बुद्धिवानाचे उदाहरण. १६. व त्याच्यात आणि अपस्मारी हिस्टेरिक रोग्यात भेद. १६ योगी आणि वेडे यामधील भेद १७. स्वत्व एक असूनहि निरनिराळे होऊ शकते. १७. टेलिपथि (मानस

तारायंत्र) अनंत स्वत्वाने दोन प्रकारच्या संस्कारांचे ग्रहण, शरीराहून निराळ्या आत्म्याचे ग्रहण, स्पिरिट भूते किंवा देवदूत १८.

अध्याय दुसरा

असाधारण लोकांच्या असाधारण गोष्टींवरून आत्मोपपत्तीची सिद्धी. १९. असाधारण आणि वेडे लोक ह्यांच्यात फरक नाही हे म्हणणे खोटे. १९ अहंचे वेगळे होणे डिस्इंटिग्रेशन ऑफ परसॅलिटि हे साधु लोकात नाही. २०. असाधारण पुरुषांचे ज्ञान साधारण पुरुषांच्या व विनिमयाकृष्ट पुरुषांच्या ज्ञानापेक्षाही ज्ञा प्रतीचे असते. २१. रंध्रोपपत्तीपेक्षा व उत्क्रांतिवादापेक्षा आत्मोपपत्तीच श्रेष्ठ आहे. असे डब्ल्यू. जेम्स यांचे म्हणणे. २१. असाधारण मनुष्यांपैकी कित्येकांचे उदय पावलेले संस्कार थोडे दिवस राहतात व कित्येकांचे जन्मभर राहतात. २२ आत्मोपपत्ती अधिक प्रमाण मानण्याविषयी प्रसिद्ध युरोपीय ज्योतिर्विद हर्शल साहेब यांचा युक्तिवाद. २३. मायर्सचे असाधारण पुरुष व हिंदू योगी यांच्यामधील मोठा फरक. विनिमयाकृष्ट पुरुषांची व हिंदू योग्यांची योग्यता सारखी नाही. पृ. २३-२४. विनिमयाकृष्ट पुरुषांची योग्यता असाधारण पुरुषांपेक्षाही फार खालची आहे. २४. हिंदू योग्यांचे सामर्थ्य व त्यांचे म्हणणे. २४. हिंदूंचे योगशास्त्र सर्वांपेक्षा पूर्ण आहे. २५. वेडे, अपस्मारी, विनिमयाकृष्टादि पुरुषांची स्थिति विकृत समजावी. २५. स्वयं प्राणविनिमय सेल्फ हिप्नॉटिझम हाही हिंदू योगापेक्षा पुष्कळ कमी दर्जाचा आहे. २६. असाधारण पुरुषाविषयी काही दृष्टान्त. २६ मेंदुगत रंध्राहून आपल्याला मन पृथक मानिलेच पाहिजे. रंध्रांची किंवा दोहो नाड्यांची चळवळ नाहीच म्हटली पाहिजे. २७. लिबनीझचे विनोदाचे म्हणणे. रंध्रवाद्यांच्या दोन उपपत्ती २७. व त्यांचे खंडण २८. आत्मोपत्तिवाद्यांच्या दोन उपपत्ती. २८. प्लेटोचे म्हणणे. सौंदर्याची कल्पना. २९. पाश्चात्य लोकांकडे सौंदर्याची कल्पना समाधानकारक नाही असे रायबाबूचे म्हणणे महाराजांचे सौंदर्याचे लक्षण व त्याला बाबूसाहेबाचे अनुमोदन. ३०. ज्ञामानसजगत, आयडियल वर्ल्ड जड, प्रत्यय, दृश्य जगताचा फिनॉमिना आणि नॉमिना अंतरसंस्कारद्वारे संबंध, स्फुरणज्ञान ऑकल्ट नॉलेज वर्तमान - संस्कार आणि अंतर संस्कार म्हणजे काय? या गोष्टी संबंधाने प्लेटोचे व मायर्सचे म्हणणे, प्लेटोचे म्हणणे महाराजांचे दृष्टीने उत्तम. बाबूसाहेबांचे अनुमोदन. ३१

अध्याय तिसरा

पहिल्या दोन अध्यायांचा सारांश. अंतरसंस्कार सर्व कामे करवितो. निद्रेविषयी विचार ३२-३३. जागृतीपेक्षा निद्रावस्था श्रेष्ठ. रंध्रोपपत्तिवाद्यांचे, निद्रेविषयी म्हणणे बरोबर नाही. ३३,३६. अहंप्रत्ययाचा बोध आपल्याला स्पष्ट समजतो. ३४. रंध्रांच्या बंद झाल्याने (सुषुप्तीत) अहंप्रत्यय का लीन होतो याचे उत्तर रंध्रोपपत्तिवाद्यांजवळ नाही. ३४. संधीविषयी योगवासिष्ठाप्रमाणे मायर्सचे म्हणणे. ३५ व दोघांच्या म्हणण्यातील भेद ३५. रंध्रे असमर्थ झाल्याने निद्रा येते हे म्हणणे दुराग्रहाचे ३५. निद्रेला मनाची अनुकूलता ३६. निद्रेमध्येही असे ज्ञान होते की जे जागृत दशेत कधी झाले नाही ३६. युरोपियन लोक बहुशा निद्रा हा शब्द स्वप्न या अर्थीच वापरतात. हॅमिल्टनचे म्हणणे. ३७. ह्या म्हणण्यातील चुकी. विनिमयाकृष्ट पुरुषाचे उदाहरण. कपिलगीतेचे व भगवद्गीतेचे म्हणणे ३७. स्वप्नाच्या व निद्रेच्या ज्ञानाचा भेद योगसूत्रात केला आहे. ३८. जागृतीत कधी न झालेल्या अशा गोष्टींचे निद्रेमध्ये ज्ञान होत असते अशी १० उदाहरणे. ३८ ते ४५. परस्पर आकर्षणाने हकीकत कळून येणे हे मानस तारायंत्राचे टेलीपथीचे उदाहरण. ४२. एकाच 'अहं' चे - 'मी' चे दोन प्रकार. ४४. स्वप्नात्मक निद्रा मुख्यजागृत अवस्था न्यून. ४५. स्वप्नच जागृतीपेक्षा तीव्र आहे याविषयी महाराजांची उपपत्ति ४५. स्वप्न सब्लीमिनल कॉंशसनेस इन मायर्स तेक्नीकली स्पिरिच्यूअल वर्ल्ड = आयडियल वर्ल्ड (प्लेटो) Subliminal consciousness in Myres technicality Spiritual world = ideal world (Plato) स्वप्न हे दोन्ही जगतांची संधि आहे हे मायर्सचे म्हणणे व आपल्या बृहदारण्यकाचे म्हणणे यांमधील फरक. ४५-४६.

अध्याय ४ था

प्राप्तविनिमयाच्या (हिप्नॉटिझमच्या) उपपत्तीच्या रीतीने विचार. ४७. शास्त्रीयत्व येण्याला अवश्य गोष्टी. ४७. प्राणविनिमयाला अजून शास्त्रीय स्वरूप आले नाही असे मायर्सचे म्हणणे. अपूर्त्या विषयाने (हिप्नाटिझम्) सिद्ध केलेल्या थिऑसाफीवर भरंवसा ठेवणारे अर्ध्या हळकुंडाने पिवळे झालेले हिंदू व पद्धतवार आणि ज्ञा प्रतीच्या योगशास्त्राने सिद्ध झालेल्या पुरांणादिकांकडे त्यांचे दुर्लक्ष ४८. प्राणविनिमयाने प्राप्त होणाऱ्या अवस्थाविषयी महाराजांचे मत

व प्रोफेसर (रॉयबाबू) साहेबांची सम्मति ४९. हा प्रयोग करणारांचे चुकीचे उत्तर. ४९. प्राणचुंबक-प्राणविद्युतवाद्यांच्या मताने प्राणविनिमयाचे फायदे व त्यांच्या म्हणण्याचे खंडण. ५० 'प्राणविद्युत' वादाचे खंडण, विद्युन्मानसशास्त्राचे म्हणणे अयुक्तिक. ५१ साधारण बुद्धिमान मनुष्य आणि महात्मे पुरुष, प्राणविनिमय स्थिती अभ्यासाने स्वाभाविक करता आली तर प्रयुक्त पुरुष विशेष ज्ञानी होऊ शकेल. ५२. पाश्चात्य प्राणविनिमय आणि हिंदू योग- यामधील फरक. ५२. निद्रेमध्ये शरीराच्या क्षीण झालेल्या शक्ति कां भरून निघतात या प्रश्नाचे उत्तर रंध्रोपपत्तिवादी देऊ शकत नाही. ५३. स्वाप्निक स्वत्वच सर्व कार्य करिते. अंतर संस्कार हे सर्वांचे मूळ कारण. प्राणविनिमयाचा मर्यादितपणा ५३-५४ मनुष्याविषयी दोन उपपत्ती. बायबलचा उल्लेख. ५४. दोन्ही उपपत्तींची व्यवस्था, प्रोफेसर साहेबाचे म्हणणे. ५४. याचा मायर्ससारखाच भाव ५५. दोन्ही जगताचा संबंध जुळविणारी सूक्ष्मशक्ति व स्वप्न आणि अंतर संस्कार यांच्या योगाने त्या शक्तीची कबुली. ५५. प्राणविनिमयाचा मूळ उत्पादक मेस्मर यापासून ब्लेड साहेबापर्यंत या प्रयोगाची उत्क्रांती. ५६. ब्लेडच्या म्हणण्यामुळे प्राणी चुंबक उपपत्ति (ॲनिमल मॅग्नेटिझम) नष्ट झाली. ५७. 'लिबो' च्या नाइन्सी स्कूल मधील लोकांचे म्हणणे. ५७. महाराजांचे म्हणणे- आईची वगैरे सूचना, दृष्ट काढणे, थापटणे वगैरे. नाडी चालन (नर्व्हस एक्साइटमेंट) प्राणविनिमय स्थितीला कारण नाही. ५८. निद्राही कारण नाही. ५८. 'बाहेरच्या सूचनेस निद्रा कारण आहे.' या म्हणण्यांचे खंडण. ५९. सूचनेचे तत्त्व. ५९ योग्य सूचना व तिचे कारण ६०. अंतर संस्कारच सर्व गोष्टींना मुख्य. ६१ लक्षसादरता (अटेंशन) हे साधन. ६१. गर्नेचे म्हणणे. ६१. प्राणविनिमयाचे दोन भाग. ६१. अंतर संस्काराला पुष्कळ पडदे आहेत. ६२. साधारण निद्रा आणि प्रयोगनिद्रा यामधील फरक. ६२. भगवान् पतंजली आचार्यांचे म्हणणे ज्ञा कोटीचे व पद्धतवार आहे. ६३. अलौकिक स्वप्नादि स्थितींना प्रयोगशास्त्रात आणण्यासारखे कारण साम्य. ६३. लक्षसादरता (अटेंशन) मुख्य कारण ६३. सजातीय सूचना ६४. लक्ष पूर्वीचेच असून सूचनेने वळण मात्र लागते.लक्ष जड म्हणता येत नाही.६४-६५. पूर्वज्ञानागमननाडी (मोटरनर्व्ह) वाद्यांचे म्हणणे, निशा करणाराचे उदाहरण, निशेचा अम्मल

शरीरावरच बसतो. मनावर बसत नाही. ६५. महाराजांच्या सूचनेने एका मनुष्यांचे मद्यपान सुटले. ६६. प्राणविनिमयाने इच्छा बदलविता येते व प्रवृत्तीही द्वेष्य करविता येते म्हणजे रंध्रांची गतीही बदलविता येते. ६६. मोठ्यांच्या मुलींना चोरी करण्याचा रोग (इंग्लंडात) प्रोफेसर साहेबांचे व महाराजांचे म्हणणे. ६६. प्राणविनिमय प्रयोगाने शारीरिक व मानसिक रोग जातात. ६७. सूचनेचे कार्य ६७. अंतरसंस्कार स्वतंत्र असून शरीरच त्यांच्या ताब्यात आहे याविषयी उदाहरणे. ६८ ते ७०. मानसजगत् तारायंत्र आणि मानसतारायंत्र दोन्ही मानली पाहिजेत. ६८. एका मुलाला मारले असता ते मारणे साधूला किंवा त्याच्या शिष्याला लागले. ६८. मनाच्या स्वाधीन शरीर असून मनानेच त्याचे परिवर्तन होते. ७०. उत्क्रांतिवादाचे खंडण, सांख्य एकच इंद्रिय मानतात. ७० पुराणाचा स्वीकार ७०. प्राणविनिमय प्रयोगाची सीमा. ७१. प्रयोगोत्थित संस्कारांना व स्वत्वांना अंतरसंस्कारांचा रोध. निद्रा भ्रमणावस्थेचे उदाहरण. बाह्यवाद्यांचे उत्तर व त्याचा स्वीकार. ७१-७२. प्रोफेसर साहेबांचे म्हणणे या प्रयोगाची सीमा ७२. हिंदु योगाची सीमा. ७३ बाह्यवादापेक्षा अंतर पद्धति उत्तम. अंतर संस्कारांनी जेथे उत्तर मिळत नाही तेथे दुसरा आत्मा शिरून कार्य करतो. ७३. प्राणविनिमय स्वाप्निक स्वत्वाचीच थोडीशी उन्नत स्थिति ७३. साधारण निद्रेचे आणि विनिमय निद्रेचे साम्य. ७४. इंद्रियविज्ञानवादी जे निद्रेचे लक्षण करितात त्यापेक्षा मायर्सचे म्हणणे उत्तम. निद्रा ही अंतर अध्यात्म जगतातून काही शक्ति उपरिस्थ संस्काराला आणून देते. साधारण निद्रेपेक्षा विनिमयनिद्रा अधिक चांगली. अध्यात्म जगताचा व निद्रेचा तसाच दृश्य जगताचा व निद्रेचा संबंध आहे. विनिमय निद्रेपेक्षाही निद्राभ्रमणावस्थेत अधिक कार्य होते. ७४. निद्राभ्रमणावस्थेचे वर्णन. ७४-७५ निद्राभ्रमणावस्थेत स्वाप्निक स्वत्व जागृत स्वत्वाहून वेगळे असते. स्वतो निद्राभ्रमण व परतोनिद्राभ्रमण. निद्राभ्रमणाचे लक्षण. मुळेमास्तरांचे उदाहरण ७५. योगवासिष्ठातील स्वप्ननामक किंवा जागृत्स्वप्ननामक अज्ञान भूमिकेच्या प्रकारात निद्राभ्रमणावस्थेचा अंतर्भाव. ७६. या अवस्थेत होणारे चमत्कार. ७६. माधानच्या पुंजाजीची गोष्ट. ७६-७७. स्वप्न, प्राणविनिमय वगैरे अज्ञान भूमिकेमधील पुरुषांचे दोन वर्ग, त्यांची लक्षणे व चमत्कार. ७७-७८. ज्ञानभूमिकेवरील पुरुषांचे दोन वर्ग लक्षणे व

चमत्कार. असाधारण बुद्धि पुरुषांची जागृत किंवा बीजजागृत नावाच्या एखाद्या अज्ञान भूमिकेच्या एखाद्या प्रकारात गणना. बळीराममामाचा वेडेपणाचा रोग. बिराटी-साबरीचा एक प्रकार. या अवस्थेत अंतरसंस्काराचा उदय. ७८. विनिमयनिद्रा व निद्राभ्रमणावस्था यामधील फरक व अतिंद्रिय दृष्टीचे सामर्थ्य. ७९. विकल्पाचा शब्दमात्र व्यवहार. दुसऱ्याच्या सूचनेने किंवा प्राणविनिमयामध्ये केव्हा केव्हा कोणाला निद्राभ्रमणावस्था येते. निद्राभ्रमणावस्थेत आणखी पुष्कळ गूढ शक्तीचा प्रकाश. ७९. विनिमय निद्रा जेव्हा मध्यम असते तेव्हा अंतरस्वत्व काम करीत असते परंतु विनिमय निद्रा तीव्र असते तेव्हा अध्यात्म जगतातून दुसरा आत्मा शरीरात शिरून काम करतो. डी.होम स्टेंन्टो मोझेस व मिसेस पायपर यांची उदाहरणे पृ. ८० मृतात्मा व दुसरा आत्मा विनिमयनिद्रेत शरीराचा आश्रय करतो असा मायर्सच्या म्हणण्याचा भाव. आपल्या योगशास्त्राचे म्हणणे. परकायाप्रवेश. पुराणाचा दाखला. शंकराचार्यांचें उदाहरण. लवणाख्यान (ऐंद्रजालिक), विक्रमचरित्र, कथासरित्सागर यांचे प्रामाण्य. श्रीमद्भागवत ११ स्कंधामधील परकायाप्रवेशसिद्धि हा अज्ञान भूमिकेचा एक प्रकार आहे असे महाराजांचे मत ८०-८१ प्राणविनिमय निद्रा ही जडशास्त्र जेवढ्या शक्ती मानते त्याहून निराळ्या शक्तीत येऊ शकते. पुढील विषयाची भूमिका ८१. प्राणविनिमयामध्ये नुसत्या सूचनेने कार्य होते म्हणून विद्युदुपपत्ति (मॅग्नेटिझम) अगदी गचाळ व खोटी आहे. याविषयी सोदाहरण स्पष्टीकरण ८२. बाह्यसूचनेची जरूर नसून मानसतारायांत्रिक सूचनेने (टेलीपॅथिक सजेशन) हा प्रयोग होतो. टेलेपथि = मानसतारायंत्र. टेलेस्थिशिया = मनोजगत तारायंत्र. यांच्या व्याख्या व कार्ये ८३. सायकोमेट्री = एखादी वस्तु हातात घेऊन तिचा इतिहास सांगणे. हा जातिस्मराचा एक क्षुद्र प्रकार आहे. जातिस्मर व सायकोमेट्री = अंतरचिंतन, अंतरज्ञान यांमधील फरक ८३. हा प्रकार अज्ञानभूमिकेपैकी आहे. वर सांगितलेल्या प्राणविनिमयादिकांचे कारण जडशास्त्राने मानलेल्या शक्तीहून ज्ञा प्रकारच्या गूढ शक्तीत आहे. ८३. सूचना विश्वासाच्या द्वारा प्रयुक्ताच्या अंतर संस्काराचा उदय करिते हे म्हणणे अधिक सयुक्तिक व ही उपपत्ती अगदी अनादि आहे. ८४. विश्वासच अंतरसंस्काराला उदित करून कार्य करवितो. भावनावाद व आपल्या इकडील मंत्र, तंत्र, देवता वगैरे, दुसरा आत्मा या रीतीने

मायर्सलाहि ही गोष्ट कबूल आहे. मंत्राने परिणाम होतो याविषयी महाराजांनी नमूद केलेल्या गोष्टी. ८४. मिशनरी तीर्थविश्वास ८५. भोळ्या भाविकांची योग्यता तर्कटी माणसापेक्षा अधिक. गीतेच्या व साधुसंताच्या महदुक्ती ८५-८६ मायर्सच्या म्हणण्यापेक्षा वरील सत्पुरुषांच्या उक्तीमधील रहस्य अधिक ज्ञा प्रतीचे, शास्त्रीय महत्त्वाचे, उपयोगी व समाधानकारक आहे. अज्ञानभूमिकेतील विश्वास व ज्ञानभूमिकेतील विश्वास. नुसत्या विश्वासानेच कार्य होत नसून भगवंताचे अधिष्ठान पाहिजे. त्याने भगवद्व्यक्तताहि होते. ८६. *(काउंट लियो टॉलस्टाय यांनी या स्पिरिच्युॲलिझम्चा निषेध केलेला आहे व त्यांना जे भविष्यज्ञान होते ते उपासनामूलक होते - मिलिंद)*

सूचनेचे कार्य कसे होते या प्रश्नाचे उत्तर. तीन प्रकारचे जगत् व त्यांच्याशी मनुष्याचा संबंध. ८६-८७. सर्व शक्ती तिसऱ्या जगात राहतात. जगाचा व मनाचा संबंध व त्यांचे परस्पर आकर्षण याविषयी तुकाराम महाराजांचे म्हणणे. ८७-८८. प्राणविनिमय हे तिसऱ्या जगातून शक्ती घेऊन येण्याचे एक कौशल आहे. वेड्याचे स्वत्व निरनिराळें असते व शहाण्याचे एकच असते. एकाग्रता करण्याची शक्ती तिसऱ्या जगातून येते. प्रत्येक मनुष्य आत्मा आहे. ८८. एकाग्रतेविषय (अटेंशन) विशेष विचार. ८९. प्रत्येक पुरुष दोन प्रकारची एकाग्रता करीत असतो. जीवंत अवस्था व मृतावस्था. ८९. मृतावस्थेत आत्मा शरीरावरची संपूर्ण एकाग्रता ओढून तिसऱ्या जगात घेऊन जातो. असे का होते? या प्रश्नाचे उत्तर कर्म अणि वासना असे महाराजांनी दिलेले आहे. कर्म आणि वासना हे हिंदुधर्मात विशेष आहे. ८९-९०. रासायनिक शक्तीच्या आत एक आध्यात्मिक शक्ति आहे. ९०. तिसऱ्या जगातच आमचे जीवित आहे. तिसऱ्या जगावरच आमची स्थिति आहे व तिसऱ्या जगातील शक्ती घेऊन आम्ही जिवंत राहतो. ९०. प्रयोक्त्याची शक्ती काम करीत नसून सूचनेने एकाग्रतेचा उदय होऊन एकाग्रता तीव्र झाल्यावर तिसऱ्या जगातून शक्ति घेऊन विनिमय स्थितीत प्रयुक्त पुरुषाची शक्ति काम करते. म्हणून प्राप्त विनिमयात पासेसची जरूर नियमाने लागत नाही. असे प्राणिचुंबकोपपत्तिवाद्यांस मायर्सचे उत्तर. ९०-९१.

अध्याय ५ वा

अंतःस्वत्व सर्व एक होऊन कार्य करते हे या अध्यायात सांगावयाचे आहे. पूर्वीच्या अध्यायांच्या उपसंहार. स्वप्नावस्थेत चिंतन होते व निद्राभ्रमणावस्थेत चिंतनाप्रमाणे क्रिया होतें. ३ अंतर ज्ञानाचा व इतरांच्या मनाचा संबंध असतो म्हणून परस्परांच्या आकर्षणाने विनिमयहि चालत असतो. निद्रेत देखील निरनिराळ्या प्रकारचे व्यापार चालत असतात व अलौकिक ज्ञान होत असते. ३. चवथ्या अध्यायात कॉसन्ट्रेशन लक्ष्यसादरता आणि (ह्यूमन फॅकल्टी), मानवी मानसिक कर्तृत्वशक्ती यांचा सूचनेच्या योगाने विलास व विस्तार दाखविला आहे. ४. त्याचप्रमाणे निद्राभ्रमणादि अवस्थेत व तसाच स्वप्ननिद्राभ्रमणावस्थेतहि मूळ शक्तीचा आभास दाखविला आहे. ह्या सगळ्या गोष्टीचा सिद्धांत हाच की मानुषस्वत्वात अतींद्रिय अशी काही गूढ शक्ति आहे. ४. ह्या सर्व गोष्टी आम्ही अनिच्छेंद्रिय ज्ञान सेंसरी अटॉमॅटिझम

ग्ठत्थतज्ञी ॰ञदितणञदड्ढथण व अनिच्छेंद्रिय क्रिया मोटोर अटॉमॅटिझम क्त-दतज्ञ ॰ञदितणञदड्ढथण दोहोंमध्ये आणून दाखवितो. ५. मानसतारायंत्र आणि मनोजगत् तारायंत्र हेच वर्तमानज्ञानापेक्षा अंतर ज्ञानात विशेष आहे. इंद्रियज्ञानाची जेथे गति नाही अशा ठिकाणचे ज्ञान होण्यालाच मानसतारायंत्र आणि मनोजगत् तारायंत्र म्हणतात. ५. ह्या सगळ्या गोष्टी ब्रह्मज्ञान मात्र नव्हेत. ब्रह्मज्ञानावाचून अज्ञानातच या गोष्टी येतात. अतएव त्या क्षुद्र आहेत. जीवन आणि मरण यांची व्याख्या ५ अंतः स्वत्व मरणानंतरहि राहते. मरणानंतर वर्तमानस्वत्व अंतःस्वत्वाशी एक होऊन जाते. नाश पावत नाही. ६ अनिच्छेंद्रिय ज्ञानकृतीत अटॉमॅटिझम Aautomatism हा अध्यायाचा विषय ६. अनिच्छेंद्रिय ज्ञानकृतीचे लक्षण उदाहरणे इतर मानसशास्त्रात मानलेल्या अनिच्छेंद्रिय ज्ञानकृतीपेक्षा आमचे लक्षण निराळे आहे. शिरसगावच्या ताईचे उदाहरण ७. जप करिताना शब्द ऐकू येणे. अमनस्क खंडाचे म्हणणे. चरकाच्या इंद्रियस्थानातील इंद्रियविप्रतिपत्तीतील चिन्ह. आर्यवैद्यासारखे पाश्चात्य वैद्यांनी अंतरिंद्रिय मानले नाही म्हणून रंध्रवाद्यांना इंद्रियांच्या विकृत दशेचे उत्तर देता येत नाही. अमनस्क खंडातील चिन्ह चरकासारखे विकृत नाही, मायर्सच्या म्हणण्याचे व अमनस्क खंडातील शब्दपाताचे साम्य. ७. या शब्दपातादिकांचे विषय दृश्य जगात दिसत नाहीत. ७. या स्थितीचे दोन भेद.

८. अनिच्छेंद्रिय ज्ञान आणि कृती हे उपस्थित संस्कारांना मिळूनही होते व न कळूनही होते. ८. साधारण इतर मानसशास्त्रात उपरिस्थ संस्कारच खरे आणि अंतः संस्कार आभासमात्र मानतात. — माझे मत त्याच्या उलट असून अंतसंस्कारच खरे व उपरिस्थ संस्कार त्याचे आभासमात्र आहेत. हे माझेच म्हणणे बरोबर आहे. ९. माझी परिभाषा व तिचा अर्थ ९. अन्यथाप्रदर्शन (इल्यूजन) आणि सामायिकासति प्रदर्शन (हॅल्यूसिनेशन) त्यांची लक्षणे. दोन प्रकारची अन्यथा ख्याति. ९. सत्ख्यातिवाद. यतींद्रमतदीपिकाकारांच्या म्हणण्याशी मायर्सचे म्हणणे सामान्यत्वे जुळते व कथासरित्सागराच्या यथार्थ स्वप्नाशी तंतोतंत जुळते. मायर्ससारख्या सत्य स्वप्नांचा श्रीमच्छंकराचार्यांनी फलसत्यत्वेकरून केलेला स्वीकार ९-१०. योगशास्त्राची भावितस्मर्तव्या स्मृति. रंध्रवाद्यांच्या स्मृतीचा व तिचा भेद १०-११. सामायिकासति प्रदर्शन हॅल्यूसिनेशन या विषयी रंध्रवाद्यांना स्मृतीने उत्तर देता यावयाचे नाही. उत्क्रांति तत्त्वाचे खंडण ११. उत्क्रांती तत्त्वाच्या दोन उपपत्ती मानल्या तर पहिली उपपत्ति मानणे भाग आहे. १२. **अणुवादाचे खंडण.** चरकावरील ''जल्प कल्पतरु'' टीकेचे स्थूलाकाशाचे लक्षण व 'इथर' चे लक्षण एकच आहे. आपल्याकडील कणादादिकांचा प्राचीन परमाणुवाद हल्लींच्या परमाणुवादांपेक्षा भिन्न व ज्ञा प्रतीचा आहे. १२. आपल्याकडील परमाणुवादाचा अर्थ, सांख्य आणि वेदान्त यांनी केलेले त्याचे ग्रहण व न्यायसांख्यवेदान्ताचे विज्ञान-भिक्षूंनी केलेले एकीकरण १३. स्थूल आकाश (इथर) बुद्धिमान नाही या विषयी युक्तिवाद १३-१४. अंतरइंद्रियच सर्व काम करू शकते याची रंध्रवाद्यांच्या दृष्टीने सिद्धि. १४. ज्ञा मेदुंबिंदूच्या (हाईएस्ट सेंटर इन द ब्रेन) पाहण्यामध्ये काही इंद्रिय शक्तीचा व काही अंतरबुद्धि शक्तीचा स्वीकार १४-१५. उत्क्रांतिमत मानले तरी पदार्थांची जशी उत्क्रांति होते तसा मनाचा अधिकाधिक विकास होत जातो उत्क्रांत्युपपत्ति आणि ईश्वर उपपत्ति ह्या दोन्ही खऱ्या आहेत पण मनुष्याच्या वरही आणखी पुष्कळ अध्यात्मिक ज्ञा प्रतीची देवतास्वरूपे आहेत हे उत्क्रांतिवाद्यांना मानले पाहिजे. १५. आपल्या इकडील सांख्यशास्त्र, योगशास्त्र व योगवासिष्ठ यांनी मानलेला उत्क्रांतिवाद. शरीराला मात्र हा उत्क्रमणवाद आपणाकडे लावीत नाहीत. १५. असे पुराणाचे मत ॲनी बिझांटला मान्य नाही. थिआसफीच्या

उत्क्रांतिवादाशी भारतीयोत्क्रमणवाद जुळत नाही. आमचे कडील चित्तोत्क्रमण-वादाचा मथितार्थ १६. मानसतारायंत्र वगैरे कार्य विद्युतच्या योगाने होतात ह्या म्हणण्याचे प्रोफेसर साहेबांच्या मताने खंडण, स्पेन्सरच्या अज्ञेयवादाची स्थिती, इथर, विद्युत वगैरे सूक्ष्म गोष्टींविषयी जडशास्त्रवेत्त्यांचे अज्ञान व जगातील सूक्ष्मत्वापेक्षा अधिक सूक्ष्म शक्तीचा स्वीकार. १७-१८. सूक्ष्म शक्ति चेतन झाली पाहिजे असा प्रोफेसर साहेबांच्या म्हणण्याचा भाव. डॉ. डॉड्सची कबुली. अतिसूक्ष्मता ज्ञानमात्रच राहिली पाहिजे. मानसतारायंत्रादिकांच्या वेळी मेंदूचे परिवर्तन काय होते हे प्रायोगिक रीतीने कोणास सांगता येत नाही १९. अन्यथाप्रदर्शन स्थितीत अथवा स्पष्ट-सामाजिक-प्रदर्शन स्थितीत अंतःसंस्कारच प्रत्यक्ष ज्ञान करून देतात. २१. यालाच मी अनिच्छेन्द्रीय ज्ञानकृति म्हणतो. अनिच्छेन्द्रीय ज्ञानाचे व अनिच्छेन्द्रीय कृतीचे लक्षण. २१. आपल्या इकडे अनिच्छ कांहीच नाही. मायर्स ज्याला अनिच्छ म्हणतो तेथे देखील सामान्य इच्छा आहे, याविषयी प्राचीन मुनी, सत्पुरुष व अर्वाचीन विवेकानंद यांचे म्हणणे. समाधिपादात पतंजल्याचार्यांचे म्हणणे. २१. अनिच्छेन्द्रीय ज्ञान व अनिच्छेन्द्रीय कृती यामध्ये येणाऱ्या गोष्टी.स्वप्नादिक अन्यथा प्रदर्शनाने होतात आणि अनिच्छेन्द्रीय ज्ञानकृती सामायिकासति प्रदर्शनस्थित असतात. स्वत्वव्यतिरेकादि गोष्टींचा शास्त्रीय रीतीत समावेश. सामायिकासति प्रदर्शनच अनिच्छेन्द्रीय ज्ञानकृतींना विशेष व्यक्त करते. २२-२३. प्राणविनीमय स्थिती सोडून दिली तरी जागृतावस्थेत सामायिकासति प्रदर्शन होते. यावर प्राणविनीमयवाद्यांची उत्तरे व शेवटलया उत्तराचा स्वीकार. ही चित्रे पहाण्याचा साधारण व असाधारणबुद्धि पुरुषांचा फरक. २३.आपल्याकडील आत्मख्यातिवाद्यांच्या व मायर्सच्या म्हणण्याचा मेळ व दोघांचा मतभेद. २३-२४. मायर्सहि एका ठिकाणी साशंक आहे. ते स्थळ सामायिकासति प्रदर्शनाच्या आणखी काही घटना. स्फटिक चित्रे (क्रिस्टल व्हिजन्स). ती पाहण्याचा अभ्यास व दिव्यदृष्टी. २४. आपल्याकडील आरशाचा योग. स्वामी नरसिंहसरस्वतींचे उदाहरण. चंद्राकडे सूर्याकडे टक लावून पाहणे,नासाग्रीं दृष्टी वगैरे क्रियांनी दिव्यदृष्टीची सिद्धी.२५

(मिलिंद / श्री. राजेश्वर त्रिपुरवार श्रीगुलाबरावमहाराजांचे चरित्रलेखक, यांनी प्रेसकॉपी केली. गुरुवासर २७-१२-१९२९)

टीप :- मायर्सच्या ग्रंथाचा परिचय

श्री गुलाबराव महाराजांनी मायर्सच्या ज्या ग्रंथाची समीक्षा केली. त्या ग्रंथाचा परिचय.

ग्रंथांचे नांव - *"Human Personality And Its Survival After Bodily Death" Auther :- Fredrick W.H. Myres.*

This book is in two volumes, each volume is of 700 Pgs. approximate. Publisher - Longmans Green & Co. It was first published in Feb. 1903, and was reprinted two times in March & June 1903. Myres died in 1902, but his associates published the two volumes in 1903. Contents of ***Volume .1*** *(Chapt. 1. Introduction ,Chapt. 2. Disintergation Of Personality, Chapt. 3 .Genius, Chapt. 4. Sleep, Chapt. 5 Hypnotism. Chapt. 6. Sensory Automation.* ह्या खंडाला *Appendices 4* आहेत.

Volume-2 *- Chapt. 7 phatasms of the dead, Chapt.8. Motar Automatism, Chap. 9. Trance, Possession and Ecstasy, Chapt. 10, Epilogue* या खंडाला *Appendics 4* आहेत. *Index Pg. No. 629* वर प्रारंभ (*Phantasm =* भूत, वेताळ, पिशा) (*Ecstasy =* हर्षोन्माद, आनंद भर, संमोह, उन्माद, हर्षोन्मत्त *Epilogue =* उपसंहार) ह्या ग्रंथाची मायर्स कृत प्रस्तावना १०० पृष्ठांची आहे. प्रस्तावनेतील महत्त्वाचा मुद्दा पुढे देत आहे. मायर्स लिहितात :- *"The question for man most momentous of all is whether or no he has an immartal soul .... whether or no his personality involves after bodily death. The method of modern science ..... that process which consists in an interogation of Nature entirely dispassionate, patient systematic. Such careful experiment and cumulative record as can often elicit from her (Nature) slightest indications her deepest truth.*

I say, then that this method has never yet been applied to the all-important problem of the existence of the

powers the destiny of the "Human Soul".

I may almost say that scientific superstition ..... is no doubt held at present date by many learned minds."

Superstition :- 1 Idea founded on unreasoning belief in magic, witchcraft etc. लोकभ्रम

2. Fear of the unknown अज्ञाताबद्दल वाटणारी गूढ भीती.)

संकलन :- प्रा. देवराव भुजाडे, रविनगर चौक, अमरावती.

---

१२. नागपुरातील चर्चा

न्या. भवानीशंकर नियोगी, डॉ. ल.रा.परांजपे (इ.सन १९११)

(चरित्र आवृत्ति –२००६ पान २४१ - २४६)

श्रीमहाराजांनी वर्णाश्रमविषयक निरूपणांच्या द्वारें कर्मरहित उपासनेचे दोष दाखवून नागपूर येथील डॉ. परांजपे, त्यांची मित्रमंडळी व वर्धा येथील मंडळी यांस धर्माचें यथार्थ स्वरूप समाजाऊन दिलें व वैदिक धर्माकडे त्यांची मनें वळविण्याचा प्रयत्न केला.

ता.१६ जुलाई १९११ इ.रोजीं श्रीयुत भवानीशंकर नियोगी एम्.ए.यांनी आपल्या कांहीं मित्रमंडळीसह नागपूर येथें डॉ. परांजपे यांच्या माडीवर रात्रौ जमून महाराजांस कांही शंका विचारल्या. तेवेळीं महाराजांबरोबर वेद. श्रीनिवासशास्त्री हरिदास, रा.गोविंदराव सुभेदार, रा.वासुदेवराव मुळे, दत्तात्रेय खापरे प्रभृति सुमारे ३०/४० मंडळी तेथें होती. तीं प्रश्नोत्तरें येणेंप्रमाणें:-

प्रश्न - इहलोक परलोक यांतील हितसंबंध काय आहेत?

उत्तर - ह्यांतील हितसंबंध भिन्न आहेत.

प्रश्न - ते परस्पर विरुद्ध आहेत काय?

उत्तर - नाहीं. ते एकाहून एक उ्रा आहेत.

प्रश्न - कशावरून ?

उत्तर - परलोक म्हणजे काय हें जर तुम्हास समजल्यास हें कळून येईल.

प्रश्न - परलोक म्हणजे काय?

उत्तर – परलोक म्हणाजे काय हें जर तुम्हास माहीत नव्हते तर तुम्ही परलोक व इहलोक ह्यांतील संबंध विचारले कसे? प्रश्न करतांना धर्मी एक असून प्रकारक अंशाविषयी मात्र विवाद असतो.

प्रश्न – जो लॉजिशियन असेल त्याची गोष्ट अशी होईल, पण ज्याला लॉजिकचा गंध नाहीं त्यानें कसें करावें?

उत्तर – जो अत्यंत अज्ञानी असतो त्याला प्रश्नच करतां येत नाहीं व जो अत्यंत ज्ञानी असतो त्याला प्रश्न करण्याची गरज नसते. म्हणून ज्याला सामान्यतः ज्ञात व विशेषेकरून अज्ञात वस्तु असते तोच प्रश्न करीत असतो. ही गोष्ट लॉजिशियन व इतर या सर्वांना सारखीच लागू आहे. तेव्हां तुम्ही जो प्रश्न केला त्यात परलोकसंबंधाची तुमची काय कल्पना आहे?

प्रश्न – शारीरिक क्रिया व मानसिक क्रिया आपण ज्या शक्तीच्या योगाने करतो ती शक्ति पारलौकिक आहे असे आम्ही म्हणतों व तिला जाणणें म्हणजेच परमार्थ अथवा अध्यात्म ज्ञान होय.

उत्तर – हें तुम्ही केवळ श्रद्धेने मानता! श्रद्धेने म्हणजे तुम्हांस स्वतः ज्ञात नसतां शास्त्रावर विश्वास ठेवून. ह्या शक्तीचें ज्ञान आपणाला कशाला पाहिजे? ही शक्ति आपणाहून अभिन्न असेल तर तिच्या ज्ञानाची गरज नाहीं व भिन्न असून अज्ञात असेल तर ती आहे असें आपल्यास म्हणतां येणार नाही. अशा प्रकारची श्रद्धा मला नको आहे.

प्रश्न – म्हणजे केवळ अज्ञानी असून जो मुमुक्षु आहे त्यानें प्रश्नच करूं नये असें झालें.

उत्तर – पहा, आपल्या बोलण्यांत व्यर्थ शब्दच फार येतात. आपणाला मोक्षाची काय कल्पना आहे? कारण निरनिराळ्या पंथांत मोक्ष निरनिराळा मानला आहे. आपली मोक्षाची कल्पना एक असून मी दुसऱ्याच मोक्षाविषयीं उत्तर दिलें तर तें चालेल काय? प्रश्न बरोबर लॉजिकलच असला पाहिजे.

प्रश्न – अशाप्रकारे प्रत्येक शब्दाची व्याख्या देत गेल्यास वर्षानुवर्ष लागून आपण (conclusion) कनक्लूजन वर कधीच येणार नाही.

उत्तर – असें मात्र नाहीं. ज्या गोष्टी लोकप्रवृत्तीला धरून असतात त्यांची व्याख्या देण्याची गरज नसते. परंतु ज्या गोष्टी लोकप्रवृत्तीला धरून नसतात

त्यांची मात्र व्याख्या दिलीच पाहिजे. नाही तर एकाचें म्हणणें दुसऱ्याला कळणारच नाही. आपण प्रथमतः जो प्रश्न केला त्यांत इहलोकाची व्याख्या देण्याची गरज नाही. कारण तो शब्द लोकप्रवृत्तीला धरून आहे. परंतु परलोक या शब्दाचा अर्थ संदिग्ध असल्यामुळें त्याचें मात्र आपणाला एक्स्प्लेनेशन दिलेंच पाहिजे. **'मी लॉजिकशिवाय एक पाऊलही पुढें चालणार नाही.'**

प्रश्न – ॲकॅडॅमिकल डिस्कशन करितां असें चालणें योग्य आहे. पण नेहमींच लॉजिकनें चालून उपयोग नाहीं व हे शक्यही नाही. माझें तर मत असें आहे कीं सर्व लोक नेहमीं व्यवहारांत श्रद्धेनेंच चालत असतात.

उत्तर – नाहीं. मी असें म्हणतों कीं सर्व लोक व्यवहारांत श्रद्धेने चालत नसून उलट लॉजिकनेच चालत असतात.

प्रश्न – असेंच जर आहे तर डिफरन्स ऑफ ओपिनीयन्स राहिला नसता. माझ्या मतानें डिफरन्स ऑफ ओपिनीयन्स असणें अपरिहार्य आहे.

उत्तर – नाहीं. लॉजिकनें चालल्यास डिफरन्स ऑफ ओपिनीयन्स कधींच रहाणार नाहीं. आपणास जो डिफरन्स दिसतो त्याचें खरें कारण हे आहे की त्यांत ते आपले स्वतःचे इमोशन्स मिळवीत असल्यामुळे कनक्लूजन एकसारखे येत नाहीत. ही चूक लॉजिकची नसून उलट श्रद्धेचीच आहे.

प्रश्न – एवढाले ग्रेटेस्ट थिंकर्स लॉजिकनें चालले नाहींत असें कसें म्हणतां येईल? त्यांचे वेज ऑफ थिंकींग निरनिराळे असल्यामुळे कनक्लूजन्स् निरनिराळे येणें स्वाभाविक आहे. बार्कलेनें आपल्या विचाराची दिशा निराळीच धरल्यामुळे मटेरियलीझम्चे जे कनक्लूजन्स् आहेत त्यांवर तो आला नाहीं व निराळा एक आयडियालिझमच त्यानें स्थापित केला.

उत्तर – अहो तुम्ही यांना ग्रेटेस्ट थिंकर कां म्हणतां हेंच मला समजत नाहीं. त्यांच्या लेखांत इमोशन्स कशा मिसळल्या आहेत हें मी तुम्हास पदोपदीं दाखवून देईन. **बार्कले**चीही गोष्ट तशीच झाली आहे. हा ड्यूएलिस्टिक आयडियालिस्ट होता. त्यानें ईश्वर आहे असें प्रथमच गृहीत केलें असल्यामुळें व विचारानें हा स्वतः आयडियालिस्ट असल्यामुळे त्याचे कन्क्लूजन्स विसंगत असे दिसतात. ही चूक लॉजिकची नसून त्याच्या श्रद्धेचीच होय. अशा प्रकारच्या चुका सर्वांनीच केल्या असल्यामुळें त्यांच्यांत डिफरन्स ऑफ ओपिनियन दिसून येतो.

प्रश्न - तर मग बरोबर लॉजिकनें चालणारा कोणीच नाहीं असें म्हणावे लागेल आणि हेंच बरोबर आहे. प्रत्येकांत विचाराचा अंश कमी असून श्रद्धेचा अंशच पुष्कळ असतो व त्यामुळेंच हे डिफरंट स्कूल्स झालें आहेत. ज्याची ज्यावर श्रद्धा असते त्यावरच तो आपल्या विचाराची मांडणी करीत असतो व ही गोष्ट सार्वत्रिक आहे.

उत्तर - सर्वच फिलॉसॉफर्स श्रद्धेने गेले असा माझ्या म्हणण्याचा अर्थ नसून पाश्चात्यात स्पेन्सर व कांट व आपल्याकडे श्रीहर्ष, शंकराचार्यादि अगदी लॉजिकनेंच गेले व त्यामुळें त्या सर्वांचे कन्क्लूजन्सही अगदी बरोबर आले आहेत.

प्रश्न - ठीक आहे.अॅकॅडेमिकली हें बरोबर आहे पण व्यवहारांत मात्र यांचा कांहीच उपयोग नाही. केवळ लॉजिकनेंच चालल्यास कधीच कार्य होणार नाही. ग्रेटेस्ट मेन ऑफ द वर्ल्ड हे श्रद्धाळूच होते असें त्यांच्या चरित्राकडे पाहिल्याने दिसून येईल.

उत्तर - असें मात्र नाही. जगांतील प्रत्येक मनुष्य आपआपल्या परी लॉजिकनेंच चालत असतो. परंतु जेव्हां तो त्यांत आपली श्रद्धा मिसळतो तेव्हां मात्र त्याच्या हातून चुका होतात.

ही गोष्ट सामान्य लोकांची झाली. परंतु ज्यांना ज्याना ग्रेटेस्ट मेन म्हणतां त्यांच्यात तर श्रद्धेपेक्षां लॉजिकचाच अंश अधिक असतो. आणि म्हणूनच त्यांच्या हातून एवढाली मोठमोठी कार्ये होतात.

उदाहरणार्थ एखाद्या एंजिनीयरला पूल करावयाचा असल्यास तो श्रद्धेनें कसाही करीत सुटत नाही. तर प्रथमतः आपल्या मनांत लॉजिकली त्याची सप्रमाण रचना आणून मग पूल करण्यास सुरुवात करतो. असें केलें नसतें तर तो पूलच मोडून पडला असता.

प्रश्न - आपल्याला तर असेंच वाटतें की जगांत एवढाले जे आणीबाणीचे प्रसंग घडून आले ते श्रद्धेनेच झाले. मोठमोठाले शूर कधी लॉजिक करीत बसले होते?

उत्तर - शूरांतही लॉजिक होतें आणि म्हणूनच ते शूरही पण झाले. कोणत्या ठिकाणाहून कसा वेध घ्यावयाचा, कोठें संधान केलें असतां काय कार्य

होईल इत्यादि लढाईस अवश्य लागणाऱ्या गोष्टी तंतोतंत लॉजिकली जर माहित नसल्या तर हातून बऱ्याच चुका होतील. सारांश, शूरांतही लॉजिक होतेंच.

प्रश्न - तर मग सगळेच लॉजिकल थिंकर्स झाल्यावर त्यांत मतभेद कां?

उत्तर - असें मात्र नाहीं. माझ्या म्हणण्याचा अर्थ इतकाच की **प्रत्येकजण आपआपलें काम लॉजिकली करीत असतो व जेव्हां तो चुकतो तेव्हां श्रद्धा असते.**

फिजिक्स

प्रश्न - थिऑरिटिकली जरी लॉजिकचें काम पडत असलें तरी प्रॅक्टिकली त्याचा कांही विशेष उपयोग आहे असें मला वाटत नाहीं. जसें फिजिक्समध्यें कांहीं अॅझम्शन्स घेऊन त्यांवर मटेरियलिस्टांनी फिजिक्सची सर्व उभारणी केली आहे व त्यामध्यें प्रॅकिटकली काहींच बाध आलेला दिसत नाही.

उत्तर - येथें तुम्ही चुकता. मी फिजिक्सवरचे बरेच ग्रंथ वाचले आहेत व मला अॅटॉमिक थियरीपासून आतांच्या डॉ. डॉड्स्च्या इलेक्ट्रॉन थियरीपर्यंतची सर्व माहिती आहे. प्रथम जेव्हां अॅटम थियरी होती तेव्हां असें दिसून आलें की त्यथियरीनें बऱ्याच गोष्टीचे एक्स्प्लेनेशन देता येत नव्हतें. उदा. एक्काबोरम् व दुआबोरम् ह्यांच्यामध्ये कोणता दुवा आहे हेंच त्यांना सांगता येत नव्हतें व म्हणूनच त्यांनी अॅटॉमिक थिअरी सोडून इलेक्ट्रॉन थियरीचा स्वीकार केला आहे. थॉमसननें एका व्ह्यॅक्यूम् ट्यूबमध्ये हैड्रोजन व ऑक्सिजन ह्यांचे अॅटम इलेक्ट्रीसिटीच्या साह्यानें विभागून असें ठरविलें आहे की ह्या दोन्ही द्रव्यांत एकाच जातीचे परमाणू आहेत व असे सर्वच एलिमेंट्समध्ये सारख्याच जातीचे परमाणू सांपडतात व ह्यांनाच आता इलेक्ट्रॉन्स अशी संज्ञा आहे.

प्रश्न - सायन्स हा माझा प्रॉव्हिन्स नव्हे.

उत्तर - बरें, फिलॉसफी, पोलिटिकल एकॉनमी अगर वाटेल तो दुसरा विषय आहे, त्यांत विचारा.

प्रश्न - आपण लॉजिकने चुकी व्हावयाची नाही म्हणतां पण इंडक्शन मध्ये दहापांच उदाहरणें पाहून त्यावरून एक सिद्धांत काढतात ही श्रद्धा नव्हे काय? व ह्यांत चुकी होणार नाहीं काय?

उत्तर - आपण म्हणतां ही गोष्ट जनरल सिद्धांताची आहे. युनिव्हर्सल

सिद्धांताची नाहीं. युनिव्हर्सल सिद्धांत कधीच खोटे व्हावयाचे नाहीत. जनरल सिद्धांताला अपवाद असतात. पण युनिव्हर्सल सिद्धांताला अपवाद नसतात.

प्रश्न - असें आपण कसें म्हणतां? रोजच्या रोज नवीन थिअरीज होत आहेत, एक सिद्धांत जाऊन त्याच्या जागी दुसरा सिद्धांत येत आहे व खरेपणा कोठेंच दिसत नाही.

उत्तर - जे सिद्धांत केवळ मेथड ऑफ ॲग्रीमेंटने ठरविले असतात तेच असे बदलत असतात. जे सिद्धांत मेथड ऑफ ॲग्रीमेंट व मेथड ऑफ डिफरन्स ह्या दोन्ही रीतीनी सिद्ध झाले आहेत ते कधींच बदलत नाहीत. केवळ मेथड ऑफ ॲग्रीमेंटनें जे सिद्धांत ठरलेले असतात. ते जनरल असतात. पण युनिव्हर्सल ट्रूथ ह्या दोन्ही रीतीने सिद्ध असतात. अशाच युनिव्हर्सल ट्रूथ वर आपल्या धर्माची एकंदर उभारणी केली आहे.

प्रश्न - ठीक आहे. लॉजिक नसतेंच असें कांहीं मी म्हणत नाही. पण त्याबरोबर श्रद्धाही असली पाहिजे. निव्वळ लॉजिकनेंच भागत नाही.

उत्तर - येथें मात्र आपण भयंकर चुकी करतां ! लॉजिक व श्रद्धा हे तुह्मी भिन्न मानतां किंवा अभिन्न मानतां?

*अभिन्न मानल्यास केवळ नाममात्रच वाद होईल. *भिन्न मानल्यास आतांपर्यंतच्या सर्व अडचणी पुन्हां येतील. एकाच मनुष्यास श्रद्धा एक करावयास सांगेल व लॉजिक दुसरें करावयास सांगेल. एकाच्या अनुरोधाने दुसरें चालते म्हटल्यास मनुष्य केवळ लॉजिकनेंच किंवा केवळ श्रद्धेनेंच चालतो असें म्हणणें बरें. दोन्हीही मानण्याची कांहीं गरज नाहीं.

आतां मनुष्य केवळ श्रद्धेनेंच चालतो असें म्हटल्यास प्रत्येकजण आपआपल्या श्रद्धेंत स्वतंत्र होईल व असे झाल्यास कोणास कोणी काही म्हणण्याचा अधिकार राहणार नाहीं. म्हणजे तुम्हांस 'आमची सोशियालिझमची तत्त्वेंच बरोबर आहेत, त्याप्रमाणें तुम्ही चला' असें दुसऱ्यास म्हणतां येणार नाहीं. ह्या सर्व अडचणी केवळ श्रद्धेनेंच सर्व चालतात असें मानल्यानें येतात.

प्रश्न - कां? आम्ही जरी श्रद्धेनें चाललों तरी तें जर दुसऱ्यास बरें वाटेल तर त्यानें करावे असें सांगण्यास काय हरकत आहे?

उत्तर - त्याची ज्या ठिकाणी श्रद्धा असते ती सोडून तो ती दुसऱ्याच

ठिकाणी कां ठेवील?

प्रश्न - आम्ही त्याला त्याच्या श्रद्धेत व आमच्या श्रद्धेत काय फरक आहे, किती फायदा आहे हें समजून सांगूं. मग त्यानें वाटेल तर स्वीकारावें किंवा स्वीकारूं नये.

उत्तर - तुम्ही जे समजून सांगूं म्हणतां तें तरी लॉजिकनेंच सांगणार की नाहीं? कसेंही केलें तरी तुम्हांला लॉजिक झुगारून देतां येणार नाही. माझें म्हणणें काय हें तुम्हांला समजलेंना?

प्रश्न - होय. आपला स्टँड पॉइंट मला कळला.

उत्तर - आतांपर्यंत आपण जो वाद केला तो योग्यच आहे. आपण परस्पर मित्र आहोंत. आपण कोणतेही प्रश्न विचारले तरी मला त्यांत कांही वाटत नाहीं. पण समजा आपण जेव्हां मघां असें म्हटलें कीं आम्ही श्रद्धेनेंच कोणतीही गोष्ट घेत असतो व दुसऱ्याला तसें करण्यास समजून सांगतो, तेव्हां एखादा कुत्सित असता तर त्यानें ह्या तुमच्या म्हणण्याचा असा अर्थ केला नसता काय? की 'ह्यांना वाटेल तसें करावयाला पाहिजे. दुसऱ्याला मात्र हे लॉजिक सांगतात'.

आपण ''मी श्रद्धा मानतों'' असें म्हणत होतां व असें कां म्हणून विचारले असतां त्याचें कारण आपण लॉजिकली देण्याचा प्रयत्न करीत होता.

असो. आतां माझे म्हणणें आपणाला पटलें ना ?

प्रश्न - होय. आपला स्टँड पॉइंट काय आहे हें मला कळलें.

.....

असो. ह्यानंतर लवकरच डॉ. परांजपे व भवानीशंकर प्रभृति मंडळींनी श्रीधरबोवांच्या यथेष्टाचरणाचे प्रकार ''श्रीधरबोवा परांजपे'' या नांवाच्या एका चोपड्यांत छापून लोकांत प्रसिद्ध करून त्यांच्या संप्रदायाशी असलेला आपला संबंध तोडून टाकला.

(श्री..त्रिपुरवारकृत चरित्र पान २४१ - २४६

१३. शिक्षण रत्नाकर

श्लोक :-

यः शासितुं जगत्सर्वं शब्दब्रह्म ऋगादिकम् ।
ततान तमहं वंदे श्रीमद्ज्ञानेश्वरं गुरुम् ॥

ओव्या :-

जय जय सद्गुरु करुणाघना । जय जय सद्गुरु मनमोहना ।
जय जय सद्गुरु दीनोद्धारणा । आळंदीपते ॥१॥
पावावया तव पदलक्ष्या । संपादणे लागे शुद्ध दीक्षा ।
यालागी आधी योग्य शिक्षा । विस्तरावी ॥२॥
आहार निद्रा भय मैथुन । प्राणिजातां समसमान ।
मनुष्याचे विशेषपण । हे अधिकरण शिक्षेचे ॥३॥
मी मनुष्य असे आपण । ज्ञा पश्वादिकाहून ।
ऐसे ज्याचे अंतःकरण । तो अधिकारी शिक्षणा ॥४॥
जैसे वाफ्यांतील पाणी । न्यावया दुसऱ्या स्थानी ।
एक बांध भरोनी । टाकणे पडे ॥५॥
तैसे अंगी असतांही मनुष्यपण । पाशव देश त्याहुनि निम्न ।
म्हणोनिया बुद्धि-जीवन । तिकडेच धावे ॥६॥
मध्ये वचनादिकांचा बांध घालोनि । उलट वळवावे बुद्धि-पाणी ।
याची उपपत्ती, उभारणी । शिक्षणाची ॥७॥
तया बुद्धिनीरी चेतनार्काचे । प्रतिबिम्ब जे साचे ।
तेचि अहं प्रत्ययाचे । विषयस्थान ॥८॥
तो विवरणोक्त जीव । नव्हे उपाधि कार्यभाव ।
यालागी स्वयमेव । स्वतंत्र तो ॥९॥
यद्यपि बिंब ईश्वरा ऐसा । स्वतंत्र नाही सहसा ।
तथापि क्रिया करणी आपैसा । चेतनास्तव स्वतंत्र ॥१०॥
काल-स्वभाव-यदृच्छादिक । हे आघवेचि प्रतीतिमात्रक ।
जीव प्रमाता म्हणूनी देख । स्वतंत्रची ॥११॥
ईश्वरानुमोदने भोगीं बांधला । तथापि इच्छा सामर्थ्ये दिसे मोकळा ।

जेवी चोर बंधी बांधला । तरी मनी मोकळा सुटो इच्छी ॥१२॥
तेवी अर्थ काम पुरुषार्थी । जरी दैवाधीन भोगप्राप्ती ।
तरी इच्छावशें धर्माप्रती । स्वतंत्र आहे ॥१३॥
मनुष्य शरीरी आपत्काळ । येताही आपद्धर्म आचरणे केवळ ।
एवंजातीय सकळ । असती वचने ॥१४॥
आपत्काळी अर्थकाम । मिळवाया अति दुर्गम ।
शरीर असमर्थ परम । म्हणोनिया ॥१५॥
अहिंसादि शुभकर्म । आणि तैसे भागवत धर्म ।
केलिया मानसही उपक्रम । सिद्ध होती ॥१६॥
म्हणुनी अत्यंत संकटी । पडलियाही शुभकर्मासाठी ।
स्वतंत्र गोमटी । आहे जीवा ॥१७॥
संपत्काळी त्याहोनी स्वतंत्र । संपद्धर्म करो शके पवित्र ।
यालागी शिक्षणपात्र । मानुष्याभिमानी ॥१८॥
बुद्धीतील तमोगुण । तो गुरूत्व स्वभावे तीस ने निम्न ।
परी जीवे सत्कृतीबांध घालोन । तमःप्रवाह रोधावा ॥१९॥
एवं बांधांतरी रज । रोधोनिया सहज ।
एक सत्त्व निज । वाढवावे ॥२०॥
हाचि शिक्षणाचा विषय । आता प्रयोजन जे होय ।
तेही ऐकोत स्वये । चतुर श्रोते ॥२१॥
मुख्य आणि गौण । द्विविध प्रयोजन ।
मुख्य ते एकविध असोन । गौण तीन प्रकाराचे ॥२२॥
बल, कौशल्य आणि शुद्धि । ही त्रिविध गौण प्रयोजन प्रसिद्धि ।
पूर्ण सुख स्वातंत्र्य सिद्धि । या नांव मुख्य प्रयोजन ॥२३॥
आलिया भोगाचे आघात । सहन करुनि शुभ न सांडत ।
हे बल लक्षण यथार्थ । बोलिले मुनी ॥२४॥
शुभाशुभ विकारांचा । योग्य उपयोग करणे साचा ।
निका कौशल्य शब्दाचा । अर्थू हा ॥२५॥
असद्विकार निःशेष जाती । सर्वदा सद्वासना स्फुरती ।
या नांव मुनी म्हणती । शुद्धि ऐसे ॥२६॥

सर्व विकार विनिर्मुक्त । सहज स्फुरे सर्वगत ।
ते आपणपे होईजे यथार्थ । स्वातंत्र्य हे ॥२७॥
वैद्यशास्त्र काम शास्त्र । आणि तैसेचि मल्लशास्त्र ।
या तिही अनुसार । बल फल जनक शिक्षण मिळे ॥२८॥
तया शारीर शिक्षण । ऐसेही देती अभिधान ।
असो कौशल्यार्थ शिक्षण । नैतिक दुसरे ॥२९॥
शुद्धिसाठी धर्म शिक्षण । ते तिसरे ज्ञा दोहीहून ।
स्वातंत्र्य जनक वेदान्त शिक्षण । चवथे ते ॥३०॥
ही शिक्षण चतुष्क परिपाटी । उभारिली शास्त्रदृष्टि ।
ती विशद सांगू गोमटी । इये ग्रंथी ॥३१॥
हे एकचि शिक्षण शास्त्र । करो अवघियावरी उपकार ।
सांग विवेचन म्हणोनि साचार । प्रकरण न म्हणावे कोणी याते ॥३२॥
यद्यपि गीर्वाण भाषेत । शास्त्र असती हा नियम परंपरागत ।
तथापि इच्छिलिया भाषेत । अर्थ होऊं शके ॥३३॥
संस्कृत वाणी देवे केली । प्राकृत काय चोरापासोनी झाली ।
ऐसी नाथोक्ति भली । एकादश स्कंधी ॥३४॥
चोपचिनी आदि परभाषागत । औषधी स्वीकारिती संस्कृत पंडित ।
कां पीकनेमादि शब्दार्थ । म्लेच्छ रूढीने मीमांसक करिती ॥३५॥
तैसा माझाही मराठा बोल । संस्कृतज्ञा होय अनुकूल ।
आणि निरभिमानी बाल । सुशिक्षित होतु ॥३६॥
पूर्वी संस्कृत शिक्षणसूत्रें । आरंभिली ती हरपली विचित्रे ।
हे विघ्न जाणोनिया स्ववक्त्रे । मराठी भाषेंत रची कविता ॥३७।
जयाचे करिता स्मरण । आघातचि हित होती पूर्ण ।
ते श्रीज्ञानेश्वर चरण । राहोत नित्य अस्मत् हृदयी ॥३८॥
श्रीज्ञानेश्वर जननी । पुढे शास्त्र उभारणी ।
निज करुणे करोनि । निवारी विश्वतापत्रया ॥३९॥
हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर कृपाप्रसादे ओवीछंदबद्धे ''शिक्षण रत्नाकरे'' बलोल्लोले अनुबंध निरुपणंन्नाम प्रथमस्तरंगः ॥

(अपूर्ण)

श्रीज्ञानदेवांचा हरिपाठ

.सुखे म्हणो येती वेद

*वेदांचा पाठ करताना वैदिक संहितेचा पाठक्रम जसाचे तसा म्हणावयाचा असतो कारण ते मंत्र आहेत; परंतु ते वेदमंत्र समजून घेण्यासाठी व त्यांचा यज्ञादि कर्मात विनियोग करण्यासाठी मात्र अर्थक्रमानुसार अभ्यास अभिप्रेत आहे; म्हणूनच वैदिक ऋषींनी **''ब्राह्मण ग्रंथांची''** रचना केली.*

*(१) श्रीमहाराजांच्या धारणेनुसार हरिपाठ म्हणजे माउलीच्या मुखातून निघालेले समाधिभाषेतील वेदमंत्रच आहेत. (२) सर्वांनी नित्याचा नेम म्हणून करावयाचा हरिपाठ परंपरेनुसार पाठक्रमानेच करायला हवा; पण अर्थ समजून घेण्यासाठी श्रीगुलाबराव महाराजांनी सुचविलेला **अर्थक्रम** महत्वाचा आहे; आणि (३) दुसरा विशेष म्हणजे प्रत्येक अभंगात कोणता विशेष सिद्धान्त आलेला आहे ते सांगण्यासाठी श्रीमहाराजांनी **प्रतिज्ञा** लिहिल्या आहेत. **(प्रतिज्ञा** = प्रमेयाचा निश्चय करणारे विधान) म्हधून अभ्यासकांच्या सोईसाठी अभंगासह प्रतिज्ञा मुद्रित करणणे उचित आहे.*

*. – **प्रकाशक***

१४. हरिपाठाचा अर्थक्रम

अर्थक्रम				पाठक्रम
१	नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी ।	..	..	२०
२	योगयागविधी येणे नोहे सिद्धी ।	..	..	५
३	भावेविण भक्ती भक्तिविणे मुक्ती ।	..	..	४
४	विष्णुविणे जप व्यर्थ त्याचे ज्ञान ।	..	..	९
५	हरि ज्ञारणी अनंत पापराशी ।	..	..	११
६	त्रिगुण असार निर्गुण हे सार ।	..	..	३
७	पर्वताप्रमाणे पातक करणे । ..	..	...	७
८	संतांचे संगती मनोमार्ग गती ।	..	..	८
९	देवाचिये द्वारी उभा क्षणभरी ।	..	..	१
१०	त्रिवेणी संगमी नाना तीर्थे भ्रमी ।	..	..	१०
११	चहूं वेदी जाण षट्शास्त्री कारण ।	..	..	२
१२	समाधि हरीची समसुखे विण।	..	..	१३

१३	हरिनाम जपे तो नर दुर्लभ ।	..	..	१६
१४	साधुबोध झाला नुरोनिया ठेला ।	..	..	६
१५	तीर्थव्रत नेम भावेविण सिद्धी ।	..	..	१२
१६	नित्य सत्य मित हरिपाठ ज्यासी ।	..	..	१४
१७	एकनाम हरि द्वैतनाम दुरी।	..	...	१५
१८	वेदशास्त्र प्रमाण श्रुतीचे वचन ।	..	..	१९
१९	हरिवंश पुराण हरिनाम कीर्तन ।	..	..	१८
२०	हरिपाठ कीर्ति मुखीं जरी गाय ।	..	..	१७
२१	नित्य नेम नामी ते प्राणी दुर्लभ ।	..	..	२२
२२	सात पांच तीन दशकांचा मेळा ।	..	..	२३
२३	काळ वेळ नाम ज्ञारितां नाही ।	..	..	२१
२४	एक तत्त्व नाम दृढ धरी मना ।	..	..	२६
२५	जप तप कर्म क्रिया नेम धर्म ।	..	..	२४
२६	सर्व सुख गोडी साही शास्त्रे निवडी ।		..	२७
२७	जाणीव नेणीव भगवंती नाही ।	..	..	२५
२८	अभंग हरिपाठ असती अट्ठावीस ।	..	..	२८

.....

१५. हरिपाठाच्या प्रतिज्ञा

(पाठक्रमानुसार)

॥ श्री ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

१. देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी ।

प्रतिज्ञा :- नामधारकास चारी मुक्तींची प्राप्ति, नाममहिमा व भागवत प्रामाण्य.

२. चहूं वेदीं जाण षट्शास्त्रीं कारण ।

प्रतिज्ञा :- वेदशास्त्रनिर्णय व नाममहिमा.

३. त्रिगुण असार निर्गुण हें सार ।

प्रतिज्ञा :- सगुण निर्गुण वादनिषेध व नाममहिमा

४. भावेविण भक्ति भक्तिविणें मुक्ति ।

प्रतिज्ञा :- इतर साधनांचा निषेध

५. योगयागविधि येणें नोहे सिद्धि ।

प्रतिज्ञा :- इतर साधनांचा निषेध.

६. साधुबोध झाला नुरोनिया ठेला ।

प्रतिज्ञा :- सत्संगाचा महिमा, संकेतदृष्टि आणि स्वलोप.

७. पर्वताप्रमाणे पातक करणे ।

प्रतिज्ञा :- नाममहिमा व इतर शब्दवादाचा निषेध.

८. संतांचे संगती मनोमार्गगति ।

प्रतिज्ञा :- सत्संगमहिमा व नाममहिमा

९. विष्णुविणें जप व्यर्थ त्यांचे ज्ञान ।

प्रतिज्ञा :- इतर साधनांचा निषेध

१०. त्रिवेणी संगमीं नाना तीर्थें भ्रमी ।

प्रतिज्ञा :- नामस्मरण प्रमाण व इतर साधन अप्रमाण.

११. हरि ज्ञारणीं अनंत पापराशी ।

प्रतिज्ञा :- नाममहिमा व वेदाची कुंठित गती.

१२. तीर्थ व्रत नेम भावेंविण सिद्धि ।

प्रतिज्ञा :- हरिनामाविषयी मानसिक साधन व इतर बाह्य साधनांचा भक्तीत अनुपयोग. सद्‌गुरु गुणाणीत. गुरुकृपेचे आभार.

१३. समाधि हरीची समसुखेंविण ।

प्रतिज्ञा :- हरिरूप ऐक्यत्व फळ, इतर योगादि सिद्धींचा निषेध, भक्ताचे हरिरूपी समाधान

१४. नित्य सत्य मित हरिपाठ ज्यासी ।

प्रतिज्ञा :- स्वोपदेश महिमा, नामधारकाची जीवन्मुक्ती, देवतांचे हृदयी विष्णुनामाची ख्याती, नामधारकाविषयी कालनिषेध, नामधारकास दोषांची बाधा नाही. नामाने सर्व साधनसिद्धी व नामधारकास आश्वासन.

१५. एक नाम हरि द्वैत नाम दुरी ।

प्रतिज्ञा :- वैराग्य व संसाराचे मिथ्यात्व, समबुद्धीचे तात्पर्य. सगुण ध्यानाने शमदमांची प्राप्ती, जीवेश्वर भिन्न ठेवून नाम घेणाऱ्याचा निषेध, अद्वैताचे अंतर महापुरुष जाणतो.

१६. हरिनाम जपे तो नर दुर्लभ ।

प्रतिज्ञा :- नामस्मरणांत सर्व सिद्धींचा समन्वय

१७. हरिपाठकीर्ति मुखीं जरी गाय ।

प्रतिज्ञा :- गुरूपदेश कीर्तीनेंच सर्वसिद्धी, नामस्मरणाचे व गुरूपदेश कीर्तीचेच समान फल, गुरुमुखापासूनच नामस्मरण सफल, गीतोक्तिसमुद्धार, नामधारक प्रलयात नाश पावत नाही, म्हणून तो अमर. नामधारकाचे आईबाप विष्णुरूप, सारूप्य मुक्तीत जीवाचा जीवपणा नाश पावत नाही, तृप्तीचे ढेंकर आणि सद्गुरुकृपेचे आभार.

१८. हरिवंश पुराण हरिनाम कीर्तन ।

प्रतिज्ञा :- पुराणांचा अंगीकार व नामास त्यांचे प्रामाण्य, नाम घेणारास वर्णाश्रम चुकल्याची बाधा नाही, नामधारकास भूमीवरच वैकुंठ, स्वोपदेशी स्थिरता करण्याची आज्ञा, नामावाचून ध्यानाचा निषेध.

१९. वेदशास्त्र प्रमाण श्रुतीचे वचन ।

प्रतिज्ञा :- सनत्कुमार व नारदसंवादाचे अभिनंदन, नामास वेदशास्त्र प्रमाण, शाक्तादि काम्यमंत्रजपनिषेध. अज्ञानपूर्वक नीतीशास्त्र, धर्मशास्त्र, मीमांसादि शास्त्रांचा निषेध, नामधारकाचे कुळास यम भितो.

२०. नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी ।

प्रतिज्ञा :- नामसाधनाचा उपक्रम

२१ काळ वेळ नाम उच्चारितां नाही ।

प्रतिज्ञा :- नामस्मरणास काळनियमनिषेध, श्रोतृपक्षाचे व वक्तृपक्षाचे कल्याण. पाषाण, पशुपक्षादि श्रोतृपक्ष व ब्राह्मणादि मनुष्यजाती वक्तृपक्ष, तेच जडजीव, या दोहोंचा उद्धार. माहात्म्य कळो न कळो नाम घेतच राहावे. भक्तीत पाषाणादिकापासून देवापर्यंत सर्व जीवांचा समान अधिकार, दुसऱ्यास उपदेश करताना आपलेही आईबाप उद्धरतात. याची ऐतिह्य प्रमाणाने सिद्धी.

२२. नित्य नेम नामीं ते प्राणी दुर्लभ ।

प्रतिज्ञा :- नामसाधन करण्याविषयी आज्ञा, नामधारकाचा रक्षक वासुदेव, हरिनामस्मरण न करणाऱ्यास जीवन्नरकप्राप्ती, नामधारकास ज्याप्रमाणे जीवन्मुक्ती व विदेहमुक्ती त्याप्रमाणे नाम न घेणाऱ्यास जीवन्नरक व मेल्यावरही

नरक. सच्छिष्याचा श्रीगुरूस प्रश्न, नाम पंचभूतमय नसून व्यापक आहे, असे सद्गुरूंचे उत्तर. आकाशाचे शब्दपण नामास लागू नाही.

२३. सात पांच तीन दशकांचा मेळा ।

प्रतिज्ञा :- सर्व शास्त्रांत अधिष्ठानाची परोक्षता व नामात अपरोक्षता, ईश्वर कर्ता म्हणणाराकडे गौणत्व, निःसाधन नामसिद्धी, भक्तीचे असाध्यत्व, प्रणवादिनाम जपण्यापुरताच योगियांचा अर्धा अंगीकार, नाम सोडून योगियांना योग साधता येत नाही. वाणीने रामकृष्ण जपाचा घोष ही संप्रदायाची कर्तव्यता.

२४. जप तप कर्म क्रिया नेम धर्म ।

प्रतिज्ञा :- प्रेमात सर्व कर्मांचे तात्पर्य, नामस्मरणावाचून वर्णाश्रमाचा निषेध, प्रेमयुक्त नामस्मरण मुखी असता वैराग्याची व संसाराची समानता, नाम घेतले असता वर्णाश्रम सोडावाच असा आग्रह नाही. नामधारकाची वैकुंठात विष्णु आधीच व्यवस्था करून ठेवितो.

२५. जाणीव नेणीव भगवंती नाहीं ।

प्रतिज्ञा :- संकेतदृष्टीने स्वरूपज्ञान व अज्ञान यांचे खंडन, इतकेही होऊन हरिनाम चालूच असावे. उत्तर भक्तीचे स्वरूप. सर्व लोकांत वैकुंठ व्यापक आहे. ज्ञानेश्वर स्मरण.

२६. एक तत्त्व नाम दृढ धरी मना ।

प्रतिज्ञा :- संकेत जाणून नामाची विशेषता, भगवंताचे दयाळुत्वगुणवर्णन, रामकृष्ण नामावांचून इतर साधने नकोत, कळकळीने नामाचा उपदेश, नामांत मनाची एकाग्रता. नाम हे तत्त्व, इतर साऱ्या वृत्ती. लोकांस दुसऱ्या मार्गाने न जाऊं देण्याची सक्ती, भक्तेतर जनांशी भाषणनिषेध, नित्य नाम जपा मग माळ नसली तर नसो.

२७. सर्व सुख गोडी साही शास्त्रे निवडी ।

प्रतिज्ञा :- उपदेशाचे चुटके, जगात वागण्याची रीती, हरिनामावाचून वेदशास्त्र खोटे, जीवंत समाधि-नामस्मरण.

२८. अभंग हरिपाठ असती अट्ठावीस ।

प्रतिज्ञा :- नामाची गुरुगम्यता, गुरुमुखापासून नामप्राप्तींचा संतोष इतरत्र नाही. हरिपाठ साधन करण्याचा क्रम, श्रीगुरुप्रसन्नता, गुरुमुखापासून नामप्राप्ती

झाली असता, प्रेम एकदम उत्पन्न होते. **आळंदीस राहण्याची आज्ञा.** माझा उपदेश ग्रहण करणारास हरी निश्चयाने रक्षितो, असे श्रीज्ञानेश्वर महाराजांचे म्हणणे. **अंतर प्रेमरूप व बाहेर सगुणरूप** हरीची स्थापकता, हरिपाठाची फलश्रुती. अभंगांची संख्या, स्वतःचा विश्वास, शिष्याला उद्देशून 'आळशी होऊ नको' म्हणण्याची प्रवृत्ती. म्हणून प्रश्न, श्रीज्ञानेश्वर महाराजांचा संतोष, श्रीगुरु निवृत्तिनाथ यांची कीर्ती.

१६. स्वसमाज सामान्य नियम

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

१ **अहिंसा सत्यमस्तेयं अकामक्रोधलोभता ।**
भूतप्रियहितेहा च धर्मोऽयं सार्ववर्णिकः॥

अर्थ - अहिंसा, सत्य, अस्तेय, अकाम, अक्रोध, अलोभ व भूतमात्रांचे प्रिय व हित करण्याची इच्छा असणें; हा सर्व वर्णांना सारखा लागू असणारा धर्म होय.

सूचना - यात मंदाधिकाऱ्यांकरता अहिंसेत एक व सत्यात तीन सवलती आहेत, त्या ज्याला लागतील त्यांनी स्वतः मागून घ्याव्या.

२. **मात्रा स्वस्त्रा दुहित्रा वा न विविक्तासनो भवेत् ।**
बलवान् इंद्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ॥

- आई, मुलगी किंवा बहिण यांच्यासह देखील एकांतात राहू नये, कारण इंद्रिये एवढी बलिष्ठ आहेत की प्रसंगी विद्वानांना देखील मोह पाडतात.

३. **यमान् सेवेत सततं न नित्य नियमान् बुधः ।**
यमान्पतत्यकुर्वाणो नियमान् केवलान्भजन् ॥

- शहाण्याने यम अवश्य पाळावेत व नियमहि पाळावेत. पण नियमांचा हट्ट धरून, यम न पाळता, नुसते नियमच पाळू नयेत, कारण- यम न पाळता, नुसते नियमच पाळणारा पतन पावतो.

यम- **अहिंसा सत्यमस्तेयमसंगो ऱ्हीरसंचयः ।**
आस्तिक्यं ब्रह्मचर्यं च मौनं स्थैर्यं क्षमादेयम् ॥ (भाग.स्कं.११अ.१९)
अहिंसा सत्यमस्तेयब्रह्मचर्यापरिग्रहः यमाः । (पातंजल योगदर्शन)

नियम- **शौचं जपस्तपो होमः श्रद्धातिथ्यं मदर्चनम् ।**
तीर्थाटनं परार्थेहा तुष्टिराचार्यसेवनम् ॥ (भाग.११.अ.१९)
शौच-संतोष-तपः-स्वाध्याय-ईश्वरप्रणिधानानि नियमाः। (पातंजल योग)

४ **तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।**
ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥ (गीता अ.१६.श्लो.२४)

- शास्त्रानेच धर्म व अधर्म यांची व्यवस्था लावावी. व आपल्या अधिकारानुसार जे कर्म करावे असे शास्त्राने ठरेल, ते समजून घेऊन मग कर्म करणे योग्य आहे.

५. **परधर्मे किमप्यस्तु स्वीयं शास्त्रं ऋगादिकम् ।**
श्रुतिस्मृतिविरोधे तु श्रुतिरेव बलीयसी ॥

- परधर्मात कोणतेहि शास्त्र असो आपल्याला त्यांशी कर्तव्य नाही. पण आपल्या धर्मात ऋगादि चार वेद व स्मृति यांनाच शास्त्र म्हणतात. जेव्हा श्रुतिस्मृतींचा विरोध दिसून येईल तेव्हा श्रुतीलाच मानावे.

''विरोधंत्वनपेक्ष्यम् । असति ह्यनुमानम्''

- श्रुतिस्मृतींचा विरोध दिसल्यास स्मृति घेऊ नये. प्रत्येक स्मृतीला श्रुतीची अनुकूलता आहे असे मत आहे; तेव्हा जरी एखाद्या अर्थाची श्रुति न दिसली तथापि त्या स्मृतीला श्रुत्यनुकूलता आहे असे अनुमानाने मानावे.

६. **श्रवणं गुरुशास्त्राभ्यां मननं च स्वयुक्तिभिः ।**
मत्वा च सततं ध्येयमेते दर्शनहेतवः ॥

- गुरु व शास्त्र या दोहोंच्या साह्याने श्रवण करून, त्याचेच आपल्या स्वतःच्या युक्तीने मनन करावे व नंतर त्याचे सतत ध्यान करावे म्हणजे आत्मसाक्षात्कार होतो.

७. **दृष्टादि लौकिकं मानं वैदिकं चाप्यलौकिकम् ।**
यद्यदावश्यकं यत्र तत्तत्तत्र नियोजयेत् ।

- दृष्टादि लौकिक प्रमाणे, वैदिक प्रमाणे व अलौकिक प्रमाणे यांचा जेथे जेथे जसजशी जरूर पडेल, त्या त्या प्रमाणे उपयोग करावा.

१. लौकिक प्रमाणे - प्रत्यक्ष - अनुमान ;
२. वैदिक प्रमाणे - श्रुति व स्मृति

३. अलौकिक प्रमाणे - स्वप्न, संभ्रम, संकल्प व स्वानुभूति परंपरा.

८. **तदशक्तो हि श्रद्धालुर्वृद्धव्यवहृतिं भजेत् ।**
तथापि निंदानिर्मुक्तः सात्त्विको अन्तर्बहिः शुचिः ॥

- जो वरील प्रमाणांचा उपयोग करण्यास असमर्थ असेल त्याने वडिलांनी लावून दिलेल्या मार्गाचेच अवलंबन करावे. पण कोणाची निंदा न करता अन्तर्बाह्य शुद्ध रहावे.

मना सज्जना भक्तिपंथेचि जावे ।
तरी श्रीहरि पाविजेतो स्वभावे ॥
जनी निंद्य ते सर्व सोडोनि द्यावे ।
जनी वंद्य ते सर्व भावे करावे ॥ (समर्थ : मनाचे श्लोक)

९ **कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।**
इन्द्रियार्थान् विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥ (भगवद्गीता अ.३)

- जो मूढ कर्मेन्द्रियांचा निरोध करून त्यांच्या विषयांचे मनांत चिंतन करतो, त्यास दांभिक म्हणतात. म्हणून असे करू नये.

१० **यस्त्विन्द्रियाणि मनसा नियम्यारभते ऽ र्जुन ।**
कर्मेन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥ (गीता ३)

जो मनाने इंद्रियांचे दमन करून कर्मेन्द्रियांनी व्यवहार करतो, तोच कर्मापासून अलिप्त असणारा श्रेष्ठ होय.

११ **अन्तरी ज्ञाने उजळला । बाहेरी कर्मे क्षाळला ॥**
याहीवरी पार्था । माझ्या भजनी आरथा ।
तयाते मी माथा। मुगुट करी ॥ (ज्ञाने. अ १२)

१२ **तावद्भयस्य भेतव्यं यावद्भयमनागतम् ।**
आगतं तु भयं वीक्ष्य प्रतिकुर्याद्यथोचितम् ॥

- भय आले नाही तोपर्यंतच त्याची भीति; येऊन पडल्यावर त्याचा योग्य प्रतिकारच करावा.

१३ **कालो दैवमीश्वरेच्छा भूतशोकापमार्जने ।**
प्राप्तदुःखं तितिक्षायां धैर्यसंवर्धनेऽपि वा ।
भविष्यद्दुःखनाशाय धार्मिकं यत्नमाश्रयेत् ।

शास्त्रधर्मकालयोगैर्धर्माधर्मौ परीक्षयेत् ॥

- काल, दैव आणि ईश्वरेच्छा, यांचा उपयोग दुःखितांचे अश्रू पुसण्याकडे व आलेले दुःख सहन करण्याकरता धैर्य वाढविण्याकडे करावा. – परंतु भाविदुःखाच्या नाशाकरता धर्माला अनुसरून यत्नच केला पाहिजे. धर्माधर्माचा निश्चय धर्मशास्त्र व कला यांच्या अनुरोधाने करून घ्यावा.

१४ **जितुके का आपणा ठावे । तितुके हळूहळू शिकवावे ।**
शाहणे करूनि सोडावे । सकळ लोकां ॥

१५ **सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत ।**
कुर्याद्विद्वांस्तथासक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥
न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् ।
जोषयेत् सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन् ॥ (गीता अ.३.श्लो..२५,२६)

- लोकसंग्रह करू इच्छिणाऱ्याने, मूढ लोक कर्माचेच ठिकाणीं आसक्ति ठेऊन जशी कर्मे करतात तसेच, आसक्ति न ठेऊन कर्म करावे.

कर्माचे ठायी ज्यांची आसक्ती आहे, अशा अज्ञ जनांच्या बुद्धीचा भेद विद्वानाने करू नये. स्वतः योग्य रीतीने कर्म आचरून त्यांजकडूनहि तशीच कर्मे करून घ्यावी.

१६ **धर्मान्तरं विना विश्वं भ्रातृबुद्धया ऽ नुभावयेत् ।**
स्त्रीष्वस्तु धार्मिकं प्रेम किंतु तासान्न विश्वसेत् ॥

- धर्मान्तर केल्याखेरीज सर्व जगतावर बंधुप्रेम ठेवावे. स्त्रियांवर अत्यंत प्रेम करावे पण त्यांच्यावर विश्वास ठेऊ नये. (विश्वसून राहू नये)

१७ **ईश्वरो सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।**
भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥६२॥ अ.१८
तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।
तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥६३॥ अ.१८

- एखादा सूत्रधार ज्याप्रमाणे स्वतः अलिप्त असताहि केवळ सूत्राधाराने सर्व बाहुल्यांना नाचवितो त्याप्रमाणेच परमात्मा सर्व प्राणिमात्रांचे हृदयात राहून त्यांचे व्यवहार चालवितो. त्याच परमेश्वरास अनन्यभावेकरून शरण जावे. म्हणजे त्याच्याच कृपेने परमशांति व शाश्वतस्थान प्राप्त होते.

१८ मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः ॥३४॥अ.९

- हे अर्जुना, माझेच ठिकाणी आपले चित्त निरंतर ठेव. माझीच भक्ति कर. माझेच पूजन कर. मलाच नमस्कार कर. याप्रमाणे नित्य माझेच ठिकाणी अनन्य होऊन आपलेपणा अर्पण करीत रहा, म्हणजे शेवटी मलाच पावशील.

१९ परस्वभावकर्माणि न प्रशंसेन्न गर्हयेत् ।
विश्वमेकात्मकं पश्यन् प्रकृत्या पुरुषेण च ॥

- दुसऱ्याची निंदा किंवा स्तुति करू नये. प्रकृति-पुरुष विवेक करून सर्व विश्व अखंडैकरसरूप पहावे.

२० व्यवहार-कलादीनां ज्ञानं धर्मानुसारतः ।
भूमीपर्यटनं भूयात् धर्मार्थधनवर्धने ॥

- व्यवहार व धंदेशिक्षण धर्म न सोडता घ्यावे व धर्माकरता द्रव्यसंचय करावयाचा असेल तर पृथ्वीपर्यटनहि करावे.

२१ ऋतौ भार्यामुपेयात् ॥

- ऋतुकालीच महिन्यातून एकदा स्त्रीगमन करावे.

२२ वीतरागमुनिर्विद्वान् क्षुत्क्षान्त्यै भैक्ष्यमाचरेत् ।
यदृच्छालाभसंतुष्टो द्वंद्वातीतो विमत्सरः ॥

- वैराग्यसंपन्न, मननशील व विद्वान अशानेच क्षुधाशान्त्यर्थ भिक्षा मागावी व शीतोष्ण सहन करून मत्सर सोडून जेवढे मिळेल तेवढ्यात संतुष्ट असावे.

२३ दशापराधान् संत्यज्य शिवं नारायणं स्मरेत् ।
गंगास्नानं च सत्संग यथाशक्त्या समाचरेत् ॥

- हरिहरांचे नामस्मरण दहा अपराध टाकून करावे; व यथाशक्ति गंगास्नान व सत्संग साधावा.

नामाचे अपराध दहा । ते न करूनि पहा ।
नाम घेता राहा । जैसे तैसे ॥
१)नामविश्वासे निंदणे संता । २)दुर्जना नामवैभवकथा ।
३)रमाकान्त आणि उमाकान्ता । भेदबुद्धि पहाणे ॥२॥
४)श्रुति ५)स्मृति ६)सद्गुरुवचन । येथ न विश्वासे मन ।

आणि ७)नामे पातके जळती संपूर्ण । हे स्तावक म्हणणे भ्रांतिस्तव ॥३॥
८)नाम आहे आम्हापाशी । म्हणोनि निषिद्ध आचरणासी ।
प्रवृत्ति लागली विशेषी । जयाची होय ॥४॥
९)जवळी नामस्मरण चांग । मानुनि करी विहितत्याग ।
१०)अन्य देवता आणि श्रीरंग । यांची नामे समचि म्हणे ॥५॥
एवं हरिहरमंत्र जपता । हे अपराध दशक सर्वथा ।
येवो न द्यावे माथा । प्राण गेलियाही ॥६॥

कोणत्याही माणसावर **सत्पुरुष** या नात्याने विश्वास ठेवावयाचा असल्यास तो –

१) विद्वान
२) विद्याभावे पराक्रमादि गुणवान्
३) नेहमी पुरुषात बसणारा
४) स्त्रियांशी बोलावयाचे असल्यास स्त्रीसमाजात किंवा पुरुषसन्निध स्त्रियांशी बोलणारा
५) स्वस्त्रीखेरीज कोणत्याहि स्त्रीशी एकांती कधीहि न बोलणारा असावा.
६) *वैद्यशास्त्र न येऊन स्त्रियांत वैद्यकी करणारा व *त्यांना ज्योतिषाचे प्रश्न सांगणारा अशावर विश्वास ठेऊ नये.

हा नियम अत्यंत कडक रीतीने पाळला जावा.

ही आज्ञा मोडून जो जाईल, तो मंडळीतला समजला न जाऊन माझ्यासुद्धा सर्वांनी त्याच्यावरचा प्रेम कमी केला पाहिजे. त्याची प्राणान्त अपील सुद्धा ऐकली जाणार नाही, मग तो कितीहि गुणवान् असो !

२४ नहि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ।
एवं प्रियोक्तितः प्रज्ञा सामानाधिकरण्यतः ॥

आपले कल्याणाचा उद्योग करणारा कधीच दुर्गतीस जात नाही या श्रीकृष्णवचनावर विश्वास ठेऊन आपणहि तसा उद्योग सुरू करावा व यात आपणास दुर्गति नाही असा भरंवसा ठेवावा.

२५ प्रायश्चित्तं प्रमादे स्यादनुतप्तस्य शास्त्रतः ।
प्रायश्चित्तं प्रदातापि पंडितो नियमान्वितः ॥

हे नियम पाळण्यात चुकी झाल्यास, पश्चाताप झालेल्यास शास्त्रानुसार प्रायश्चित आहे. परंतु प्रायश्चित देणाराहि शास्त्रज्ञ व नियमांनी वागणारा पाहिजे.

स्वसमाज - विशेष नियम

अद्वैतवेदान्त, योग, भक्ति, वैद्यकी, मंत्रशास्त्र व नीतित्रय यांचा अभ्यास वेदान्ताला मुख्य ठेऊन करावा.

हे नियम स्वधर्माच्या विरुद्ध न जाता, व स्वधर्माच्या अज्ञानाने भलतेच परिणाम होतील तेथे श्रद्धा न ठेवता, हट्ट सोडून पाळावें.

प्रत्येकाने आपल्या आचरणाची डायरी ठेवावी. ती डायरी वेळोवेळी पाहिली जाऊन प्रति तीन महिन्यास सांगितलेल्या अभ्यासाच्या प्रगतीची तपासणी केली जाईल. त्यात जो उतरेल त्याला पुढे अभ्यास सांगितला जाईल.

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

ooo

१७. वैद्यनन्दिनी

॥ प्रथमोऽध्याय / आयुर्वेद प्रस्तावना ॥

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

शब्दब्रह्म वपुर्यस्य विद्यानुग्रहकेवलम् ।
तमुमावल्लभं वन्दे त्रैलोक्यशरणं शिवम् ॥१॥

अर्थ : ॐकाररूपी वेद ज्याचे शरीर असून अनुग्रहार्थ ज्यांनी शरीर धारण केले आहे, जो उमेचा पति आहे व जो तिन्ही लोकांना धारण करतो अशा शंकराला नमस्कार असो.

आपले हे शरीर पांच भूतांचे बनलेले आहे. पांच भूते कोणती? पृथ्वी, आप, तेज म्हणजे अग्नि, वायु म्हणजे वारा व आकाश म्हणजे पोकळी-अगदी कांही नाही. या पांच भूतापासूनच आपल्यामध्ये तीन दोष उत्पन्न झाले आहेत. दोष कशाला म्हणावे ? दुसऱ्याला जे बिघडवितात, त्याला दोष म्हणतात.

वृद्धवाग्भटकार म्हणतात, आकाश व वायू यापासून **वातदोष** उत्पन्न

झाला, **पित्तदोष** नुसत्या अग्नीपासून उत्पन्न झाला. जल व पृथ्वी यापासून **कफदोष** झाला. याप्रमाणे हे तीन दोष उत्पन्न झालेत. या तीन दोषांचे जेव्हा परस्पर मिश्रण होते तेव्हा रोग उत्पन्न होतात. जेव्हा हे दोष बिघडलेले नसतात तेव्हा प्रकृति सशक्त आहे असे समजावे व जेव्हा यापैकी निदान एक तरी बिघडला असतो तेव्हा प्रकृति रोगी आहे असे समजावे. हे दोष खाण्यामध्ये अपथ्य केल्याने बिघडतात. ज्या ज्या दिवशी किंवा ज्या ज्या ऋतुमध्ये जें जें खायचे किंवा जें जें कर्म करावयाचे ते तेच केले असता प्रकृति सदा निरोगी राहते.

ऋतुचर्या म्हणजे ज्या ऋतूंत जे करावयाचे ते करणे व

दिनचर्या म्हणजे ज्या दिवशी जे करावयाचे ते करणे.

रोग तीन प्रकारचे आहेत. कर्मज, दोषज व उभयज.

कर्मज म्हणजे कर्मापासून उत्पन्न होणारे.

दोषज म्हणजे दोषापासून उत्पन्न होणारे.

उभयज म्हणजे कर्मापासून व दोषापासून होणारे.

जे रोग कर्माशिवाय इतर औषधीने दूर होत नाहीत ते कर्मज.

औषधीने दूर होतात ते दोषज व

जे औषधीने दबतात व पुनः उद्भवतात ते उभयज.

कर्मज रोग जपतप वगैरेनी बरे होतात.

दोषज रोग औषधीने बरे होतात व

उभयज रोगांना औषधी व जपतप दोन्ही पाहिजेत.

हे पुनः चार प्रकारचे आहेत.

१) शारीरिक.

२) मानसिक.

३) आगन्तुक.

४) स्वाभाविक.

शारीरिक म्हणजे शरीराला होणारे. हे दोषापासून होतात.

मानसिक म्हणजे मनाला होणारे. उदा. मानसोन्माद (हिस्टेरिया) वगैरे.

तसेच शोक, क्रोध वगैरे मानसिक रोग आहेत.

आगन्तुक म्हणजे दैविक अपघात. उदा. वीज पडणे वगैरे.

स्वाभाविक म्हणजे भूक, तहान वगैरे लागणे. भूक तहान वगैरे सर्व रोगच आहेत. कारण ज्याच्यापासून पीडा होते ते रोग. भूक तहान वगैरे हे जन्मापासून जडले आहेत. म्हणून स्वाभाविक म्हणावयाचे.

शरीररोग औषधीने, मानसिक रोग धैर्याने किंवा उत्तम रीतीचा धर्म केल्याने दूर होतात.

आगन्तुक रोग देवतांच्या शांतीने किंवा औषधीने दूर होतात.

रोगाच्या योगाने सर्व जीव पीडित होऊन मोक्षसाधनाकडे लक्ष लागत नाही म्हणून आरोग्य पाहिजे.

सिद्धांची गोष्ट निराळी. त्याने औषधि नाही घेतली तरी चालेल. पण साधकाला औषधी घेऊन शरीर चांगले ठेवलेच पाहिजे. हे शरीर निरोगी ठेवून ब्रह्मज्ञान करून घ्यावे म्हणूनच चार वेदाप्रमाणे आयुर्वेद निघाला.

हा उपवेद आहे. हा पूर्वी ब्रह्मदेवाला दिला, ब्रह्मदेवाने दक्षप्रजापतीला, दक्षप्रजापतीने अश्विनीकुमाराला, अश्विनीकुमारांनी इंद्राला, इंद्राने भारद्वाज ऋषीला व पुढे भारद्वाज ऋषीपासून याचा पृथ्वीवर प्रसार झाला. हे परोपकाराचे शास्त्र आहे.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी या आयुर्वेदाचा निषेध केला आहे. पण त्यांच्या निषेध करण्याचा अर्थ असा आहे की - त्याचा उपयोग विषय भोगण्याकरीता स्वतःचे शरीर धष्टपुष्ट करण्याकरता करू नये. त्यांचेच पुनः असेही वचन आहे की- **रोगे दाटला उदास । ओखदेसी ॥** (ज्ञानेश्वरी)

या वैद्यशास्त्राची सध्या फारच वाईट स्थिती आहे याला राजाश्रय मुळीच नाही. मुसलमान लोकांनी आपले पुष्कळ ग्रंथ जाळून टाकलेत व त्याला उत्तेजन मुळीच दिले नाही. आताहि या शास्त्राला उत्तेजन नाहीच. त्यामुळे बरेच दिवसापासून हे शास्त्र नष्ट झाले आहे.

इति श्री वैद्यनंदिन्यां **आयुर्वेदप्रस्तावना** नाम प्रथमोऽध्यायः॥

॥ द्वितीयो आवश्यकताध्याय ॥:

तीन दोषाची व्याप्ती

हे तीन दोष प्रत्येक पदार्थात कांही क्रमाने असतात. **मनुष्याचे शरीर व जीव यांचा संयोग ते आयुष्य.** हे तीन दोष सम असले म्हणजे आयुष्य असते व बिघडले म्हणजे आयुष्याचा क्षय होतो. या दोषांच्या कमीजास्तपणामुळे रोग उत्पन्न होतात. या मानाने आपण रोज रोगी आहोत. या रोगाची संवय पडल्यामुळे रोग वाटत नाहीत.

कांही रोगाचा परिणाम असा असतो की तो एकदम खाटेवरच पाडतो. आपल्या प्रत्येक दिवसांत व आयुष्यात हे दोष सारखे व्यापले असतात.

कालमान

सकाळी ६ ते १० वाजेपर्यंत कफ असतो म्हणून त्यावेळेला कफ वाढविणारे पदार्थ खावूं नयेत.

१० पासून २ वाजेपर्यंत पित्त असते म्हणून या वेळेला पित्त वाढविणारे पदार्थ खावूं नये.

२ पासून ६ पर्यंत वात. म्हणून या वेळेला वात वाढविणारे पदार्थ खावूं नये.

पुनः ६ ते १० पर्यंत कफ. १० ते १२ पित्त. व २ ते ६ वात. हे प्रत्येक दिवसाचे मान झाले.

याचप्रमाणे आयुष्याचे मान आहे. उदा. पाऊस आला म्हणजे नाल्या, मोऱ्या सर्व वाहतात व त्याबरोबरच मोठी नदीही वाहते. त्याप्रमाणे दिनमानाबरोबर आयुष्यमानही चाललेलेच असते.

बाळपणी कफ, तारुण्यांत पित्त व वृद्धपणी वात अधिक असतो. हे कालमान झाले.

देशमान

आता देशमान सांगतो. देश म्हणजे जमीन, हा देश तीन प्रकारचा आहे.

(१) **अनूप**. (२) **जांगल,** (३) **साधारण.**

ज्या देशांत पाणी कमी, खडक फार, ऊन फार, झाडे वगैरे कमी असतात त्याला जांगल म्हणतात.

ज्या देशांत पाणी जास्त खडक कमी, ऊन कमी झाडे वगैरे फार त्या देशाला अनूप म्हणतात.

ज्या देशात झाडे, पाणी खडक वगैरे साधारण असतो तो देश साधारण समजावा.

जांगल देशात वात जास्त असतो.

अनूप देशात कफ जास्त व

साधारण देशात पित्त जास्त असते.

आपण ज्या देशात जातो त्या देशाप्रमाणे वागावे. त्या देशात जे पदार्थ खावू नये - ते खावू नये.

याप्रमाणे हे दोष, देश व काल यात व्यापलेले असतात.

॥ इति श्री वैद्यनन्दिन्यां आयुर्वेदेदेशकालयोः क्रमेण **दोषव्यवस्था-वर्णनं** नाम द्वितीयोऽध्यायः ॥

*

॥ तृतीयोऽध्यायः / प्रकृतिव्यवस्था ॥

प्रत्येक मनुष्यामध्ये सत्त्व, रज व तम असे तीन गुण असतात. हे गुण मनाचे ठिकाणी राहतात.

''सत्त्वं रजस्तम इति गुणा बुद्धेर्न चात्मनः''

(भागवत)

यापैकी **सत्त्वगुण** स्थिर, हलका व आरोग्यकारक आहे व बाकीचे गुण रोग आहेत. **रज** हा चंचल आहे. **तम** हा जड आहे.

आपल्या शरीरातला चंचलपणा **रज** आहे.

मांस, रक्त हाडके वगैरे सर्व जड पदार्थ **तम** आहेत.

मांस वगैरे जड पदार्थ मिळून **कफ.**

शरीरातील हालचाल तो **वात.**

या शरीरात काही पदार्थ नुसते हालचाल करतात. काही नुसते जड व कांही दोन्ही मिळून आहेत.

कल्पना कर - थिजलेले तूप जड. ऊन केलेले तूप हालचालयुक्त व जड. अतिशय ऊन करून वाफ केली तर नुसते हालचालयुक्त राहील. त्याप्रमाणे

रजापासून वात, तमापासून कफ व रजस्तम मिळून पित्त होते.

सत्त्व उत्तम, हलके व निरोगी आहे.

रजस्तमाचेच पुष्कळ लोक दिसतात. म्हणून पुष्कळ लोक रोगीच दिसतात.

वाग्भटकार म्हणतात की वातादिक काही रोग नाहीत. रागादिक रोग आहेत. **''रागादि रोगान्''**

* राग म्हणजे विषयाच्या ठिकाणी प्रीति. हा रजोगुणापासून उत्पन्न होतो व यालाच काम म्हणतात.

* द्वेष रजोगुणापासून उत्पन्न होतो. हेच रागादि रोगाला कारण आहेत. अतिरजोगुणी म्हणजे नेहमी विषयात भुलणारा. कोठेच मन स्थिर नाही.

* अतिरजोगुणी मनुष्याला वात रोग जास्त होतात.

* अति तमोगुणी म्हणजे आळशी. कोठेही पडला राहणारा; काही खाणारा याला कफरोग फार होतात व दोन्ही वाल्यांना पित्तरोग जास्त होतात

* व सात्त्विक पुरुषाला रोगच होत नाहीत. तो इतरांना औषधिरूप आहे. या साधुपुरुषांच्या संगतीने पुष्कळांचे रोग दूर होतात.

इति श्री वैद्यनन्दिन्यां **सत्पुरुषसंगतिरेव महौषधिवर्णनं** नाम तृतीयसर्गः ॥

*

चतुर्थोऽध्यायः / बहिर्दोषः

मागे तीन दोषांची प्रवृत्ति अन्तःकरणाच्या विकाराने होते असे सांगितले. आता हे बाहेरच्या दोषांमुळेही वाढतात हे सांगतो. या दोषांना दोन गति असतात.

(१) संचय आणि

(२) प्रकोप.

संचय म्हणजे दोषाचा साठा होणे.

प्रकोप म्हणजे दोष वाढणे.

संचय जो असतो तो त्या त्या स्थानात होतो व दोष जेव्हा आपले स्थान सोडून जातात तेव्हा प्रकोप होतो.

पित्ताची कांही स्थाने आहेत. काही वाताची स्थानें व काही कफाची स्थाने आहेत. ही स्थाने समजण्याकरितां मी तुम्हाला पहिले शारीर सांगतो.

पहिले परमेश्वर व माया अनादि आहे. एक सत्य व एक मिथ्या आहे.ईश्वर सत्य व माया मिथ्या. ती माया दोन प्रकारची आहे.

एक शुद्धसत्त्वात्मक व दुसरी मलिनसत्त्वात्मक.

त्यांत शुद्धसत्त्वात्मक मायेमध्ये पडलेंले प्रतिबिंब तो परमेश्वर व मलिनसत्त्वात्मक मायेमध्ये पडलेले प्रतिबिंब तो जीव.

या जीवाला जन्मपरंपरा कर्मानुसार मिळते.कर्म अनादि आहे.त्या कर्माचे फळ देण्याकरिता परमेश्वराने सृष्टी उत्पन्न केली. त्या सृष्टीत पहिले आकाश, त्यापासून वायू, त्यापासून अग्नि, त्यापासून आप व त्यापासून पृथ्वी झाली.

या पंचभूतांच्या सत्त्वांशापासून पंचज्ञानेंद्रिये उत्पन्न झाली व त्यापासूनच अन्तःकरण झाले. त्यांत आकाशाच्या सत्त्वांशापासून श्रोत्र, वायूपासून त्वक्, अग्नीपासून चक्षु, आपापासून रसना, पृथ्वीपासून घ्राण झाली.

अंतःकरण दोन प्रकारचे -

(१) मन - संशयात्मक

(२) बुद्धि - निश्चयात्मक.

पंचभूतांच्या रजोंशापासून पंचकर्मेन्द्रिये झाली. आकाशाच्या रजोंशापासून वाक्, वायुपासून हस्त, अग्निपासून पाय, जलापासून गुद व पृथ्वीपासून उपस्थ उत्पन्न झाले.

प्राण एकच आहे. स्थानतः तो पांच प्रकारचा आहे. प्राण, अपान, व्यान, उदान व समान.

आज या पंचभूतांचे पंचीकरण कसे होते हे सांगतो, पांच भूताचे दहा भाग करून त्यापैकी एक एक भूताचा एक तुकडा तसाच ठेवून दुसऱ्या अर्ध्या तुकड्याचे चार चार भाग केले व राखून ठेवलेल्या प्रत्येक अर्ध्या भागात इतर भूताचा १/८ हिस्सा मिळविला.

उदा. सूक्ष्म आकाश आहे. त्याचे दोन भाग केले. व पुनः त्यापैकी एक अर्धा

भाग घेऊन त्याचे चार भाग केले याचप्रमाणे वायु, अग्नि, आप व पृथ्वी यांचे भाग केले. आता सूक्ष्म आकाशाचा अर्धा भाग घेऊन त्याच्यात वायूचा १/८ अग्नीचा, १/८ आपाचा १/८ व पृथ्वीचा १/८ भाग मिळवून हे स्थूल आकाश झाले आहे. याप्रमाणे बाकी वाय्वादि इतर भूतांची गोष्ट आहे.

वैद्यशास्त्राप्रमाणे शरीराची उत्पत्ती अशी आहे-

पुरुषाचे वीर्य व स्त्रीचे रक्त मिळून हा देह होतो. त्यांत पुरुषाचे रेत अधिक असून स्त्रीचे रक्त कमी असेल तर मुलगा होतो. स्त्रीचे रक्त अधिक असून पुरुषाचे वीर्य कमी असेल तर मुलगी होते व दोन्ही समान असल्यास नपुंसक होतो.

प्रथम जो जीव जन्माला येतो तो अन्नांत येतो व ते अन्न पुरुष खातो तेव्हा अन्नद्वारा रेतांत जातो व स्त्रीसंगाचे वेळी स्त्रीचे गर्भांत उतरतो. पुढे नऊ महिनेपर्यंत सर्व शरीर वगैरे तयार होते. त्या शरीरात हाड, शिरा, त्वचा, रक्त, मांस व मज्जा हे सहा भाग ठळक आहेत.

त्यापैकी हाड, शिरा, व मज्जा हे तीन भाग पितृवीर्यापासून उत्पन्न होतात.

त्वचा, रक्त मांस हे तीन भाग भाग मातृवीर्यापासून होतात.

आपली हाडे पोकळ आहेत. त्यांत तुपाप्रमाणे भरलेला पदार्थ मज्जा आहे.

मन, काम, क्रोध, दया, लोभ, समजणे वगेरे गुण आपल्यापासून उत्पन्न होतात.

(अपूर्ण)

१८. वैद्य-वृन्दावन

(भिषग्वृन्दावन)

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

॥ प्रथमा वल्ली ॥

आयुर्वेद प्रादुर्भावः

जी माउली भजकसंसृति वारणारी । रागादि रोगनिचयास निवारणारी ।
जीचा प्रकाश भुवनत्रयींही न मावे । त्या ज्ञानदेवजनिदाचरणां नमावे ॥१॥
गीर्वाण वाणिगत संग्रह वैद्यकाचा । आहे, परंतु न कळे सकलास साचा ।
सोडोनि यास्तवचि तें कठिणार्थ गांठी । हा ग्रंथू मी रचितसे अवघा मराठी ॥२॥
धर्मार्थ काम अपवर्ग [1] नरार्थ मूळ । आरोग्य बोलति समस्त सुकर्मशीळ ।
आयुःश्रुति-निचय बोधि उपाय त्याचा । ऐकोत सज्जन तदर्थ मराठी वाचा ॥३॥

(१ चरकसंहिता सूत्र अ. १)

भगवंताने मरीच्यादिऋषींना उत्पन्न करून कर्मकांडाचा बोध केला आणि सनत्कुमारादिकांना उत्पन्न करून ज्ञानकांडाचा बोध केला.असे श्रीशंकराचार्यानी गीताभाष्यांत म्हटले आहे –

'स भगवान् सृष्ट्वेदं जगत् तस्य च स्थितिं चिकीर्षुः मरीच्यादीन् अग्रे सृष्ट्वा प्रजापतीन् प्रवृत्तिलक्षणं धर्मं ग्राह्यामास वेदोक्तम्' ।
ततः अन्यान् च सनकसनन्दनादीन् उत्पाद्य निवृत्तिलक्षणं धर्मं ज्ञानवैराग्यलक्षणं ग्राहयामास ॥''

याप्रमाणे एकच आयुर्वेद ब्रह्मदेवानी व श्रीशंकरांनी निर्माण केला.

पहिल्या भागांत काष्ठौषधि विशेष असून दुसऱ्या भागांत पारद, गंधक व धातू इत्यादि रसौषधी विशेष आहेत.

याप्रमाणे दोन्ही कांडांच्या औषधींमध्ये भेद असला तरी **'सूत्रशारीर व निदान'** या संबंधी मतैक्य आहे. या दोन्ही कांडांचा समन्वय करून यथामति समाकलित भाग आर्तांच्या हिताकरिता श्रीमत्सदगुरुज्ञानेश्वरमहाराजांच्या कृपेकरून मी निरूपण करतो.

सर्व लोक रोगपीडित झाल्यामुळे भगवान् पितामह, त्यांची पीडा दूर करण्याकरिता करुणार्द्र होवून **निदान, लक्षण व चिकित्सा** ज्यांत आहे अशा आयुर्वेदाला आथर्वणापासून निर्मिते झाले.

शिष्य :- महाराज ! चरकांत सांगितल्याप्रमाणें सर्व रोग अधर्मापासून होत असल्यामुळें व 'प्रारब्ध भोगल्यावाचून क्षय पावत नाही,' हा श्रुतीचा सिद्धांत असल्यामुळें, कर्मभोग देणाऱ्या भगवान् पितामहाला स्वकर्माने च्युत झालेल्या या लोकांवर दया करण्याला अवसर कसा मिळाला?

श्रीगुरु :- समीचीन शंका केलीस. हिचे समाधान श्रवण कर.

व्याधी तीन प्रकारचे आहेत. **कर्मज, दोषज व उभयज.** (याची विशेष माहिती पुढे सांगेन) पैकी पहिल्या प्रकारचे व शेवटच्या प्रकारचे व्याधी पापकर्मजनित आहेत. परंतु दुसऱ्या प्रकारचे (दोषज) व्याधी केवळ पापकर्मजनितच आहेत असे नाही. मैथुनसृष्टींत जन्मलेले प्राणी मानससृष्टिपेक्षा समर्याद-बलाचे असल्यामुळे तपादिक पुण्यकर्म करतांना त्यांचे शारीरिक बल क्षीण होऊन दुसऱ्या प्रकारचे व्याधी उद्भवणें साहजिक आहे. त्या व्याधींची निःशेष निवृत्ति होण्याकरिताच भगवान् पितामहाचार्यांनी हा आयुर्वेद प्रणिला.

शिष्य :- अर्थातच तर सर्व लोकांकरिता हा नाही.

श्रीगुरु :- कांही अंशी तसे म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही.

'**नीच कर्म करणाऱ्यास औषधे देऊं नये**'

- असे सुश्रुतांत सांगितले आहे. पण तुला दुसऱ्या एका दृष्टीने समाधान सांगतो.

भगवान् पितामह समष्टिबुद्धि-अंतर्गत असल्यामुळे प्रत्येकाची बुद्धि जी आपल्या कल्याणाकडे धाव घेत असते, ती सर्व कल्याणाची हाव समष्टिरूपाने ब्रह्मदेवाचें ठिकाणीं जागृत आहे. तदुपहित चैतन्यरूप या भगवंताने प्रारब्धभोग भोगीत असणाऱ्याही जनांची द्वितीयलक्षणावच्छिन्न-अनागत-दुःखनिवृत्ति व्हावी म्हणून आयुर्वेद प्रणिला असला तर तो सर्व लोकांकरिता कां होणार नाही?

अथवा, गुणसंक्रमण प्रवाहामधे रजस्तमाचा जोर होवू लागला असतां त्याच्या जयाकरितां सत्त्वाची चढाओढ होवून सत्त्वोपहित चेतनाचे सत्त्वालाच अधिक साहाय्य असल्यामुळे रजस्तम न्यून होतील. तितके करण्याकरिता जे

कल्याणमार्ग निर्माण झाले आहेत त्यापैकीच हा आयुर्वेद झाला असे म्हणता येते.

शिष्य - भगवन् आपण जे तपस्वी लोकांकरिता आयुर्वेद निर्माण केला, असे म्हटले ते मुळीच संभवत नाही. कारण -

(१) या वेदात (आयुर्वेदात) शुक्राचा निरोध करूं नये म्हणून सांगितले आहे. आणि मोक्षाकरिता संन्यासाची आवश्यकता आहे.

(२) पुनः या वेदात प्राणी मारण्याची आज्ञा आहे. कारण आपोआप मेलेल्या प्राण्याचें मांस खाऊं नये असे वाग्भट म्हणतात. आणि मोक्षाकरितां तर अहिंसेची आवश्यकता आहे. **''मा हिंस्यात् सर्वाणि भूतानि''** ही श्रुती याविषयी प्रमाण असल्यामुळे अर्थातच आयुर्वेद मोक्षमार्गात प्रतिबंधक ठरतो.

श्रीगुरु :- तुझ्या बुद्धीची प्रशंसा करावी तेवढी थोडीच! सुश्रुतांत न समजले तर वारंवार विचारावे म्हणून जो विधि केला आहे. त्याची तूं मूर्तीच दिसतोस. काढलेल्या संशयाची क्रमाने उत्तरें श्रवण करून त्याचे मनन कर. **मननावाचून श्रवण फुकट आहे.** हरिविजयकार (अ. १) म्हणतात -

''मननेवीण श्रवण करी । जैसी पालथी घागरी ।
पर्जन्यांत ठेविली जन्मवरी । परी अंतरी बिंदू न साठवे ॥

बाळ ! वैद्यशास्त्रात ज्याप्रमाणे 'प्रवृत्त झालेल्या वेगाचा रोध करूं नये' असे सांगितले आहे. त्याप्रमाणे 'बलेकरून ते वेग प्रवृत्त करूं नयेत' असेही सांगितले आहे.

पुनः त्याच वेदात असेही म्हटले आहे कीं मनाचे कामक्रोधादि वेग आवरून धरावेतच! अर्थात् जे वेग आवरूं नये म्हणून सांगितले ते शारीरिक होत.

तस्मात् स्त्रीसंभोगाची इच्छा रोधिली असता शुक्रनिरोध निषेध तेथे प्राप्त होत नाही. परंतु इच्छा ज्यांच्या कडून रोधल्या जात नाहीत त्याने जगलज्जादिकांसाठी किंवा आग्रहाने किंवा स्त्रियेच्या रागावर जो चलित शुक्राचा रोध करतो त्याचेच ठिकाणी तन्निरोध निषेध लागूं पडतो. (गीता अ ३)

कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।
इन्द्रियार्थान् विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥६॥

अर्थ :- कर्मेन्द्रियांना विषयांपासून आवरून जो मनाने विषयाचे चिंतन करतो तो मूर्ख जाणावा व तो दंभाचार समजावा, असे प्रियवचन असून ज्याच्या

विषयवासना क्षीण न होऊन, जो बाह्य विषयांचा मात्र त्याग करून, तपात गढून राहतो तो नाश पावतो असे भीष्मांनी युधिष्ठिराला मोक्षधर्मात सांगितले आहे.

''ज्याचे मन नाही लागले हातासी । तेणें संसारासी त्यागूं नये ।''

असे श्रीतुकाराम महाराजांनी म्हटले आहे.

'म्हणोनि अतिशयो विषय सेवावा । ऐसा बोधू नोहावा ।
कां सर्वथा निरोधावा । हेहि नको'

असे तातांनीही (ज्ञा. अ. ६-३४८) म्हटले आहे. आता-

'मन गया तो जाने दे । तूं मत जाने दे शरीर'

या वचनाचा अर्थ असा की निषिद्ध विषय मात्र मनातून सुटले नसले तरी शरीराने भोगूं नयेत. जसे स्त्रीसंगेच्छा निरोध झाल्यामुळे शुक्र चलायमान झाले तथापि, ते परस्त्रीचे ठिकाणी स्थापन करूं नये. स्वस्त्रीचे ठिकाणी स्थापन करावे. स्वस्त्री असल्यास चलित दैहिक शुक्राचा व्यर्थ निरोध करून शुक्राश्मरादि रोग व्यर्थ उत्पन्न करून घेवूं नयेत. तथापि शुक्राश्मरी झाली असता औषध घ्यावे पण परस्त्रीचे ठिकाणी मात्र रेत सिंचन करूं नये. **''होईल तोपर्यंत कामक्रोध रोधावेत''** या वचनावरून ब्रह्मचर्य पाळणे अर्थात् सिद्ध होत असून ब्रह्मचर्य मोक्षाला मुख्य कारण आहे असे चरकाच्या[१] सूत्रस्थानांत कंठरवाने सांगितले आहे. (चरकसंहिता सूत्रस्थान अ११)

''यस्त्वेन्द्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन ।
कर्मेन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥अ३

असे व्रजयुवतीहृदयपंकजमधुपवचन (गीता) असून -

''चित्तायत्तं नृणां शुक्रं शुक्रायत्तं च जीवितम् ।
तस्मात् शुक्रं मनश्चैव रक्षणीयं प्रयत्नतः ॥

असे योगशास्त्रातही म्हटले आहे. तात्पर्य, प्रवृत्तशुक्र पुरुषाला गृहस्थाश्रमच विहित आहे. तथापि हा नियम अयोगियालाच लागूं असून योगी गृहस्थाश्रमी असला तरीही स्वस्त्रीच्या योनींत पडलेले रेत 'वज्रोलीमुद्रेने' तो वर ओढून घेतो. परंतु असे लोक थोडे असल्यामुळे प्रायशः चलितशुक्रनिरोध-निषेध नियत केला आहे.

या ब्रह्मचर्याप्रमाणेच दिनचर्या **अध्यायांत हिंसेचा परित्याग सांगितला**

आहे. म्हणून मांसवर्ग अतिप्रवृत्तीला आळा घालण्याकरितां असून रोग मांसापासून उत्पन्न झाले आहेत की काय हे समजण्या करीता आहे. आणि वाग्भटादि ग्रंथात तो सविस्तर सांगितला असल्यामुळे मी या ग्रंथांत तुला सांगणारही नाही. आता अवशिष्ट शंकांचे उत्तर ऐक.

यद्यपि प्रारब्ध भोगल्यावाचून सुटत नाही, तथापि ते प्रारब्धकर्म ''शरीराच्या मागे असून अनागतदुःखनिवर्तक विचाराभिभावक नाही'' म्हणून तत्प्रवृत्त्यवच्छिन्न ब्रह्मदेवादिकांचे ठायी जीवदया संभवते.

शरीर तीन प्रकारचे

आणखी शरीर तीन प्रकारचे आहे. **१- मैथुनज, २- रसज** व **३- योगज;** पैकी पहिल्या प्रकारच्या शरीरावरच प्रारब्धाचा विशेष जोर असून दुसऱ्या दोहोंवर नाही.

'गर्भज' शरीराला कष्ट असतांही दिव्य शरीराने भगवंताचे दर्शन घेतले असे रामायणातील[1] शरभंग ऋषींचा इतिहास **'योगज'** शरीराचे प्रारब्ध-अनभिभूतत्त्व दर्शवितो.(वाल्मिकी रामायण अ. का. सर्ग. २)

आणि यद्यपि पंचभूतात्मक शरीराला आवश्यक मरण आहे तथापि रसबलेकरून हरगौरी सृष्टीतील **'रसहृदयतंत्रम्'** ने मिळालेला नूतन देह चिरंतन असतो हे रसेश्वरशास्त्रांत सांगितले आहे. - म्हणून तिसऱ्या प्रकारचे (रसज) शरीरही प्रारब्ध-अनभिभूत समज. मागे जो 'विशेष' शब्द घातला त्यावरून इतर पुण्य सामान्यप्रारब्ध-व्यावर्तक आहे.

औषधींत रससाम्य असल्यामुळे रसायनादिकांनीही रसज-शरीर-साम्यता प्राप्त होते.

तात्पर्य, अशा रीतीने सप्रारब्ध पुरुषावर आयुर्वेद उपकारक असल्यामुळे साधकांनी व जीवन्मुक्तिसुखार्थ सिद्धांनीही ह्याला अनुसरावे असे मी म्हणतो.

रोग

मूलभूत व शाखादिभूत

रोग हे दोन प्रकारचे आहेत. मूलभूत व शाखादिभूत ! पैकी रागादि मानसरोग मूलभूत असून, शारीरिक वातादि रोग शाखादिभूत आहेत.

पहिल्याकरिता योग व वेदान्त कुठार असून दुसऱ्याकरिता दोन्ही प्रकारचा

आयुर्वेद कुठार आहे. यद्यपि मूलाचा छेद झाला असता शाखादिक शुष्क होतात, परन्तु शाखादिकांच्या छेदाने मूळ शुष्क होत नाही म्हणून आयुर्वेदवेत्त्यांनाच वेदान्ताची आवश्यकता असून वेदान्तीयांना आयुर्वेद आवश्यकता सिद्ध होत नाही. तथापि शारीररोगाभिभव होऊन आत्माकारवृत्तिसौलभ्याकरीतां वेदान्तीयांनाहि आयुर्वेदाची अपेक्षा आहे.

यद्यपि **''ततः प्रत्यक्चेतनाधिगमोऽप्यन्तराय- अभावश्च''** या योगसूत्रावरून भगवत्प्रणिधानानेच सर्व व्याधिविनाश होतो. तथापि प्रियनिर्धारित मूर्तीला कष्ट होवूं नयेत, हे भक्तीचे तत्त्व असल्यामुळे समुद्राची पूजा जशी निराळ्या पाण्याने करावी लागते किंवा सूर्याला जसे निराळ्या तेजाने उजळावे लागते, तद्वत् निर्धारित प्रियमूर्तीला कष्ट न देता.

''गामाविश्यच भूतानि धारयाम्यहमोजसा''
पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः॥

या प्रियोक्तींत (गी १५-१३) सांगितलेल्या जगत् पोषणरूप सोमौषधी विभूतीलाच शारीररोगनिवृत्ति याचना केली असता भक्तींत विरोध येत नाही. म्हणूनच तात व समर्थ असे म्हणतात की,

'रोगे दाटला । आणि उदासपण ओखदेसी'

(ज्ञा. अ. ९)

'औषधी नेघे व्याधि असोनि । तो एक पढतमूर्ख'

(दासबोध)

यद्यपि भगवद्विभूति सोमरूपी चंद्र आहे व **''चंद्रमा मनसो जातः''** या श्रुतीवरून तदाविष्करण समष्टिमनापासून झाले असून व्यष्टिमनाचे ते अधिदैवत आहे यास्तव ज्याचे मन सत्त्वसंपन्न आहे त्याच्या मनातून चंद्रमा अनुग्रहाने सूक्ष्म सोमप्रवाह, रोगी मनुष्यास अमृतमय करून रोगमुक्त करीत असतो; म्हणूनच **जितेन्द्रिय, क्रोधरहित, सत्यवादी, धर्ममग्न पुरुषाला वाग्भटाने ''रसायन'' म्हटले आहे.** तथापि हे रसायन बहुशः दुर्मिळ असल्यामुळे परोपकारास्तव सोमानुगृहीत साधारणीभूत सत्त्वरूप वृक्षजातिरूप औषधीचाच लोक आश्रय करितात.

आता, 'अधिक सत्त्वात्मक अशा मनुष्याला स्थावर वृक्षादिक न्यूनसत्त्व

असून कसे अनुग्रह करतात?' अशी शंका करूं नको. कारण यद्यपि मनुष्याची बुद्धि सत्त्वप्रधान आहे व वृक्षादिकांची बुद्धि तमःप्रधान आहे तथापि चंद्रापासून व पृथ्वीपासून मिळालेला भाग मनुष्याच्या शरीरापेक्षा अधिक सात्त्विक आहे. -

'पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः'

(गी.१५-१३)

ह्या जागृत श्रुतीवरून चंद्रापासून औषधींना भाग मिळालेला आहे असे सिद्ध होते. व पृथ्वीपासून औषधीला मिळालेल्या भागाविषयी तैत्तरीयश्रुति प्रमाण आहे.

तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः ।
आकाशाद्वायुः । वायोरग्निः । अग्नेरापः । अद्भ्यः पृथिवी ।
पृथिव्या औषधयः । औषधिभ्योऽन्नम् ।
अन्नात्पुरुषः । स वा एष पुरुषोऽन्नरसमयः ॥ *(ब्रह्मानंदवल्ली प्रथम अनुवाक्)*

अर्थ :- तस्मात् म्हणजे त्यापासून ब्रह्मा व त्यापासून आकाश उत्पन्न झाले आकाशापासून वायु, वायुपासून अग्नि, अग्नीपासून पाणी, पाण्यापासून पृथ्वी, पृथ्वीपासून औषधी, औषधीपासून अन्न, अन्नापासून पुरुष म्हणून हा पुरुष अन्नाच्या रसाने पूर्ण आहे.

ह्यांत औषधीपासून अन्न, अन्नापासून रेत व रेतापासून पुढे शरीर सांगितले असल्यामुळे अर्थातच कार्यापेक्षा कारणांत अधिकतर गुण असतात. या न्यायाने औषधी अधिक सत्त्वसंपन्न सिद्ध होतात.

पुनः ईश्वरापासून उत्पत्तिक्रमामध्यें औषधी हे सहावे स्थान असून शरीर नववे स्थान आहे. म्हणून शरीरापेक्षा, औषधीत व ईश्वरांत अंतर न्यून असल्यामुळे औषधी अधिक सत्त्वसंपन्न आहेत.

आणि छांदोग्य श्रुतीत **''अन्नमयं हि सौम्य मनः''** हे मन पृथ्वीमय आहे. हे सांगितले असून अन्नाच्या सूक्ष्मभागाचे मन होते असे शिवगीतेत सांगितले आहे.

तात्पर्य, औषधिकार्य अन्नांत जर इतके सत्त्व आहे तर औषधीत असलेच पाहिजे. असे असेल तर-

वृक्षादिकांना कर्मच नाही की काय, अशी शंका व्यर्थ आहे. कारण त्यांची बुद्धि पापकर्माने बहुशः आच्छादित असते. आणि **तीव्र पापकर्माचा त्या वृक्षादिकांच्या**

शरीरावरही परिणाम होऊन त्यांच्यातील औषधित्व नष्ट होते. म्हणूनच कीड लागलेली वगैरे औषधी आणू नयेत, असे सांगितले आहे. कीड लागणे वगैरे त्यांच्या कर्माचे फल आहे. कारण कर्मावाचून सुखःदुख येतात ह्या म्हणण्याला यथार्थ आधार नाही.

शिष्य :- भगवन् ! माझ्या प्रकट व गुप्त शंकांची निवृत्ति झाली. आता पुढे आपणास काय सांगावयाचे आहे?

श्रीगुरु :- मला सांगावयाची आहे परंपरा! कारण संप्रदायगत महात्म्यांच्या स्मरणाने कामना सफल होतात. कार्य निर्विघ्न होते व आयुष्य वाढते. अशाप्रकारचा हा आयुर्वेद भगवान् ब्रह्मदेवाने निर्माण केला. हे तुला मी सांगितलेच आहे. तो भगवान् उपासकांच्या कार्यासाठी समष्टिबुद्धिउपहित ईश्वर असूनही सत्यलोकवासी चतुर्मुखादी व्यक्तिमान् झाला. त्या प्रभूने वर सांगितलेला आयुर्वेद जगत्कल्याणासाठी दक्ष प्रजापतीला पढविला. त्यांनी तो अश्विनीकुमारांना शिकविला. हे अश्विनीकुमार देवांचे वैद्य प्रख्यात आहेत. त्यांनी ह्या विद्येच्या पराक्रमानेच आपला हविर्भाग मिळविला. क्षुत्पिपासा बोधक श्रुतीवरून विष्णुपुत्र ब्रह्मदेवाचे ठिकाणीं किंचित् जीवधर्म प्रतीति आहे. म्हणूनच -

एके वेळी भैरव आयर्वुद शिकण्याकरिता ब्रह्मदेवाकडे गेले असतां **''तुझ्या चांचल्यास्तव मी तुला शिकवित नाही''** असे ते म्हणाले.

तेव्हा त्यानी क्रोधातुर होऊन ब्रह्मदेवाचे शिर तोडले असता, अश्विनीकुमाराने ते जोडून दिले. तेव्हां भैरव शंकराला शरण जाऊन क्रोध सांडून आपले अपमानवृत्त त्यांना निवेदन करून 'दासलज्जा रक्षण करा' म्हणून म्हणाले.

भोळा चक्रवर्ती परमेश्वराने अक्षय टिकणाऱ्या औषधी ज्यांत आहेत असा **'रसायुर्वेद'** त्यांना सांगितला. नंतर दोन्ही आयुर्वेदांचा जगत्कल्याणार्थ उपयोग होऊ लागला.

'ब्राह्मायुर्वेद' अश्विनीकुमारापासून इंद्राने शिकून लोकांच्या क्लेशाने दुःखित होवून ऋषींनी आत्रेयादिकांना इंद्राकडे पाठवून त्यांनी तो शिकून पृथ्वीवर अग्निवेशादिकांस शिकविला नंतर अग्निवेशांनी आपल्या नांवाची संहिता केली. दुसरे भेड, जतुकरण वगैरे आत्रेयांच्या शिष्यांनीही आपल्या नांवाच्या संहिता केल्या.

परंतु सर्वामधे **अग्निवेश संहिताच** उत्तम ठरविली.हिलाच **''चरकसंहिता''** म्हणतात. इजवर चक्रदत्तादिकांचे **तिलक** आहेत. तथापि ज्वरादि चिकित्सेमध्ये **हारितसंहिताहि** उत्तम आहे. हेंहि आत्रेयांचेच शिष्य होते.

ह्यावेळी इंद्रापासूनच आणखी एक संप्रदाय उत्पन्न झाला. इंद्राने आयुर्वेद धन्वन्तरीला शिकवून 'जगत्कल्याणासाठी तूं काशीमध्ये अवतार घे' म्हणून सांगितले. काशीराज दिवोदास प्रत्यक्ष धन्वन्तरी होऊन त्याने विश्वामित्राचे पुत्र सुश्रुतऋषि यांना आयुर्वेद शिकविला. व तेथून **'सुश्रुतसंहिता'** निर्माण झाली इजवर जज्जट, (गैदास) गोदास व डल्लनादिकांचे तिलक आहेत.

शैवायुर्वेद सिद्धसंप्रदायांत प्रख्यातीस आला. त्यावर **रसेन्द्रचिन्तामणी, रसरत्नाकर,** महादेव, नित्यनाथादिकांनी ग्रंथ केले आहेत. रावणानी दोन्ही आयुर्वेदाचा समन्वय करून **''अर्कप्रकाश''** म्हणून ग्रंथ लिहिला.वाग्भटाचार्यांदिकानी **''अष्टांगहृदय''** व **''अष्टांगसंग्रह''** हे दोन ग्रंथ ब्राह्मायुर्वेदानुसार पढून शैवायुर्वेदानुसार **''रसरत्नसमुय''** प्रणिला. ह्यांच्या ग्रंथाला बृहत् त्रयीमध्ये घेतात. म्हटले आहे की-

'सुश्रुतं न श्रुतं येन वाग्भटे नैव वाग्भटः ।
नाधीतश्चरको येन स वैद्यो यमकिंकरः ॥'

आसुरी, मानुषी व दैवी या तीन चिकित्सेंपैकी

(१) शस्त्रचिकित्सेला **आसुरी,**

(२) काष्ठौषधीला **मानुषी** व

(३) रसचिकित्सेला **दैवी** म्हणतात.

(४) **सिद्धचिकित्सा** म्हणून एक चौथी चिकित्सा आहे व ती तांत्रिकचिकित्साही होय.शिवकृत **''रुद्रयामलादिकांत''** व **सिद्धनागार्जुनादिकृत ''कक्षपुट्यादिकांत''** ती उत्तम प्रकारानें सांगितली आहे.

वाग्भटाचार्यांच्या पुढे दोन्ही आयुर्वेदानुसारच बहुतेक ग्रंथ झाले. मी पण तुला मंत्रांगासहित सांगतो.

स्वामी विद्यारण्यांनी निदानावर एक ग्रंथ केला, अध्येतव्य ग्रंथचतुष्टयात त्याचा अंतर्भाव आहे. म्हटले आहे की -

''शारीरे [१] सुश्रुतः प्रोक्तो चरकस्तु चिकित्सके[२] ।
निदाने [३] माधवः श्रेष्ठो सूत्रस्थाने [४] तु वाग्भटः ॥

या निदानानुसारच **चक्रदत्त चिकित्सा** ग्रंथ आहे, आणि उत्तम आहे, तसाच **शारंगधरसंग्रह**ही उत्तम आहे. लोलिंबराजासारखे लहान व वृंदमाधव, बखराज, वंगसेनासारखे मोठे ग्रंथ व राजनिघंटु आदि कोष यांचा चांगला प्रचार झाला. यांचे पुत्र भावमिश्र यांनी काशीत अध्ययन करून **''भावप्रकाश''** नांवाचा ग्रंथ केला आहे.

वरदराजकृत **'मध्यसिद्धान्तकौमुदीने'** आपली **''सिद्धान्तकौमुदी''** मागे पडेल की काय या भीतीने भट्टोजी दीक्षिताने तिला शाप दिला. तसा शाप एखाद्याचा भावप्रकाशाला मिळाला नाही, हे आर्यावर्ताचे सुदैव होय.

ह्यांत ''**फिरंगरोग** (राज?)'' व **''चोपचिन्यादिक''** ह्या महात्म्याने नवीनही घातले आहेत. शारंगधरासारख्या लहान ग्रंथातीलही नवनीत ह्याच्या गुणग्राहिणी मतिरवीने सोडले नाही. आणखी पुष्कळ लहान मोठे ग्रंथ निर्माण झाले.

पुढे यावनी पंजरात आर्यावर्त शुक आर्जवशब्दाने डाळ याचना करीत असतां **''तिब्बअकब्बरादिक''** यावनी ग्रंथ निर्माण झाले. त्यांतहि कांही उत्तम औषधी आहेत. परंतु **''रोग जाय दूध साखरे । तरी निंब का सेवावा?''** या तातोक्तीतील आयुर्विद्येची खुमारी तालीमखाना, तरबुज, काकडीचे पाणी व गुलेबनवशा यांत नसल्यामुळे अर्थातच चैतन्य आर्यावर्त शुकाने यावनी जड पंजऱ्यातून डोके काढून औरंगजेबादिकांनी जाळल्यावर अविशिष्ट राहिलेल्या आर्यायुर्वेदांतच राहिलेल्या बोलण्याचा आरंभ केला, तरी आयुर्वेदाचे पण शारीरादिकांविषयी पुष्कळसे ग्रंथ नष्ट झाले. ही हानी स्मरून युगाची युगे रडत बसले तरी कांही भरून निघत नाही. परन्तु शोकाने शोक वाढविण्यात काय अर्थ आहे ?

आलिया भोगासी असावे सादर । देवावरी भार घालूनिया ॥
मग तो कृपाळु निवारी सांकडे । येर ते बापुडे काय रंक'' ॥

ह्या साधुवर्याच्या उक्तीप्रमाणे (तुकारागाथा) परमेश्वराचे स्मरण करून धैर्य धरून हे सामान्य शारीर सांगितले आहे.

शास्त्र शिकून व प्रत्यक्ष चीरफाड करून शारीरातील वैद्याचा अनुभव वाढतो. ह्या सुश्रुतवाक्याचा आधार धरून कोणी परिश्रम केल्यास पुष्कळ अंशी आपले अश्रूंचे परिमार्जन होणार आहे.

ह्या पुनरायुर्वेदीय काळांत शेठ हंसराज (करमशी) यांच्या आश्रयाने गणेश रामचंद्र दातार, कृष्णशास्त्री महाबळ आदिकरून मंडळींनी **'निघंटुरत्नाकर'** नामक महान् संग्रह केला. कोठे एक एक गोष्ट सांपडते. यांत बहुतेक सर्वच गोष्टी सांपडतात. परंतु हा रत्नाकर असल्यामुळे यांत बरेच सामुद्रिक धर्म राहिले आहेत. समुद्रजलाप्रमाणे आश्विनमासासारख्या काळांत याचा उपयोग होतो. ह्या संग्रहाचे असेच किंवा थोडासा फेरफार करून हिंदुस्थानातहि भाषान्तर झाले आहे. त्याला जुळवून **''शालिग्रामकोष''** एक मोठा निर्माण झाला आहे. त्यांत अर्वाचीन वनस्पति शास्त्रानुसार झाडांची चित्रेहि दिली आहेत. जवळ जवळ ह्याच काली पंचनद (पंजाब) विश्वविद्यालयातील आयुर्वेद - परीक्षक श्री विनोदलाल सेनगुप्त यांनी **''द्रव्याभिधान'' ''आर्यग्रहचिकित्सा'', ''भैषज्यरत्नावली'' ''आयुर्वेदविज्ञान''** ग्रंथ केले. त्यांत ''भैषज्यरत्नावली'' चिकित्सेमध्ये अपूर्व आहे. आणि 'आयुर्वेदविज्ञानही' अति उत्तम शास्त्रीय निबंध आहे.

सद्यः पाश्चात्य वैद्यकीचा प्रचार फार आहे. सारग्राही दृष्टीने तदीय शस्त्रक्रियादी साहाय्याने शारीरज्ञान वाढविले असतां वावगे होणार नाही. परंतु तीत त्रिदोष पद्धति नसल्यामुळे विप्रकृष्ट कारणरूप जे जंतु त्यांच्या परिणामाकरितां आनुकूल्य व प्राणशक्तीची अपेक्षा ग्रहण करावी लागते. आणि वातादिकांची माहिती नसल्यामुळे ज्याला ते नाडी रोग म्हणतात अशा सूक्ष्म रोगाविषयी चिकित्सा करता येत नाही. तसेच तीव्र मनःकृति उन्माद वगैरे रोगांचीहि चिकित्सा करता येत नाही. कांही विवक्षित ज्वराव्यतिरिक्त इतर ज्वराचे योग्य समाधानकारक निरूपण करीता येत नाही. आणि विष अंगांत नसतांही या विषासारखे रोग कां होतात? व वातरक्तादिकांचे जंतु अंगात असूनही पंधरा पंधरा वर्षे रोग न होऊन पुढे होतात? त्याची कारणें सांगता येत नाहीत एकीला दूध उत्पन्न होते व एकीला होत नाही त्या सर्वांची कारणें सांगता येत नाहीत.

मनाच्या शक्तीचा ताबा शरीरावर मानला नसल्यामुळे तीव्र मनःकृतीत

उष्णतामापक (पारदारोहण) यंत्रातील एकशे चाळीस अंश ज्वर कसा दिसतो हे सांगता येत नाही.

एका मनुष्याचे, त्यांनी मानलेलेच मेंदूतील बुद्धिकेंद्र काढून टाकले असतांही त्याच्या वर्तनांत कांही विकार झाला नाही असे पाश्चात्य इंद्रियविज्ञान शास्त्रांत लिहिले आहे. परंतु त्याचे कारण दाखविले नाही.

दुसरे, स्त्रियांच्या स्तनामध्ये दुग्ध उत्पन्न करणाऱ्या ज्या गांठी आहेत त्यांना रक्त नेहमी मिळत असताही गर्भानंतरच दूध कां उत्पन्न होते व मुलाची भूक जशी वाढत जाते तसे तसे दूध कां अधिक होते व विवक्षित वयाचा मुलगा झाला म्हणजे ते कां बंद होते. ह्या प्रश्नांची उत्तरेच मिळत नाहीत.

''उपयोग गृहीत करून उत्तर होत नाही.'' पण ह्या प्रश्नांचे उत्तर सुश्रुतात देखील दिलेले नाही. ते भावमिश्रानें* (* भावप्रकाश पूर्वखंड प्र. ३१९-१०) उत्तम प्रकाराने दिले आहे.

तसेच पाश्चात्य वैद्यकींत कर्मवाद घेतला नसल्यामुळे ऋतुस्नात होण्याच्या पूर्वीच गर्भ वगैरे कां उत्पन्न होतात किंवा एकाच मनुष्याला स्त्री व पुरुष यांचे अवयव कां उत्पन्न होतात? राक्षसीय मल कसा होतो व अस्वाभाविक इच्छा गर्भिणीला कां होतात व त्यांचा काय उपयोग आहे ? इत्यादिकांचे समाधानकारक उत्तरच देता येत नाहीत.

असो! बाळा! येथपर्यंत निरूपण केलेल्या आयुर्वेद पद्धतिमध्ये जें जें उत्तम आहे ते सर्व यथाबुद्धि आकलन करुन परोपकारार्थ तुला सांगतो.

दोहा

श्री ज्ञानेश्वरचरणरज नमिते वारंवार ।
सद्‌गुरु नामधरणवशे घडो दीन उपकार ॥

॥ हरि ॐ तत्सत्श्रीमत्‌सदगुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे गद्यपद्यान्विते महाराष्ट्रभाषाभूषिते भिषग्वृंदावने सूत्रवाटिकायां आयुर्वेदप्रादुर्भावो नाम प्रथमा वल्ली ॥

***

॥ द्वितीया वल्ली ॥

सांग-सलक्षण-आयुर्वेद-निदर्शन

प्रणमुनी वारंवार गड्या अलकावतीपतिपाय ।
निरूपितो तुज साजिरा गद-संतरण उपाय ॥

देह व प्राणांचा संयोग जोपर्यंत असतो तेवढ्या काळाला आयुष्य म्हणतात. ते ज्याच्या योगाने जाणल्या जाऊन ज्याच्या योगाने त्याचे रक्षण होते त्याला आयुर्वेद म्हणतात.

शारीरिक, मानसिक, स्वाभाविक व आगंतुक या चार प्रकारच्या व्याधींच्या योगाने आयुष्य क्षीण होत असते आणि या व्याधींची निवृत्ति केली असता आयुष्य वृद्धि होते.

१) वातादि दोषापासून उत्पन्न होणाऱ्या व्याधींना **शारीरिक** म्हणतात.

२) रज व तम हे मनाचे दोन दोष वाग्भटात सांगितले आहेत. त्यापासून उत्पन्न होणाऱ्या व्याधींना **मानस** म्हणतात.

३) क्षुधा, तृषा निद्रादिकरून प्रतिदिनी होणाऱ्या व्याधींना **स्वाभाविक** म्हणतात.

४) व अभिघातादिकांनी प्रथम रोग उत्पन्न होऊन ज्यांत दोष मागाहून होतात ते **आगन्तुक** व्याधि होत.

याप्रमाणे सुश्रुताचार्यांनी चार भेद केले आहेत खरे, तथापि क्षुधा, तृष्णा व निद्रा यांना वात, पित्त व कफ कारण असल्यामुळे या स्वाभाविक व्याधींचा शारीरिक व्याधीतच समावेश होतो.

परंतु प्राकृतिक दोषातही हे स्वाभाविक व्याधी होत असल्यामुळे ह्यांना दोषजत्व सुश्रुताचार्यांनी दिले नाही. तरी प्रकृतिदशेंत मनोदेहसमसात्म्य राहत असल्यामुळे आणि चरकाचार्यांनी सांगितल्याप्रमाणे आत्मा निर्विकार असूनही बुद्ध्युपहित होत्साता मनस्साहाय्याने देहावर अभिमान स्थापन करून तो भोक्ता होत असल्यामुळे **शारीर, मानस, स्वाभाविक** व्याधींना निज म्हणजे आपल्या हातानेच आंगावर ओढून घेतलेले म्हणणे बरे.

आणि **आगन्तुक** यद्यपि निजातच जातात तथापि बालबोधार्थ पृथक् भेद केला असता **निज व आगन्तुक** असे दोनच प्रकारचे व्याधी राहतात.

निजामध्ये आध्यात्मिक व आगन्तुकांत आधिभौतिक दुःखाचा समावेश केला तरी एक प्रकारचा व्याधी शिल्लक राहतो. तो **आधिदैविक** होय.

निजामध्ये प्रथम दोघांचा प्रादुर्भाव होऊन नंतर रोग होतात व आगन्तुकामध्ये प्रथम रोगाचा प्रादुर्भाव होऊन नंतर दोष होतात. तसे आधिदैविक नाहीत. केव्हा त्याचे परिणाम निजासारखे व केव्हा त्यांचे परिणाम आगन्तुकासारखे होतात.

हे आधिदैविक व्याधीही देवकृत आणि भूतकृत असे दोन प्रकारचे आहेत. ह्या दोहोमधील भेद असा आहे कीं,

१) जेव्हा रोगी स्ववश होऊन दैविक दुःख भोगतो तेव्हा ते पहिल्या प्रकारचे समजावे. व जेव्हा तो परवश होऊन दुःख भोगतो तेव्हा दुसऱ्या प्रकारचे समजावे.

भूताभिषंगाने तिन्ही दोषांचा कोप होतो असे माधव म्हणतात. तशी स्थिती देवकृताचीही आहे. म्हणजे हे व्याधी बहुतेक सान्निपातिकच असतात.

तथापि हे व्याधी दुष्कर्मावर अवलंबून असून ते दुष्कर्म घडण्याला पूर्वीचा प्रज्ञापराधच कारण आहे. 'मनुष्य प्रथम आपल्या हाताने आपला नाश करून घेतो व नंतर देवादिक त्याचा नाश करतात.' असे वाग्भटाने म्हटले आहे.

यद्यपि 'देव मनुष्यावर क्षोभले असता दंडुका घेऊन मारीत नाहीत तर त्यांची बुद्धीच हरण करतात' असे महाभारतात विदुराचे वचन आहे.

तथापि कर्तृकालीन **प्रज्ञापराध** स्वतःचा असून

भोगकाली दुःखात **''दुसरे न सुचणे''**

हे कर्मानुसार देवाचे करणे समजावे. म्हणून सर्व व्याधी निजातच येतात. आणि निजव्याधी तर आत्म्याच्या विस्मृतीवर अवलंबून आहेत. येवढ्याकरीता आत्मविवेकानेच सर्व व्याधींची निवृत्ति होणे शक्य आहे.

तथापि अग्नि जसा काष्ठांच्या विरोधी असून काष्ठकार्य जे भस्म त्याच्या विरोधी नाही. तद्वत् आत्मविवेकही अविद्येच्या विरोधी असून तत्कार्य जे निज व आगन्तुक व्याधी त्यांच्या विरोधी नाही. यद्यपि कारणनाशानंतर कांही कालाने कार्य अवश्य नाश पावते तथापि तावत्काल ब्रह्माकारवृत्ति करण्याकरितां दुःखाभिभव

करणाऱ्या औषधीच कार्यरूप व्याधी विरोधी आहेत, त्या सर्व आरोग्य उपाय असल्यामुळे त्यांचे निरूपण ज्यांत केले आहे, त्यांना आयुर्वेद म्हणतात. त्याची अंगे नऊ आहेत.

आयुर्वेदाची ९ अंगे

(१) शल्यतंत्र (२) शालाक्यतंत्र (३) भूतविद्या (४) कायचिकित्सा

(५) कौमारभृत्य (६) अगदतंत्र (७) विज्ञानतंत्र (८) वाजीकरणतंत्र

(९) रसायनतंत्र

(१) कंठाच्या खालचे रोग चीरफाड करून दूर करण्याचे उपाय ज्यात सांगितले आहेत त्याला **शल्यतंत्र** म्हणतात व

(२) कंठाच्या वरचे रोग दूर करण्याचे उपाय ज्यात सांगितले आहेत त्याला **शालाक्यतंत्र** म्हणतात.

(३) देवादिग्रहांची चिकित्सा सांगणाऱ्या भागास **भूतविद्या** म्हणतात. हा भाग मंत्रप्रधान आहे.प्रधान म्हणण्याचे कारण असें कीं कांही औषधीही भूतनिवारक आहेत, पण त्या थोड्या. ह्या तंत्राने दैविक रोगांची चिकित्सा होते.

(४) शरीराच्या अंगप्रत्यंगाचे ठायीं तिन्ही दोषापासून होणाऱ्या रोगांचे विस्तृत वर्णन व त्यांना दूर करण्याचे उपाय ज्या आयुर्वेदाच्या भागांत सांगितले आहेत. त्याला **काय-चिकित्सा** म्हणतात. शस्त्रवैद्यक, काष्ठवैद्यक व रसवैद्यक ह्या भागांत प्रधान आहेत. गौणतः मंत्रादिकांचाही उपयोग आहे असे सुचविले (आहे).

(५) बालरोगाची चिकित्सा, दुग्धाची शुद्धि व बालग्रहांची चिकित्सा ज्या भागांत आहे त्याला **कौमारभृत्य** म्हणतात.

(६) स्थावर जंगम विष निवारण्याचे उपाये ज्या भागांत सांगितले अहेत त्याला **अगदतंत्र** म्हणतात.

(७) तथापि लहान मोठ्यांना होणारे भौतिक दैविक सर्व रोग कर्मजन्य असल्यामुळे रोगांचा कर्मविपाक व त्या कर्मांचा परिहार ज्या भागांत सांगितला आहे त्याला **विज्ञानतंत्र** म्हणतात. हा भाग पुण्यप्रधान आहे.

(८) वाजी म्हणजे घोडा. घोड्यासारखे स्त्री संभोगाविषयीं जे बल उत्पन्न करते आणि त्याच्यासारखा क्षणोक्षणी वीर्योद्भव होण्याच्या उपायाला **वाजीकरण**

म्हणतात. वाजीकरण औषधाने जन्मतःच ज्याचे वीर्य न्यून आहे त्याचे ते अधिक होते असे डल्लनाचार्य म्हणतात. यावरून तीव्रसंवेगी स्वभावही बदलविता येतो. असा निष्कर्ष निघतो. उपदंशादिकाने बिघडलेले शुक्र वाजीकरण औषधाने शुद्ध होते. भांग आदिक मादक पदार्थाच्या सेवनाने किंवा अतिशय स्त्रीसंगाने ज्यांचे वीर्य शुष्क होते त्यांना वीर्योत्पत्ति उपाय वाजीकरणच आहे असे डल्लनाचार्य म्हणतात. अल्प म्हणजें स्वभावतःच बालपणी असते ते आणि अर्ध्या वयामध्ये वीर्य क्षीण होते आणि म्हातारपणामध्ये शुष्क होते या तिन्ही वयामध्ये वीर्यवृद्धि करून स्त्रीसंभोगांत आनंद उत्पन्न करणारे वाजीकरण आहे. म्हणजे बाल्य व वार्धक्य मोडून तारुण्य देणारे आहे. असे समजावे. हे ज्याभागात सांगितली आहे त्याला **वाजीकरणतंत्र** म्हणतात.

(९) सर्वथा जरेचा नाश, नित्य तारुण्य, शंभर वर्षे किंवा त्याहीपेक्षा अधिक ज्याच्या योगाने आयुष्य वाढून बुद्धि, बल, धैर्य. वृद्धिपूर्वक सर्व रोगांचा नाश करते त्याला **रसायन** म्हणतात. ''रसायन म्हणजे रसादि धातूंची शुद्धि करून त्यांना सम ठेवणे''

यद्यपि रसायनाचे कार्य वाजीकरणानें होते व वाजीकरणाचे कार्य रसायनाने होते असे चरकाचार्य म्हणतात तथापि वाजीकरण शुक्रशुद्धि निमित्त प्रधान असून रसायन सर्वशुद्धि निमित्त प्रधान आहे.

आणि वाजीकरण जरी रसायनाचे कार्य करते तरी शुक्र प्रवृत्त्यांदिके करून ते रजोवर्धक आहे, म्हणून काम पुरुषार्थाच्या ठिकाणीं त्याचा विशेष उपयोग असला तरी सत्त्ववर्धक व धर्माकडे प्रवृत्ति करणारे रसायनच श्रेष्ठ आहे. ते ज्या भागांत सांगितले आहे त्याला **रसायनतंत्र** म्हणतात.

सर्व व्याधींचे आश्रय देह व मन दोन्ही आहेत. किंबहुना 'देह जड असून सर्व दुःख मनोमात्र आहे' असे विज्ञानभिक्षूंनी सांख्यभाष्यांत म्हटले ते यथार्थही आहे. तथापि मूढ पुरुष देहासक्तीने मनाला देखील विसरल्यामुळे व त्यांना शारीरिक सुखदुःखाची महतीच अधिक वाटत असल्यामुळे कर्मफलदात्त्या भगवंताने, पुनः पाप कर्म करू नये म्हणून शारीरिक रोगरूपी शिक्षाच मूर्खांना अधिक दाखविण्यामुळे पश्चात्ताप झालेल्या आतुरासाठी इतर तंत्रापेक्षा कायचिकित्सेचाच भाग अधिक वाढला आहे.

मनाचे रजस्तम हे दोष असून उत्तम काळ, उत्तम स्मृति, सत्यासत्याची निवड, हितापासून न ढळणे, मनाची स्थिरता, समाधीच्या योगानें परमेश्वराचा अनुभव इत्यादि सद्‌गुणच त्यांचे औषध आहे.

तरी सद्विचाराने शारीरिक रोगांचेही निवारण होते. परंतु ती रीती या ग्रंथांत सांगत नसून मानसायुर्वेदावरून ती त्वां समजून घ्यावीं. एऱ्हवी नवांग युक्त आयुर्वेद तुला सांगतो. परंतु अंगाच्या क्रमाने न सांगता जेव्हा जशी आवश्यकता लागेल तशी तेथे व्यवस्था करीन.

आता सांगितलेल्या लक्षणावरून पुढे येणाऱ्या विषयावरून त्या त्या अंगाचा तो विषय आहे, असे तू समजून घ्यावे. हे निरूपण श्रीमत्सदगुरु श्री ज्ञानेश्वरमहाराजांचे चरणी समर्पण करितो.

॥ हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सगदुगुरू ज्ञानेश्वरकृपाप्रसादे गद्यपद्यान्विते महाराष्ट्रभाषा- भूषिते वैद्य (भिषक्) वृंदावने सूत्रवाटिकायां संक्षेपतः सांग-सलक्षण-आयुर्वेद-निदर्शनं नाम द्वितीया वल्ली ॥

***

॥ श्री ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

॥ तृतीया वल्ली ॥

अलकावतीपति चरणरज वंदुनि वारंवार ।
स्नेहे कथितो ठेवि इथे पूर्णपणे निर्धार ॥

वत्स ! संप्रदायाचे अधिपीठ. ज्यांच्या जटेमधील गंगा पाप व तापाचे शमन करिते, ज्यांच्या मस्तकावरील चंद्र सर्व औषधीचे पोषण करतो, षडाननासारखे योगी ज्याचे पुत्र असल्यामुळे व भूपिशा सर्प इत्यादिकांचा संगी असल्यामुळे जो सुष्ट किंवा दुष्टांच्या विरोधी नाही, हिमालयाचा जामात असल्यामुळे तेथील सर्व औषधी ज्याला आदंण आहेत. याप्रमाणे शारीरिक दोष शमविणारा असून तृतीयनेत्रातील वन्हीने काम दहन केला म्हणून मानसिक दोषाचेही जो शमन करण्यास समर्थ; त्या सर्व विद्याप्रवर्तक महेश्वराचे आपण स्मरण करू; तसेच समष्टिबुद्ध्युपहित चैतन्य असल्यामुळे सर्वाचेच कल्याण करण्याची ज्याला इच्छा आहे व ज्याचे जन्मस्थान नाभी असल्यामुळे ज्याच्यापासून दुसऱ्याला 'भी'

प्राप्त होत नाही तो भगवान् सावित्रीपती आणि तसेच दक्षप्रजापती, अश्विनी कुमार, इंद्र, आत्रेय, धन्वन्तरी, सुश्रुत, चरक इत्यादी आचार्यांचे स्मरण करू.

भगवान् पतंजलींनी सांगितल्याप्रमाणे महात्म्यांच्या स्मरणाने त्यांच्या चित्ताचे ठिकाणीं आपल्या चित्ताचे आविष्करण होऊन संयमबले करून आपले चित्त तदाकार झाल्यावर आपल्याला रसायनरूपता प्राप्त होईल. मग त्या महात्म्याच्या स्मरण करुणा बलाने, आपल्या दर्शनाने औषधींचा प्रभाव प्रगट होईल. कारण प्रभावशील औषधीचे ज्ञान आगमावाचून घटत नाही म्हणूनच -

''संज्ञाकर्मस्त्वस्मद्विशिष्टांना लिंगम्''

(वैशेषिकदर्शन, आन्हिक २ सू १८)

असे कणादाचार्यांनी म्हटले आहे. आईबापांनी दिल्यावाचून जसे मुलामुलींना नावे येत नाहीत त्याप्रमाणें कोणी केल्यावाचून संज्ञा किंवा कर्मे प्रवृत्त होत नाहीत. ज्या संज्ञाकर्माने कर्ते प्रत्यक्ष दिसतात त्याविषयी वाद नसो. परंतु ज्या संज्ञाकर्माचे कर्ते प्रत्यक्ष दिसत नाहीत त्याच्या विषयी अनुमान करावे लागते. अनुमानाचा धर्म सामान्यज्ञान करून देण्याचा असल्यामुळे विशेषज्ञान आगमावाचून संभवत नाही.

आगमप्रामाण्य, प्रवर्तकांच्या आप्तत्वावर अवलंबून असून, आप्तत्व सदाचरणावर व सदाचरण धर्मबुद्धीवर अवलंबून असून, धर्मबुद्धि देहात्मभिन्न ज्ञानावर अवलंबून आहे.

लोकांकरितां उत्तम आचरण करणारा मनुष्य कितीही चोख असला तरी सुखरक्तिमेतून सुटला नसल्यामुळे एकांतांत त्याचे उत्तम आचरण राहणे बहुवर्षसंस्कारामुळे यद्यपि शक्यसे वाटत असेल तथापि चित्तचांचल्य त्याला सोडणार नाही आणि त्या चित्ताला रिझविण्याकरिता त्याजजवळ नित्य संबोधक उपाय नसल्यामुळे कोणी न पाहील इतकी व्यवस्था करून तो दुराचरण करण्यास मागेपुढे पाहणार नाही; म्हणून देहाहून पृथक आत्मा ज्याने जाणला आहे त्याला दुसऱ्याला दिलेले सुखदुःख परतून आपल्याला केव्हातरी त्याच्यापासून घ्यावे लागेल, म्हणून इहपरत्र कोणास दुःख होणार नाही असे रागद्वेष रहित आचरण करणे या धर्मबुद्धीचा आश्रय करून अंतर्बाह्य सद् आचरणमय होत्साता परदया-प्रेरित दिव्यद्रष्टा जगत्कल्याणमार्गानुसारी आप्त होतो. तो मग ऋषि असो, आर्य असो किंवा म्लेंच्छ असो, त्याचे वचन प्रमाण आहे. असे न्यायभाष्यकार

वात्सायनमुनि (न्यायसूत्रात) म्हणतात.-

"एवं ऋष्यार्यम्लेच्छानां समानं लक्षणम्''

ह्या आप्त वचनापासूनच आगमाची उत्पत्ती आहे.आगमावाचून आपल्याला द्रव्यादि विज्ञान होत नाही.

यद्यपि पाश्चात्यशास्त्राप्रमाणे प्रत्यक्ष योग करून आणि बहुरोगनिवृत्त्यनुभवाने अनुमानावरून औषधिविज्ञान होतेसे वाटते;

तथापि त्रैकालिक निर्धारित ज्ञान या दोहोंनीही होत नाही. ज्याप्रमाणे अत्यंत सावध राहिलेला मनुष्यही कधीच कोणत्याही कीटकांच्या किंवा रोगांच्या तडाख्यात सापडणार नाही हे सांगणे कठीण आहे तद्वत् गणितादी अनुभवावरून सिद्ध केलेले अनुमानही मानाश्रया-अनिश्चयामुळे चुकण्याचा अत्यंत संभव आहे.

यथा-मानाश्रय जे द्रव्य घेतो ते तितकेच असते याला काय प्रमाण आहे? म्हणजे एक तोळा चंदन घेतले तर ते एक तोळाच असेल याला प्रमाण कांही नाही असे मी म्हणतो कारण कर्षरूप मानाचा आश्रय ज्यांनी केला आहे ते चंदन एकावयवरूप आहे की अनेकावयव संघातरूप आहे?

प्रथम घटत नाही कारण की एकावयवसंघातरूप जर कर्ष मानाश्रयचंदन असेल तर त्याचे दोन विभाग केले म्हणजे अर्ध त्यांचे मानकर्ष होऊं नये अथवा कर्षद्वय मानाश्रयचंदन भूमीवर कोठेच उपलब्ध होऊं नये.

दुसरा पक्षही संभवत नाही. कारण की अनेकावयव मानल्यास त्यांत इतके अवयव आले पाहिजेत अशी कांही संख्या निश्चित करणे भाग पडेल.आणि तशी संख्या केली की त्या संख्येचा जो एक अवयव असेल त्याचा पुनः विभाग न झाला पाहिजे.आणि विभाग झाल्यास संख्येचा निश्चय होणार नाही. संख्येचा निश्चय न झाल्यास जे आपण मान करितो त्या मानाश्रय द्रव्याच्या भागात त्या मानाला न कळून येणारा एखादा सूक्ष्म भाग अधिक नाही; हे सांगण्याला आपणाजवळ प्रमाण नाही.ज्याप्रमाणे केशाचा सहस्त्रावा अंश घेऊन सहस्त्रमणीच्या पदार्थावर ठेऊन त्याचे मान पाहिले असता केश सहस्त्राच्या अंशाचे मान कळणे शक्य नाही, तद्वतच् येथेंही अनुमान चुकण्याचा संभव आहे.

मानाश्रय वस्तूचे विभाग होत नाहीत असे म्हटले तर स्थूल वस्तूचे विभाग होत नाहीत किंवा परमाणूचे विभाग होत नाहीत? हा प्रश्न उत्पन्न होतो पैकी -

कर्षमात्र मानाश्रय चंदनाचे दोन भाग आपणास करता येतात म्हणून प्रथम पक्ष संभवत नाही आणि

द्वितीय पक्षही असम्यक् आहे. कारण परमाणूंचे विभाग होत नाहीत असे म्हटले तर परमाणू म्हणजे काय? वस्तूचे तुकडे करता करता ज्याचा तुकडा होणार नाही असा भाग. परन्तु हे म्हणणे ''परस्परविरोध गुणाश्रय द्रव्याचा स्वीकार करण्यासारखे आहे.

ज्याचे विभाग होतात त्याच्याच कांही अंशाचे विभाग होत नाहीत. असे मानले.

तथापि, ते अंश वस्तु सजातीय आहेत की वस्तु विजातीय आहेत?

पुनः एका पदार्थाचे तुकडे करतां करतां एकच परमाणू राहतो की अधिक राहतात ?

एकच राहतो म्हणशील तर दुसऱ्या तुकड्याचे काय होते?

अधिक राहतात म्हणशील तर ज्याचा विभाग केला व ज्या विभागामुळें ज्या तुकड्यांना अधिकत्व संख्या आली त्या तुकड्यांना तत् संख्या द्विगुणत्व संख्या न येण्याविषयी कोणती युक्ति आहे?

आता वस्तुसजातीय ते परमाणुरूप अंश मानल्यास वस्तूच्या विभाज्य धर्मास्तव परमाणूही विभाज्य होतील आणि

वस्तु विजातीय परमाणु मानल्यास वस्तु सावयव असल्यामुळे निरवयव होतील.

निरवयव परमाणुमध्ये एक दोन तीन असा संख्येचा तरी निर्धार कसा होतो?

कारण निरवयव म्हणजे आकाशासारखे अवकाशरूप असणें.

तशीच निरवयवा पासून सावयत्वाची उत्पत्ति होते कशी?

आणि सावयव पदार्थाचे तुकडे करिता करितां निरवयव तुकडा राहील हे मनात तरी येते कसे ?

तात्पर्य, परमाणुकारणवाद सिद्ध होत नसल्यामुळे आणि सावयव परमाणूंच्या विभाज्यानंत्यास्तव संख्या निर्धार होत नसून मान निर्धारही होत नाही.

आता थोड्याशा सूक्ष्म अंशाने पुष्कळ द्रव्याचे गुण नाश पावत नाहीत असे म्हणणे योग्य होणार नाही. कारण, गुण द्रव्यापेक्षा स्थूल आहेत की सूक्ष्म आहेत?

पहिला पक्ष मानल्यास ते गुणही परमाणुचेच झाले असे म्हणावे लागेल तसे म्हटले म्हणजे द्रव्य गुणांत भेद राहणार नाही

आणि तसे झाले म्हणजे पुष्पाचा गंध घेतांना पुष्पासुद्धा तो गंध आपल्या हृदयांत जाऊन बसला पाहिजे. आणि तसेही मानले तर परार्धावाधि पुष्पे हृदयांत गेल्यामुळे शरीराचा श्वासोश्वासच चालण्याला अडचण पडून शिवव्रत घेण्याची पाळी येईल.

म्हणून द्वितीय पक्ष स्वीकारशील तर द्रव्यापेक्षा गुण सूक्ष्म असल्यामुळे कितीही द्रव्याचा सूक्ष्म भाग मानात मिसळला तर त्याहीपेक्षा सूक्ष्म गुणामध्ये तो अवश्य आधिक्य उत्पन्न करील त्यामुळे औषधीचें अनुमानांनी ठरविलेले संयोगज गुण विरूद्ध होण्याचा संभव आहे.

आता औषध दिले असतांना शरीरात जी क्रिया होते तिजवरून प्रत्यक्ष प्रमाणानुसारच औषधाचे गुण ठरवू पाहशील तर तेही बरोबर नाही.

कारण की याविषयी पारकीय लोकांनी पुष्कळसा यत्न कला असून

१) आडुळश्याची इंद्रियविज्ञानजन्य प्रत्यक्ष क्रिया त्यांना सापडली असूनहि कांसावर (खोकल्यावर) त्याची क्रिया कशी होते हे समजत नाही. व

२) पाऱ्याचीही इंद्रियवैज्ञानिक क्रिया समजली असून उपदंशावर त्याने कसा गुण येतो. त्याचे उत्तर ती क्रिया देऊं शकत नाही.

त्याचप्रमाणे सोमलादिकांचीही स्थिति आहे. अशा विषयी कांही पाश्चात्य लोकांनी पुस्तकेही लिहून ठेंविली आहेत.

तात्पर्य, आप्तांना **औषधीतील सत्त्व ऋतंभराप्रज्ञादृष्ट** असल्यामुळे त्यांनी प्रणिलेल्या आगम साहायानेच औषधीचे संयोग हितकारी होतात. असेच सुश्रुताचार्यानी सांगितले आहे. हेच तुला उत्तम समजावे म्हणून प्रथम आगमानुसार द्रव्यादी विज्ञान सांगितले.

तैत्तिरीयश्रुतीत ब्रह्मापासून आकाशादिक क्रमाने औषधी उत्पन्न झाल्या असल्यामुळे व तत्तदुपहित ब्रह्म झाले असल्यामुळे ब्रह्मज्ञ माहात्म्यांनी प्रणिलेल्या

आगमान्वये औषधीरूप द्रव्याचे ठिकाणी द्रव्य, रस, गुण, वीर्य, विपाक आणि प्रभाव हे गुण राहतात. ह्या सर्वाची तुला क्रमाने लक्षणें सांगतो. सर्वांचा आश्रय द्रव्य असल्यामुळे त्याचेच प्रथम निरूपण करितो. परन्तु

''आगमाला मस्तकी धरणाऱ्याही मला दुर्दैवानेच आप्तांच्या विरुद्ध जावे लागते ह्याची तूं क्षमा कर.''

चरक-सुश्रुताचार्य यांचे खंडन

चरकाचार्यांनी व सुश्रुताचार्यांनी **गुण क्रिया समवायी द्रव्य** सांगितले आहे. हे लक्षण न्यायातील आहे.

तदनुसारच आत्मा, आकाश, वायू, तेज, जल, पृथ्वी, काल, दिशा व मन ही नऊ द्रव्य चरकाचार्यांनी सांगितली आहे. अर्थातच् त्यांच्या म्हणण्याप्रमाणे **आत्मा द्रव्य असल्यामुळे गुणक्रियासमवायी** झाला. आणि

ह्याच आचार्यांनी आत्म्याला निर्विकारत्व सांगितले आहे. आणि पाहण्यासारखी गोष्ट ही कीं, हे दोन्ही विषय सूत्रस्थानाच्या पहिल्या एका अध्यायातच वर्णन केले आहेत.

याप्रमाणे सुश्रुताचार्यांनीही पुरुषाला असर्वगतत्व मानून गमनागमनादि विकार सांगितले आहे. पण गमनागमन आकाशावाचून होत नाही. हे त्यांच्या ध्यानांत आले नाहीसे दिसते. कारण ज्या अध्यायांत त्यानी असे सांगितले आहे त्याच **सर्वभूतचिंताशारीराध्यायात** त्यांनी आकाश प्रकृतीचे कार्य व पुरुष नित्य आहे असे सांगितले आहे.

आकाश जर प्रकृतीचे कार्य आहे तर ते उत्पन्न होण्यापूर्वी नित्य असा पुरुष कोठे होता? कारण तो असर्वगत असल्यामुळे त्याच्या सभोवती आकाशावाचून दुसरे काय होते?

सर्वगत मानल्यास तो गुणक्रियासमवायी ठरत नसल्यामुळे द्रव्य होत नाही.

एवं प्रसंग आल्यामुळे कष्टाने कराव्या लागलेल्या खंडणाची चरक-सुश्रुताचार्य या दोघांनाही प्रणाम करून क्षमा मागतो.

द्रव्याचे लक्षण

माझ्या मताने द्रव्याचे लक्षण असे आहे कीं -

''पंचेन्द्रियांनी गुणच प्रत्यक्ष होतात.द्रव्य होत नाही''

उदा.आंबा घेतला तर त्याचे रूप डोळ्यांनी प्रत्यक्ष होत असून नाकाने गंध, हाताने स्पर्श व जीभेने रस प्रत्यक्ष होतात.हे गुण वेगळे केले असता आंबा काय आहे? याला प्रत्यक्ष प्रमाण उत्तर देत नाही, तथापि –

''हे चार गुण वेगळे करण्याच्या पूर्वी ज्या अधिष्ठानावर एकत्र आले होते ते अधिष्ठान अनुमेय द्रव्यरूप आहे असे मी म्हणतो.''

आता ते काय आहे याविषयी विचार असा कीं रूप, रस, गंध, स्पर्श या चार गुणांचे पृथक् संस्कार आत एकत्र होऊन बुद्धीतच राहतात व ती बुद्धी अनुमानानेच कळते.

तसे रूप, रस, गंध व स्पर्श हे चार गुणही ज्या ठिकाणी एकत्र राहातात ते द्रव्यही अनुमानानेंच कळते.

या लक्षण प्रमाणसाम्यावरून व्यापक असणारी बुद्धी शरीराच्या आंत संस्काररूप सूक्ष्म गुणाला एकत्र करिते.तीच बाहेर संस्काराच्यापेक्षा स्थूल गुणाला एकत्र करते म्हणून बुद्धिच बाहेर द्रव्यरूप व आंत वृत्तिरूप झाली आहे. याविषयी तुला प्रमाण सांगतो ते ऐक.

अनुमान : अनित्य व नित्य

अनुमान दोन प्रकारचे आहे.अनित्य व नित्य. ज्याचे अनुमान होऊन पुढे प्रत्यक्ष होते ते **अनित्य** व ज्याचें अनुमान करणें भाग पडत असून प्रत्यक्षात कधीच येत नाही ते **नित्य.**

जसें स्वयपांकगृहात धुपट निघते म्हणून अग्नि आहे.हे अनुमान अनित्य समजावे.कारण तेथे जाऊन पाहिले असतां तो अग्नि प्रत्यक्ष झाल्यावर अनुमानाची आवश्यकता राहत नाही.

पण गुरुत्वाकर्षणाची गोष्ट तशी नाही. कोणताही पदार्थ खाली पडतो म्हणून पृथ्वीत गुरुत्त्व आहे.हे अनुमान जितके वेळ केले तितके वेळ अनुमानातच राहते.प्रत्यक्षांत येत नाही.म्हणून हे अनुमान नित्य समजावे.

जे नित्य अनुमेय असते ते कोणत्याहि इंद्रियाने गम्य नसून मनानेच गम्य

असते.व जे नित्य मनानेच गम्य असते ते अर्थातच दृश्य नसून मनोमयच असले पाहिजे व मनोमय मनोविजायतीय असे कधीही शक्य नाही.म्हणून गुणाच्या एकत्र करण्याच्या हेतुवरून नित्य अनुमेय रूप असणारे द्रव्य मनःसजातीय बुद्धिरूप आहे.

इतक्याने तुझे समाधान होत नसेल तर मानसायुर्वेद पाहा.त्याच्या दुसऱ्या अध्यायांत या विषयाचे मी विस्ताराने वर्णन केले आहे.

द्रव्याचे भेद

आता द्रव्याचे जे भेद होतात त्याचे कारण असे आहे की बुद्धीत तीन गुण आहेत.**''सत्त्वं रजस्तम इति गुणा बुद्धेर्न चात्मनः''** असे भागवतात सांगितले आहे.व सांख्यकारिकेत असे म्हटले आहे की **''सत्त्वं लघु प्रकाशकमिष्टमुपष्टंभकं, चलं च रजः, गुरु वरणकमेव तमः''**

सत्त्व हलके आहे.प्रकाशक आहे.आणि आनंददायक आहे.

रज उपष्टंभक आणि चंचल आहे.

तम जड आहे.भारी आहे.

या 'तीन गुणांचे मन' गौण प्रधान रूपानें **पंचभूतरूप** झाले आहे.

ज्यांत सत्त्व अत्यंत प्रधान आहे.तो भाग अंतःकरण.

१) व तेच सत्त्व थोडे अस्पष्ट झाले म्हणजे सत्त्वाचा प्रकाशक धर्म व आनंदधर्म इतर गुणांनी लोपवून टाकून सत्त्वाचा हलकेपणा कायम ठेविला. या स्थितीलाच **आकाश** किंवा पोकळी म्हणतात.

२) पुनः सत्त्वाच्याही हलकेपणाला कमी करीत करीत रजोगुणाचा प्रादुर्भाव अधिक होतो तेव्हा **वायू** उत्पन्न होतो.

३) त्यात तमाचा भाग थोडा मिसळला की **अग्नि**

४) व थोडा अधिक तमाचा भाग झाला म्हणजे **जल**

५) आणि पुष्कळ तमाचा भाग झाला म्हणजे **पृथ्वी.**

याप्रमाणे पंचभूतें उत्पन्न होत असून या गुणसंक्रमणानेच द्रव्यामध्ये भेद झाला आहे.ज्यांत हलकेपणा वगैरे जास्त आहे ते द्रव्य आकाशगुणाचे.याप्रमाणे पुढेही समजून घ्यावे.

तात्पर्य, अंतरीची बुद्धीच सूक्ष्म संस्कार तीव्र करीत करीत जशी स्वप्नांत

स्त्रीला दाखवून वीर्यपात करविते.- तद्वत् बाहेरही तीव्र होऊन गुणांना एकत्र करून द्रव्यरूप होऊन पदार्थ दाखविते.

आता माझे द्रव्य विवेचन कठीण असल्यामुळे लौकर ध्यानांत येत नसेल तरी मी जीवंत असेपर्यंत याजवर कोणी टीका करणारा भेटावा अशी माझी फार इच्छा आहे. पण 'मला हे दिसते म्हणून मी असे म्हणतो' असे बोलणारा तो वेडा नसावा. कारण की त्याच्या म्हणण्यावरून त्याचे मनही त्याला दिसत नसल्यामुळे ते नाही असे म्हणावे लागते. असो.

गुणविवेचन

''त्या द्रव्याचे ठिकाणीं परस्पराकर्षणाने शरीरातील समविषमताकारक जे भाव दिसून पडतात त्यालाच गुण म्हणतात''

त्यात रुचीच्या द्वाराने मनाला पुष्टी देणारा **रस** असल्यामुळे तोच प्रथम शरीरातील समविषमतेशी निकट संबंधी होतो म्हणून त्याचे वर्णन प्रथम करितो व त्याच्याच अनुरोधाने भूतगुणानुसार पांचभौतिक शरीरावर जे परिणाम होतात त्यांच्या **कारणभूत गुणांचे**ही वर्णन करतो.

नंतर जड झालेले द्रव्य अग्नीच्या द्वाराने हलके होते व हलके द्रव्य द्रवीभूत होत होत शेवटी घनीभूत होते. म्हणून स्थूलदृष्टीने पाहाता अग्नीसोमात्मक हे जगत् दिसत असल्यामुळे उष्ण आणि शीत असें दोनच प्रकारचे **वीर्य** आहे. त्याचे वर्णन करितो व त्यापुढे वीर्यानुसार रस शरीरात गेल्यावर त्याची काय गति होते हे दर्शविणारा जो **विपाक** त्याचे वर्णन करितो. आणि इतके वर्णन करूनही बुद्धी थकून गेली. तथापि परमेश्वरापासून हे सर्व उत्पन्न झाल्यामुळे त्या परमेश्वराच्या ईक्षणानें जो द्रव्याचे ठिकाणी आमच्या बुद्धीला न कळणारा **अचिंत्य गुण** आला आहे. त्याच्या प्रभावाचे वर्णन करितो.

'तात, आता ह्या सर्वांची लक्षणें श्रवण करण्याकरितां चांगले अवधान दे.'

सूक्ष्म व स्थूल अशा भेदाने द्रव्य दोन प्रकारचे असून त्याचे तरतमभेदाने पांच प्रकार झाले आहेत.

द्रव्य मानावयाचे कारण असें की गुणांचे ठिकाणी गुण राहत नाही.

'राहते' असें कोणी म्हणेल तर त्याला आम्ही असे विचारतो की,- गुणांचे ठिकाणी दुसरा गुण राहिला म्हणजे त्यांचा प्रथम निर्देश करता येणार नाही.

कारण गुणांचे ज्ञान जे होत असते तें समुदायजन्य होत नसून व्यावृत्तिजन्य होत असते.

जसे - गंध हा रूपगुणाहून भिन्न आहे. रूप समुदाय नाही. पण आंब्याची गोष्ट तशी नाही. आंब्यांत स्पर्श, रूप, रस व गंध हे चार प्रकारचे गुण आपणास दिसून येतात. म्हणून चारहि प्रकारच्या गुणांला धरून ठेवणारा असा कांही प्रकारचा पदार्थ - आंबा आहे, असे आपणास म्हटले पाहिजे.

आता ज्यांच्या मतात द्रव्य कांही नसून जे गुणसमुदायच पदार्थ आहे - असे म्हणतात, त्यांना असे विचारावे कीं तुमच्या मतांत जर गुणसमुदायाला धरून ठेवणारा असा कांही पदार्थच नाही. तर नियतपदार्थापासून नियत गुणांची उपलब्धी कां होते? घटाच्या कंबुग्रीवादिमत्त्व गुणांची पटापासून उत्पत्ति कां होत नाही?

आता 'ईश्वराची इच्छा' असे जर कोणी म्हणेल तर त्याला आम्ही असे विचारतो की, ह्या तुझ्या म्हणण्याचा अर्थ काय? ईश्वराची इच्छाच गुण समुदायाला धरून ठेवून ती पदार्थरूप होते. असे म्हटले तर ती सर्वव्यापी आहे की नाही?

पहिल्यापक्षी सर्व गुणांची सर्व पदार्थांपासून उपलब्धि झाली पाहिजे व

दुसऱ्यापक्षी घटगुणसमुदायाला धरून ठेवणारी ईश्वराची इच्छा पटगुण समुदायाला धरून ठेवणाऱ्या ईश्वराच्या इच्छेपासून भिन्न आहे कीं नाही? असा प्रश्न उत्पन्न होतो.

दुसऱ्या पक्षी घट व पट अशा दोन पदार्थांची सिद्धीच होणे शक्य नाही. व

पहिला पक्ष स्वीकारला तर त्याला धरून ठेवणाऱ्या दोन इच्छेच्यामधे जे राहते तें काय? जड कीं चैतन्य?

जड म्हटल्यास इच्छा व तें जडद्रव्य दोन की एक?

पहिल्या पक्षी ईश्वर संयोगीपदार्थ होऊन तो कोणी तरी केला असला पाहिजे असा त्यावर जन्यत्वाचा दोष येतो व

दुसऱ्यापक्षी द्रव्य-भेद सिद्ध होत नाही.

म्हणजे ईश्वर चैतन्य आहे, हा पक्ष स्वीकारला तर ईश्वर व त्याची इच्छा एक कीं दोन? असा पुनः प्रश्न उत्पन्न होतो.

पहिल्यापक्षी चैतन्यरूपच ईश्वराची इच्छा असल्यामुळे व चैतन्य सर्व

व्यापी असल्यामुळे द्रव्य-भेद सिद्ध होणे शक्य नाही. व

दुसऱ्या पक्षी जड व चैतन्य यांचा संयोग झाला कसा? जड चैतन्यापासून उत्पन्न होणे विरुद्ध असल्यामुळे ईश्वराचा व इच्छेचा कार्यकारणभाव होणे शक्य नाही. म्हणून - ते दोन्ही पदार्थ अनादि आहेत असे म्हणशील तर परमेश्वरालाहि परिछिन्नता आल्यामुळे सर्व-निर्मातृत्व व सर्व गुणसमुच्चयाधारत्व त्याला म्हणता येणार नाही.

आता 'वेदान्ताच्या मायेप्रमाणे अध्यस्त अनिर्वचनीय अशा इच्छारूप जडाचा स्वीकार करून तिला द्रव्य म्हणशील' तर आम्हाला इष्टापत्ति आहे खरी परंतु तूं मात्र पेचात सांपडलास; कारण हे द्रव्य मायारूप झाल्यामुळे ज्ञानानेच तिचा नाश झाल्यावर जीवन्मुक्ताला रोग झाला असतांना औषधीच मिळणार नाही. अथवा सर्व द्रव्यांचा नाश झाल्यामुळे रोग व औषधी दोन्ही न सांपडल्यामुळे ज्ञान झाल्यावर त्याला मरावेच लागेल. म्हणून -

''आवरण-शक्त्यात्मक माया जरी द्रव्य नसली तरी अंतःकरणरूप विक्षेपशक्त्यात्मक माया बाह्य द्रव्यरूप होते'' असे आम्ही म्हणतो. व –

''तो विक्षेप यावत् प्रारब्ध तिष्ठतो''; म्हणून ज्ञानियाला औषधी मिळणार नाही हा दोष येऊं शकत नाही व तें द्रव्य परमेश्वराच्या आधीन आहे.

आता मुक्तांचे प्रारब्ध बलवान असले तर ह्याचा जय होईल हे खरे. परंतु योगरूपी प्रयत्नाने मुक्ताला जसा प्रारब्ध भोगांचा अभिभव करिता येतो तसा वैद्यकरूपी प्रयत्नानेही करता येणे शक्य आहे. म्हणूनच समाधी व औषध या दोहींनीही सिद्धि मिळतात असे योगसूत्रांत त्याच्या भाष्यवार्तिकादी टीकेंत व त्रिपुरारहस्य आणि श्रीमद्भागवत इत्यादि ग्रंथांत सांगितले आहे.

पंचभूतांची उत्पत्ती
तैत्तिरीय उपनिषद

ते द्रव्य सर्वात स्थूल म्हणजे पार्थिव व सर्वात सूक्ष्म म्हणजे आकाशीय मधले तीन प्रकारचे, तेजस्, आप्य व वायवीय असे समजावे. पैकी **आकाशीय** सर्वात सूक्ष्म असून **वायवीय** त्याच्यापेक्षा घन व त्यापेक्षा **तेजस** घन. त्यापेक्षा **आप्य** घन व त्यापेक्षा **पार्थिव** असे एकमेकापेक्षा घन आहेत.

प्रथम **'विक्षेपाव्यक्तावरणावच्छिन्न चैतन्यच आकाश'** असून चेतन

स्वातंत्र्यास्तव विक्षेपप्रवृत्ति **अहंता**प्राधान्यावच्छिन्न **अंतःकरणरूप** होऊन **इदंता** प्राधान्यावच्छिन्न **वायुगतिरूप** झाली. व त्या गतीच्या परस्परांमध्ये जो कल्लोळ त्यापासून **उष्णता** उत्पन्न झाली व तत्प्राधान्यावच्छिन्न चैतन्य **प्रकाश** म्हटल्या जाते. पुढे ती उष्णताच घन झाल्यावर परमाणू दृढ होऊन **द्रवरूप** (व्य×)झाली व त्यापेक्षा घन झाल्यावर **पृथ्वीरूप** झाली.

याप्रमाणे हा पंचमहाभूतांचा उत्पत्तिक्रम तैत्तिरीय उपनिषदांत स्पष्ट सांगितला आहे. त्याचा उत्पत्तिक्रम जसा परमेश्वराला कळतो तसा आपणाला कळत नाही.

जसा घट मातीपासून झाला इतकें जरी आपणाला पक्के कळले तरी त्या मातीला वाटोळेपणा येतो कसा? ती दोन्ही शकले एकत्र जुळतात कशी? इत्यादि कौशल्य कुलालावाचून समजत नाही. तथापि घट हा मातीचा आहे हे ज्ञान मृत्कारणत्व निश्चयास उपयोगी पडते. तद्वत् महाभूतांच्या उत्पत्तीचा खडान् खडा जरी आपल्यास समजला नाही. तरी - त्या सर्वांचे कारण परमात्मा आहे. एवढ्या निश्चयाकरिता आपल्या हे उपयोगी पडते व तसा निश्चय झाला म्हणजे त्याच्या सत्यसंकल्पाने आलेला औषधीतील प्रभाव आपल्यावर कृपा करुन आपल्यास यश देण्यासाठी तो ईश्वर प्रकट करितो. म्हणून **कोणताही वैद्य अनीश्वरवादी होणे उपयोगी नाही.**

- ज्या महात्म्यांचा खरा खरा परमेश्वरावर विश्वास असून ज्यांचे अंतःकरण त्याच्याशी तादात्म्य पावले आहे. त्यांचे संगती तर औषध न घेतांना रसायनरूपिणी आहे असे वैद्यशास्त्रधुरीण वाग्भटादिकांनीही म्हटले आहे.

समन्वय

असो. येथपर्यंत केलेल्या विवेचनात द्रव्य अनुमेय आहे, असे जे आम्ही सांगितले ते सुश्रुतादिकांच्या विरुद्ध आहे, असे कोणी समजू नये. कारण द्रव्याची अनुमानानें सिद्धि करण्याकरिता व त्याला शास्त्रीयत्व आणण्याकरिता आम्ही तशा रीतीने सांगितले आणि गुणसमुदाय एकदम प्रत्यक्ष होतो म्हणून इन्द्रियद्वारा बाहेर निघालेली बुद्धि द्रव्याकारच होत असली पाहिजे अशा अभिप्रायानेच सुश्रुताचार्यादिकांनी द्रव्यांचे पंचेंद्रिय द्वारा ग्रहण होते. असे सांगितले. तथापि सुश्रुताच्या डल्लनभाष्यात वायवीय व आकाशीय द्रव्य अमूर्त असल्यामुळे अनुमेयच

आहे असे स्पष्ट म्हटले आहे.

ज्यांच्या मतात शब्दस्पर्शादिक गुण आहेत, त्यांच्या मतांत द्रव्य अनुमेयच राहतात व ज्यांच्या मतांत द्रव्य आहे, त्यांचे मत द्रव्यप्रत्यक्षवादी आहे. तथापि वृत्तिगम्यतेस्तव दोघांतही विरोध नाही. ह्या द्रव्य प्रत्यक्षवादामुळे व आणखी कांही कारणामुळे आम्ही सुश्रुताचार्यांना सांख्याश्रित व चरकाचार्याना वेदान्ताश्रितवादी म्हणणार आहोत. सुश्रुताचार्यांच्या मताने द्रव्य प्रधान आहें. त्याला ते येणे प्रमाणे हेतु देतात.- रसादिक द्रव्याच्या आश्रित असून द्रव्य कशाच्याच आश्रित नाही म्हणून द्रव्य प्रधान आहे.

दुसरा हेतु असा आहे कीं द्रव्य हे अवस्थातः व जातितः स्थिर आहे. अवस्थातः स्थिर म्हणजे पिकलेल्या आंब्यात आम्रपणाचे जातिमत्त्व द्रव्यासारखे असून रसादिक गुण मात्र निरनिराळे होतात म्हणून द्रव्य स्थिर आहे व स्थिर आहे म्हणून प्रधान आहे. याप्रमाणेच आंब्यांचे निंबू होत नाही व घटाचा पट होत नाही. बिब्याचा गूळ होत नाही, म्हणून द्रव्य स्थिर आहे.

शंका-समाधान - ''पार्थिव द्रव्य आकाशादि द्रव्य होत नाही असे जे सुश्रुताचार्यांनी जाति न बदल्याविषयी उदाहरण दिले आहे ते श्रुतिविरुद्ध आहे कारण पृथिव्यादिकांचा उलटक्रमाने जलादिकांत श्रुतीने लय सांगितला आहे'' अशी कोणी शंका करू नये. कारण महर्षि हे श्रुतिविरुद्ध बोलणारे नव्हते. सुश्रुताचार्यांचे म्हणणे कार्यद्रव्याविषयीचे आहे, कारणद्रव्याविषयीचे नाही म्हणजे पार्थिव द्रव्य जो आंबा तो आप्यद्रव्य तुहिन (बर्फ) होत नाही. इत्यादि.

तिसरा हेतु असा आहे की, आरंभसामर्थ्या- मुळेही द्रव्यच प्रधान आहे. कारण कोणाला सांगितले की रस, वीर्य, विपाक किंवा प्रभाव घेऊन ये. तेव्हा त्याला द्रव्य आणल्यावाचून ते रसादिक आणता येणार नाहीत.

मम कल्पित आणखीही याला एक हेतु आहे - द्रव्य जर एक मानले तर आरंभामध्ये बराच भ्रम उत्पन्न होईल. जसे - पुरणपोळी तयार करिताना ''गोड घेऊन ये'' असे जर कोणी कोणाला म्हटले तर तें गोड त्याला नेऊन देता येणार नाही. किंवा साखरेच्या ऐवजी एखादे विषही नेऊन देण्याचा संभव आहे. म्हणून द्रव्याचे नांव घेऊनच सर्व व्यवहार होतो. रसादिकांच्या नांवाने व्यवहार होत नाही. या मी दिलेल्या हेतुवरूनही द्रव्यच प्रधान आहे.

चवथा हेतु सुश्रुताचार्यांचा असा आहे कीं शास्त्रामध्ये द्रव्यांची नांवे घेऊनच औषधी सांगितल्या आहेत. म्हणजे गोड, खारट, आंबट मिळून घ्यावे असे म्हटले नसून वाळा, चंदन, नागकेशर इत्यादि मिळवून घ्यावे असेच म्हटले आहे. म्हणून द्रव्यच प्रधान आहे.

विरोध - आणि द्रव्याची जितकी अवस्था असेल तितक्याच अवस्थेने रसादिक कोवळ्यात कोवळे व प्र्रात प्र्र असे राहतात. या पाचव्या हेतुवरूनही द्रव्यच प्रधान आहे. याप्रमाणे द्रव्यप्राधान्याविषयीं सुश्रुताचार्यांचे मत समीचीन आहे. - तथापि जे काम द्रव्यादिकांनी होत नाही ते काम प्रभावाने होते असे डल्लनाचार्यांनी सुश्रुताच्या भाष्यांत म्हटले आहे. हा मूलकारांचा व टीकाकारांचा विरोध तादृश भासतो.

परिहार - परन्तु त्याचा परिहार असा आहे कीं आम्ही जे वर मायारूप द्रव्य सांगितले ते अर्थातच त्रिगुणात्मक आहे व प्रभाव हा ईश्वरसंकल्परूप आहे असे आम्ही वरच म्हटले आहे. तो प्रभाव द्रव्यसत्त्वविशेषाने अधिक प्रकट होतो. म्हणून कार्यकारणाविषयी ईश्वरसंकल्परूप प्रभाव प्रधान असून तो प्रगट होण्याला आश्रयभूत द्रव्याची सात्त्विकता प्रधान आहे. - अशा रीतीने या दोहोंच्याही विरोधाचे निराकरण होते.

पुनः रसप्रधानवादी, वीर्यप्रधानवादी, विपाकप्रधानवादी इत्यादिकांची मतें सुश्रुतांनी संगृहीत केली आहेत. ती सर्व कार्य करण्याविषयीची असल्यामुळे त्यांच्यातही विरोध नाही. त्यांची मते योग्यस्थळी दाखवीन. ह्यांत कारणद्रव्य मानसिक सूक्ष्म रोग निवारण्याच्या उपयोगी पडत असून कार्यद्रव्य स्थूलरोग निवारण्याच्या उपयोगी पडतात. कारण कारणद्रव्य मनोमात्र व कार्यद्रव्य स्थूल आहे.

यद्यपि सर्वच द्रव्य मनोमात्र आहे असे आम्ही वर सांगितले आहे, तथापि कारणद्रव्य हे मानसगुणांचाच आश्रय करून राहतात. व कार्यद्रव्य हे स्थूल गुणांचाच आश्रय करून राहतात- असा त्या दोहोत भेद समजावा.

महाभूतांच्या पंचीकरणामुळे गौणप्राधान्यास्तव कार्यद्रव्यही एकरसगुणात्मक नाही. जर परस्पर साहाय्यामुळे एकदोषात्मक व्याधि होऊं शकत नाही तर औषधाने तरी एक गुणात्मक कां राहावे? ह्याचे कारण द्रव्य पंचभूतात्मक आहे,

म्हणून ज्या भूतांचा ज्या द्रव्यात अंश अधिक असतो ते तदात्मक म्हटले जाते.

पैकी जडपणा, स्थूलपणा, अचलपणा व गंधत्व ज्या द्रव्यांत उत्कट असतात ते पार्थिव म्हटल्या जाते.याच्या योगाने जडपणा, घनत्व, कठीणपणा व स्थूलत्व हे धर्म येतात.

पातळ, थंड, जड, गुळगुळीत, मंद, ओलसर, रस हे गुण ज्यात प्रधान असतील तें आप्य द्रव्य समजावे.याच्या योगाने ओषटपणा, स्त्राव, ओलसरपणा, आल्हाद व संधान हे धर्म येतात.

रुक्षता, तीक्ष्णता, उष्णता, प्रकाशत्व, सूक्ष्मत्व व रूपवत्व हे गुण ज्यात प्रामुख्याने असतील तें तैजस द्रव्य जाणावे, यांत दाह, कान्ति, वर्ण, प्रकाश व पचन हे धर्म आहेत,

रुक्षता, स्वच्छता, हलकेपणा, स्पर्शकत्व हे गुण प्रधान असून जे द्रव्य रुक्षता, हलकेपणा, स्वच्छता, विचार व ग्लानी उत्पन्न करते ते वायवीय द्रव्य जाणावे.

सूक्ष्मता, स्वच्छता, लघुमत्व शब्दोत्पादकता हे गुण मुख्य असून जे अवकाश देऊन लघुतमत्व उत्पन्न करिते ते आकाशात्मक द्रव्य समजावे.

याप्रमाणे ज्या ज्या भूतांचा ज्यांत अंश अधिक आहे त्याचे गुण त्यांत अधिक असतात.परन्तु इतर भूतांचेही गुण नसतात असे नाही.म्हणून सर्वच द्रव्यें युक्ति व योजना बरोबर झाली म्हणजे औषधरूप आहेतच.

आता कांही द्रव्यांत दोन दोन भूतांचे गुण असतात.जसे मेळंफळ इत्यादि वर चढणारी औषधें अग्नि व वायुसंबंधी आहेत.परंतु कांही अग्नि व वायुसंबंधी द्रव्यें खालीही जातात.जसे हारीतक्यादि, पण हा त्या द्रवाचा प्रभावच समजावा.

प्रभाव अचिंत्य असतो.सर्प हा विषमय असून देखील त्याचा मणी विषाला दूर करणारा आहे.हेहि एक प्रभावाचे अचिंत्य उदाहरणच होय.परंतु बहुशः अग्नि व वायु या दोन भूतांचे गुण ज्यात प्रधान आहेत अशी द्रव्यें ऊर्ध्वगामी असतात व बहुशः पाणी व पृथ्वी या दोन भूतांचे गुण ज्यात जास्त आहेत अशी द्रव्यें खाली जाणारी असतात.जसे निशोत्तर इत्यादि. तद्वत् एक, दोन, तीन, चार इत्यादि भूतांचे ज्यांत गुण आहेत.अशीही द्रव्यें आहेत.ती त्याच्या कार्यावरून ओळखावीत.विस्तारभयास्तव येथे सांगितली नाहीत.

येथपर्यंत हें द्रव्य विवेचन झाले.त्याचे ठिकाणीं असणाऱ्या गुणादिकाचे आता आम्ही वर्णन करतो.

गुण-विवेचन

द्रव्याचे ठिकाणी पहिला मुख्य रस हा एक गुण असून दुसरेही पुष्कळ गुण असतात.परंतु रूचीच्या संबंधात रसच मुख्य असल्यामुळे त्याचेच प्रथम वर्णन करतो.

शिष्य :- भगवन्! रस हा गुण आहे कीं दुसरे कांही आहे? कारण मला वाटते रस हा गुण नसावा.कारण गुणाचे ठिकाणीं गुण राहत नाहीत व मधुरादि रसांचे गुण तर चरक, सुश्रुतादिकांनी वर्णन केले आहेत.

श्रीगुरु :- श्रवण कर. सांख्याच्या मताने रस हे तन्मात्र आहेत.म्हणजे कार्यरूप द्रव्य आहे; व न्यायाच्या मताने रस हा गुण आहे.व वेदान्ताच्या मतानेही रस हा जलाचा गुणच आहे.

काही वैद्यांचे मत सांख्याला अनुसरून व कांही वैद्याचे मत न्यायवेदान्ताला अनुसरून असते.

जसे - सुश्रुतांचे मत पुष्कळ(पणे) पहिल्या प्रकारचे आहे व चरकांचे मत बहुशः दुसऱ्या प्रकारचे आहे.तथापि यांच्यात वाद उत्पन्न होण्यासारखा मतभेद नाही.म्हणजे सुश्रुताचार्यांनी द्रव्यवादात सांख्यपक्ष स्पष्ट दाखविला नाही.तरीही पहिल्याच्या म्हणण्याप्रमाणे रसाच्या साहचर्याने व परमार्थतः द्रव्याच्याच आश्रयाने गुण राहतात.असेच वाग्भटाचार्यानींही म्हटले आहे.

तथापि सर्व वैद्यांनी गुणशब्दाच्या अर्थातच रसाचा अंतर्भाव केला नसून रस व गुण निरनिराळे सांगितले आहेत.त्यावरून सांख्याश्रित वैद्य **रसाच्या ठिकाणी** गुण राहतात असा सिद्धांत करतात व दुसरे त्याच्या **साहचर्याने** गुण राहतात.परंतु रसाचे नांव पृथक् घेण्याचे कारण औषधींत त्याचा विशेष उपयोग आहे हे आहे असा सिद्धांत करतात.कांहीही झाले तरी कार्यांत भेद येत नाही. जसा चैतन्यदृष्टीने पुरुषाचा व ब्रह्माचा सांख्य-वेदान्तात विरोध येत नाही.तसाच न्याय वरील सिद्धान्तासही लागू करावा.रसाच्या साहचर्यावाचून औषधांच्या गुणांची अभिव्यक्ति मात्र होत नाही.म्हणून त्याचे वर्णन आधी करितो.

कोणतीही वस्तु तोंडात घातल्यावर त्याचा जो स्वाद लागतो त्याला रस

म्हणतात. हा रसच मुख्य आहे असे कित्येकांचे मत आहे. त्याला ते येणेप्रमाणे हेतु देतात -

शास्त्रामध्ये रसाचीच मुख्यता सांगितली आहे, जसे- रसाच्या आधीन आहार असतो व आहाराच्या आधीन जीवित असते. वेदाचार्यांच्या उपदेशावरूनही रसच प्रधान आहे. जसे - मधुर, आंबट व खारट रस वातशामक आहेत, इत्यादी. हे दोन हेतु झाले. तिसरा हेतु असा आहे कीं अमुक द्रव्य गोड आहे असें आपण रसावरूनच ठरवितो, यावरूनही रसच मुख्य आहे, असे ठरते. आणि आर्षवचनावरूनही रसच मुख्य ठरतो. याविषयी ही श्रुती प्रमाण आहे.

''किंचिद् इज्यार्थं मधुरम् आहरेद् इति''

श्रुत्यर्थ - 'यज्ञासाठी कांही गोड द्रव्य घेऊन ये' हा रस संयोगाच्या व अभिव्यक्तीच्या भेदाने जरी असंख्य प्रकारचा आहे तथापि महर्षी त्याचे सहा भेद करतात. ते गोड, आंबट, खारट, तिखट, तुरट व कडू हे होत.

(आर्ष = ऋषिप्रणीत, ऋषिसंबंधी, वैदिक)

(अपूर्ण)

***

१९. भिषक्पाटवोपपत्ति

(वैद्याच्या कौशल्याची उपपत्ति)

॥ प्रथमो अध्यायः ॥

वायूचा चय उष्ण व रूक्षांनी -	रोगास कारण
वायूचा प्रकोप शीत व रूक्षांनी -	रोगास कारण
वायूचा शम उष्ण व स्निग्धांनी -	औषध
पित्ताचा चय शीत व तीक्ष्णांनी.	रोगास कारण
पित्ताचा प्रकोप उष्ण व तिखटानी.	रोगास कारण
पित्ताचा शम शीत व मंदांनी.	(तिखट नव्हे ते) औषध.
कफाचा चय शीत व स्निग्धांनी	रोगास कारण

कफाचा प्रकोप उष्ण व स्निग्धानी	रोगास कारण
कफाचा शम उष्ण व रूक्षाने होतो.	औषध

*

वातावरचें औषध पित्त वाढवित नाही.
वातावरचें औषध कफाला वाढविते.
पित्तावरचें औषध कफाला वाढवित नाही.
पित्तावरचें औषध वातालाही वाढवित नाही.
कफावरचें औषध वाताला उत्पन्न करते.

*(**शब्दांचे अर्थ :- चय** = समूह, संग्रह, जमाव / **प्रकोप** = क्षोभ / **शम** = शमन, शांती / **उपष्टंभ** = आधार, धारण करणारा / **अवष्टंभ** = बलवाचकक, महत्व, अवरोध, अटकाव / **आतुर** = रोगी)*

औषध देण्याची रीती

सामान्यतः पित्तशामक औषध कोणत्याही दोषाला वाढविणारे नसल्यामुळे सर्वांच्या उपयोगी आहे. जसें - सुंठ

कफावरीत औषध वाताचा चय करीत असल्यामुळे वैद्यांनी खबरदारीने द्यावे. म्हणजे वाताच्या चयाला साह्य करणारे ऋतु वगैरे बाह्य करणें नसतांना द्यावे.

वातावरील औषध कफाला प्रकोप करीत असल्यामुळे योजिताना वैद्यांनी फारच खबरदारी घ्यावी. कारण चय स्थितीमध्ये जसे दोषाला जिंकता येते तसें प्रकोप स्थितीमध्यें जिंकता येत नाही. परन्तु कुशल वैद्याने वातावर औषध देतांना फार घाबरण्याचे कारण नाही. कारण वाताचे विकार ८० व कफाचे विकार २० आहेत. म्हणजे कफाचे चौपट वाताचे विकार आहेत. त्यामुळे कोणत्याही रीतीने विचार केला तरी चतुर्थांश वाताइतकीच कफाची शक्ति असून पुढे राहिलेल्या तीन हिस्से वाताबरोबर कफाचा मुळीच संग नसणें अशी स्थिती सांपडणे शक्य आहे. तिचा वैद्याने शोध करून कफाला न भितां वातावर औषध द्यावे.

तो शोध असा की वाताची व कफाची स्थानें एक नाहीत. त्यामुळे कफ जो जवळच्या स्थानातील किंवा कफाचे स्थानातील वात जर दूषित नसला व

दुसऱ्याच कोण्या स्थानांतील दूषित असला तर त्यावर निर्भयपणे औषध द्यावे.

पुन्हा असाही शोध करावा कीं दोषांचे विकार अगदी तोंडपाठ करून वाताच्या बरोबर कफाचा विकार आहे की नाही हे आतुर कथनादिकावरून स्पष्ट जाणून चिकित्सा करावी.

पण हा शामक चिकित्से विषयीं विचार केला आहे.'वर्धक' चिकित्सेविषयीं विचार केला नाही.

शंका :- तर मग औषध म्हणून जगांत नसून परस्पर विरुद्ध प्रतिक्रियाच परस्पराला औषध होते म्हणावयाचे ?

उत्तर :- मुळीच नाही. असे म्हणणे म्हणजें तुझ्या म्हणण्याप्रमाणे रोग वाढविणारें कारण व औषध एकच; पण तसे नव्हे.

आतापर्यंत सांगितलेल्या औषधामध्ये कांहीं औषधे अशी आहेत कीं ते काहीच नुकसान पोचवीत नाहीत. जसें - पित्तशामक व कांही औषधे अशी आहेत कीं ते चय करितात किंवा प्रकोप करितात. परंतु कोणतेच औषध चय व प्रकोप दोन्ही करीत नाही. आणि इतराचे शमनही करीत असते. - पण रोगांच्या कारणाची गोष्ट तशी नाही. रोगांचे कारण दोषांचा चय व प्रकोप दोन्ही स्वतःच करीत असून कोणत्याही दोषाचे शमन करीत नाही, हा या दोहोतील स्पष्ट भेद समज.

प्रश्न :- तर मग यांची योजना कशी करावी?

उत्तर :- ऐक. पित्त नष्ट नसल्यास पित्तशामक औषध केव्हाही द्यावे व कफ शामक औषध देतांना वाताचे वेळी तत्काळ वातशामक औषध देत जावे व वातावर औषध द्यावयाचे असल्यास कफ थोडा जरी असला तरी वात व कफाशिवाय नुसत्या वातावर औषध देऊ नये. म्हणजे किंचित् जरी कफ असला व वात प्रधान असला तर वात व कफ या दोन्ही दोषांची एकदम चिकित्सा करावी. पण कफ नसेल तर एकट्या वातावर औषध द्यावे. द्विदोष व त्रिदोषांची विशेष चिकित्सा गुणोक्त केल्याशिवाय उपाय नाही.

या प्रमाणे भिषक्पाटवोपपत्ति तुला थोडक्यांत सांगितली.

॥ इति भिषक्पाटवोपपत्तिः प्रथमः अध्यायः ॥

०००

॥ द्वितीयो अध्यायः ॥

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

मूलं कवचबीजस्य मधुत्रितयसंयुतम् ।
सितासमन्वितं वापि सर्वज्वरनिवारकम् ॥
प्रविकृंत ज्वरं चेयमानयित्वा विनाशयेत् ।
न ग्रन्थे कोप्ययं योगो सिद्धो वृद्धानुभूतितः ॥

कर्णरोग :-

कडू निंबाची काडी चिरून त्यांत डिकेमाली व सुंठ भरून व चिंधी लावून तेलांत भिजवून पेटवून वाटींत त्याचे थेंब घ्यावे; व सर्व कर्ण रोगावर कानांत टाकावे.

वातरोग :-

भुईदोडी, कडुबदाम, फुलधावडी, काही टाहाकळ (ऐरणमूळ), उतोती (ब्रह्मदंडी) हे सर्व एका दिवशी आणून उबडहांडीने अथवा चोगा भट्टीने तेल काढून (अर्क) विड्याचे पानास लावून सर्व वातरोगावर देणे. **पथ्य** -कडक.

उन्हाळी :-

भराटीचा पाला ठेचून पाण्यात गरगोट करून उन्हाळीवर पाजावा.

(बापूगडी हरदास याने, महाराजांनी सांगितल्याप्रमाणे लिहून दिलेले)

अथ यकृत्प्लीहादिषु :-

कासी साब्धिजयोश्चूर्णे समे कृत्वा विनिक्षिपेत् ।
षोडशैर्गुणिते शुद्धे जम्बीरस्य रसे बुधः ॥१॥
रुद्धकुप्यां विनिक्षिप्य बाष्पं तस्यां निरोधयेत् ।
दिनत्रयोर्ध्वं संयोज्यं यकृत्प्लीहोदरेषु वै ॥२॥
अर्धकर्षा द्विकर्षान्ता मात्रा सेव्या यथाबलम् ।
मासमात्रेण नश्यन्ति रुजः प्लीहयकृद्भवाः ॥३॥

अथ ज्वरे प्रयोग :-

नीविकावृक्षपत्रस्य कल्कः शीतज्वरापनुत् ।
अनुभूतः प्रयोगोऽयं वृद्धैः सम्यक् निरूपितः ॥४॥

अन्या -

सौराष्ट्री भर्जिता देया ज्वरावृत्तिक्षणात्पुरा ।
एकाहिकं द्वयाहिकं च त्र्याहिकं हन्ति साधु वै॥५॥

अथ अभ्रकमारणम् -

शुद्धधान्याभ्रकं खल्वे सूर्यक्षारेण मर्दयेत् ।
चतुर्थांशेन दध्ना च सर्वमेव विभावयेत् ॥६॥
पचेद्गजपुटे पश्चादेवमेव पुनः पुनः ।
सूर्यक्षाराष्टमांशेन दद्याद्गजपुटद्वयम् ॥७॥
केवलेन पुनर्दध्ना दत्वा गजपुटद्वयम् ।
निश्चन्द्रकं स्वाङ्गशीतं भस्मोद्धृत्य जले क्षिपेत् ॥८॥
यावन्निर्लवणं तोयं तावत्प्रक्षालयेत धिया ॥
छायाशुष्कं समुद्धृत्य शुभ्रमर्भकभस्म तत् ॥९॥
दृढं जीर्णज्वरं हन्ति सूतिकामरुदुद्भवम् ।
दाहं हन्ति यथा भार्या कामतप्तस्य चुम्बनात् ॥१०॥

सूर्यावर्ते अर्धशीर्षे च -

द्विदलं भवितुं योग्यमपामार्गस्य मूलकं ।
आनीयाद्विदलीकृत्य कटिमेकां करे वहेत् ॥११॥
द्विदलेन शिरः स्पृष्टं वारमष्टोत्तरं शतम् ।
सूर्यावर्ताद्यर्धशीर्षरोगान् हन्ति न संशयः ॥१२॥
पर्णकल्क पिण्डयोः स्थितं काास्यम् ।
भस्मी भवेत् पुटैकानुभवितुम् योग्यमस्ति वैद्यैस्तत् ॥१३॥

कांस्यमारणप्रयोग :-

दशमुखविपर्ययतरोः पर्णकाभ्रकं च
अभ्रकं च रवेः क्षारं गृहीत्वा च समं समम् ।
गोमूत्रेण भावयित्वा पश्चाद्गजपुटे पचेत् ॥
भस्मीभवत्यसौ दत्तः सर्वज्वरविनाशनः ॥१४॥

अर्शरोग :-

समं समं गृहित्वाऽथ गन्धकं कर्पुरं तथा ।

चूर्णीकृता सितायुक्तं भक्षणादर्शनाशकम् ॥१॥
दीपावलितरोर्मूले लेपनादर्शनाशकृत् ।
पर्णान्यथवा मौषिक्याः अर्शो निघ्नति भक्षणात् ॥२॥
(दीपावली - दिवाळी / मौषिकी - उंदीरकानी)

घटसर्पः-

कोकिलाक्षार्द्रपत्रस्य गुडेन गुटिकां कुरु ।
यथाकालं त्रिकं देहि घण्टिकासर्पनाशकम् ॥१॥
(कोकिलाक्ष - तालिमखाना)

***

भावप्रकाश (पान ३१३)

शाकेषु सर्वेषु वसन्ति रोगास्ते हेतवो देहविनाशनाय ॥
तस्माद्बुधः शाकविवर्जनं तु कुर्यात् तथाम्लेषु स एव दोषः ॥४॥
(भोजनाचे) रहस्य :- शाकविवर्जनम्

संस्कारमात्राबलं ज्ञात्वा भक्षणीयाः शाकाः भक्षयन्तु जनाः ।
शाकवर्जनं तु सर्वथा रोगरहिताय त्वरिकाकृतं सुप्तं शुद्धघृतेन संस्कृतं गोधूमं, तण्डुळमुद्गं नित्यमन्नं मतं मम ।
योग्यं स शार्करमिति एतेषां पदार्थानां तिक्तमिश्रितं वा शाका प्रति निधातं(धातं) कुर्यात् ।
अन्यानि पक्वान्नानि वा हिताय भवन्ति यदि अपेक्षणीया शाकास्तदा उच्यन्ते यत्तु पदार्थेषु दोष एव नास्ति ।
संस्कारेणैव पदार्था दूषिता भवन्ति ।
इति नलाचार्यैरुक्तं तत्संस्कारवेत्तृणामेवोचितं शाकविवर्जनम् ।

श्लोक :-

जाङ्गलानूपभेदेन भेषजस्योष्णशीतता ।
विचारेण मया ज्ञाता पश्चात् शार्ङ्धरात् श्रुता ॥
अत ऊहवतां ज्ञानं ग्रन्थकर्तुः समं भवेत् ।
तस्मात्सत्त्वयुतो भूत्वा कुर्यात् तत्त्वविवेचनम् ॥

- भाद्रपद वद्य १० रविवार

॥ श्री ज्ञानेश्वर माउली ॥

शुद्ध पारा, गंधक, लोहभस्म, ताम्र, नाग भस्म, सुंठ, मीरें, पिंपळी.

ही सर्व समभाग, या सर्वांच्या अर्धा- शुद्ध केलेला बचनाग, यांचा आल्याच्या रसात दोन दिवस खल करून गुंज प्रमाण गोळी करून अतिशय दारुण नवज्वर, धातुज्वर, ग्रहणीरोग इत्यादिकावर ''नवज्वरेभसिंह'' द्यावा.(बस्वराज)

विसूचिकापहम्

महागरुडपुराणातून घेतलेले

हरिद्रा निम्बपत्राणि पिप्पल्यो मरिचानि च ॥
विडङ्गं भद्रं मुस्तश्च सप्तजं विश्वभेषजम् ॥
गोमूत्रेण च पिष्ट्वैव कृत्वा च वटिकां हरेत् ।
अजीर्ण हृद्भवौकं द्वयं विसूचिकापहम् ॥१०॥ (गरुडपुराण)

व्योषं सौवर्चलं सीता प्रमालूरसंयुता ।
वटीयमरुचिं हन्ति भीमवद्वर्धयेत् क्षुधाम् ॥१॥
गन्धकं सैधवं व्योषं लशुनं हिंगुजीरकम् ।
धृत्वा शुद्धं समं कार्या गुटिका जम्बिराम्बुना ॥२॥
अग्निमान्द्यमजीर्णं च आमशूलं विसूचिकाम् ।
विविधं कृमिदोषं च वटीयं हन्ति भक्षणात् ॥३॥

विसूचिकांगम् लघु ग्राह्या न तु वृद्धा ।
अथवा नेयं गुटिका विषूच्यानुकूला ।
नापि कर्पूराद्यरिष्टवत् विषूच्यौषधम् ।

जलजं त्वक् पुटेन मृतं ताम्रं परीक्षयेत् ।
यथावत्तिष्ठते भस्मा प्रमुक्तिष्ठते पुनः ॥
(सर्वेषां मृतधातूनामियं परीक्षेति केचित्कल्पयन्ति)
भल्लातकं भागमेकं त्रिगुणां त्तित्तिडी भवेत् ।
भल्लातकसमा शुण्ठी तदर्धं सैन्धवं तथा ॥४॥
सर्वेषामौषधानां च गृहीत्वा वै गुडं समम् ।
मेलयित्वा माषमानाः कार्यास्तु गुटिका सदा ॥५॥

दत्ता विषूचिं हन्युस्ताः घोरामपि यथाबलम् ।
आद्या देया मुहूर्तेन मुहूर्तैस्तु त्रिभिः पुनः ॥६॥
व्योषं बिडं लवणं गंधं सैंधवं टंकणं तथा ।
हरीतकीं विचूर्णेतत् शिग्रुद्रवेण पेशयेत् ॥८॥
गुंजामिता गुटिका सा देया तप्तेन वारिणा ।
तूर्णं विनाशयेच्छूलं विशूच्यामपि संस्थितम् ॥९॥
अत्राप्येव कुबेराक्षीं रामठं विश्वभेषजम् ।
मेलयित्वापि संयोज्यमिति तद्ध्यनुभूयताम् ॥१०॥
यावन्नानुभवस्तावत्पूर्वपाठं न लंघययेत् ॥

(मराठी)

सागफलकुबेराक्षी हिंग सैंधव घेउनी ।
शूळीं उष्णोदकें द्यावे साग भर्जित पाहिजे ॥११॥

॥श्रीज्ञानेश्वरमाउली॥

ता.१३-१-१९१४

पीयुषा

अत्वग्बीजमप्राम्रमांसं कृत्वा तु खण्डशः ।
पाचयेत्प्रपल्लवेन वह्निप्रं समुद्धरेत् ॥१॥
सीतादुग्धं मेलयित्वा वासयित्वा सुवासनैः ।
वस्त्रेण गालयेत्पात्रे मैलैः करैः ॥२॥
पीयूषैषा गुरुस्निग्धा तृड्विजित् तृप्तिदा मता ।
दुर्जरा बहुभुक्ता चेत् महदाभविवर्धिनी ॥३॥
मानसात्म्यं मनुष्याणां द्रव्यसात्म्यं न विद्यते ।
न सर्वं मल्लसात्म्यं हि गुंजासात्म्येन दृष्यते ॥४॥
स्वौषधं दीर्घरोगेऽतो बुद्धिमान्न परित्यजेत् ।
विवर्धयेत् यथा शक्त्या धक्तिपाते विवर्जयेत् ॥२॥
एवं न हीनवीर्यस्य चिन्तनीया गतिः चित् ।
सर्वे द्रव्याणवोपि स्युः शुष्कवत् हीनधर्मिणः ॥
वर्धयेत् तन्न द्विगुणत्वेन ।

मल्लाभ्यासकस्य अभ्यासद्विगुणत्वं विना साधारणमनुष्यमारकमानेन मरणदर्शनात् ।
विषन्यायस्तु दृष्टान्तमात्रेण सिद्धान्ते योजनीयः ।
शक्तिपाते अधिकमानग्रहणसामर्थ्याभावे प्रथममपि वा केनचिद्वैकल्येन ।
अरसायनानामेवायं विधिः अन्यथा कस्यचिद्रसायनस्य
नित्यसेवनविधिविरोधः स्यात् ।
केषाचिदल्परसायनानामपि भवतु वा विधिः।

०००

२०. अभंग व पदे

२१५९

जोहार

जोहारजी मायबाप । आलो घेऊनी निरोप ।
गावाचा ताल गेला । अधिकारी घेती झोप ॥१॥
जीवाजी पाटलानं । काहाले लगन केलं ।
मग ताई पाटलीन्नं । गाव नाशाले नेलं ॥२॥
ददंभाजी परधानानं । नाईक नेमला काम ।
त्यासंगे लोभ्यावानी । खाना खातो हराम ॥३॥
क्रोधाजी जागल्यानं । शांतिबाई नागविली ।
मदाजी सेटोबानं । माया मांगिन ठेविली ॥४॥
यमाजी बादशहाला । बाबा तं लहर आली ।
आम्हां गरीबाचा । कोणी नाही आहे वाली ॥५॥
आळंदीश्वरा चाला । सैन्य घेऊनि सकळ ।
पिटोनी हरामजादे । सांभाळा आपुले कुळ ॥६॥

२१६०

यावे वाटे लोटांगणी । ठाव सांगा सांगा कोणी ॥१॥
कोण्या स्थळी माझी माय । मज विसरली काय ॥२॥
कासावस जीव । केव्हां घेईन मी धाव ॥३॥
आळंदीवल्लभे । जीणे तुजविण न शोभे ॥४॥

२१६१

यई रे रामराया । माझी कष्टली काया ।
त्रासला जीव माझा । वारी आपुली माया ॥१॥
आंधळ्या डोळ्याने । वाट दिसेना कांही ।
धर्माचे मायबाप । दाखवाया कोणी नाही ॥२॥
चालत जाय जेथे । तेथे तेथे गोटेकाटे ।
नुमजे गावा तुमचिया । यावे कवणिया वाटे ॥३॥
आळंदीवल्लभा रे । धैर्य धनुष्यपाणि ।
हृदय अयोध्येचे । राज्य करीतो निर्वाणी ॥४॥

२१६२

दाखविता पाय । शीण तुज होतो काय ॥१॥
आणिकाची कोटी । ध्यात नाही जगजेठी ॥२॥
पाहुनी लोचनी । चित्त ठाके समाधानी ॥३॥
ज्ञानेश्वर स्वामी । सुलभचि अन्तर्यामी ॥४॥

२१६३

कालविला दहीभात । विनवी जोडुनि हात ॥१॥
आतां सोडा सारी चिंता । ग्रास घ्यावा कृपावंता ॥२॥
सांभाळितां भक्त संत । नाही निमिष उसंत ॥३॥
समी आळंदीवल्लभा । भवत्सौख्य आम्हा शोभा ॥४॥

२१६४

केव्हांचि मी पाहे वाट । पाहुनिया स्वर्णताट ॥१॥
कानवला कुंडलिनी । पुरी रसाला सुगुणी ॥२॥
सारक शाखा सांडगे अपूप । सुधारसादि अमूप ॥३॥
ज्ञानियाचे धन्य दैव । नैवेद्यार्थ क्षुधाभाव ॥४॥
नित्यतृप्ती देव भक्तां । देवोनी घे दहीभाता ॥५॥
ज्ञाननाथा प्राणप्रिया । भली प्रीती जेवावया ॥६॥

२१६५

जान्हवी जीवन । त्रिभुवनी ते पावन ॥१॥
भाव माझा भगीरथ । पुण्य पृथिवी भरित ॥२॥
पापे केली जन्मभरी । जाळियेली एकसरी ॥३॥
ज्ञानेश्वरनाथ । मूळबळे तारी लोक ॥४॥

२१६६

कुळ तेचि पुण्यवंत । ज्यात देवता महंत ॥१॥
कैवल्य तयाचे करी । जो घे सद्‌गुरु चाकरी ॥२॥
तसा नाही कर्माकर्म । मुखे गातो कृष्णनाम ॥३॥
त्याची गेली भवचिंता । ज्ञानेशजा अनुमंता ॥४॥

२१६७

शिणले नयन पाहोनिया वाट । चढवेना वाट अवघड ॥१॥
एकली ये वनी न मिळे हातिरू । न दिसे पाखरू आडराने ॥२॥
आघवी जाणीव जाहलिया गूढ । सुलभ की गूढ कळेचिना ॥३॥
आळंदीवल्लभे तुझा भरंवसा । उचित तो तैसा मार्ग दावी ॥४॥

२१६८

आळस न जाय जंव अंतरीचा । तंव कां या कर्माचा अभिमान ॥१॥
जंव न साधेल अखंड भावना । तंव उपासना लाजिरवाणी ॥२॥
समुद्धि नाही जंव सर्वांभूतीं । तंव ज्ञानस्थिती कोरडीच ॥३॥
ज्ञानेश्वरकन्या नेणे खटपट ।नारायणपाठ वाचे गाय ॥४॥

२१६९

माझे पंढरीये गोत । रखमा माय विठ्ठल तात ॥१॥
नाही आणिकाची चाड । नको साधन काबाड ॥२॥
चंद्रभागेचिये तिरी । कटी कर उभा हरी ॥३॥
सांडोनिया वैकुंठ । दासाचे घे ताकपीठ ॥३॥
ज्ञरनेश्वर स्वामी राजे । उघडाजी विठ्ठल गुजे ॥४॥

(वरील अभंगांचे क्रमांक ''अभंगांची गाथा'' यष्टी ९-पूर्वार्ध यात आलेल्या २१५८ क्रमाकाचे पुढील आहेत / अभंगांच्या गाथेची पुढील आवृत्ति मुद्रित करताना (२१५९ ते २१६९) या ११ अभंगांचा समावेश तीत करावा.....संपादक)

श्री कुर्याभाई, चांदूरबाजार यांना पत्र

(**हरिदास, मुळे, भालेराव, खापरे इ.ना लिहिलेल्या पत्रातून / यष्टी ७ वी** –

आपल्या येथें वाचन व वेदान्तचर्चा चालत असते हें मला बऱ्याच दिवसांपासून माहित आहे. ह्मणून त्या चर्चेत मी कांही प्रश्न पाठविले आहेत; त्याचें विचारानें उत्तर पाठवितील, अशी आशा आहे.हें माझे प्रश्न न्यायशशास्त्रसंबंधी आहेत व त्यांचे उत्तरही मला न्यायानेंच ठाऊक आहे. पण आपली चर्चा अशा विचारानें परिप्लुत व्हावी, ह्मणून हे प्रश्न मी पाठवीत आहे. या प्रश्नांचा योग्य विचार व्हावा; नाहीतर अर्धवट नवीन वादकाप्रमाणें -

***सामान्य** ह्मणजे अभेद ज्ञान किंवा साधर्म्य; ***प्रामाण्याचे परतोग्रहण** ह्मणजे अन्योन्याश्रय;
***सन्निकर्ष** ह्म. सन्निधी किंवा समीपता; ***दृष्टिसृष्टिवाद** ह्मणजे संकल्पतीव्रपणा;
***ज्ञातसत्त्व** ह्म. क्षणिक विज्ञानवाद; ***सर्वज्ञता** ह्मणजे ईश्वराचें ज्ञानांत त्रिपुटीचा अभाव;

– इत्यादि विपरीत अर्थ घेण्यासारखी स्थिति होऊन, प्रश्नांचा आशय न समजून, उत्तरही देतां येणार नाही. **नवीन वादकामध्यें अयोग्य शब्दार्थ प्रयोग फारच दृष्टीस पडतो;** व त्यामुळें कल्पपर्यंत वाद तुटणें अशक्य होतें. ग्रंथकाराचें ह्मणणें काय आहे हें योग्य न समजून घेतल्यामुळें, पुष्कळवेळा आपल्या मनांत शब्दांचें विपरीत अर्थ येत असतात. वरील चारपांच शब्दांचें उदाहरण देऊन, त्याचा विपरीत अर्थ कसा होतो व शास्त्रीय अर्थ कसा आहे, हें सांगून नंतर उत्तर लिहितों. (यष्टी ७-१२५) - - याप्रमाणें हे न्यायावर प्रश्न आहेत. त्यांचे उत्तरही निष्कर्षतः न्यायांत आहे पण आपणही याचा बुद्ध्यनुसार विचार करावा. (साक्रेटिस मेथड) साक्रेटिसच्या रीतीचा अंगिकार करून आपणाला थोडी अशा विचाराची संवय लावावी ही इच्छा आहे; पण एवढें मात्र लक्षांत ठेवावें कीं -

''मी आपल्या ग्रंथांत एखाद्या शास्त्राचें खंडण केल्याशिवाय, माझ्या सहज बोलण्यात आलेल्या शास्त्रावरील आक्षेपानें, कोणत्याही शास्त्राविषयी उगीच अनादर करून घेऊं नये.

वादीची हुर्यो उडविण्याविषयीं माझें कांहीं ह्मणणे नाहीं; पण केव्हा केव्हां असें होतें कीं माझ्या सहज बोलण्यातील आक्षेपाला उत्तर नाही असे (य७-१३१) समजून त्या शास्त्रविषयी अनादर होतो. तसे होऊ देऊ नये. ***श्रीगुलाबरावमहाराज)***

॥ सर्वत्र यशस्वी ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

॥ ॐ तत्सत् ॥

भगवान् वेदमूर्ति तीर्थरूप महाराज ईशमान्य ईशश्री कुर्याभाई व मोतिरामभाई यांचे चरणी दासानुदास बालक गुलाब याचा साष्टांग प्रणाम.

विनंती विशेष.

लिहिण्यास कारण गुरुवारी संध्याकाळी साधेराजबाबाचा व आपला बराच संवाद झाला. त्यात मलाहि ग्राह्य गोष्टी बत्याच निघाल्या, परंतु कांही शंका राहिल्या आहेत. त्यांचे मनन करून लिहून पाठवितो.

१. (गीता कोणासाठी) शंका :- गीता भगवंताने अर्जुनासाठीच सांगितली आहे काय?तसे जर असेल तर अठराव्या अध्यायाच्या ७२ व ७१ श्लोकात जे मनुष्य आमच्या संवादाचे श्रवणपठण करतील ते मुक्त होतील असे कशाला म्हटले?

२. (वासुदेव व कृष्ण) दहाव्या अध्यायात ''वृष्णीनां वासुदेवोऽस्मि'' या शब्दांनी 'मी वासुदेव आहे' असे सांगितले असतांहि 'वासुदेव कृष्ण नव्हे' असा अर्थ केला. कारण सांगणारा (व) ज्याचे विषयी सांगावयाचे आहे तो, हे एकच नाहीत म्हणून?

हे जर खरे आहे तर पंधराव्या अध्यायाच्या १७ व्या श्लोकात 'उत्तमः पुरुषस्त्वन्यः' तसेच १८ व्या अध्यायात असे म्हटले आहे की ''ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति । भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥ / तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत । तत्प्रसादात् परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥ असे १० व्या अध्यायात सांगणारा आणि ज्याच्याविषयी आहे तो भिन्न आहेत म्हणून वासुदेव मी नव्हे. तसेच १८ व्या अध्यायात सांगितले की, सर्व भूतांच्या हृदयात ईश्वर वास करतो. हे अर्जुना, त्याला तूं सर्व भावाने शरण जा म्हणजे त्याच्या प्रसादाने तुला शांती आणि नित्य स्थळ प्राप्त होईल. - तर मग सांगणारा आणि ज्या विषयी सांगावयाचे आहे तो, हे दोन्ही भिन्न असल्यामुळे येथेही 'कृष्ण ईश्वर नव्हे' असे ठरविण्यस काय हरकत आहे? असो.

३. याच अध्ययात आणखी एके ठिकाणी म्हटले आहे की ''सवधर्मान्परित्यज्य मामेकु शरणं व्रज ॥'' वाहवा ! एका श्लाकात सांगितले आहे की - त्या ईश्वराला शरण जा आणि दुसऱ्या श्लोकात म्हटले आहे की 'एकट्या मला शरण ये.' तेव्हा हा घोटाळा नव्हे काय?

वासुदेव जर कृष्ण नव्हे तर यादवकुळात अवतारच घेतला नाही काय? कारण ''वसुदेवस्य अपत्यः पुमान् वासुदेवः'' असा 'तद्धित' होतो. मग कृष्ण वसुदेवाचा पुत्र नव्हे काय?

४. समरूपत्व? :- परमेश्वर समरूप आहे की परमविष्णुरूप आहे? - समरूप आहे म्हणाल तर भिन्न भिन्न योनीत भिन्न भन्न जीवांना घालण्याचे कारण काय?

९ व्या अध्यायाच्या २९ व्या श्लोकात ''समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः।'' आणि १६ व्या अध्यायात क्षिपाम्यासुरी आसुरीं योनिषु'' असे म्हटले आहे. तेव्हां हे दोन्ही वाक्य विरोधी नाहीत काय?

आणखी चवथ्या अध्यायात, ''अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽसन्। प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ॥'' - असे म्हटले आहे. ईश्वर अज

असूनहि स्वमायाश्रयाने जर जन्म घेतो तर तो मायावश आहे, असे म्हणण्यास काय हरकत आहे?

मी सर्वाभूतीं सारखा आहे, मला कोणी शत्रू नाही व मित्र नाही, असे ९ व्या अध्यायात म्हटले असून पुन्हा चवथ्या अध्यायाच्या ८ व्या श्लोकात - ''परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् । धर्मसंस्थापनाय संभवामि युगे युगे ॥८॥'' आणि सातव्या श्लोकात - ''यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत । अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥७॥'' असेही म्हटले आहे. हा पूर्वापर विरोध नव्हे काय?

६. ईश्वराची सत्ता :– ईश्वर सर्वसत्तावान् आहे की अल्पसत्तावान् आहे? सर्वसत्तावान् म्हणाल तर सर्वांच्या हृदयीं ईश्वर असून जीवाला अज्ञान कसे राहिले? अज्ञान मायेने घातले म्हणाल तर सर्वसत्तावान् ईश्वरापेक्षा माया बलवान् नव्हे काय? जीवाला अज्ञान मूळचे आहे म्हणाल तर ईश्वराच्या सत्तेखाली ते राहिले कसे? आपणच राहिले म्हणाल तर ईश्वराला पुष्कळच सत्ता आहे तशीच अज्ञानाला थोडीतरी सत्ता आहे असे म्हणण्याला काय हरकत आहे? मग त्या अज्ञानाच्या अपेक्षेने ईश्वराचा थोडासा भाग सत्ताहीन आहे असे म्हणण्याला काय हरकत आहे?

७. ईश्वराचे सामर्थ्य :- ईश्वर सर्वसामर्थ्यवान् आहे की अल्पसामर्थ्यवान् आहे? सर्वसामर्थ्यवान् म्हणाल तर जीवाला पहिलेच कां उद्धरिले नाही? बिचाऱ्याला सृष्टीत आणून त्याच्यामागे आपणही अवतार घेण्यास कां प्रवृत्त झाला?

८. ईश्वराचे स्वातंत्र्य :- ईश्वर राजासारखा किंवा स्वतंत्र आहे? स्वतंत्र आहे म्हणाल तर मायावश होऊन अवतार घेण्याचे कारण काय? जीवाला मोक्ष देण्यासाठी, असे म्हणाल तर बसल्या ठिकाणाहून जीवाला मोक्ष ईश्वराला देता येत नाही काय?

९. अवतारशरीर :- १३व्या अध्यायाच्या १३व्या श्लोकात – ''सर्वतः पाणिपादं तत्सर्वतो मुखम् । सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥१३॥'' असे म्हटले आहे. हे जर खरे आहे तर ईश्वराने आपले 'सर्वगतत्व' सांडून 'एकदेशीय शरीरगत' होऊन अवतरावे हा उणेपणा नव्हे काय? ईश्वराचे

अवतार शरीर जरी कारणभूतांचे घेतले तरी कार्यरूप झाल्यावांचून ते दिसणार नाही, मग आमच्या शरीरात व ईश्वर शरीरात भेद काय?

ईध्वराचे शरीर योनिसंभव आहे की अयोनिसंभव आहे? - अयोनिसंभव म्हणाल तर देववकीला गर्भ राहिला. तो दिवसानुदिवस तेजस्वी होत चालला. देवांनी त्या गर्भाची स्तुति केली इत्यादि विषय भागवतात आहे आणि अष्टवर्षाची मूर्ति समोर आली असेही आहे तेव्हा ही लटपट नव्हे काय?

९ गीतेचा कर्ता :- भगवद्गीता स्वतः कृष्णाने केली की कोण्या कवीने केली कृष्णाने सांगितली जर म्हणाल तर पहिल्या अध्यायात जी युद्धप्रसंगकथा आहे आणि त्यात अर्जुनविषाद सांगितला आहे आणि पुनः त्यात धःतराष्ट्राच संजयाला प्रश्न, हे सर्व श्लोक कृष्णानेच गठिले आहेत काय?

१०. येवढ्या मोठ्या युद्धप्रसंगात भगवंताला छंदोबद्ध गीता सांगण्याचे कारण काय? आणखी पुनः अठराव्या अध्यायाच्या ७८ व्या श्लोकात म्हटले आहे की,यत्र योगेश्वरो कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः । तत्र श्रीर्विजयोर्भूतिर्धुवा नीतिर्मतिर्मम ॥७८-१८॥ - येथे सांगणारा आणि ज्याविषयी सांगावयाचे तो, हे दोन्ही एकच आहेत की भिन्न आहेत? एकच मानले तर न्यायदृष्टीने ही 'अत्युक्ति' होईल. आणि भिन्न मानले तर 'कृष्णोने गीता केली नाही' असे कबूल करावे लागेल.

बरे, कोण्या कवीने केली म्हणाल तर जशी इतर कविकृत पुराणे घोटाळ्याची आहेत तशी गीताही आहे, असे म्हणण्याला प्रत्यवाय कोणता?

॥ शंका समाप्त ॥

टीप - अहो महाराज, **या सर्व शंकांची उत्तरे श्रुति-युक्ति-अनुभवाने पाठवावी.** किंवा साधेराजबाबास पुसून पाठवावी.

परंतु जशा माझ्या शंका आहेत तसेच हुबेहूब खंडन पाठवावे. येवढी माझी दीन लेकराची कर जोडून विनंती आहे. तीस आश्रय मिळेल अशी अआशा जाणून हा वेडा वाकडा लेख फूल तर नव्हेच पण फुलाची पाकळी यान्यायाने चरणी समर्पण केला. बहु काय लिहिणे. कळावे ही विनवणी.

॥ ॐतत्सत् श्रीज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

– गुलाब गोंदूजी मोहोड

२१. श्रौतक्रीडाविशेष

(कैवल्यपट अर्थात् मोक्षपट)

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

अध्याय १ ला

श्रीमद् ज्ञानेश्वराचार्य नत्वानंदमजं विभुम् ।
श्रौतक्रीडाविशेषोऽयम् बालबोधाय तन्यते ॥१॥

यालोकांमध्ये आपलें तीनच गोष्टी मनोरंजन करितात. स्त्री, काव्य आणि खेळ.

१. त्यामध्यें स्त्री जी आहे ती रजोगुणी असून तिला खर्च वगैरे पुष्कळ लागत असल्यामुळे ती परिणामी दुःखदात्री आहे.

२. आतां काव्य हें मनोरंजन करितें, परंतु तें विद्वानांचे. परंतु रसहानि झाली असतां दुःखही पण देते. म्हणून कार्यापुरतेच अंगी मनोरंजन करण्याचे यांत सामर्थ्य आहे.

३. आतां राहिली क्रीडा म्हणजे खेळ. खेळ हाच सर्वांना सर्वदा मनोरंजन करणारा आहे.

प्रश्न :- अहो, मनोरंजन करणारा खेळच जर म्हणतां तर निद्रा, समाधि इत्यादिहि ठिकाणी मनोरंजन होतें. मग त्यांनाही खेळच म्हणावें लागेल.

उत्तरः- अरे, तुला मनोरंजन शब्दाचाच अर्थ मुळीं समजला नाही. कारण सुषुप्ति, समाधिआदि आत्मयाच्या जवळच्या सुखामध्यें मनच नसतें, तर मनोरंजन कोठून होईल? तेथें आनंद मात्र असतो म्हणूनच खेळ हा आनंददायक म्हटला नसून मनोरंजन आहे असें म्हटलें आहे. म्हणून समाधिआदि स्थानी अतिव्याप्ति नाहीं. आतां खेळ म्हणजे काय याची व्याख्या सांगतों.

खेळाची व्याख्या व पांच अंगे -

''कल्पित वस्तूचे आकार घेऊन अथवा अधिष्ठान खरें आणि वस्तु खोटी- म्हणजे मृत्तिका खरी आणि तिची केलेली कल्पना खोटी, याप्रमाणें प्रातिभासिक सत्तेचे आकार कल्पून आपल्या मनाला आवडेल तसा समाधानपूर्वक

कालक्षेप करणे'' याला खेळ म्हणतात. त्या खेळाचीं पांच अंगे आहेत. **नाम, रूप, संख्या, योजना आणि सूचना.** त्यांतली चार साधनरूप आहेत आणि सूचना हें फळ आहे. उदाहरणार्थ - आपण सारीपाट घेऊं. या खेळांत ही पांचही अंगे लागू पडतात -

१. पहिले अंग **''नाम''**:- म्हणजे फांसे, नरदा, पट, (अक्ष, सोंगट्या) घरें इत्यादि जे शब्द तें नाम म्हणावें. अक्ष, सोंगटी जर नसली तर मुक्याने कांही खेळ खेळतां यावयाचा नाहीं. बुद्धिबळाचा खेळ जरी मुक्यानें चालतो तरी राजा, प्रधान इत्यादि नावें मनांत तरी घेतलींच पाहिजेत; हें पहिले अंग झालें.

२. दुसरें अंग **''रूप''**:- नरदा लांबट असाव्या, फांसे लांब असावे. कांही फुलें व कांहीं घरें इत्यादिकांचे जे आकार त्याला रूप म्हणतात. हे नसलें तर नुसतें वांझेचा मुलगा म्हणून केवळ खेळ घडावयाचा नाहीं.

३. तिसरें अंग **''संख्या''**:- सोळा नरदा असाव्या; तीन फांसे असावे इत्यादि. हे नसले तर सर्वच अंधाधुंदी माजेल.

४. चौथे अंग **''योजना''** :- किती दानें पडली असतां सोंगटी कोणते जागी द्यावी? इत्यादि गोष्टींना योजना म्हणतात. ह्या योजना मात्र भिन्न भिन्न असतात आणि योजनेवरच खेळाचा भेद अवलंबून असतो. नाम, रूप, संख्या ही सर्व खेळांत सारखींच असतात. आणि योजनेवरच खेळाचा भेदही अवलंबून असतो.

५. आतां पांचवे अंग म्हणजे **''सूचना''** होय. 'खेळाचे शेवटी अथवा आरंभी मनाचे जे परिणाम' त्यांना सूचना म्हणतात. एकानें जिंकले असतां हर्ष व दुसरा हरला असतां त्याला खेद ह्या गोष्टी खेळ खोटा असतांही घडून येतात. खोट्या खेळातही मनाला हर्ष अथवा खेद होणें हें त्या जगन्नियंत्याच्या मायेचीच करणी म्हणावी लागते. परंतु आपल्या अभिमानामुळे असें होते असे म्हणणें अधिक सयुक्तिक होईल. ही गोष्ट कल्पितातल्या कल्पितांत झाली. पण ह्या गोष्टीला व्यावहारिकपणा सुद्धां देतां येतो. सारीपाटाच्या खेळाशीं पैशाचा 'पण' बांधला म्हणजे मग आले त्यांत व्यवहारत्व. याप्रमाणें कल्पित वस्तु देखील क्रीडाद्वाराने व्यावहरिक होतात; म्हणजे कल्पित वस्तूवरून जर कांहीं व्यवहारज्ञान होतें, तर कल्पित वस्तूवरून परमार्थ होणेंही कांहीं मोठेसें दुर्लभ नाही. मात्र पैशाचा 'पण' बांधला म्हणजे जशी सारीपाठ खेळण्याची चुटपुट लागते, त्याप्रमाणे खेळातही

परमार्थाची चुटपुट लागलेल्या पुरुषाला मुक्ति मिळण्याचा संभव आहे. असे व्यावहारिक व पारमार्थिक खेळ जगांत पुष्कळ आहेत. परंतु या आम्ही निव्वळ गप्पाच मारतो असें कोणी म्हणूं नये. कारण पुराण व इतिहास यांतही या गोष्टीं कांही कमी नाहींत.

अक्षक्रीडेनेंच रुक्मिणीच्या भावाचें म्हणजे रुक्मीचे प्राण बलिरामानें हरण केले. ही गोष्ट भागवतांत आहे. आणि अक्षक्रीडेनेंच पांडवांना वनगमन करावें लागले ही गोष्ट महाभारतात आहे. भगवान् म्हणतात - **''द्यूतं छलयतामस्मि''** याप्रमाणे द्यूत व अक्षक्रीडा हे उपलक्षण आहे. म्हणजे दिव्याच्या उजेडाने जर केंस दिसतात तर ते सूर्याच्या उजेडाने कां दिसणार नाहींत? याप्रमाणें द्यूत वगैरे तामस खेळांना जर परमेश्वर आपली विभूति म्हणतो तर पारमार्थिक जे सात्त्विक खेळ त्यांना परमेश्वर आपली विभूति कशी म्हणणार नाही? अर्थात् म्हणतो; हें कैमुतिक न्यायानें (किमिति न्यायानें) सिद्ध होतें. फडणीस नानासाहेंबानें बुद्धिबळाच्या खेळामध्ये लढाईचें तत्त्व दाखवून दिले होतें, हें अर्वाचीन इतिहासामध्ये प्रसिद्ध आहे. वावडी (पतंग) उडवितां उडवितां आकाशातील विद्युत् तळी कशी येते याचा शोध लागला. यावरून क्रीडा ही सायन्सविरुद्ध नाहीं हे सिद्ध होते. **''श्रीकृष्णांनीं बालपणीं जे अनेक खेळ केले त्याचे कारण अनेक शास्त्रें दाखवून देणें हेंच होय.''** आतां व्याकरण शास्त्रावरील महाभाष्यांत अशाप्रकारच्या खेळाशिवाय व्याकरण लागत नाहीं म्हणून 'क्रीडाविशेष' भगवान् श्रीमदाचार्य पतंजली स्वामींनीहि दाखविले आहेत. त्याप्रमाणें एका खेळानें वेदांताचेंही मोठे कार्य झाले असा एक इतिहास पौराणिक (व्यास) सांगतात. तो इतिहासच येथें घेतों.

श्री नारदांची कथा

एके समयीं मम हृदयरमण श्रीकृष्ण सभेंत बसले असतां तेथें स्वामी नारद आलेले पाहून भगवान् म्हणाले, ''नारदा, आपण अनुग्रहीत आहांत काय?''

तेव्हां नारद म्हणाले ''भगवंताला सर्वच कांही ठाऊक आहे.''

हें नारदांचे वाक्य ऐकून देवांनी असा विचार केला कीं, जरी हा नारद पूर्ण आहे तरी सद्गुरुमहिमा प्रगट दाखविण्यासांठी आपण कांही युक्ति केली

पाहिजे.

मग भगवान् म्हणाले - ''नारदा, आमच्या द्वारावर जे तुम्हांला अगदी ब्राह्ममुहूर्ती दिसतील त्यांना गुरु मानून त्यांची सेवा करा.''

नारदांने 'ठीक आहे' असें म्हणून दुसऱ्या दिवशीं ब्राह्ममुहूर्तीं द्वारावर येऊन पाहिलें तों तेथें एक मनुष्य बसलेला दृष्टीस पडला. नंतर भगवंतांनी सांगितलेला हाच आपला गुरु आहे असें समजून नारदानें त्यास नमस्कार केला, आणि क्षणभर तेथेंच बसले. परंतु अरुणोदय झाल्यावर हा मनुष्य धीवर (कोळी) आहे हे नारदाला कळल्यावरून फार चिंतातुर होऊन पुन्हा श्रीकृष्णसभेत आले.

तेव्हा श्रीकृष्ण म्हणाले, ''नारदा, आपण गुरुसेवा केली का?''

तेव्हां नारद म्हणाले, 'केली, पण - -' असें बोलून संदिग्ध होत्साते पुढें बोलणार इतक्यांत श्रीकृष्ण म्हणाले.

''नारदा, आपणाला चौऱ्यांयशीं लक्ष योनी अवश्य भोगिल्या पाहिजेत. कारण सद्‌गुरूच्या स्वरूपाविषयीं ज्याला संशय आहे, तो जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून सुटलेला असा कोणीच नाहीं.''

ही गोष्ट नारदाच्या काळजास लागल्यासारखी होऊन ते लवकर लवकर धांवत येऊन त्याच धीवरापाशीं आले आणि साष्टांग नमस्कार करून झालेली सर्व गोष्ट निरूपण केल्यावर म्हणाले,'भगवन्, माझें रक्षण करा. रक्षण करा.' तेव्हा त्या धीवररूपी गुरूनें एक खूण सांगितली व ती घेऊन नारद सभेमध्यें आले आणि श्रीकृष्णास म्हणाले.

महाराज, ''हा मी चौऱ्यांयशी भोगायला तयार आहे पहा. परंतु त्यांचें (म्हणजे चौऱ्यांयशींचे) ज्ञान होण्यासाठी, त्या मला एका कागदावर लिहून दाखवाव्या.''

नंतर ईश्वराने 'बरें' म्हणून त्या सर्व योनी लिहून नारदाजवळ दिल्या. तेव्हां तो कागद तेथेंच नारदांनी आंथरून त्यावर लोटांगण घालूं लागले.

तेव्हां देव म्हणाले, 'नारदा, हें काय करीत आहां? याचा अर्थ आम्हांस कांहीं कळत नाही.'

तेव्हा नारद म्हणाले, 'देवा, मी आपणांस आतांच सांगितलें कीं मी या

योनी भोगण्यास तयार आहें, आणि त्याच या मी आतां भोगून टाकीत आहे.''

देव हांसून म्हणाले, ''अहो, केवळ चित्रावर लोळण्याने योनी भोगणें होत असतें काय?''

नारद म्हणाले,''हो अवश्य होतें याला जीवभूत प्रमाण नाहीं तर ईश्वरभूत प्रमाण आहे. कारण देवा, जगतांतील जेवढीं म्हणून चित्रे आहेत तेवढी आपणच घडविली आहेत. मग यात व त्यात भेद तो कोणता? शिवाय ब्रह्मदृष्टीने हे सारे जगत् चित्रवतच आहे. कारण चित्रांतील व्याघ्राची भीति वाटली तर तो देखील स्वप्नांत खराखुरा दिसतो. ही जर साधारण जीवाची गोष्ट आहे तर ईश्वरी चित्रावर तशी भावना केल्यानें माझी तशी कशी भावना होणार नाहीं?''

ही गोष्ट ऐकून परमात्म्याने एकदम आसनावरून उठून नारदास साष्टांग नमस्कार करून आलिंगन दिलें आणि म्हणाले -

''विधितनया, आपण सनत्कुमारांच्या अनुग्रहानें केव्हांच मुक्त झालां आहांत. धीवर तो आपणांस काय सांगणार? परंतु सनत्कुमारांनी सांगितलेल्या मुक्तीवर आपली कितपत निष्ठा आहे हे पाहण्याकरिताच मी ही युक्ति केली होती. आपण मुक्त होतां तर आपणास चौऱ्यांशींची भीति कां वाटावी? परंतु अशा वेळीं तो धीवर आपणांस सद्‌गुरु झाला नाही काय?''

नारद म्हणाले,'' भगवन्, त्यावर माझी पूर्ण निष्ठा बसली आहे. आईचें दूध जसें लेकरास वाढवितें तसें पृथ्वीमातेंतून निघालेलें अन्नही वाढवितें, त्याप्रमाणें मुक्तीचा उपाय सांगणारा व मुक्ति दृढ पटवून देणारा हे दोन्ही मी सारखेच मानतो.'' हें बोलणें झाल्यावर नारदांला श्रीकृष्णांनी आपल्या आसनावर बसवून घेतलें.

या इतिहासावरूनच आपणास असें ग्रहण करितां येईल कीं दृष्टिसृष्टि-वादांत जगत् हें प्रातिभासिक आहे, आणि असें दाखविणारें कांहीं खेळही आहेत. **जगत् हें चित्र आहे अशा प्रकारच्या भावनेने जग चित्रच दिसून पुरुष मुक्त होतो** असें विद्यारण्य स्वामींनी पंचदशीच्या सहाव्या प्रकरणांत म्हटलें आहे -

चित्रदीपमिमं नित्यं येऽनुसन्दधते बुधः ।
पश्यन्तोऽपि जगत्रिं ते मुह्यन्ति न पूर्ववत् ॥२०॥

आणि याच ग्रंथाच्या दहाव्या प्रकरणांत **जगत् नाटकरूप आहे असें**

दाखविलें आहे. योगवासिष्ठांत अशा प्रकारचे पुष्कळ खेळ सांगितले आहेत हें कांही सांगावयास नको. चेंडुफळीचें उपलक्षण करून असा एक खेळ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वराचार्य महाराजांनीही अनुभवामृताच्या सिद्धहरणनिरूपण नामक नवव्या अध्यायांत सांगितला आहे.

म्हणोनी हे चेंडुफळी । देखिले का कें व्हेळी । (ऐसी जरी हे चेंडूफळी)
परंतु बोलिजे हे सरली । प्रबुद्धांची ॥

शिवाय त्यांनी ज्ञानपट, सोपानपट, वगैरेही पुष्कळ खेळ केले आहेत. ते जरी उत्तम आहेत. तथापि मुलीला खेळता यावे म्हणजे त्यांची मी कन्या असल्यामुळे कन्याबुद्धीनेंच मी या क्रीडाविशेष फुलांची माळ करून त्यांचे चरणीं गजरे वाहतें.

ह्या खेळांत आतां पांचही अंगें कशी लागू पडतात हें क्रमाक्रमानें पाहूं. त्यांत पांचव्यापासून पहिल्यापर्यंत जाऊं.

सूचना

या खेळात १) कैवल्य हें स्थान मुख्य आहे. त्यांतही पराभक्ति हें श्रेष्ठतम स्थान आहे. २) कैवल्याच्या अपेक्षेनें जेवढे लोक आहेत तेवढ्या आडवाटा आहेत. परन्तु ३) भक्ति नसली तर कैवल्यालाही विशेष किंमत नाही, हेंच सर्व संतांच्या हृदयांतील रहस्य आहे; आणि हीच या खेळांतील सूचना म्हणजे पांचवें अंग होय.

योजना

आतां चौथे अंग सांगतो. व्याकरणांत किंवा त्या वरील महाभाष्यांत जसे नियम किंवा अपवाद केले आहेत त्याप्रमाणेंच या खेळांतही समजावें. त्यांत आधीं नियम सांगतों आणि मग अपवाद सांगतो. नियम येणें प्रमाणे :-

१. जितके खेळणारे असलीत तितक्यांनीं आपआपल्या रंगाच्या वस्तु घेऊन **मनुष्यलोकांपासून खेळण्यास आरंभ** करावा.

भावना

१. मात्र हीं माझी वस्तु आहे अशीं भावना न करितां ती वस्तु मीच आहें अशी भावना करावी.

२. ज्या घरांत शिडी असेल तेथून चढून शिडीचें वरचें टोक ज्या घरांत

असेल त्यांत स्थिर व्हावें. आणि ज्या घरांत सर्पाचे तोंड असेल तेथून निघून सर्पाचे पुच्छ जेथें असेल तेथें खालीं यावें.

३. फांसे किंवा कवड्या घेऊन डाव टाकून खेळावें. त्यांत ***अंक क्रमांक दान** किंवा ***युगपद् अंकदान** असा कोणताही नियम करावा. अंकक्रमदान म्हणजे जितक्या कवड्या चित पडतील तितकें दान घेणें आणि युगपत् अंकदान म्हणजे पांच कवड्या उपड्या पडल्या असतां पंचवीस इत्यादि चौसरीप्रमाणें. फांशाच्या खेळांत मात्र ही फारशी भानगड नाही परन्तु -

भावना

४. एवढें मात्र लक्षात ठवावें कीं डाव टाकीत असतांना आपण मनुष्य लोकांत असून मुक्तीकरितां खटपट करीत आहोत ही भावना दृढ धरावी. म्हणजे **तसबिरीच्या पूजनानें जसा परमेश्वर प्रसन्न होतो तसाच या कैवल्याच्या भावनेनेंही आपण परमेश्वराच्या अनुग्रहानें मुक्त होऊं यांत संशय नाही.**

घटकाभराच्या भावनेनें जें काम होतें तशीच भावना घडीघडी वाढविली असतां कैवल्यास जाण्याची आपल्यास तर अगदी खात्रीच वाटते. ज्ञानेश्वरीत एके ठिकाणी असे म्हटलें आहे ''अर्जुना तुला एकदम माझ्या ठिकाणी चित्त लावतां येत नसल्यास तूं क्षणक्षणां लावीत जा. आणि जितके क्षण तुझें चित्त माझ्याकडे येईल, तितके विषय आपोआपच सुटत जातील. आणि असें क्षणक्षणां वाढतां वाढतां सरते शेवटी तूं माझ्या स्वरूपालाच येऊन मिळशील.'' पण ही गोष्ट नाक धरून एखाद्या वनांत जाऊन करण्यापेक्षा खेळानेच जर होत असली तर तिचा लाभ कोण अज्ञ मनुष्य आहे कीं सांडून देईल? ज्ञानेश्वर महाराजांनी एके ठिकाणी म्हटलें आहे कीं, 'रोग जाये दूध सारखें तरी निंब कां सेवावा,' नियम सांगतांनाही सिद्धांताची गोष्ट सांगावी लागली याबद्दल क्षमा असावी.

अशा वैदांतिक खेळांत द्वेषभाव राहत नसल्यामुळे विलक्षण मैत्री वाढते. हा एकीचा व्यावहारिक फायदा समजावा.

५. आतां ज्या घरात सर्प किंवा शिडी कांहींच नसेल तर त्या गृहात तेथेंच रहावे.

६. जीवन्मुक्त झाल्याशिवाय विदेहमुक्त होतां येत नाही व – पराभक्तींतही जातां येत नाही.

नियमाला अपवाद

आता अपवाद सांगतो :- सर्पांच्या घराचें दान आलें असतां पतन होतें ही गोष्ट खरी, परंतु -

१. ब्रह्मलोकांतील **''मोक्ष''** शिवलोकांतील **''उमापति लोक''** आणि वैकुंठातील **''गोलोक''** यांतील स्थानांतून सर्पाचे दान आले असतांही पतन होत नाहीं तर कैवल्याचें दान पडलें म्हणजे कैवल्यास जावें लागतें हा एक अपवाद झाला.

२. ब्रह्मलोकांतील भोग लोकांत (पारमेष्ठ्यांत) असतां पांच फेरांचे राज्य देऊन तेथून नंतर **क्रमांक दानांतून तीन** पडले असतां किंवा **युगपत् अंकदानांतून पवदान** पडलें असतां कल्पान्तरोत्थानांतून त्याला खाली आणावें.

३. बाकीची दाने पडली असतां त्याला खालीं आणावयाचें नाही.

४. त्या डावांत पव पडल्यावर बाकीचीं दाने त्या डावांच्या (रमणीय घराच्या) खाली द्यावयाची.

५. परंतु भोगलोकांतील पुरुषांना आणखी दुसरी एक अडचण आहे. ***अविद्येचे दान** पडलें म्हणजे एकदम खाली यावें आणि ***मायेचें दान** पडलें तर त्याला सहा फेरांचें राज्य देऊन नंतर ब्रह्मलोकांतील मोक्षांत सर्प शिडीशिवाय यावें.

६. ब्रह्मलोकांतील मोक्षांत कितीही जण असले तरी ते सर्व पर्यंकस्थ पुरुषाचे (ब्रह्मदेवाचे) स्वाधीन असल्यामुळे त्याच्या बरोबर त्यांना मुक्त झाले पाहिजे.

७. परंतु पर्यंकावर दुसरा ब्रह्मा आला म्हणजे पहिल्या ब्रह्मदेवाची मुक्तता होणार आणि त्याबरोबरच सर्वांची मुक्तता होणार.

८. परन्तु मागून येणाऱ्या ब्रह्मदेवाचें दान पडून पहिल्या ब्रह्मदेवाचे दान पडले नाही तर मागून येणाऱ्या ब्रह्मदेवास पर्यंकावर जुगस्थानी द्यावें.

९. परन्तु पहिल्या बह्मदेवाची मुक्ति झाल्याशिवाय मागल्या ब्रह्मदेवास मुक्त होता येत नाही आणि पहिल्या ब्रह्मदेवाबरोबरही मुक्त होता येत नाही.

१०. ब्रह्मलोकांतील भोगलोकांतून मात्र कैवल्याशिवाय कैलासादिकांतही जातां येतें. पण - उमापति लोकांत आणि गोलोकांत जाता येत नाही.

११. भूलोकांतील अविद्यादर्शनेच्छेमधून शिडीनें मूलाविद्येंत यावें व तेथल्या सर्पांतून नरकांत जावें.

१२. मनुष्यलोकांतून खेळण्यास आरंभ होतो खरा, परंतु महानरकांत पडले

असतां, पव किंवा चार घेऊन क्षुद्रनरकांत यावे आणि नंतर कितीही दानें पडली तरी मनुष्यलोकापासूनच खेळावें.

१३. म्लेंच्छ मताचें दान पडलें तर बेहस्त लोकांत शिडीने जावें व तेथून सर्पानें मृत्यूंत यावे व तेथें त्यास तीन फेरेपर्यंत पडूं द्यावें व नंतर चौथे फेऱ्यास वाटेल त्या दानानें महानरकांत यावें व तेथून महानरकाच्या नियमाप्रमाणें खेळावे.

१४. गोलोकांतील लोकांना दहा तीन पडले तर ते भक्तजनकलहावच्छिन्नांत जाऊन तेथून खाली पडावयाचे; नाही तर कैवल्याचे दान घेऊन जीवन्मुक्तीत जावयाचे.

१५. ब्रह्मदेवाला मुक्त होण्याची पाळीं आली तर मोक्षांत लोकच असले पाहिजेत असें नाही. पर्यंकस्थानी दुसरा ब्रह्मदेव असला म्हणजे झालें. - परंतु दुसरा होणारा ब्रह्मदेव शतजन्म ब्रह्मकर्मसमुच्चयांतील शिडीनेंच आलेला असला पाहिजे. - दुसऱ्या कोणीकडूनही आणूं नये.

१६. दुसऱ्या कोणाची दुसऱ्या ठिकाणाहून दानें पडली तर साम्राज्यादि पांच लोकांतील कोणातरी लोकांत द्यावी अथवा आधिपत्य लोकांत द्यावीं.

१७. गोलोक किंवा क्षीराब्धिलोक यांतून दहा तीन पडले असतां तेथील लोक अवतार घेऊन जशी इच्छा असेल त्याप्रमाणें अयोध्या किंवा नंदनवनांत यावयाचें व येथून आपले दान देऊन लोकोद्धार करावयाचा.

१८. अवतारांचे कृत्य झाल्यावर त्यांना क्षीराब्धींत नेऊन ठेवावयाचे. अवतार घेणारास नरकाचें दान पडल्यास त्याला नरकांत आणावयाचें नाही. अवतारासंबंधी नियम तीन हे सर्व लक्षपूर्वक पहावे.

१९. दैवयोगानें सर्वच जण ब्रह्मलोकांतील मोक्षांत गेल्यास आणि पर्यंक स्थानी कोणी नसला तर ज्यांचें वरिष्ठ दान असेल अशा दोघां जणांनी पर्यंकावर आरोहरण करून नंतर एका ब्रह्मदेवा बरोबर कैवल्याचे दान पडले म्हणजे, सर्वांनी मुक्त व्हावे.

२०. परंतु येथे असें कोणी समजूं नये की ब्रह्मदेवाच्याच शक्तीनें मोक्षांतील सर्व लोक मुक्त होतात. तर ब्रह्मदेवाच्या दानाप्रमाणें मोक्षांतील लोकांचीही दानें पडली पाहिजेत. आतां सामान्य नियम सांगतों.

सामान्य नियम

२१. मला किती पाहिजेत हें पटावरून पाहून घेऊं नये. व खेळणारांनी पाहूंही देऊ नये. जोडून डाव टाकला असतां कैवल्यातून ही खाली फेकावें कारण लबाडीनें कैवल्य कधीही मिळत नाही. लबाडीनें कैवल्यांत गेला तरी, तो चित्रांतील कैवल्यांत जाणारा होय. खेळाबरोबर भावनेनें कैवल्यांत जाणारा नव्हे. म्हणून भावनायुक्त पुरुषांना चित्रांतून खोट्या मनुष्याला बाहेर फेकण्याचा अधिकार आहे.

२२. माझी नरद म्हणणारांना किंवा कैवल्यातील कोणाचा अपमान करणारांनाही हीच गती द्यावी.

२३. क्रीडारंभ करतांना आपल्या कुलदेवतेचे किंवा गुरूचे स्मरण करावे.

२४. पराभक्तीत पोहोचलेल्या पुरुषांना खेळणारांनी मानसिक नमस्कार करावा. बाकीचे नियम बांधणें हरीभाऊ केवले यांचे कडेस आहे. हें या खेळाचे **योजना** नामक चौथें अंग झाले.

२५. तिसरें अंग म्हणजे संख्या हें दानादिकांची **संख्या,** घरांची संख्या यावरून स्पष्ट कळून येतें.

२६. शिड्या, साप, घरें त्रिकोण वर्तुळ इत्यादिकांच्या आकृति म्हणजे **रूप.** हें दुसरें अंग.

२७. या खेळाचें पहिले अंग म्हणजे **नाम.** याचें संस्कृत नाम **'श्रौत क्रीडा विशेष'** अथवा दुसरें नांव **'कैवल्यपट'** - कैवल्य, वैकुंठ, शिवलोक, ब्रह्मलोक इत्यादि या पटातील घरांची नांवे.

ऐसा हा पंचांग संपूर्ण । क्रीडा विशेष गुंफोनि जाण ।
श्रीज्ञानेश्वर चरणीं समर्पण । सप्रेमें केला ॥

टीप -

जे आधार घेऊन हा पट तयार केला त्या श्रुतिस्मृतिपुराणादिक ग्रंथातील आधारवाक्यांचा संग्रह आम्ही सवडीनें देणार आहो.

०००

अध्याय दुसरा

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर चरणीं । साष्टांग प्रणिपात करूनी ।
द्वितीयाध्याय उभारणीं । प्रौढक्रीडार्थ करितांहे ॥१॥

पहिल्या अध्यायात जें कांही सांगीतले त्यात भावनेचे ज्ञान फार थोडेसेंच आहे. खेळाचें पंचांग व आणखी कांही गोष्टी याचाच विचार अधिक आहे. परन्तु सामान्य लोकांविषयीं तितकी भावना अगदीं पुरे आहे. परंतु ज्यांना खेळांत खरोखरच पटाईत व्हावयाचे असेल, आणि त्यांचे बरोबर, - ज्यांची भावना टिकाऊ झाली असून कैवल्यापर्यंत ज्यांना सारख्या रीतीनें नेता येत असेल त्या महात्म्यांकरितां मी येथें विशेष काही लिहीतों -

योगामध्यें आसनांनी प्राण व चित्त स्थिर होतें असें सांगितलें आहे. परंतु एका कवीनें असें म्हटलें आहे की ''तुम्ही जर आशा मारणार नाही व आसन मांडत बसाल तर त्यापासून तुमचे कार्य मुळीच होणार नाही. हा कांही कसरतीप्रमाणें पहिलवानीचा खेळ नव्हे. त्याला यम-नियमरूपी भावनेचे चांगले पाठबळ पाहिजे. ''हीच गोष्ट आमच्या खेळासही लागू पडते.'' **भावना केल्यावाचून खेळणें म्हणजे फाजिल करमणूक करणेंच होय.''** म्हणून सामान्य लोकांविषयी भावनेचे प्रकार पहिल्या अध्यायात सांगितले आहेत.

आतां तीव्र मुमुक्षु महात्म्यां लोकांकरिता भावनेचे प्रकार सांगतें. **''जी वस्तू पटावर खेळावयास घेतली असेल ती 'मी आहे' असे समजून खेळण्याला आरंभ करीत जावा.''** हे पहिलेच लिहीले आहे. ही भावना दोन प्रकारची आहे. १. शाब्दीभावना व २. आर्थीभावना. पण हें शब्द येथें पारिभाषिक आहेत.

शाब्दी भावना

ज्याला आर्थी भावना करिता येत नसेल त्याने शाब्दी भावना करावी म्हणजे 'माझी पिंबळी वस्तु आहे, तिला ब्रह्मलोकात न्या' असे न म्हणता 'मीच ब्रह्मलोकात जातों,' 'स्वर्गास गेलों' इत्यादि शब्दाचा उपयोग तरी निदान करावा. अशाच प्रकारच्या आणखी ज्या भावना असतील त्या अहंता किंवा ममता रूपानें आपल्याच ठिकाणी ओढून घ्याव्या, व तसेच शब्द उच्चारावे - ह्याला शाब्दी भावना म्हणतात; म्हणजे

* ''मनानें चिंतन होत नसेल तर शब्दांनी तरी विधियुक्तच उच्चार केला पाहिजे; त्याच्या विरूद्ध शब्द उच्चारल्यास त्याला पंचवीस फेर होतपर्यंत महा नरकांत टाकून द्यावे.'' ही गोष्ट सामान्य लोकांसही लागू आहे.

आर्थी भावना

आता शदांनी न बोलताही ज्याला मनानें चिंतन सारखें करितां येतें, अशा पुरुषांनी आर्थीभावना करावी. ''मनोवृत्तीचा प्रवाह चिंतनाने सुरु ठेवणें याचें नांव आर्थीभावना.''

शाब्दीभावना करणाराने हळु हळु आर्थीभावनेंत गेलें पाहिजे. मग तो एका दिवसापासून एका युगापर्यंत कितीही कालानें जावों. आर्थीभावना करणारास शाब्दी भावनेची विशेष जरुरी नाही. परंतु आर्थीभावनेचें अवधान चुकल्यास शाब्दी भावनेच्या द्वाराने पुनः आपलें ठिकाणी आणावें.

आतां पुढील नियम दोन्ही प्रकारचे भावनेस सारखेच लागू आहेत. परंतु मंदांनी शब्दांनी नियम पाळावयाचे व तीव्रांनी चिंतनानें पाळावयाचे - एवढाच काय तो भेद. हे भावना करण्याचे सामान्य पांच प्रकार आहेत. व त्यात पोट भेद अनेक आहेत.

भावनांचे पांच प्रकार

१) तृप्ति २) निर्भयता ३) उपेक्षा ४) भीति ५) पश्चात्ताप.

१. कैवल्यस्थानांत गेलें असतां **तृप्तीची भावना** करावी.

२. ब्रह्मलोकातील मोक्ष व पर्यंकस्थान, परमलोकांतील सर्पाच्या वरचे लोक व उमापतीलोक आणि गोलोक ह्यांत **निर्भय** भावना करावी. तसेंच अलोकांमधील लोकांतही निर्भय भावना करावी. सारांश मुख्य स्थानीं **तृप्त** व्हावें. गौणमुक्ति स्थानीं जे असतील तेथें **निर्भय** रहावें.

३. संदिग्धस्थानीं **उपेक्षात्मक भावना** धरावी.

४. भोगस्थानी **भीतीची भावना** धरावी. आणि

५. दुःखस्थानी **पश्चात्तापाची भावना** करावी.

त्यांत तृप्ति आणि निर्भयाची स्थानें वर सांगितलीच आहेत.

* पारमेष्ठ्य, क्षीराब्धि, विष्णुलोक, पशुपति लोक आणि उमा लोक हीं पांच **संदिग्ध;** येथून पडतो अथवा पडतही नाहीं.

* पारमेष्ठ्य लोकाचाच नियम ह्या चारही लोकांस लागू असल्यामुळें त्यांची व ह्यांची बरोबरी सांगितली.

* स्वर्गादिक जे पुण्यकृत लोक ती भोगस्थानें समजून तेथून पडण्याची **भीति** बाळगावी;

* आणि दुःखदायक जे पापमय लोक आहेत त्या ठिकाणीं नेहमी **पश्चात्तापयुक्त** रहात असावें.

* ही सामान्य स्थानांची गोष्ट झाली. परंतु त्या त्या स्थानाप्रमाणें ह्या चार भावनांला अनुसरूनच विशेष भावना जितक्या करतां येतील तितक्या कराव्या.

* कैवल्यांत जाईपर्यंत सर्व भावनांत परमेश्वराचे सहाय्य मात्र घेत असावे. ह्या विशेष भावना कशा कराव्यात ह्याविषयी आणखी कांही उदाहरणें सांगतें.

* ''हा मी एका नरकांत आहे तेव्हा तो नरक मला ज्या पातकांनी प्राप्त झाला आहे, अशा प्रकारची पातके हे ईश्वरा मी आता करणार नाही, येथून मला लवकर काढ,'' अशाप्रकारची पश्चातापाला अनुसरून मी भावना केली,

* आता तसाच एखाद्या कर्मानें मी स्वर्गास गेलो तर, ''हे प्रभो, मला येथें पतनाचे मार्ग पुष्कळ आहेत, अशा भोगस्थानातून मला केव्हा मुक्त करशील?'' तसेंच यज्ञहविर्भागग्रहण वगैरे भावना साधल्यास येथेंच करीत जाव्या.

* आता जसें यमनियमादि स्थानी गेलें तर तेथें त्या त्या प्रमाणें मी भावना केली म्हणजे अहिंसा, सत्य वगैरे मनांत आणले आणि निर्भय स्थानी ''भगवन् मी आपल्या सहाय्यानेच येथें येऊन निर्भय झालों, आता कांही परोपकार केला पाहिजे.'' अशा प्रकारच्या भावना कराव्यात.

* उपेक्ष्य स्थानी ''प्रभो, आम्ही सर्वथा तुझ्याच अखत्यार आहो. काय करशील ते कर'' इत्यादि भावना कराव्या.

* चांगली भावना करीत असतांही एकादेवेळी वाईट लोकांत जाण्याचा प्रसंग आला तर तें आपल्या कर्माचें फल समजावें.

* तसेंच ज्या लोकांत आपण जाऊं त्या लोकांत येण्यासारखें आपण पुण्य केलें असे समजावे. पुण्याचा अभिमान मात्र होऊं देऊं नये.

* लोकज्ञानावर लक्ष्य पहिल्या अध्यायांतील उत्सर्गापवादावरून (नियम व विकल्पावरून) सहजच रहाण्याजोगें असल्यामुळें त्याविषयी निराळा नियम

घालण्यास नको.

* सारांश सात्त्विक राजस तामस लोकांतून सात्त्विक लोकांतील ज्या सत्त्वाच्या भावना असतील त्या सात्त्विक लोकांतच उत्साहयुक्त कराव्यात आणि राजस लोकातील भावनां रजोगुणी लोकांत भीतियुक्त कराव्यात. आणि तामस भावना पश्चात्तापयुक्त कराव्यात.

* अलोकांतील लोकांत शुद्ध सात्त्विक भावना कराव्या. म्हणजें 'मी ब्रह्म आहें' अशीच एक भावना करीत रहावे.

* आणि कैवल्यांत 'मी ब्रह्मच आहें, आता आहें असें मला कशाला म्हटले पाहिजे,' अशाप्रकारचीं भावना जागृत ठेवावी.

* ह्या आर्थी भावना होत नसतील तर शाब्दी भावना अवश्य झाल्याच पाहिजेत. मग त्या मंद लोकांकडून पहिल्या अध्यायाप्रमाणें आणि मध्यम लोकांकडून दुसऱ्या अध्यायाप्रमाणें असल्या म्हणजें झालें. तीव्र लोकांना तर आर्थीभावना निःशेष करितां येतात आणि त्याच उत्तम आहेत. कैवल्यावांचून एकाद्या लोकाची भावना न करितांही मनांत येणे हें कोणत्यातरी जन्मांतील मृदु दशेंतील कर्म आहे असें समजावे.

अधिकारी

पटावरील चित्राविषयी समजूत खोटी असली तरी त्यातील सिद्धांत आणि भावना ह्या अगदीं खऱ्या आहेत अशा प्रकारची ज्याची पक्की समजूत आहे. तोच ह्या खेळाला अधिकारी आहे,

इतरांस खेळूं देऊं नये.

आणि ज्याला खेळावयाची इच्छा झाली असेल त्याला खेळ शिकविणाऱ्या गुरूंनी मुद्या मुद्याच्या गोष्टी सांगून त्या त्याजकडून कबूल करवून घेऊन नंतर खेळण्यास आरंभ करूं द्यावा.

अनुबंधचतुष्टय

वर सांगितलेला **''अधिकारी,''** भावनांचा आणि लोकांचा प्राप्यप्रापकभाव **''संबंध,''** त्या लोकांतील साधनांसह भावना करिता येणें आणि त्या लोकांचे ज्ञान होणें हा **''विषय''** आणि कैवल्यांतील सांगितलेली शेवटची भावना क्षणोक्षणीं वाढवीत वाढवीत जन्मभर दृढ राखणें हें **''प्रयोजन;''** याप्रमाणें अनुबंधचतुष्टय

तयार झाले. ही सांख्य म्हणजे वेदान्तमार्गाची रीति सांगितली.

योगानुसार भावना

आता योगमार्गानें भावना करण्याची रीति सांगतें.

शाब्दी आणि आर्थी हे भेद ह्या भावनांतही मानावेत. योगाच्या भावना मुख्य आठच मानाव्यात.

१. भूर्लोकांत असतां आपल्या शरीरांतील **आधारचक्रावर** मन न्यावे.

२. भूर्लोकांत असता आपल्या शरीरांतील **स्वाधिष्टानचक्राचे** ध्यान करावें.

३. स्वर्लोकांत असता **मणिपुर.**

४. महर्लोकांत असता **अनाहतचक्राचे,**

५. जनलोकांत असता **विशुद्धचक्राचे,**

६. तपोलोकांत असता **द्विदलाचे** आणि

७. ब्रह्मलोकांत सहस्रदलाचे ध्यान करावे व

८. अलोकांत कैवल्यावाचून पुरुष प्रकृतीहून निराळा आहे अशा **विवेकाचे** ध्यान करावें.

ही योगियाला सांगितलेली स्थाने कंदस्थानापासून तो शिखास्थानापावेतों शरीरातच समजावीत. पटावरील चित्रावरून शरीरातील चित्रांवर मन न्यावयाचे एवढाच काय तो भेद. योगाची भावना करीत असतांना पतन झाले तर सिद्धिभोगाचे फल समजावे. कैवल्यात मात्र वेदांती व योगीयांना भावना एकच आहे.

याप्रमाणें योगमार्गाच्या भावना सांगून आता कर्म मार्गातील भावना सांगतो.

कर्म मार्गातील भावना

कर्म मार्गातील भावनेत ध्यान करावयाचे नसून, ते ते लोक आपल्या शरीरातील कोणत्या ठिकाणीं आहेत एवढें ज्ञान मात्र करून ठेवून विराड् उपासनेंत त्याचे पर्यवसान करावे.

त्यातही शाब्दी व आर्थी असे दोन भेद आहेत.

१. एक विराट पुरुष कल्पून भूर्लोकात असता आपण त्याची लहानशी प्रतिमा बनावे.

२. आणि नंतर भूर्लोकात असलो तर विराटाचे पायाचे ठिकाणी आपण आहोत अशी कल्पना करावी.

३. भूवर्लोकात जानूचे ठिकाणी आहो अशी,

४. स्वर्लोकांत कटीचे ठिकाणी आहो अशी.

५. महर्लोकांत नाभीविषयींची,

६. जनलोकांत हृदयाविषयींची,

७. तपोलोकात कंठाविषयीची,

८. ब्रह्मा, विष्णु, शिव, माया आणि परम लोकांतील ज्ञा स्थानात असता ललाटाविषयीची भावना करावी.

९. कैवल्यावांचून अलोकांतील स्थानांत शीर्षाची भावना करावी आणि कैवल्यांत पुनः सर्वांची भावना एकच आहे.

ह्या प्रमाणें सर्व भावना सांगितल्या. त्यांचे भेद पुष्कळ आहेत ते त्या त्या ग्रंथातून जाणून शक्य तेवढ्या भावना कराव्या.

कर्म, योग आणि ज्ञान ह्या तीन मार्गांप्रमाणें भावना सांगितल्या; परंतु ''खेळणारे जर निरनिराळ्या मार्गाचे असतील तर कोणकोणत्या मार्गाची भावना करितो हें निराळें एका कागदावर लिहून ठेवून त्या त्याप्रमाणें डाव देत चलावें,' 'एका मार्गाचे सर्व खेळणारे असतील तर ही भानगड नाहीं - परंतु मंद, मध्यम, तीव्रांचा भेद ओळखावा. तीव्र भावनेंतून मध्यम भावनेंत येणें वगैरे च्युत होण्याला कारण असल्यामुळें आपल्याला झेपेल अशीच भावना करावी. पहिलेच तीव्र भावना करून पतन करून घेऊं नये. कोणी तोंडानें आपली शाब्दी भावना बोलण्यात लाजेल तर त्याच्या चेहऱ्यावरून अनुमान करून समजून घ्यावें. ही गोष्ट उत्तम प्रेक्षकाला लागू आहे.

हें ज्ञान मात्र एक ठेविलें पाहिजे कीं अविद्येंतून भेदभावनेत यावयाचें आणि नंतर तेथल्याच सर्पांतून नरकात जावयाचें. अविद्यावर्तांतही ही गोष्ट लागू करावी. ह्या खेळांत भावना मात्र इष्टच करावयाच्या. पण ह्या खेळापासून ज्ञान इष्टानिष्ट गोष्टींचेंही होतें. ह्या खेळांत गुरुशिष्यपद्धति मोडत नाहीं हे एक विशेष आहे. असो.

उद्देश

कैवल्यातील उत्तम भावना दृढ होऊन जन्मभर रहावी किंवा खेळतां खेळतां पुष्कळ दिवस खेळल्यामुळें मरते वेळेंस तरी ती भावना उत्पन्न व्हावी, हाच आमचा खेळ काढण्याचा उद्देश आहे.

भावना करून खेळत असतां ते ते लोक मृदुसंवेगानें तरी प्राप्त होतात ही गोष्ट योगवासिष्ठावरून सिद्ध असल्यामुळें त्यापासून खात्रीनें वेदान्तिक नफा होतो असें आम्ही स्पष्ट म्हणतों. ह्याचाच मध्य संवेग झाला म्हणजे स्वप्नांत व तीव्र संवेग झाला म्हणजे प्रत्यक्ष प्राप्ति होणे अगदीं साहजिक आहे.

हा अध्याय थोडासा कठिण आहे खरा तथापि खेळामध्यें जो मुख्य असेल त्यानें अवश्य समजून घेतलाच पाहिजे. किंवा हें पुस्तक तरी पुढें ठेवून खेळलें पाहिजे. ज्याला खेळाची माहिती आहे असा एक मनुष्य प्रेक्षक असला पाहिजे. आणि कोणाची भावना कोठें चुकते ह्याबद्दल शिक्षेचा अधिकार त्याचेकडेच असला पाहिजे.

आर्थीभावना करणारानें देखील आपली भावना ह्या प्रेक्षकास कळण्याकरितां तोंडानें बोलून दाखवावी. आणि अशा प्रकारचा कोणी प्रेक्षक मिळत नसेल तर कैवल्याला गेलेला एकादा पुरुष नंतर प्रेक्षक करून ठेवावा आणि तेंही जमत नसेल तर प्रेक्षकाचें काम पटांतल्या पटांत ब्रह्मदेवानें करावें.

फलप्राप्ति

हा खेळ कांहीं काम कोणाला नसेल आणि ग्रंथ वाचण्याचेंही कार्य नसेल तर त्याने शक्य अशा भावनापूर्वक पाहिजे तितके वेळ खेळावा – व नंतर **रात्रौ स्वप्नांत काय चमत्कार होतो तो पहावा** – पण खेळाकडे मात्र चित्त पाहिजे.

असें सात्त्विक स्वप्न वृद्धी होऊं लागलें म्हणजे 'स्वप्ननिद्राज्ञानावलंबनं वा' ह्या पतंजली स्वामींच्या सूत्रांवरील 'स्वप्नज्ञानावलंबन' या व्यास भाष्यांतील प्रतीकांत सांगितल्याप्रमाणें योगसिद्धी होऊन कैवल्य मिळेल. ही गोष्ट सप्रमाण सिद्ध आहे.

इतका आणि असा वेळ मिळत नसेल तर - **आठ दिवसातून दोन वेळ**

किंवा एक वेळ तरी निदान खेळण्याचा नियम करावा.

ह्याप्रमाणें हा खेळ वेदान्तात एक प्रक्रियामार्गच होऊन बसला आहे यांत संशय नाहीं. ह्या खेळात गुरुशिष्यपद्धती मोडत नाहीं, हें एक विशेष आहें.

नियम - खेळातून विशेष जरूरीचें काम असल्याशिवाय उठून जाऊं नये.

अपवाद - ब्रह्मा होण्याची अडचण पडल्यास पटावर पाहून उत्तम मनुष्यानें दान टाकावें. भावना चुकतील अशा तामस गोष्टी करूं नयेत. सर्व मोक्षात गेलें असता एकाद्याने परोपकार करावा. **हरिः ॐ तत्सत् ॥**

यदेतं कथितं तत्सर्वं श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजचरणयोस्समर्पणमस्तु ॥

इत्यनेनालम् ॥

॥ श्रीमत्सद्गुरु सर्वत्र यशस्वी श्रीज्ञानेश्वर महाराज की जय ॥

टीप :- *कोणी आमच्या खेळास त्रिकाळदर्शी आरशाप्रमाणें समजतील. परन्तु वास्तविक या दोहोंत मोठा भेद आहे. तो असा कीं त्रिकाळदर्शी आरशाविषयीं प्रथम योगाच्या भावना साधून नंतर आरशांत पहावें लागतें - म्हणजे चैतन्यांतून जडांत यावें लागतें, तेव्हां देवतांचें दर्शन होतें - ही रीतीच मुळीं विचित्र आहे - कारण चैतन्यांतून जडांत येण्याची रीति कोणत्याच धर्मानें सांगितली नाही -*

परन्तु आमच्या खेळाची गोष्ट तशी नाहीं - तर त्याच्या अगदीं उलट आहे, - म्हणजे आमच्या ह्या रेखाटलेल्या जडचित्रपटावरून योगरूपी भावना वाढवून चैतन्यांत जाण्याचा सनातन व सुलभ मार्ग सांगितला आहे - ही रीति प्राचीन मूर्तीप्रमाणें किंवा सर्वतोभद्रांतील मंडलाप्रमाणें असून प्राचीन संतांनीं जे पूर्वी असे खेळ काढले आहेत त्यांचीही ह्याला सम्मति आहे. असें उघड दिसतें.

शिडीची सुरवात शिडीचा शेवट

३ अविद्यादिदक्षा	-	मूला विद्या २५९
७ श्रद्धा	-	संपदतिसंपदउपासना २९
९ परोपकार	-	पुण्य ४९
१३ श्रवण	-	समन्वय ३५
१८ दहराद्युपासना	-	अंहग्रहोपासना ३९
२२ संन्यास	-	मुमुक्षुत्व ४५

२४ कला	-	राजमंदिर ६९
२५ उपासना	-	गौणीभक्ति ५३
३२ तीव्रमुमुक्षा	-	सद्गुरुसेवा ९४
३३ बौध्य	-	शून्य लोक
३८ म्लेंच्छमत	-	बेहस्त लोक
४१ ध्यान	-	संप्रज्ञान समाधि ८६
४३ विद्याभ्यास	-	शास्त्र ६६
४७ स्मरण	-	सख्य ९२
५५ अर्हन्मुक्ति	-	आत्मपरिभाण लोक
५९ तीव्र अनुताप	-	शुद्धि ८१
६२ ऐन्दवसम प्रक्रिया	-	पर्यंक २३७
७३ योग	-	विवेक ख्याति १०९
७४ सत्कर्म	-	चित्तशुद्धि ९८
७६ विवेक	-	निदिध्यासन १०१
८७ ब्राह्मण्य	-	अपरवैराग्य ११४
९० मातृपितृसेवा	-	पितृलोक १८८
९७ तप	-	मोक्ष २३६
१०० धूममार्गादि	-	चंद्रलोक १९९
१०२ ज्ञानेश्वरी	-	वेदान्त लोक २६५
१०४ कर्मसमुदिपासनालोक	-	मोक्ष २३६
१०५ गोब्राह्मणरक्षण	-	अजानजदेवानंद १९६
११० पातिव्रत्य	-	मोक्ष २३६
११३ शतजन्मब्रह्मकर्मसमुाय	-	पर्यंक (ब्रह्मदेव) २३७
११६ पंढरी	-	क्षीराब्धि २४५
११८ पंचमार्ग	-	उमालोक २३८
१२० काशी	-	पशुपतिलोक २३९
१२२ गोदा नदी	-	इंद्रलोक २०१
१२४ यज्ञ	-	कर्म देवानंद २००
१२६ कमलासन	-	पर्यंक २३७
१२७ बद्रिकेदार गंगा हिमालय	-	कूटस्थ ध्यान २६४
१२८ श्रीज्ञानेश्वरचरणोदकतीर्थ	-	जीवन्मुक्ति २८३

१३० पातंजलयोग - क्लेशहानि २५८
१३२ योगवासिष्ठ - वेदान्तलोक २६५
१३४ वैशेषिक - दुःखध्वंस २५२
१३६ परवैराग्य - गुणातीतत्व २७४
१३८ पंचाग्नि उपासना - पारमेष्ठ्य, कल्पनोत्थान २३५
१४२ न्याय - एकविंशति दुःखनाश २५५
१४५ राधादिव्रजगोपिका-
माधुर्य भक्ति - आदि वैकुंठ लोक २७१
१४८ पाणिनीय लोक - नंदनवन २०२
१४९ ज्ञान वैराग्य विरक्ति
उपरति - श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर अभयदान २८१
१५३ चतुर्धाम तीर्थ - विष्णु लोक २४१
१५६ वृंदावन - गोलोक २४७
१५७ सुस्वप्न - देव गंधर्वानंद १९२
१५८ अयोध्या - विष्णु लोक २४१
१६० मांडूक्यगत निवृत्त-
प्रणवोपासना - निर्गुणस्थान २७२
१६१ हरिद्वार - विष्णु लोक २४१
१६२ प्रयाग - क्षीराब्धि २४५
१६५ विरोध भक्ति - क्षीराब्धि २४५
१६६ परमहंस - सोहंवस्तू २६१
१६७ अर्चिरादि मार्ग - मोक्ष २३६
१६८ विशिष्ठाद्वैतादिश्रुतिविरुद्धधर्मी परमेश्वरस्वीकार
- मुनिमानभंग २४२
१६९ भागवत - पराभक्ति २७७
१७७ अग्नि - नंदनवन २०२
१७९ विनायक लोक - पशुपति लोक २३९
१८१ एकत्र त्रयाभ्यास - जीवन्मुक्ति २८३
१८४ कुंडलिनी - उन्मनि २६६
१९० गणपत्यथर्वशीर्षोपासना - महागणपति २६८
१९५ प्रस्थानत्रय - वेदान्तलोक २६५

१९७ अर्ध्यप्रदानादित्यहृदयादिदैविक सूर्योपासना
- शुद्ध भास्कर २६७
२०४ व्यतिरेकान्वय - भूमा २७९
२०८ बृहस्पतिलोक - सप्तर्षि लोक २२४
२१० गायत्री उपासना - आदिशक्ति २६९
२१५ आत्मनिवेदन - तुर्या २७३
२१७ जीवब्रह्मैक्य - निश्चित मुक्ति २८२
२२३ ब्रह्मवित् संप्रदाय - परमशिव लोक २७०
२२५ ब्रह्मर्षि लोक - जीवन्मुक्ति २८३
२८० अमृतानुभव सिद्धानुवाद - निष्क्रीयतावच्छिन्न अद्वैतज्ञानगतसहजभक्ति २८५

सापाचे मुख सापाची शेपटी

२६३ भगवद्भक्ति अभाव - महानरक
२५९ मूलाविद्या - भेदभावना १०३
२५६ अंधतामिस्त्र लोक - महानरक
२५४ तामिस्त्र लोक - अंधतामिस्त्र लोक २५६
२५१ मोह लोक - मनुष्य १
२४९ तम - पैशाच लोक १७८
२४८ भक्तजनकलहावच्छिन्न
परस्पर शापदान - गोकुल १५४
२४४ स्व-स्व-आगमाग्रह - महानरक
२४२ मुनिमानभंग - राक्षस लोक १८३
२४०परोपास्यद्रोह - महानरक
२३५ पारमैष्ठ्य - रमणीय स्थान १५१
२३४ कल्पनोत्थान - रमणीय स्थान १५१
२२९ आराज्य - मनुष्य १
२१६ प्रलय - मनुष्य १
२१४ भक्त्यभिमान लोक - सत्कुल ६७

२०९ राजस अंहकार - मनुष्य १
२०६ ब्राह्मण अपमान - महानरक
२०३ पंचाग्नि पतन मार्ग - मनुष्य १
१९४ तपनाश - महानरक
१८७ जारणमारणादि - महानरक
१८२ बीभत्स आचरण - महानरक
१८० घोर पातके - महानरक
१७१ दक्षिणद्वार - महानरक
१६४ योगच्युत - सत्कुल ६७
१५५ गुरुद्रोह - जातमृत्यु २
१४७ विज्ञानवाद - क्षणिक वाद ७७
१४६ उपासनारहित कर्म - तमोभूमि ५६
१४४ सर्वास्तित्ववाद - नास्तिक्य २६
१४१ दुःस्वप्न - महानरक
१३९ उन्माद - प्रमाद ८५
१३७ परधनाभिलाष - महानरक
१३५ मूर्च्छा - शोक ५०
१२९ विषयानुराग - संग १०६
१२५ कुटुंबकलह - महानरक
११९ ब्रह्महत्या - महानरक
११७ वरिष्ठ आज्ञाभंग - महानरक
११५ ब्रह्मद्वेष - महानरक
१११ ब्रह्मविद्वेष - महानरक
१०८ भय - महानरक
१०६ संग - काम ७२
१०३ भेदभावना - महानरक
९६ पंचमहापातके - महानरक
९१ विद्याभिमान - पंचाभिमान ६५
८८ क्षुद्र पातके - महानरक
८४ कपट - महानरक
८० धर्मलोप - पापयोनि १२

७७ क्षणिकवाद - नास्तिक्य २६
७२ काम - क्रोध ६०
७० हर्ष - खेद ४
६४ धर्मपत्नीमनोभंग - महानरक
६० क्रोध - संमोह ३७
५८ पंक्ति प्रपंच - महानरक
५२ धर्मांतर - बुद्धिनाश ११
४८ हिंसा - महानरक
४६ संयमजन्यसिद्धिभोग - मनुष्य १
४४ आलस्य - निद्रा १४
४२ अन्यप्रति शापदान - सुकृतहानि १९
४० प्रजापीडन - महानरक
३७ संमोह - स्मृतिविभ्रम २३
३१ दुर्वासना - नास्तिक्य २६
२६ नास्तिक्य - महानरक
२३ स्मृतिविभ्रम - बुद्धिनाश ११
२१ पीडा - पापयोनि १२
१७ तामस अहंकार - दुःख १५
११ बुद्धिनाश - मरण

oooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooooo

श्रौतक्रीडाविशेष : मोक्षपट

स्थानांचा अनुक्रम

० महानरक
० क्षुद्रनरक
० महानरक
० मृत्यू उर्फ कबर
० महानरक
१. मनुष्य
२. जातमृत्यु
३. अविद्यादिदक्षा
४. खेद
५. उपनयन संस्कार
६. ब्रह्मचर्य
७. श्रद्धा
८. गृहस्थ
९. परोपकार
१०. दुष्कर्म
११. बुद्धिनाश
१२. पापयोनि
१३. श्रवण
१४. निद्रा
१५. दुःख
१६. वानप्रस्थ
१७. तामस अहंकार
१८. दहराद्युपासना
१९. सुकृत हानि
२०. वर्णाश्रम धर्म
२१. पीडा
२२. संन्यास
२३. स्मृतिविभ्रम
२४. कला
२५. उपासना
२६. नास्तिक्य
२७. सृष्टि उत्पत्ति
२८. मनन
२९. संपदतिसंपद उपासना
३०. निर्गुणोपासना
३१. दुर्वासना
३२. तीव्रमुमुक्षा
३३. बौध्य
३४. कीर्तन
३५. समन्वय
३६. पश्चात्ताप
३७. संमोह
३८. म्लेच्छमत
३९. अहंग्रहोपासना
४०. प्रजापीडन
४१. ध्यान
४२. अन्य प्रतिशापदान
४३. विद्याभ्यास
४४. आलस्य
४५. मुमुक्षुत्व
४६. संयमजन्यसिद्धि भोग
४७. स्मरण
४८. हिंसा
४९. पुण्य
५०. शोक
५१. साहस
५२. धर्मान्तर
५३. गौणी भक्ति
५४. गुरुवाक्यश्रद्धा
५५. अर्हन्मुक्ति
५६. तमोभूमि
५७. पंचमहायज्ञ
५८. पंक्ति प्रपंच
५९. तीव्र अनुताप
६०. क्रोध
६१. पादसेवन
६२. ऐन्दवसमप्रक्रिया
६३. सौभाग्य
६४. धर्मपत्नीमनोभंग
६५. पंथाभिमान
६६. शास्त्र
६७. सत्कुल
६८. अर्चन
६९. राजमंदिर
७०. हर्ष
७१. प्रायश्चित
७२. काम
७३. योग
७४. सत्कर्म
७५. भगवद्गुणश्रवण
७६. विवेक
०० शून्य लोक
७७. क्षणिकवाद
७८. सुखेच्छा
७९. वंदन
८०. धर्मलोक
८१. शुद्धि
८२. परोक्षज्ञान
८३. ज्ञान
८४. कपट
८५. प्रमाद
८६. संप्रज्ञान समाधि
८७. ब्राह्मण्य
८८. क्षुद्र पातके
८९. दास्य
०० बेहस्त लोक
९०. मातृपितृसेवा
९१. विद्याभिमान
९२. सख्य
९३. सत्समागम
९४. सद्गुरुसेवा
९५. भोगेच्छा

९६. पंचमहापातके
९७. तप
९८. चित्तशुद्धि
९९. नित्यकर्म
१००. धूममार्गादि
०० आत्मपरिभाण लोक
१०१. निदिध्यासन
१०२. ज्ञानेश्वरी
१०३. भेदभावना
१०४. कर्मसमुच्चिदुपासनालोक
१०५. गो-ब्राह्मण रक्षण
१०६. संग
१०७. अतिथिसत्कार
१०८. भय
१०९ विवेकख्याति
११०. पातिव्रत्य
१११. ब्रह्मविद्वेष
११२. प्राणोपासना
११३. शतजन्म ब्रह्मकर्मसमुच्चय
११४. अपर वैराग्य
११५. ब्रह्मद्वेष
११६. पंढरी
११७. वरिष्ठ आज्ञाभंग
११८. पंचमार्ग
११९. ब्रह्महत्या
१२०. काशी
१२१. मानुषानंद
१२२. गोदा नदी
१२३. जय
१२४. यज्ञ
१२५. कुटुंब कलह
१२६. कमलासन
१२७. बद्रिकेदार गंगा हिमालय
१२८. श्रीज्ञानेश्वरचरणोदक तीर्थ
१२९. विषयानुराग
१३०. पातंजलयोग
१३१. वेदाध्ययन
१३२. योगवासिष्ठ
१३३. असंप्रज्ञातसमाधि
१३४. वैशेषिक
१३५.मूर्च्छा
१३६. परवैराग्य
१३७. परधनाभिलाष
१३८. पंचाग्नि उपासना
१३९. उन्माद
१४०. यमादिधारणान्त षडंग
१४१. दुःस्वप्न
१४२. न्याय
१४३. कापिल सांख्य
१४४. सर्वास्तित्ववाद
१४५. राधादिव्रजगोपिका माधुर्यभक्ति

१४६. उपासनारहित कर्म
१४७. विज्ञानवाद
१४८. पाणिनीय लोक
१४९. ज्ञान,वैराग्य,विरक्ति,उपरति
१५०. मथुरा
१५१. रमणीय स्थान
१५२. जागृति
१५३. चतुर्धाम तीर्थ
१५४. गोकुल
१५५. गुरुद्रोह
१५६. वृंदावन
१५७. सुस्वप्न
१५८. अयोध्या
१५९. कर्मरहित उपासना
१६०. मांडूक्यगतनिवृत्त प्रणवोपासना
१६१. हरिद्वार
१६२. प्रयाग
१६३. मुद्रालोक
१६४. योगच्युत
१६५. विरोध भक्ति
१६६. परमहंस
१६७. अर्चिरादि मार्ग
१६८. विशिष्टाद्वैतादि श्रुतिविरुद्धधर्मपरमेश्वर स्वीकार
१६९. भागवत
१७०. वरुण
१७१. दक्षिणद्वार
१७२. तदितरदान
१७३. यमलोक
१७४. पंचकोश विवेक
१७६. मनुष्य गंधर्वानंद
१७७. वायु
१७८. अग्नि
१७९. पैशाच लोक
१८०. विनायक लोक
१८२. घोर पातके
१८३. एकत्र त्रयाभ्यास
१८४. बीभत्स आचरण
१८५. राक्षस लोक
१८६. कुंडलिनी
१८५. देवद्वेष
१८६. यक्षलोक
१८७. जारणमारणादि
१८८. पितृ लोक
१८९. पित्रानंद
१९०. गणपत्यथर्वशीर्षोपासना
१९१. गंधर्व लोक
१९२. देव गंधर्वानंद
१९३. अप्सरोपभोग
१९४. तपनाश
१९५. प्रस्थानत्रय

१९६. अजानजदेवानंद
१९७. अर्ध्यप्रदानादित्यहृदयादि दैविक सूर्य उपासना
१९८. सूर्य लोक
१९९. चंद्र लोक
२००. कर्म देवानंद
२०१. इंद्र लोक
२०२. नंदनवन
२०३. पंचाग्निपतन मार्ग
२०४. व्यतिरेकान्वय
२०५. स्थान कलह
२०६. ब्राह्मण अपमान
२०७. अणिमादि ऐश्वर्यभोग
२०८. बृहस्पति लोक
२०९. राजस अहंकार
२१०. गायत्री उपासना
२११. ज्योतिर्लोक
२१२. ब्रह्म महिमान लोक
२१३. श्रुति महिमान लोक
२१४. सत्त्वाभिमान लोक
२१५. आत्मनिवेदन
२१६. प्रलय
२१७. जीव ब्रह्मैक्य
२१८. विरोचनी विद्याग्रह
२१९. प्रजापति लोक
२२०. प्रजापतिविद्यावच्छिन्नेदं प्रतीति
२२१. दक्ष लोक
२२२. नानाविध प्रजापति लोक
२२३. ब्रह्मवित्संप्रदाय
२२४. सप्तर्षि लोक
२२५. ब्रह्मर्षि लोक
२२६. देवर्षि लोक
२२७. प्रवृत्त्यवछिन्न प्रणवोपासना
२२८. प्रकाश लोक
२२९. आराज्य
२३०. साम्राज्य
२३१. भौज्य
२३२. स्वाराज्य
२३३. वैराज्य
२३४. कल्पनोत्थान
२३५. पारमेष्ठ्य
२३६. मोक्ष (*)
२३७. पर्यंक (*) (ब्रह्मदेवाचे स्थान)
२३८. उमालोक
२३९. पशुपतिलोक
२४०. परोपास्यद्रोह
२४१. विष्णु लोक
२४२. मुनिमान भंग
२४३. उमापतिलोक (*)
२४४. स्व-स्वागमाग्रह
२४५. क्षीराब्धि
२४६. अवतार

२४७. गो लोक (*)
२४८. भक्तजनकलहावच्छिन्न परस्पर शापदान
२४९. तम
२५०. मिश्रसत्त्वगुण
२५१. मोह लोक
२५२. दुःखध्वंस
२५३. महामोह लोक
२५४. तामिस्त्र लोक
२५५. एकविंशति दुःख नाश
२५६. अंधतामिस्त्र लोक
२५७. अत्यंत दुःखनिवृत्ति
२५८. क्लेशहानि
२५९. मूला विद्या
२६०. माया
२६१. सोहं वस्तु
२६२. शुद्ध सत्त्व
२६३. भागवद्भक्ति अभाव
२६४. कूटस्थ ध्यान
२६५. वेदान्त लोक
२६६. उन्मनि
२६७. शुद्ध भास्कर
२६८. महागणपति
२६९. आदिशक्ति
२७०. परमशिव लोक
२७१. आदि वैकुंठलोक
२७२. निर्गुणस्थान
२७३. तुर्या
२७४. गुणातीतत्त्व
२७५. तुर्यातीत्व
२७६. सृ॒दानंद
२७७. परा भक्ति
२७८. शोकनिवृत्ति
२७९. भूमा
२८०. अमृतानुभव सिद्धानुवाद
२८१. श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वर अभयदान
२८२. निश्चित मुक्ति
२८३. जीवन्मुक्ति
२८४. विदेहमुक्ति
२८५. निष्क्रीयतावच्छिन्न अद्वैतज्ञानगत सहजभक्ति

;;;